
# यातनांवर विजय

रिचर्ड वर्मब्रँड



# यातनांवर विजय

लेखक

**रिचर्ड वर्मब्रँड**

अनुवादक

**विश्वनाथ गोठोस्कर**

**THE LOVE IN ACTION SOCIETY**
P.O. Box 4532, New Delhi 110016

# TORTURED FOR CHRIST
**MARATHI**

RICHARD WURMBRAND

1986
Copies 5000

© Richard Wurmbrand

Printed and Published by Dr. P.P. Job, Post Box No. 4532
V-31, Green Park, New Delhi-110 016, For the Love in Action
Society at Sabina Printing Press, India.

# लेखकासंबंधी थोडेसे

रेव्ह. रिचर्ड वर्मब्रँड हे एक सुवार्तिक पाळक आहेत. त्यांच्या मायदेशातच–रुमानियात–त्यांनी चौदा वर्षे कॉम्युनिस्टांच्या तुरुंगात यातना भोगल्या. रुमानियामधील एक सुप्रसिद्ध ख्रिस्ती पुढारी, ग्रंथकार व शिक्षक म्हणून ते नावाजलेले आहेत. तेथील आबालवृद्धांना त्यांचे नाव माहीत आहे.

इ. सन १९४५ मध्ये कॉम्युनिस्टांनी रुमानिया देश बळकावला व आपल्या हेतूसाठी तेथील मंडळचाही काबीज करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रेव्ह. वर्मब्रँड यांनी गुलाम बनलेल्या देशबांधवांमध्ये व छळ करणाऱ्या रशियन सैनिकांमध्ये सेवाकार्य सुरू केले. हे सेवाकार्य प्रभावी व परिणामकारी होतेच पण विशेष म्हणजे ते " भूमिगत " होत होते.

पुढे १९४८ मध्ये ते व त्यांची पत्नी साबिन या दोघांनाही पकडण्यात आले. त्यांच्या पत्नीला तीन वर्षेपर्यंत गुलामगिरीत काबाडकष्टाची कामे करावी लागली. रिचर्ड वर्मब्रँड यांना तीन वर्षे तुरुंगवासात एकाकी काढावी लागली. या काळात त्यांचा छळ करणाऱ्या कॉम्युनिस्टांशिवाय त्यांना कोणीच भेटू शकले नाही. या काळानंतर त्यांना एका मोठ्या कोठडीत हलवण्यात आले. तेथे इतरही कैदी होते. या ठिकाणी त्यांचा पाच वर्षेपर्यंत छळ झाला.

ख्रिस्ती पुढारी म्हणून ते आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नावाजलेले होते. यामुळेच परदेशीय वकिलांनी त्यांनी सुरक्षित राहावेत म्हणून कॉम्युनिस्ट सरकारजवळ आपले वजन खर्च केले. त्यांनी रुमानियातून पलायन केले असे या वकिलांना सांगण्यात आले. आपण त्यांच्याबरोबरचे पण मुक्त झालेले कैदी आहोत असे भासवून गुप्त पोलीस त्यांच्या पत्नीला भेटले व आपण तुरुंगामध्ये त्यांच्या अल्पसंस्काराच्या वेळी हजर होतो असे त्यांनी तिला सांगितले. आता ते मरण पावले आहेत तेव्हा त्यांना विसरा असे रुमानियामधील त्यांच्या कुटुंबियांना व देशोदेशींच्या मित्रांना सांगण्यात आले.

आठ वर्षांनी त्यांना सोडले. लगेच त्यांनी आपल्या " भूमिगत मंडळीचे " कार्य जोमाने पुन्हा सुरू केले. दोन वर्षांनी १९५८ मध्ये त्यांना पुन्हा पकडून २५ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली.

१९६४ मध्ये बऱ्याच कैद्यांना सार्वत्रिक माफी देण्यात आली तेव्हा त्यांची सुटका झाली. पुन्हा त्यांनी आपले पूर्वीचेच कार्य सुरू केले. आता त्यांना पुन्हा तिसऱ्यांदा तुरुंगवास भोगावा लागेल या भीतीने नॉर्वेमधील ख्रिस्ती लोकांनी कॉम्युनिस्ट अधिकाऱ्यांशी त्यांना रुमानियातून बाहेर पाठवण्यासंबंधी बोलणी सुरू केली. यावेळी कॉम्युनिष्ट अधिकाऱ्यांनी त्यांच्या राजकीय कैद्यांची " विक्री " सुरू केली होती. साधारण कैद्याची किंमत १६००० रुपये होती. रेव्ह. वर्मब्रँड यांची किंमत ५०००० रुपये एवढी होती.

मे १९६६ मध्ये वॉशिंग्टन येथे अमेरिकन सेनेटच्या अंतर्गत सुरक्षा उपसमितीपुढे त्यांनी आपली सर्व हकीकत सांगितली. त्यावेळीच त्यांनी आपले शरीर कंबरेपर्यंत उघडे करून यातनांच्या खुणा अशा अठरा मोठ्या जखमांचे व्रण दाखविले. अमेरिका, युरोप व आशिया या खंडांतील सर्व वृत्तपत्रांतून हे वृत्त जगभर प्रसिद्ध झाले. रुमानियामधील कॉम्युनिस्ट सरकारने त्यांचा वध करण्याचा निर्णय घेतला आहे अशी धमकी त्यांना सप्टेंबर १९६६ मध्ये देण्यात आली. अशा धमक्या मिळूनही ते गप्प न बसता आपले कार्य चालवीतच आहेत. " भूमिगत मंडळीचा आवाज " असे त्यांचे वर्णन करतात. ख्रिस्ती पुढारी त्यांना " जिवंत हुतात्मा व पोलादी पडद्याआडचा प्रेषित पौल " असे म्हणतात.

# दोन शब्द

(रेव्ह. डब्ल्यू स्टुअर्ट हॅरिस, एफ.आर.जी.एस., जेनरल डायरेक्टर, युरोपीअन ख्रिश्चन मिशन.)

डिसेंबर १९६४ मध्ये मी प्रथमच रुमानियात गेलो. यापूर्वी अल्बानिया वगळून मी भेट न दिलेला रुमानिया हा युरोपमधला एकच देश होता. मी तेथं जावे अशी देवाची इच्छा काही महिन्यांपूर्वी मला स्पष्टपणे कळली होती. रेव्ह. जॉन मोसली यांच्यासह मी हंगेरीतून जाण्यासाठी सीमा ओलांडली.

आम्ही एका कॉम्युनिस्ट देशात आल्याची लगच जाणीव झाली, कारण तेथील अधिकारी आमच्यावर डोळ्यात तेल घालून पाळत ठेवीत होते. तरीही तेथील विश्वासणाऱ्यांनी आमचे सहर्ष स्वागत केले. आगमन-समयातील पहिल्या रविवारी आम्ही बुखारेंस्ट येथील जर्मन बॅप्टिस्ट चर्चमध्ये गेलो तेथे आम्हां दोघांनाही संदेश देण्यास व साक्ष देण्यास सांगण्यात आले. सभेच्या शेवटी अनेकजण आम्हांला भेटले. या लोकांत एक उंच माणूस होता. त्याचा फिकट चेहरा उत्साहाने व कुतुहलाने भर-लेला होता. त्याला आमच्याशी बोलण्याची इच्छा होती. आम्ही त्याच्या घरी यावे, त्यातील संभाव्य धोका पत्करण्यास तो तयार आहे असे त्याने आम्हांला सांगितले. त्याच रात्री उशीरा–सुमारे १० वाजता–आम्ही तिकडे गेलो. याच घराच्या वरच्या मजल्यावरील लहानशा पोटमाळ्यावर रिचर्ड वर्मब्रँड, त्यांची पत्नी व त्यांचा मुलगा मिहाई हे राहात होते.

आम्ही सावधपणे तेथे गेलो. या पाळकाविषयी मी खूपच ऐकले होते. आता प्रत्यक्ष माझ्याशी बोलताना त्यांनी आपल्या चौदा वर्षांच्या तुरुंगवासाची हकीकत सांगितली. त्यांचे अनुभव जितके रोमांचक होते तितकीच त्यांची सुटका आश्चर्यजनक होती. मग प्रथम त्यांचा मुलगा व नंतर त्यांची पत्नी साबिन बाहेर रस्त्यावर पाहणी करण्यास गेले. त्यांनी परत येऊन सांगितले की, घराला पोलिसांनी वेढा दिला असून घरासमो-रच त्यांची मोटार उभी आहे. किती वेळ त्यांचा वेढा चालणार होता? शेवट काय होणार होता? काहीच कळत नव्हते. रिचर्ड वर्मब्रँडनी

आपली हकीकत संपवली. नंतर आम्ही प्रार्थना केली. ही प्रार्थना-सभा चिरस्मरणीय ठरली, कारण यावेळी आम्ही देवाने त्याच्या सेवकांचे रक्षण करावे यासाठी आळवणी करीत होतो. त्यांच्या शरीरावरील यातनांच्या खुणा आम्ही पाहिल्या होत्या. त्या काळातील क्रूर यातनांची, जीवघेण्या छळाची आता पहिल्यानेच आम्हांला प्रचिती येत होती. त्याबरोबरच तुरुंगवास, छळ, यातना यांच्या या कटु कहाणीतून वैभवी तेज व प्रीती यांचा प्रकाशही ओसंडत होता. देवाने प्रार्थना ऐकल्या. आम्ही रस्त्यावर आलो तर पोलिस गेले होते ! हीच या देवाच्या कुटुंबाची आणि आमची पहिली भेट. येशू ख्रिस्ताचे असे धैर्यवान, शूर साक्षीदार आम्ही पाहिले. या भेटीमुळे आम्ही संपूर्ण बदलून गेलो आहोत असे आम्हां दोघांनाही वाटले. या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यामध्ये मला स्वत:चा फार मोठा मान झाला असेच वाटत आहे. ही प्रस्तावना लिहिताना मी मनोमन एकच प्रार्थना कळकळीने करीत आहे की, देवाने असंख्य लोकांच्या हृदयात असे कार्य करावे की, या पूर्व युरोपीय देशांतील लोकांवर त्यांनी प्रीती करावी, येशू ख्रिस्ताच्या नावासाठी यातना सहन करणाऱ्या अनेकांना साह्य करण्यास त्यांनी प्रवृत्त व्हावे, व ख्रिस्ताच्या क्लेशातले जे उरले ते त्यांनी "आपल्या देहाने त्याचे शरीर जी मंडळी तिच्यासाठी भरून काढावे."

# अर्पण पत्रिका

रेव्ह. डब्ल्यू. स्टुअर्ट हॅरिस, युरोपियन ख्रिश्चन मिशन,लंडन, याचे जेनरल डायरेक्टर, १९६४ मध्ये मी तुरुंगातून सुटल्यावर माझ्या घरी येऊन मला भेटले. पश्चिमेकडील ख्रिस्ती लोकांचा संदेश घेऊन येणारे तेच पहिले होते. रात्रीच्या वेळी पुष्कळ सावधगिरी घेऊन ते आमच्या घरी आले. त्यांनीच आम्हांला प्रेमाचे व सांत्वनाचे पहिले शब्द ऐकवले आणि ख्रिस्तासाठी हुतात्मा झालेल्यांच्या कुटुंबियांसाठी प्रथम साह्य त्यांनीच आणले.

त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यासाठी हे पुस्तक त्यांनाच अर्पण करीत आहे.

# दोन शब्द

## ह्या पुस्तकाचे प्रयोजन

पोलादी पडद्यामागील "भूमिगत मंडळी" चा हा संदेश मी प्रत्येक स्वतंत्र ख्रिस्ती व्यक्तीला देत आहे.

कित्येक वर्षे मी या भूमिगत मंडळीचा पुढारी होतो. मी बाहेरच्या स्वतंत्र जगात हरप्रयत्नांनी जावे व हा तातडीचा संदेश तुम्हा सर्वांना द्यावा असे या मंडळीने ठरविले. कल्पनाही करवणार नाही असा महान चमत्कार घडला. या चमत्काराविषयी तुम्ही या पुस्तकात वाचालच. मी जगलो आणि स्वतंत्र जगात आलो. या पुस्तकामध्ये दिलेला संदेश, कॉम्युनिस्ट प्रदेशात हालअपेष्टा, यातना सोसणाऱ्या भूमिगत मंडळीने माझ्यावर सोपवून दिला.

भूमिगत मंडळीच्या या संदेशाला तुम्ही त्वरित पूर्णपणे प्रतिसाद द्यावा यासाठी प्रथम मी माझी साक्ष देऊन पुढे भूमिगत मंडळीच्या कार्याविषयी सांगितले आहे.

# यातनांवर विजय

## प्रकरण पहिले

### एका नास्तिकाला ख्रिस्त सापडतो

मी वाढलो त्या कुटुंबात धर्म ही काय चीज आहे हे ठाऊक नव्हते. लहानपणी मला कसलेच धर्मशिक्षण मिळाले नाही. वयाच्या चौदाव्या वर्षी मी अगदी कट्टर नास्तिक बनलो होतो. याला कारण म्हणजे माझे खडतर बाळपण ! अगदी लहान वयातच मी पोरका झालो; तसेच पहिल्या महायुद्धाच्या वेळची बिकट दैन्यावस्थाही मी त्याच काळात अनुभवली. आजचे कॉम्युनिस्ट जसे पक्के कट्टर नास्तिक आहेत तसाच मीही वयाच्या चौदाव्या वर्षी होतो. नास्तिक मताची पुस्तके मी वाचली होती. देव अगर ख्रिस्त यांच्यावर माझा विश्वास नव्हता असे नाही... तर या कल्पनाच मुळी मानवी मनाला धोकादायक आहेत ही माझी खात्री होती. याप्रमाणे धर्मद्वेषातच मी वाढलो.

देवाचा निवडलेला होण्यासाठी मला कृपा मिळाली हे मला पुढे समजले. याचे कारण काय ते मात्र मला समजत नाही. मात्र या गोष्टीचा संबंध माझ्या स्वभावांशी नव्हता हे निश्चित, कारण मी अतिशय वाईट होतो.

मी नास्तिक असूनही मला उपासनामंदिराविषयी अकारण ओढ वाटे. असे का, याचे सयुक्तिक कारण मात्र काहीं कळत नसे. एखाद्या उपासनामंदिराजवळून मी जाऊ लागलो तर आत जाण्याची इच्छा मला कधीच टाळता आली नाही. मात्र,या मंदिरात काय चाले हे मला कधीही समजले नाही. तेथले उपदेश मी ऐके पण त्यांमुळे माझ्या मनावर

मात्र काही परिणाम होत नसे. देव नाहीच अशी माझी पूर्ण खात्री होती. देव हा कोणी मालक व त्याचे हुकूम आपण पाळायचे ही कल्पनाच मला पटणारी नव्हती. माझ्या मनात ही जी देवाविषयी चुकीची कल्पना होती तिचा मी द्वेष करी. मात्र या विश्वाच्या केंद्रस्थानी कोठेतरी एखादे प्रेमपूर्ण अंत:करण असेल तर त्याचा शोध घ्यावा असे मला वाटे. बालवय व तरुणवय यांतील रम्य आनंदाला मी पारखाच झालो होतो माझ्यावर प्रेम करणारे, माझी काळजी करणारे असे प्रेमळ अंत:करण जगात कोठेतरी असेल का ? असावे, ते आपणाला मिळावे अशी माझी उत्कट इच्छा होती.

देव नाही हे मला माहीत होते; त्याबरोबरच प्रेममय देव अस्तित्वातच नाही याचे मला अत्यंत दु:ख होई. असाच एकदा द्विधा मन:स्थितीत असताना मी एका कॅथोलिकांच्या उपासनामंदिरात गेलो. तेथे पाहिले तो लोक गुडघे टेकून तोंडाने काहीतरी म्हणत होते. आपणही त्यांच्यासारखेच, त्यांच्याजवळ गुडघे टेकून बसावे, ते म्हणतात ते शब्द ऐकावे, तसेच म्हणावे व काय होते ते पाहावे अशी मला इच्छा झाली. ते पवित्र कुमारीची प्रार्थना करीत होते: "नमो मरीया, तू कृपेने भरलेली," हे शब्द मी सर्वांबरोबर पुन्हापुन्हा म्हटले, कुमारी मरीयेच्या पुतळ्याकडे पाहिले, पण काहीच घडले नाही. मला फार वाईट वाटले.

देव नाहीच अशी माझी पुरी खात्री होती, तरीपण एके दिवशी मी देवाची प्रार्थना केली. मी केलेली प्रार्थना साधारणपणे अशी होती : " हे देवा, तू अस्तित्वात नाहीसच अशी माझी पूर्ण खात्री आहे. पण न जाणो तू असलासच–असणार नाहीसच–तर तुझ्यावर विश्वास ठेवणे हे माझे कर्तव्य नाही, तू स्वत:ला प्रकट करून मला दाखवणे हे तुझेच कर्तव्य आहे. " मी नास्तिक होतो पण नास्तिकतेमुळे माझ्या अंत:करणाला काही शांती लाभली नाही.

हे माझे आत्मिक द्वंद्व चालू असतानाच रुमानियामधील डोंगरमाथ्यावरील एका खेड्यातील एका म्हाताऱ्या सुताराने प्रार्थना केली : ( ही गोष्ट मला नंतर समजली. ) " माझ्या देवा, मी या पृथ्वीवर तुझी सेवा केली आहे या सेवेचे फळ मला स्वर्गात, तसेच पृथ्वी-

वरही मिळावे अशी माझी इच्छा आहे. ख्रिस्त यहूदी लोकांतून आला म्हणून एका तरी यहूद्याला मी ख्रिस्ताकडे आणावे, त्याशिवाय माझा मृत्यू होऊ नये हेच बक्षीस मला हवे. पण मी गरीब आहे, वृद्ध झालो आहे, आजारी आहे. आजूबाजूला जाऊन यहूदी माणसाचा शोध करणे मला अशक्य आहे. या माझ्या गावातही कोणी यहूदी नाही. आता तूच या गावात एक यहूदी माणूस येईल असे कर व मी त्याला ख्रिस्ताकडे आणण्याचा प्रयत्न करीन."

काही अदृश्य, अटळ शक्तीनेच जणू मी त्या गावाकडे ओढला गेलो. वास्तविक तेथे माझे काहीही काम नव्हते. रुमानियामध्ये बारा हजार खेडी आहेत पण मी याच खेडेगावात गेलो. मी यहूदी आहे हे पाहून तो सुतार माझा इतका अनुनय करू लागला की, तसा कोणी एखाद्या सुंदर तरुणीचाही केला नसेल ! मी म्हणजेच त्याच्या प्रार्थनेचे उत्तर होतो. त्याने मला पवित्रशास्त्र वाचावयास दिले. संस्कृती जाणून घेण्याच्या उद्देशाने यापूर्वी अनेकवार मी पवित्रशास्त्र वाचलेच होते. पण त्याने दिलेले हे पवित्रशास्त्र अगदी वेगळेच होते. त्यानेच मला नंतर सांगितले की माझा व माझ्या पत्नीचा पालट व्हावा, यासाठी तो व त्याची पत्नी दोघांनीही तासन्तास एकत्र प्रार्थना केली होती. मला दिलेल्या त्या पवित्रशास्त्रातील अक्षरे साधी नव्हती, ती होती त्याच्या प्रार्थनेने प्रज्वलित झालेल्या प्रीतीज्योतींची अक्षरे ! ते वाचणे मला शक्यच नव्हते, कारण मला रडू कोसळले होते. त्या अनुतप्त अवस्थेतच मी माझ्या दुष्ट जीवनाची येशूच्या जीवनाशी तुलना केली, माझी अशुद्धता, त्याची शुद्धता, माझी द्वेषबुद्धी, त्याची प्रीती, या सर्वांची तुलना करू लागलो, आणि त्याने माझा एक स्वकीय या नात्याने स्वीकार केला.

थोड्याच काळाने माझ्या पत्नीचाही पालट झाला. तिने दुसरे आत्मे ख्रिस्ताकडे आणले आणि अशा प्रकारे रुमानियामध्ये एक नवी लूथरन ख्रिस्ती मंडळी वाढू लागली.

पुढे नाझी लोकांचे प्राबल्य वाढले. आम्हांला पुष्कळ हाल सोसावे लागले. रुमानियामध्ये नाझी शाहीने कट्टर हुकुमशाहीचे स्वरूप धारण केले, व यहूदी तसेच प्रॉटेस्टंट मंडळ्या दोघांचाही सारखाच छळ चालू केला.

माझी दीक्षा व सेवेसाठी तयारी होण्यापूर्वीच मी या मंडळीचा पुढारी होतो, कारण मी या मंडळीचा संस्थापक होतो. या मंडळीची सर्व जबाबदारी माझ्यावर होती. मला आणि माझ्या पत्नीला अनेकवार ओढून नाझी न्यायाधीशासमोर उभे करण्यात आले, अनेकदा पकडण्यात आले, अनेकदा मारहाण करण्यात आली. नाझी लोकांची ही दहशत भयंकर तर होतीच पण ही कॉम्युनिस्टांच्या कारकीर्दीत होणाऱ्या यातनांची केवळ चुणूक होती. माझा मुलगा मिहाई याचा वध होऊ नये म्हणून त्याला यहूदी नाव न ठेवता दुसरेच ठेवले होते. या नाझी राजवटीने आम्हांला एक गोष्ट मात्र शिकवली. त्यांनी आम्हांला शारीरिक यातना, मारहाण सहन करण्याची सवय लावली; देवाच्या साहाय्याने मानवी आत्म्याला भयानक यातनाही सहन करता येतात हेही त्यांनीच शिकविले. हा मोठाच फायदा होता. गुप्तपणे ख्रिस्ती सेवा करण्याचे तंत्रही त्यांनीच शिकवले आणि येणाऱ्या भयंकर दिव्याला तोंड देण्यासाठी आमची तयारी केली. हे दिव्य आमच्यापुढे लगेच उभे ठाकले होते.

## रशियन लोकांमधील माझी सेवा

कित्येक काळ मी नास्तिक होतो. त्याचे मला फार दुःख वाटे म्हणूनच माझा पालट झाल्या दिवसापासूनच रशियन लोकांना साक्ष देण्याची माझी उत्कट इच्छा होती. रशियन लोकांना अगदी लहानपणापासून नास्तिकतेचे बाळकडू पाजलेले असते. रशियन लोकांना साक्ष देण्याचा माझा मनोरथ पूर्ण झाला. त्याची सुरुवात तर नाझी काळातच झाली, कारण त्यावेळी रुमानियामध्ये हजारो रशियन युद्धकैदी होते. त्यांच्यामध्ये आम्ही ख्रिस्ताचे कार्य करीत होतो.

हे कार्य नाटयपूर्ण, भावना हेलावणारे असे होते. एका रशियन कैद्याशी झालेली माझी पहिली भेट मी कधीच विसरणार नाही. आपण इंजिनिअर आहो असे त्याने मला सांगितले. " तुमचा देवावर विश्वास आहे का ?" असे मी त्याला विचारले. त्याने सरळ " नाही " असे म्हटले असते तर मला काही विशेष वाटले नसते, कारण विश्वास ठेवणे वा न ठेवणे हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. जेव्हा मी " तुम्ही

देवावर विश्वास ठेवता का?" असे विचारले तेव्हा त्याने शून्यपणे माझ्याकडे पाहिले व म्हटले, " विश्वास ठेव, असा सैनिकी हुकूम मला मिळालेला नाही. असा हुकूम मिळाला तर मी विश्वास ठेवीन."

मला एकदम रडूच कोसळले. माझे अंतःकरण शतशः विदीर्ण होत आहे असे मला वाटले. माझ्यासमोर हा मन मेलेला माणूस उभा होता. देवाने मानवाला व्यक्ती बनण्याची जी मोठी देणगी बहाल केली आहे तीच हा माणूस हरवून बसला होता. आता हा माणूस कॉम्युनिस्टांच्या हातातले बाहुले–यंत्र–बनला होता. हुकुमाप्रमाणे वागणारा–त्याच्या मनाची स्वतंत्र विचारशक्ती संपूर्णतः मारून टाकण्यात आली होती. इतक्या वर्षांच्या कॉम्युनिस्ट सत्तेच्या प्रभावाचे फळ म्हणजेच हा रशियन माणूस ! कॉम्युनिझमने माणसांना कसे हीनकोटीला नेले हे पाहून मला धक्काच बसला. लगेच मी देवाला वचन दिले की माझे संपूर्ण आयुष्य मी याच लोकांसाठी अर्पण करीन. यांना व्यक्तिमत्त्व मिळवून देण्यासाठी पुन्हा त्यांना ख्रिस्त व देव यांवरील विश्वास मिळवून देण्यासाठी मी सतत कार्य करीत राहीन.

रशियन लोकांमध्ये जाऊन कार्य करण्यासाठी मला काही रशियाला जावे लागले नाही.

२३ ऑगस्ट १९४४ या दिवसापासूनच रुमानियामध्ये रशियन सैनिक येऊ लागले. साधारण दहा लाख सैनिक आले. यानंतर लगेच सर्व देश कॉम्युनिस्टांनी ताब्यात घेतला, आणि एका भयानक स्वप्नाची सुरुवात झाली. त्याच्यापुढे नाझी काळातील छळ अगदी सामान्य वाटू लागला.

रुमानियाच्या त्यावेळच्या एक कोट ऐंशी लाख संख्येपैकी फक्त दहा हजार लोकच कॉम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते; पण विशिन्स्की हा सोव्हिएट युनियनच्या परदेश व्यवहाराचा सचीव, आमचे प्रिय राजे पहिले मायकेल यांच्या कचेरीत बळजबरीने घुसला. राजेसाहेबांच्यापुढे टेबलावर मुठी आपटून तो म्हणाला, "तुम्ही कॉम्युनिस्ट लोकांचे सरकार बनवलेच पाहिजे."

आमचे सैनिक व पोलीस नि:शस्त्र करण्यात येऊन हिंसात्मक मार्गांनी कॉम्युनिस्टांनी सत्ता बळकावली. सर्वचजण त्यांचा द्वेष करीत होते. त्यावेळचे अमेरिकन व ब्रिटीश राज्यकर्त्यांचे त्यांना या कामी साहाय्य होतेच.

देवासमोर माणसाला फक्त स्वत:च्या वैयक्तिक पापांचाच हिशेब द्यावयाचा असतो असे नाही; प्रत्येक माणूस राष्ट्रीय पातकांनादेखील जबाबदार आहे. बंधनात पडलेल्या राष्ट्रांच्या या शोकांतिकेची जबाबदारी अमेरिकन व ब्रिटिश ख्रिस्ती लोकांवर आहे हे विसरून चालणार नाही. खून व दहशत यांनी भरलेली रशियन राजवट आमच्यावर लादण्याच्या कामी अजाणतेपणी का असेना,अमेरिकन लोकांनी रशियनांना साहाय्यच केले आहे. बंधनात पडलेल्या लोकांना ख्रिस्ताच्या प्रकाशात आणण्यासाठी मदत करून अमेरिकन लोकांना प्रायश्चित्त घेता येईल.

## प्रेमाची भाषा आणि फसवणुकीची भाषा एकच आहे

कॉम्युनिस्ट सत्तेवर आल्यावर त्यांनी मंडळीमध्ये फूट पाडण्यासाठी प्रलोभनांचा वापर सुरू केला. प्रेमाची भाषा आणि फसवणुकीची भाषा दोन्ही सारख्याच मधुर असतात. एखादा मनुष्य एखाद्या मुलीला लग्नाबद्दल विचारताना अगर दुसरा एखादा रात्रभर मजा करून दुसऱ्या दिवशी तिला नाकारण्याच्या इच्छेने बोलताना सारखेच शब्द वापरतात—" माझे तुझ्यावर प्रेम आहे." /" प्रेमाची भाषा आणि फसवेगिरीची भाषा यांतला फरक ओळखा " असे येशूने आम्हांला सांगितले आहे. तसेच मेंढयाचे कातडे पांघरलेले लांडगे व खरी मेंढरे यांनाही ओळखण्यास त्याने सांगितले.

मात्र कॉम्युनिस्टांनी सत्ता काबीज केली तेव्हा हजारो धर्मोपदेशक, पाळक व सुवार्तिक यांना या दोन भाषांतला फरक समजत नव्हता.

कॉम्युनिस्टांनी आमच्या लोकसभागृहामध्ये सर्व ख्रिस्ती मंडळयांच्या अधिकाऱ्यांचे एक संमेलन भरवले. वेगवेगळ्या मंडळयांचे पाळक,सुवार्तिक व कार्यकर्ते असे चार हजार लोक तेथे जमले. या संमेलनासाठी जोसेफ स्टालिनची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी ते जाग-

तिक नास्तिक सभेचे अध्यक्ष होते आणि असंख्य ख्रिस्ती लोकांचा संहारक म्हणूनही त्यांची प्रसिद्धी होती. या संमेलनात बिशप, पाळक यांनी एकामागे एक अशी अनेक भाषणे करून सांगितले की, ख्रिस्ती धर्म व कॉम्युनिझम दोन्ही मुळात एकच आहेत व दोन्ही एकत्र राहू शकतील. अनेक सुवार्तिकांनी कॉम्युनिझमची स्तुती करून नव्या सर-कारावर मंडळ्यांची निष्ठा व्यक्त केली.

मी माझ्या पत्नीसह या संमेलनाला उपस्थित होतो. माझ्याजवळ बसलेली माझी पत्नी मला म्हणाली, " रिचर्ड, उठा आणि ख्रिस्त-मुखाला लागणारा हा काळिमा दूर करा. हे लोक पुन्हा त्याच्या तोंडा-वर थुंकत आहेत." मी तिला म्हटले, "मी असे केले तर माझी धडगत नाही." "काही हरकत नाही –मलाही भित्रा पती नकोच आहे !"

मग मी उठून उभा राहिलो आणि संमेलनाला उद्देशून भाषण केले. माझ्या भाषणात मी ख्रिस्ती लोकांच्या खुन्यांची प्रशंसा केली नाही. ख्रिस्त व देव यांच्याविषयी मी बोललो आणि आमची निष्ठा प्रथम ख्रिस्तावर व देवावर आहे हे स्पष्ट केले. या संमेलनातील सर्व भाषणे ध्वनिक्षेपित केली होती. या कॉम्युनिस्टांच्या व्यासपीठावरून दिलेला हा ख्रिस्ताचा संदेश देशातील हजारोंनी ऐकला; मात्र याची किंमत मला पुढे द्यावी लागली, पण कार्याच्या मानाने किंमत काही विशेष नव्हती.

सनातनी तसेच प्रॉटेस्टंट मंडळ्यांच्या पुढाऱ्यांत कॉम्युनिझमचा स्वीकार करण्याची जणू स्पर्धाच चालली होती. एका सनातनी बिशपने तर आपल्या झग्यावर "विळा हातोडा" हे चिन्ह काढले व आपल्या पाळ-कांना सांगितले, "येथून पुढे माझ्याशी बोलताना ' बिशपसाहेब' असे म्हणू नका मला आता भाई (कॉमरेड) बिशप' असे म्हणा." रेझिटा गावात बॅप्टिस्ट ख्रिस्ती लोकांची सभा भरली तेथे मी होतोच. या सभेसाठी लाल निशाण फडकवले होते; सोव्हिएट युनियनचे राष्ट्रगीत म्हणण्यात आले त्यावेळी सर्वजण उठून उभे राहिले होते. बॅप्टिस्ट सभेच्या अध्यक्षांनी जाहीर केले की स्टॅलिन फक्त देवाच्या आज्ञांचे पालन व पूर्ती करीत असून तो दुसरे काहीच करीत नाही. " पवित्र शास्त्राचा उत्कृष्ट शिक्षक" असे

म्हणून त्यांनी स्टॅलिनची प्रशंसा केली ! पत्रोस्की व रोझिनू या नावांचे पाळक याहीपुढे गेले. ते गुप्त पोलिसदलात अधिकारी बनले. रुमानियातील लूथरन मंडळीचा उपधर्माध्यक्ष ईश्वरविज्ञान विद्यालयात शिकवू लागला की, " देवाने तीन प्रकारे स्वतःला प्रकट केले आहे. प्रथम मोशेच्याद्वारे, दुसऱ्याने येशूच्याद्वारे व तिसऱ्याने स्टॅलिनच्याद्वारे. तसेच यातील शेवटचे प्रकटन पहिल्या दोनांहून उच्च प्रकारचे आहे."

खऱ्या बॅप्टिस्टांनी–ते मला अत्यंत प्रिय आहेत–मात्र या शिक्षणाला मान्यता दिली नाही. ते ख्रिस्ताशीच विश्वासू राहिले. त्यांना खूपच त्रास झाला. कॉम्युनिस्टांनी " निवडलेले " पुढारी मान्य करणे बॅप्टिस्ट लोकांना भागच होते. आजही धर्मसंबंधातील वरिष्ठ पातळीवरील पुढारी असेच निवडले जातात.

ख्रिस्ताला सोडून ज्यांनी कॉम्युनिझमची सेवा पत्करली त्या सर्वांनीच त्यांच्यात सामील न झालेल्या बंधुजनांचा छळ सुरू केला.

रशियामधील क्रांतीनंतर तेथे रशियन ख्रिस्ती लोकांना " भूमिगत मंडळीची" स्थापना करावी लागली, त्याचप्रमाणे रुमानियात कॉम्युनिस्ट सत्तेवर आल्यामुळे व मंडळीच्या अनेक कार्यकर्त्यांनी इतरांना धरून देण्याचे सत्र सुरू केल्यामुळे आम्हांलाही भूमिगत मंडळीची उभारणी करावी लागली. सुवार्ता सांगणे, ख्रिस्ताचे शुभ वर्तमान प्रसारित करणे' व मुलांना ख्रिस्ताची शिकवण सांगणे या गोष्टी करण्यामध्ये ही मंडळी विश्वासू होती. या सर्व गोष्टीना कॉम्युनिस्ट सरकारने प्रतिबंध केला होता व अधिकृत मंडळीने त्याला मान्यता दिली होती.

इतरांसमवेत मीही भूमिगत कार्यास सुरुवात केली. माझा सामाजिक दर्जा चांगला होता. मला मानमान्यता होती. पण या गोष्टींचा माझ्या भूमिगत कार्याशी काहीच संबंध नव्हता; उलट या गोष्टींमुळे मला कार्य करणे सुलभ झाले. नॉर्वेजिअन लूथरन मिशनमध्ये मी पाळक होतो तसेच वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस या संस्थेच्या रुमानिया शाखेतही मी प्रतिनिधित्व करी. ( ही संस्था कम्युनिस्टांशी हातमिळवणी करील अशी आम्हांला रुमानियात कधी कल्पनाही नव्हती. त्यावेळी ही संस्था आमच्या देशात फक्त मदतकार्यच करीत असे.)

अशा दुहेरी क्षेत्रात मी कार्य करीत असल्याने अधिकाऱ्यांना माझ्याविषयी विश्वास व आदर वाटे. त्यांना माझ्या भूमिगत कार्याविषयी काहीच ठाऊक नव्हते. या कार्याचे दोन विभाग होते.

पहिला विभाग म्हणजे दहा लाख रशियन सैनिकांमध्ये चालविलेले गुप्त सेवाकार्य.

दुसरा विभाग म्हणजे गुलामगिरीत खितपत पडलेल्या रुमानियातील आमच्या देशबांधवांच्यामधे भूमिगत सेवाकार्य.

## " तृषित " आत्म्याचे रशियन

रशियन लोकांना सुवार्ता सांगणे हे माझ्या दृष्टीने भू-लोकी स्वर्गासारखेच होते. अनेक राष्ट्रांतील लोकांना मी सुवार्ता सांगितली आहे, पण सुवार्ता उत्सुकतेने ऐकणाऱ्या प्रत्येक शब्द जिवाचा कान करून ऐकणाऱ्या, रशियनांसारखे तान्हेले लोक मी कोठेच पाहिले नाहीत.

माझा एक सनातनी पाळक मित्र आहे. त्याने एकदा टेलिफोन करून मला सांगितले की, त्याच्याकडे एक रशियन अधिकारी पापांचा कबुलीजबाब देण्यासाठी आला आहे. माझ्या मित्राला रशियन भाषा येत नव्हती. मला रशियन येत असल्यामुळे त्याने या अधिकाऱ्याला माझा पत्ता दिला होता. दुसऱ्या दिवशी तो माझ्याकडे आला. तो देवावर प्रीती करी, देवाची त्याला ओढ लागली होती पण त्याने कधीच पवित्र शास्त्र पाहिले नव्हते. कधी तो उपासनेला गेला नव्हता. (रशियामध्ये उपासनामंदिर म्हणजे अगदी दुर्मिळ चीज आहे. ) त्याला काही धार्मिक शिक्षण मिळाले नव्हते. देवाविषयी काहीच ज्ञान नसतानाही तो देवावर प्रीती करीत असे.

मी त्याला डोंगरावरील प्रवचन व येशूचे दाखले हे भाग वाचून दाखवण्यास सुरुवात केली. ते ऐकल्यावर तो अतिशय आनंदाने खोलीभर नाचू लागला. " किती सुंदर! किती दिव्य! या ख्रिस्ताचे ज्ञान झाले नाही तर मी जगणार कसा ? " असे तो म्हणू लागला. ख्रिस्तामध्ये इतक्या उत्कट आनंदाने मग्न झालेली अशी व्यक्ती मी प्रथमच पाहात होतो.

पुढे मी एक चूक केली. त्याला पूर्वसूचना अगर कल्पना देण्यापूर्वीच मी त्याला ख्रिस्ताचे दुःखसहन व वधस्तंभावरील मरण यांविषयी वाचून

दाखवले. ही गोष्ट त्याला अगदीच नवी होती. ख्रिस्ताला मारण्यात आले, त्याला वधस्तंभावर खिळले व त्याचा मृत्यू झाला, हे ऐकून तर याला धक्काच बसला. एका खुर्चीत तो कोसळला. हाताने तोंड झाकून तो धाय मोकलून रडू लागला. त्याने तारकावर विश्वास ठेवला, आणि तो तारक आता मरण पावला होता !

त्याच्याकडे पाहून माझी मलाच लाज वाटली. स्वतःला मी ख्रिस्ती, पाळक, शिक्षक समजे पण हा रशियन अधिकारी ख्रिस्ताच्या दुःखाशी जसा एकरूप झाला होता तसा मी कधीच झालो नव्हतो. त्याच्याकडे पाहताना मला वाटले की, वधस्तंभाच्या पायथ्याशी रडणारी, येशूला थडग्यात ठेवल्यावरही तशीच रडणारी मरीया मग्दालियाच जणू मी पाहतो आहे.

मग मी त्याला येशूच्या पुनरुत्थानाविषयी वाचून दाखवले. त्याचा तारक थडग्यातून पुन्हा उठला हे त्याला माहीत नव्हते. ही अद्‌भुत वार्ता ऐकताच त्याने स्वतःच्या गुडघ्यांवर मारून घेतले व एक वाईट शिवी हासडली. ( मला वाटतें ती शिवीही " पवित्रच " होती. भावना व्यक्त करण्याची त्याची ही रांगडी पद्धत होती. ) पुन्हा त्याने आनंदाने आरोळी ठोकली, " तो जिवंत आहे ! तो जिवंत आहे ! " पुन्हा आनंदाच्या भरात तो टाळ्या वाजवून नाचू लागला.

" आपण प्रार्थना करू या," मी त्याला म्हटले. प्रार्थना त्याला ठाऊक नव्हती... प्रार्थनेचे पवित्र शब्दही त्याला माहीत नव्हते. माझ्या समवेत त्याने गुडघे टेकले. त्याने अशी प्रार्थना केली : " देवा, तू चांगला माणूस आहेस. माझ्याजागी तू आणि तुझ्याजागी मी असतो तर मी तुझ्या पापांबद्दल तुला कधीच क्षमा केली नसती. पण तू अतिशय–खरोखर अतिशय–चांगला आहेस ! मी तुझ्यावर मनापासून प्रेम करतो. "

माझी खात्री आहे की, या रशियन अधिकाऱ्याची ही साधी भोळी पण उदात्त प्रार्थना सर्व देवदूतांनी आपले काम थांबवून ऐकली असेल हा माणूस ख्रिस्तासाठी जिंकला गेला होता.

एका दुकानात एक रशियन कॅप्टन व एक स्त्री अधिकारी मला भेटले. तें बऱ्याच वस्तू विकत घेत होते. पण तेथल्या विक्रेत्याला रशियन येत

नसल्यामुळे ते अडचणीत सापडले होते. मी त्यांचा दुभाषी बनलो. आमची ओळख झाली आणि मी त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. ते माझ्या घरी आले. जेवण्यास आरंभ करण्यापूर्वी मी त्यांना म्हटले, " आपण एका ख्रिस्ती घरात आहात. आम्ही आता प्रार्थना करणार. ती आमची रीत आहे. " मी रशियन भाषेत प्रार्थना केली. त्यांनी आपले काटेचमचे खाली ठेवले. जेवणाचे सोडून ते प्रश्न विचारू लागले. ख्रिस्त, देव, पवित्र शास्त्र—या सर्व गोष्टींबद्दल त्यांचे प्रश्न होते. त्यांना काहीच माहीत नव्हते.

त्या गोष्टी त्यांना समजावून देणे कठीणच होते. ज्याच्या शंभर मेंढरांतून एक मेंढरू हरवले होते त्याचा दाखला मी त्यांना सांगितला. त्यांना काहीच समजले नाही. त्यांनी विचारले, "त्याच्याकडे शंभर मेंढ्या होत्या ? कॉम्युनिस्ट सामुदायिक शेतीसंघटनेने त्या नेल्या नाहीत ? ' मी पुढे म्हटले, " येशू राजा आहे, " " राजा ? सगळे राजे दुष्ट होते. ते प्रजेवर जुलूम करीत. येशूही असाच जुलमी असणार ! " ते म्हणाले. द्राक्षमळ्यातील कामकऱ्यांचा दृष्टांत सांगितल्यावर ते म्हणाले, " त्यांनी द्राक्षमळ्याच्या मालकाविरुद्ध बंड केले ते ठीकच. हा द्राक्षमळा सामुदायिक मालकीचा असला पाहिजे. " सगळ्याच गोष्टी त्यांना नवीन होत्या. मी त्यांना येशूच्या जन्माबद्दल सांगितले. त्यावरचा त्यांचा प्रश्न म्हणजे एखाद्या पाश्चात्याच्या दृष्टीने दुर्भाषण असाच होता. " मरीया देवाची पत्नी होती का ?" असे त्यांनी विचारले. त्यांच्याबरोबर, तसेच तरांशी झालेल्या चर्चेतून एक गोष्ट स्पष्ट झाली की, अनेक वर्षे कॉम्युनिस्टांच्या प्रभावाखाली असणाऱ्या रशियन लोकांना सुवार्ता सांगावयाची तर अगदी नवीन प्रकारची भाषा वापरणे जरूर आहे.

पूर्वी मध्य आफ्रिकेत गेलेल्या मिशनरींनाही यशयाचे " तुमची पापे लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी शुभ्र होतील " हे शब्द भाषांतरित करताना अडचण आली होतीच. मध्य आफ्रिकेत बर्फ कोणीच पाहिला नव्हता. त्यांच्या भाषेत बर्फाला समानार्थी शब्द नव्हताच. मग " तुमची पापे खोबऱ्यासारखी सफेद होतील " असे भाषांतर करावे लागले.

आम्हांलाहीं सुवार्ता मार्क्सच्या शब्दांनी त्यांना समजावून द्यावी लागली मगच ती त्यांना समजली. ही गोष्ट आम्हांला स्वतःला करणे अशक्यच होते पण पवित्र आत्म्यानेच आमच्याद्वारे हे कार्य केले.

तो कॅप्टन व ती स्त्री अधिकारी त्यांचा त्याच दिवशी पालट झाला. पुढे रशियन लोकांमध्ये आम्ही करीत असलेल्या भूमिगत कार्यात या दोघांनी आम्हांला खूपच साहाय्य केले.

ख्रिस्ती वाङ्मय व शुभवर्तमानांच्या हजारो प्रती गुप्तपणे छापून आम्ही रशियन लोकांना दिल्या. पालट झालेल्या रशियन सैनिकांच्या मदतीने आम्ही रशियांतही गुप्तपणें पवित्र शास्त्र व पवित्र शास्त्राचे भाग पाठवले.

रशियन लोकांच्या हाती देवाच्या वचनाच्या प्रती पडाव्या यासाठी आम्ही एक नवेच तंत्र स्वीकारले. रशियन सैनिक वर्षानुवर्षे युद्धात गुंतले होते. या सर्व काळात त्यांना त्यांची मुलेबाळे पाहावयास मिळाली नव्हती. ( रशियन लोकांना मुले फार आवडतात. ) माझा मुलगा मिहाई हा इतर दहा वर्षांतील मुलांबरोबर रस्त्यावर, बागांमध्ये रशियन सैनिकांकडे जाई. ही मुले जाताना आपल्या खिशातून पवित्र शास्त्र, शुभवर्तमाने व इतर वाङ्मय घेऊन जात. रशियन सैनिक या मुलांचे लाड करीत, त्यांच्याशी प्रेमाने बोलत, आणि कित्येक वर्षे न पाहिलेल्या, दूरवर असलेल्या स्वतःच्या मुलांची आठवण करीत. सैनिक या मुलांना चॉकलेट व गोळ्या देत व ही मुलेही त्यांना परतभेट म्हणून पवित्रशास्त्र व शुभवर्तमानाच्या प्रती देत. ही भेट त्यांना फार आवडे. ते तिचा उत्सुकतेने स्वीकार करीत. जी गोष्ट उघडपणे करण्यात आम्हांला मोठा धोका होता तीच गोष्ट ही मुले उघडपणे सहज करून जात. रशियन लोकांत कार्य करणारे हे " छोटे मिशनरी " होते. याचे फळ भरपूर मिळाले. दुसरा कोणताच मार्ग नसताना या मार्गाने रशियन सैनिकांपर्यंत सुवार्ता संदेश पोचवता आला.

## रशियन सैनिकांच्या बराकीमध्ये सुवार्ताप्रसार

रशियन सैनिकांमध्ये आम्ही एकएकटेच ख्रिस्ताची साक्ष देत होतो तसेच केव्हा केव्हा छोट्या छोट्या सभाही घेत होतो.

रशियनांना घड्याळांची फार आवड. ज्याच्या त्याच्याकडून ते घड्याळे चोरून घेत. लोकांना रस्त्यावर थांबवून ते त्यांची घड्याळे काढून घेत. दंडावर कांकणासारखी घड्याळे अडकवलेले कितीतरी रशियन दिसत. रशियन स्त्रीसैनिकांच्या गळ्यात गजराचे घड्याळ हारासारखे रुळताना दिसे. त्यांनी कधी घड्याळे पाहिली नव्हती आणि आता ती मिळतील तेवढी त्यांना थोडीच वाटत. रुमानियात कोणाला घड्याळ हवे असेल तर त्याला या सैनिकांच्या बराकीत जाऊन ही चोरलेली घड्याळेच विकत घ्यावी लागत. केव्हा केव्हा त्या माणसाला त्याचे स्वतःचेच घड्याळ विकत घ्यावे लागे. आम्हांलाही–भूमिगत मंडळीलाही–ही चांगली सबब सापडली. घड्याळे विकत घेण्याच्या मिषाने आम्हीही त्यांच्या बराकीत जात असू. एका ऑर्थडॉक्स सणाच्या दिवशी संत पौल व संत पेत्र यांच्या स्मृतिदिनी मी रशियन सैनिकांच्या एका बराकीत शुभवर्तमान सांगण्याचा पहिला प्रयत्न केला. घड्याळ घेण्याच्या मिषाने मी सैन्याच्या तळावर गेलो. मला दाखवलेल्या घड्याळातील "हे महाग आहे, ते लहान आहे, हे मोठेच आहे" अशा बहाण्याने मी तेथे बराच वेळ राहिलो. माझ्याभोवती अनेक रशियन सैनिक गोळा झाले. प्रत्येकजण मला काहीतरी विकण्याचा प्रयत्न करीत होता व थट्टा करीत होता. "तुमच्यात कोणी पौल अगर पेत्र आहे का ? " मी त्यांना विचारले. कांहीजणांची ही नावे होती. मग मी त्यांना म्हटले, "संत पौल व संत पेत्र यांचा स्मृतिदिन आजच तुमचे ऑर्थडॉक्स चर्च साजरा करीत आहे हे माहीत आहे का ? " ( म्हाताऱ्या रशियन लोकांना ही माहिती होती. ) "पौल आणि पेत्र कोण होते माहीत आहे ? " मी पुढे विचारले. कोणालाच माहीत नव्हते. मी त्यांना पौल व पेत्र यांची माहिती सांगू लागलो. एक वयस्कर सैनिक मला थांबवन म्हणाला, " तुम्ही काही घड्याळ घ्यायला आला नाही. तुम्ही आम्हांला त्या विश्वासासंबंधी सांगण्यास आला आहात. इथे बसून आमच्याशी बोला, पण सावध राहा. कोणापासून सावध राहायचे हे आम्हांला माहीत आहे. हे येथे जमलेले सर्व चांगले आहेत. मात्र जेव्हा मी तुमच्या गुडघ्यावर हात ठेवीन तेव्हा तुम्ही घड्याळांबद्दल बोलणे सुरू करा. हात काढला की पुन्हा संदेश देणे सुरू करा. " माझ्याभोवती

चांगलाच जमाव जमला होता. मी त्यांना पौल व पेत्र यांच्याबद्दल सांगितले. तसेच पौल व पेत्र ज्या ख्रिस्तासाठी मरण पावले यांच्याबद्दलही मी सांगितले. वेळोवेळी त्यांचा विश्वास नसलेली एखादी व्यक्ती येई, मग तो सैनिक माझ्या गुडघ्यावर हात ठेवी. मी लगेच घड्याळांबद्दल बोलू लागे. आलेला माणूस गेला की मी पुन्हा ख्रिस्ताविषयी बोलू लागे. अशा प्रकारे मी तेथे अनेक वेळा गेलो व त्या रशियन सैनिकांच्या मदतीने ख्रिस्ताची सुवार्ता सांगितली. तेथल्या अनेक सैनिकांना ख्रिस्त मिळाला. हजारो शुभवर्तमाने गुप्तपणे वाटण्यात आली.

ह्याच कार्यासाठी भूमिगत मंडळीच्या अनेक बंधुभगिनींना पकडून छळण्यात आले; त्यांना मारहाण झाली पण त्यातील कोणीही आमच्या संघटनेचा विश्वासघात केला नाही.

हे कार्य चालू असतानाच एक आनंदाची घटना घडली. रशिया-मधील भूमिगत मंडळीचे काही बंधू आम्हांला भेटले व त्यांचे अनुभव आम्हांला समजले. हे सर्व देवाचे महान पवित्र जन होत आहेत असे आम्हांला प्रथम आढळले. कॉम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचा त्यांच्यावर कितीतरी वर्षे मारा चालूच होता ! ह्यांपैकी काही जणांना कॉम्युनिस्ट विश्वविद्यालयात अभ्यास करावा लागला होता. पण खाऱ्या पाण्यात राहून मासा आपल्या मांसाची चव कायम ठेवतो तसेच कॉम्युनिस्टांच्या विद्यालयात शिक्षण घेऊन या लोकांनी आपले आत्मे ख्रिस्तामध्ये शुद्ध व पवित्र असे राखले होते.

या रशियन ख्रिस्ती लोकांचे आत्मे इतके उदात्त होते की त्याला तोडच नाही! ते म्हणत, " आमच्या टोपीवरील हातोडा व विळा असलेला हा तारा म्हणजे ख्रिस्त विरोध्याचे चिन्ह हे आम्हांला ठाऊक आहे." हे शब्द ते अतिशय जड अंत:करणाने उच्चारीत. इतर रशियन सैनिकांना सुवार्ता सांगण्याच्या कामी त्यांनी आम्हांला खूप मदत केली.

आनंद सोडून इतर सर्व ख्रिस्ती गुण त्यांच्याठायी होते. त्यांचा पालट झाला तेव्हाच फक्त त्यांना आनंद मिळाला होता. मग मात्र तो लोप पावला. असे का? याचे मला आश्चर्य वाटे. एका बॅप्टिस्ट ख्रिस्ती व्यक्तीला मी विचारले, " तुम्ही आनंदी दिसत नाही याचे कारण काय ? " " मी एक आवेशी ख्रिस्ती आहे, मी प्रार्थनाशील आहे, तसेच मी ख्रिस्तासाठी

आत्मे जिकण्याचा प्रयत्न करतो–या सर्व गोष्टी मला माझ्या पाळकांपासून गुप्त ठेवाव्या लागतात. मग मी आनंदी कसा असणार ?" तो म्हणाला. " माझ्या मंडळीचे पाळक तर गुप्त पोलिसांचे हस्तक आहेत. आमच्यातील कित्येकजण दुसऱ्यावर नजर ठेवून आहेत, आणि मेंढपाळच मेंढरांचा घातक बनला आहे. आमच्या अंत:करणात तळाशी तारणाचा आनंद भरला आहे. पण तुमच्याप्रमाण आम्ही बाहयात्कारी आनंदी कधीच दिसणार नाही. "

" आमच्या दृष्टीने ख्रिस्ती धर्म अतिशय क्रांतीकारक आहे. तुम्ही स्वतत्र ख्रिस्ती जेव्हा ख्रिस्तासाठी एखादा आत्मा जिकता तेव्हा शांतपणे जीवन व्यतित करणाऱ्या तुमच्या मंडळीत एक सभासद वाढतो. पण याउलट आम्ही एखादा आत्मा जिकतो तेव्हा त्या व्यक्तीला तुरुंगात जावे लागेल, त्याची मुलेबाळे पोरकी होतील ही जाणीव आम्हांला असते. ख्रिस्ताकडे आत्मा आणल्याचा आनंद होतो पण या आनंदाची किंमत मोजावी लागणार ही कटु जाणीवही त्याच वेळी असते."

आम्हांला एक.नवीन प्रकारची ख्रिस्ती व्यक्ती भेटली–ती म्हणजे भूमिगत मंडळीतील ख्रिस्ती. येथेच आम्हांला अनेक आश्चर्यकारक गोष्टी कळल्या.

आपण ख्रिस्ती आहोत असे मानणारे पण प्रत्यक्षात ख्रिस्ती नसणारे असे बरेच लोक आहेत, तसेंच स्वत:ला नास्तिक म्हणणारे बरेच रशियन लोक खरोखर नास्तिक नाहीत.

मी एका रशियन जोडप्याला भेटलो. ही दोघेही शिल्पकार होती. त्यांच्याशी देवाविषयी बोलताना ते म्हणाले, " छे ! छे ! देव अस्तित्वातच नाही आम्ही 'बेज बोश मिकी'–म्हणजे देवरहित–आहोत. पण आमच्या बाबतीत घडलेली एक मनोरंजक गोष्ट तुम्हाला सांगतो.

" एकदा आम्ही स्टॅलिनचा पुतळा करीत होतो. पुतळ्याचे काम चालू असताना माझी पत्नी म्हणाली, " ऐकलं का, आंगठा कसा बनवायचा ? इतर बोटांपेक्षा आंगठा वेगळाच पाहिजे–हाताची बोटे पायाच्या बोटांसारखी असती तर आपणांला काहीच काम करता आले नसते. हातोडा, हत्यार, पुस्तक, भाकर यांतले काहीच आपणांला पकडता

आले नसते. हा छोटासा आंगठा नसता तर आपणांला जगणेच अशक्य झाले असते. पण हा आंगठा केला तरी कोणी ? आपण मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास शाळेत असतानाच केला आहे. त्यानुसार स्वर्ग व पृथ्वी आपोआप उत्पन्न झाली; देवाने त्यांची उत्पत्ती केली नाही. मला अशीच शिकवण मिळाली, असेच मी मानतेदेखील ! पण देवाने स्वर्ग--पृथ्वी निर्माण केली नसली तरी त्याने हा छोटासा आंगठा जरी केला असेल तरी तो निःसंशय स्तुतिपात्र आहे.

एडिसन, बेल, स्टीफन्सन यांची आम्ही स्तुती करतो, कारण त्यांनी विजेचा दिवा, टेलिफोन, आणि रेल्वे व इतर वस्तूंचे शोध लावले. पण ज्याने या आंगठ्याचा शोध लावला त्याची स्तुती मात्र का करायची नाही ? एडिसनला आंगठा नसता तर कोणता तरी शोध लावता आला असता का ? ज्या देवाने हा आंगठा केला त्याची स्तुती करणे हेच योग्य. "

बायकांनी शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या की बहुधा सर्व नवरे रागावतात, तसाच हाही नवरा रागावला. " मूर्खासारखे बरळू नकोस ! देव नाही हे तू शिकलीस. घरामध्ये एखादा ध्वनिक्षेपक गुप्तपणे लावून ठेवला असेल तर आपली शंभर वर्षे भरलीच म्हणून समज. पुन्हा एकदा नीट लक्ष दे. **देव नाही** ही गोष्ट मनात ठसवून ठेव. स्वर्गात **कोणी नाही**! "

ती म्हणाली, " वा ! छान ! हे तर मोठे अजब आहे मग ! देव आहे असे आपले पूर्वज पूर्वी मूर्खासारखे मानत आणि ते खरे असले तर त्या देवाने आपणांला आंगठे देणे अगदी स्वाभाविक होते. सर्वसमर्थ देवाला काहीच अशक्य नाही; म्हणूनच त्याला आंगठाही करता येणारच. पण जर स्वर्गात 'कोणी नाही' तर हा आंगठा करणाऱ्या त्या 'कोणी नाही'-ची मी मनापासून उपासना करायचे मी तुझ्यापुरते तरी ठरवले आहे."

मग ते " कोणी नाही " ची उपासना करू लागले. कालांतराने " कोणी नाही " वरील त्यांचा विश्वास वाढू लागला. आता तो केवळ आंगठा करणारा अशी त्यांची भावना राहिली नव्हती तर त्यानेच तारे फुले, मुले व जीवनातील सुंदर गोष्टीही उत्पन्न केल्या अशी त्यांची भावना होती.

प्राचीन काळी अथेनैमध्येही अशीच घटना घडली होती. " अज्ञात देवाची " भक्ती करणारे उपासक तेथे संत पौलाला भेटले होते.

त्यांचा विश्वास अगदी योग्य आहे असे माझ्या तोंडून त्यांनी ऐकले तेव्हा त्यांना अवर्णनीय आनंद झाला. मी त्यांना सांगितले की स्वर्गात तसे पाहिले तर " कोणी नाही " हेच आहे, म्हणजेच देव–आत्मा–आहे. हो, प्रीतीचा, ज्ञानाचा, सत्याचा, सामर्थ्याचा आत्मा आहे, आणि या दोघांवर त्याची प्रीती आहे, म्हणूनच त्याने त्यांच्यासाठी वधस्तंभावर बलिदान होण्यासाठी स्वतःचा एकुलता एक पुत्र पाठवला.

त्यांचा देवावर विश्वास होता पण ही गोष्ट त्यांना मात्र ठाऊक नव्हती. त्यांना एक पायरी पुढे नेण्याचे सद्भाग्य मला लाभले–ही पायरी म्हणजे तारणाचा अनुभव व उद्धाराची खात्री !

एकदा रस्त्यामध्ये मला एक रशियन स्त्रीअधिकारी दिसली. मी तिच्याकडे जाऊन नम्रतेने बोललो, " रस्त्यामध्ये अनोळखी स्त्रीशी असे बोलणे चांगले नाही हे मला समजते; मी एक पाळक आहे; माझा हेतू विशुद्ध आहे. मला तुमच्याशी ख्रिस्ताविषयी बोलायचे आहे. "

" तुम्ही ख्रिस्तावर प्रीती करता ?" तिने विचारले, " हो, अगदी जीवेभावे प्रेम करतो " मी म्हटले. तिने मला मिठीच मारली व माझे भराभर मुके घेण्यास सु वात केली. एका पाळकाच्या दृष्टीने ही परिस्थिती नाजूक होती म्हणून मीही तिचा मुका घेतला, म्हणजे लोकांना वाटावे आम्ही नातेवाईक आहोत. " मी पण ख्रिस्तावर प्रीती करते, " ती उत्साहाने मला म्हणाली. मी तिला आमच्या घरी नेले. तिला ख्रिस्ताचे नावच फक्त माहीत होते–इतर गोष्टी **काहीच माहीत** नव्हत्या–हे समजल्यावर मला फारच आश्चर्य वाटले. आणि तरीही ख्रिस्तावर तिची प्रीती होती. तोच तारक आहे, तारण म्हणजे काय या गोष्टींविषयी ती अजाण होती. तो कुठे कसा होता, कसा मरण पावला, त्याने काय केले, काय शिकवले, त्याचे जीवन कसे होते, त्याचे कार्य काय होते या सर्व गोष्टींविषयी ती संपूर्णतः अंधारात होती. मला तर ही स्त्री एक मानसिक रहस्यच आहे असे वाटू लागले. नुसत्या नावावर कोणी कधी प्रेम करीत असते का ?

याबद्दल मी तिला विचारल्यावर तिने सांगितले, " लहानपणी मला चित्रांच्या साहाय्याने वाचायला शिकवले. ' ए ' अक्षरासाठी अॅपलचे चित्र होते ( सफरचंद ); ' बी ' साठी ' बेल ' चे चित्र होते ( घंटा ); ' सी ' साठी ' कॅट ' चे चित्र होते ( मांजर ); आणि याप्रकारेच सर्व अक्षरे शिकले. पुढे माध्यमिक शाळेत गेले. तेथे कॉम्युनिस्टांच्या पितृभूमीचे रक्षण करणे हे माझे पवित्र कर्तव्य आहे असे मला शिकवले. कॉम्युनिस्टांच्या नीतीचे शिक्षणही मला मिळाले. पण ' पवित्र कर्तव्य ' अगर ' नीती ' या गोष्टी दिसतात कशा, असतात कशा हे मला समजेना. यासाठी मला त्यांची चित्रे हवी होती. माझ्या वडिलांकडे जीवनातील सगळया सुंदर, उत्तम व सत्य गोष्टींची चित्रे होती हे मला माहीत होते. अशाच एका चित्रापुढे माझी आजी गुडघे टेकून बसे. ती म्हणे हे चित्र ' क्रिस्टॉस 'चे (ख्रिस्ताचे) आहे. या नावावरच माझे प्रेम बसले. माझ्या दृष्टीने हे नाम एक सत्यच बनले; नुसते हे नाव घेण्याने इतका आनंद मिळतो म्हणून सांगू ?–"

तिचे शब्द ऐकताना मला फिलिप्पैकरांस पत्रामधील वचन आठवले. प्रत्येकाने " येशूच्या नामाने गुडघे टेकावे." कदाचित देवाचे ज्ञान जगातून पुसून टाकण्याचे ख्रिस्तविरोधाचे प्रयत्न काही काळ सफल होतील. पण ख्रिस्ताच्या साध्या नावात सामर्थ्य आहे आणि हेच आपणांला प्रकाशाकडे नेईल.

माझ्या घरी तिला ख्रिस्त मिळाला. ती आनंदित झाली. ती ज्याच्या नावावर प्रेम करी तोच स्वतः आता तिच्या हृदयात येऊन राहिला.

रशियन लोकांबरोबर मला आलेला प्रत्येक अनुभव नाटयमय, काव्यमय होता आणि त्यात गूढ अर्थ भरलेला होता.

रेल्वे स्टेशनांमध्ये एक भगिनी सुवार्ताप्रसार करी. तिने एका जिज्ञासू अधिकाऱ्याला माझा पत्ता दिला. एका संध्याकाळी तो–उंचपुरा सुंदर रशियन लेफ्टनंट–माझ्या घरी आला. " आपली काय इच्छा आहे?" मी विचारले. " प्रकाश मिळावा म्हणून मी आलो आहे, " तो म्हणाला.

पवित्रशास्त्रातील अतिशय महत्त्वाचे भाग मी त्याला वाचन

दाखवू लागलो. माझ्या हातावर हात ठेवून तो म्हणाला, " मी अगदी खऱ्या भावाने विचारतो आहे. माझी दिशाभूल करू नका. अंधारात बसणाऱ्या लोकांतून मी आलो आहे. कृपा करा आणि सांगा. खरोखर हेच ते देवाचे वचन आहे काय ? " मी त्याची खात्री पटवली. कित्येक तास तो ऐकत होता... आणि त्याने ख्रिस्ताचा स्वीकार केला.

रशियन लोक धार्मिक गोष्टींविषयी कधीच देखावा करीत नाहीत, उथळपणा दाखवीत नाहीत. धर्माविरुद्ध लढताना काय अगर धर्माच्या बाजूचे होऊन ख्रिस्ताचा शोध करताना काय–दोन्ही गोष्टी ते अगदी मन लावून करीत. रशियामधला प्रत्येक ख्रिस्ती आत्मे जिंकणारा मिशनरी आहे, म्हणूनच सुवार्तेच्या कार्यासाठी योग्य, सुफळ व तयार असा दुसरा कुठलाच देश जगाच्या पाठीवर नाही. जगातील सर्व लोकांपेक्षा रशियन लोक स्वभावतःच धार्मिक आहेत. आपण आवेशाने त्यांना सुवार्ता दिली तर जगाचा प्रवाहच बदलून जाईल.

एकदा आगगाडीतून जाताना, माझ्यासमोर एक रशियन अधिकारी बसला होता. मी त्याच्याशी थोडा वेळच ख्रिस्ताविषयी बोललो तोच तो नास्तिकतेची तत्त्वे सांगून माझ्याशी वाद करू लागला. मार्क्स, स्टॅलिन, व्हॉल्टेअर, डार्विन यांनी व इतरांनी पवित्रशास्त्राविरुद्ध लिहिलेले शब्द त्याच्या तोंडातून जणू लाह्या फुटल्याप्रमाणे फुटत होते. त्याला विरोध करण्यास, उलट उत्तर देण्यास त्याने मला वावच दिला नाही. देव नाही हे मला पटवून देण्यासाठी तो एकसारखा तासभर बोलत होता. त्याचे बोलणे संपल्यावर मी त्याला विचारले, " तुम्ही म्हणता देव नाही मग संकटाच्या वेळी, तुम्ही प्रार्थना कशाला करता?"

एखाद्या चोराला चोरी करताना मुद्देमालासकट पकडावे तशी त्याची अवस्था झाली. " पण मी प्रार्थना करतो हे तुम्हाला कसे कळले? " त्याने विचारले. मी त्याला सोडलेच नाही. " पहिल्याने मी प्रश्न विचारला. तुम्ही प्रार्थना का करता असे मी विचारलें. अगोदर माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. " डोके लववून त्याने कबुली दिली, " आघाडीवर जर्मनांनी आम्हांला वेढले होते तेव्हा आम्ही सर्वांनीच प्रार्थना केली होती. प्रार्थना कशी करतात आम्हांला माहीत नव्हते म्हणून आम्ही म्हणालो, ' देवा

आणि मातेच्या आत्म्या.' " खरे तर ही एक सुंदर प्रार्थना आहे, कारण देव शब्द पाहात नाही, अंतःकरणच पाहतो.

रशियन लोकांमधील आमच्या कार्याचे पुष्कळ फळ मिळाले आहे.

मला पिओत्र (पीटर) आठवतो. कोठल्या रशियन बंदीखान्यात त्याचा मृत्यू झाला, कोणालाच ठाऊक नाही. साधारण विशीचा कोवळा तरुण होता तो ! तो रशियन सैन्याबरोबरच रुमानियामध्ये आला होता. एका भूमिगत सभेमध्ये त्याचा पालट झाला. मी त्याचा बाप्तिस्मा करावा अशी त्याची इच्छा होती. बाप्तिस्मा झाल्यावर पवित्रशास्त्रातील कोणत्या वचनाचा परिणाम होऊन तो ख्रिस्ताकडे आला असे मी त्याला विचारले.

त्याने सांगितले, " एका गुप्त सभेमध्ये तुम्ही लूकाच्या शुभवर्तमानातील २४ वा अध्याय वाचीत असताना तो मी लक्षपूर्वक ऐकत होतो. या अध्यायात अम्माऊस गावाकडे निघालेल्या दोन शिष्यांची व येशूची भेट वर्णन केली आहे. ते सर्व त्या गावाकडे आले तेव्हा त्याने पुढे जाण्याचा रोख दर्शविला. येशूने असे का केले याचा मी विचार करू लागलो. खरे तर त्याला आपल्या शिष्यांबरोबर राहण्याची इच्छा होती. मग आपणाला पुढे जायचे आहे असे तो का म्हणाला ? मी त्याचा अर्थ लावला तो असा : येशू सभ्यतेने वागतो. आपण खरोखर यावे अशी इतरांची इच्छा आहे का, हे तो प्रथम पाहातो. त्यांनी आग्रह केला, त्याला बोलावले तेव्हाच तो त्यांच्याबरोबर घरात गेला. कॉम्युनिस्ट असभ्य व जंगली आहेत. आमच्या मनावर, हृदयावर ते बळजबरीने कबजा करतात. दिवसरात्र त्यांचे ऐकण्याची सक्ती करतात. शाळा, नभोवाणी, वर्तमानपत्रे, जाहिराती, चित्रपट, बोलपट, नास्तिक संघटनेच्या सभा-- जिकडे जाल तिकडे त्यांचेच शब्द ! त्यांचेच विचार ! आवडो वा नावडो तुम्हाला हेच ऐकले पाहिजे. येशू आमच्या स्वातंत्र्याला मान देतो. तो हळूच दारावर टकटक आवाज करतो. येशूने आपल्या सभ्यपणाने मला जिंकले आहे."

कॉम्युनिझम आणि ख्रिस्त यांतल्या या तीव्र विरोधाने त्याची खात्री पटली होती. येशूच्या या स्वभाववैशिष्टयाने प्रभावित झालेला

रशियन हा एकटाच नव्हता. (पाळक म्हणून मी मात्र कधी या प्रकारे विचार केला नव्हता.)

पालट झाल्यावर पिओत्राने स्वतःच्या जीवाला धोका असताना व कैदेची भीती असतानाही पुन्हा पुन्हा रुमानियातील भूमिगत मंडळीकडून रशियातील लोकांसाठी ख्रिस्ती वाङ्मय व मदत नेण्याचे काम केले. अखेरीस त्याला पकडले. तो तुरुंगातच आहे असे मला १९५९ मध्ये समजले. अजून जिवंत असेल का तो ? तो स्वर्गात सुखाने आहे, का अजून या जगातच सुयुद्ध करीत आहे ? मला ठाऊक नाही. आज तो कोठे आहे हे फक्त देवच जाणतो !

याच्याप्रमाणेच आणखीही कित्येकांचा नुसताच पालट झाला नव्हता. ख्रिस्तासाठी आत्मा जिंकला की संपले असे म्हणून आपण हात झटकून स्वस्थ बसता कामा नये. इतकेच केले तर फक्त अर्धेच काम संपते. ख्रिस्तासाठी जिंकलेल्या प्रत्येक आत्म्याला " आत्मे जिंकणारा " बनविले पाहिजे. ह्या रशियन लोकांचा नुसताच पालट झाला नव्हता; ते भूमिगत मंडळीमधील मिशनरी बनले. धाडसाने व धैर्याने ते ख्रिस्तासाठी कार्य करीत. आमच्यासाठी ज्या ख्रिस्ताने मरण पत्करले त्याच्यासाठी आम्ही अजून काहीच करीत नाही असे ते म्हणत.

## दास्यात खितपत पडलेल्या राष्ट्रासाठी भूमिगत सेवाकार्य

आमच्या कामाचा दुसरा भाग म्हणजे खुद्द रुमानियन लोकांमध्ये चालवलेले भूमिगत मिशनरी कार्य.

लौकरच कॉम्युनिस्टांनी आपली नखे बाहेर काढली. प्रथम गोड गोड बोलून त्यांनी मंडळीच्या पुढाऱ्यांना आपलेसे करून घेतले. मग मात्र दहशतीचे साम्राज्य सुरू झाले. हजारोंना पकडण्यात आले. ख्रिस्तासाठी आत्मा जिंकणे ही गोष्ट आता रशियन लोकांप्रमाणे आम्हांलाही अवघड झाली.

देवाच्या साहाय्याने मी काही लोकांना ख्रिस्ताकडे आणले होते. ह्याच लोकांबरोबर मी पुढे तुरुंगात होतो. माझ्याच कोठडीत एक माणूस होता. ख्रिस्तावर विश्वास आहे म्हणूनच त्याला तुरुंगाची शिक्षा दिली होती. घरी त्याची सहा लहान मुले होती. तो व त्याची पत्नी

उपासमारीने व्याकुळ झाली होती. कदाचित त्यांची पुन्हा कधीच भेट होणार नव्हती. "मी तुला ख्रिस्ताकडे आणले म्हणून आता तुझ्यावर आणि तुझ्या कुटुंबावर ही आपत्ती ओढवली. माझ्याविषयी तुझ्या मनात काही किल्मिष आहे का ?" मी त्याला विचारले.

**"असे म्हणू नका. तुमच्यामुळेच मी या अद्भुत तारकाजवळ आली. तुमचे हे उपकार मी कसे फेडू ? याहून दुसरा विचार माझ्या मनात कधीच येत नाही."**

या नव्या परिस्थितीत शुभवर्तमान सांगणे सोपे नव्हते. आम्ही बऱ्याच ख्रिस्ती पुस्तिका छापल्या व कॉम्युनिस्टांच्या कडक तपासातून त्या सुरळीतपणे मान्य करून घेतल्या. कॉम्युनिस्ट परीक्षकांच्याकडे आम्ही तपासणीसाठी पाठवलेल्या एका पुस्तकावर कार्ल मार्क्सचा फोटो छापला होता. इतर पुस्तकांनाही "धर्म ही अफू आहे" अशा प्रकारची नावे दिली होती. ही कॉम्युनिस्ट पुस्तके आहेत असा त्या परीक्षकांचा समज झाला. त्याने सर्व पुस्तकांवर शिक्के मारले. या सर्व पुस्तकांत पहिल्या काही पानांवर मार्क्स, लेनिन व स्टॅलिन यांच्या लेखांतील उतारे छापलेले होते त्यामुळे परीक्षक खूष झाला. मात्र पुढल्या पानांवर आम्ही ख्रिस्ताचा संदेश छापला होता.

भूमिगत मंडळी थोडीशीच "भूमिगत" आहे. हिमखंडाप्रमाणे या मंडळीचे थोडे कार्य उघडपणेही चालते. कॉम्युनिस्टांच्या सभांना जाऊन तेथे आम्ही ही आमची "कॉम्युनिस्ट" पुस्तके लोकांना देत असू. पुस्तकावरील मार्क्सचे चित्र पाहून ही पुस्तके कॉम्युनिस्ट लोक हिरीरीने विकत घेतले. पुस्तकातले दहावे पान उघडल्यावर त्यांना कळले की हे पुस्तक मार्क्स, लेनिनचे नसून देवाविषयी आहे. पण तोपर्यंत आम्ही दूर गेलेलो असू.

या परिस्थितीत उपदेश करणेही कठीणच होते. आमच्या देशबांधवांवर फार जुलूम होत होता. कॉम्युनिस्ट सगळ्यांचे सर्वस्व लुबाडून नेत होते. शेतकऱ्यांच्या मेंढ्या व शेते त्यांनी लुबाडली. शिंप्यांकडून, न्हाव्यांकडून त्यांची छोटी दुकाने हिरावून घेतली. त्यांनी काही फक्त भांडवलवाल्यांचीच मालमत्ता बळकावली नव्हती. अगदी गरीब माण-

सांवरसुद्धा असाच प्रसंग आला होता. प्रत्येक घरातले कोणीतरी तुरुंगात होतेच. दैन्य व दुःखाला पारावाराच नव्हता. " देव तरी अशा दुष्टांना कसा विजयी होऊ देतो ? " लोक असे विचारीत.

उत्तम शुक्रवारच्या त्या दिवशी " माझ्या देवा ! माझ्या देवा ! तू माझा त्याग का केलास ?" असे शब्द उच्चारीत येशूने प्राण सोडला तेव्हा त्या पहिल्या प्रेषितांनाही येशूविषयी सांगणे असेच कठीण झालेले असणार ! झालेल्या कार्याकडे पाहताना मनात एकच विचार येतो; " हे देवाकडून त्याच्या सामर्थ्याने झाले, आमच्याकडून नाही." अशा प्रश्नांना ख्रिस्ती विश्वासच उत्तर देऊ शकतो.

येशूने आपणाला लाजराची गोष्ट सांगितलीच आहे. आपल्याप्रमाणेच लाजरही गांजला होता. भुकेला, मरणोन्मुख असा तो होता. कुत्री येऊन त्याच्या जखमा चाटीत, पण अखेरीस देवदूतांनी त्याला स्वर्गास आब्राहामजवळ नेले.

## भूमिगत मंडळीचे प्रकट कार्य

खाजगी घरांतून, रानातून, बागांतून, तळघरांतून, जेथे जशी संधी मिळेल तेथे भूमिगत मंडळी एकत्र येई. गुप्तपणे तिने तिचे प्रकट कार्य योजिले. दडपशाही चालू असतानाच, रस्त्यांतून सुवार्ता सांगण्यासाठी आम्ही एक योजना तयार केली. रस्त्यात उघडपणे प्रचार करणे दिवसेंदिवस धोकादायक होत होते; तरीपण या मार्गाने आम्ही बऱ्याच जणांना सुवार्ता सांगितली. एरवी हे अशक्यच होते. या कार्यामध्ये माझी पत्नी आघाडीवर होती. एखाद्या रस्त्याच्या कोपऱ्यावर काही ख्रिस्ती लोक हळूच जमत व गाऊ लागत. ही सुंदर गाणी ऐकण्यासाठी लोक जमत, मग माझी पत्नी सुवार्तासंदेश देई. रस्त्यातले पोलीस येण्यापूर्वीच आम्ही तेथून निघून जात असू.

एका संध्याकाळी मी दुसरीकडे कामाला गेलो असताना माझ्या पत्नीने मॅलाक्स कारखान्याच्या दाराशी हजारो कामगारांना ख्रिस्तसंदेश दिला. हा कारखाना बुखारेस्ट येथे आहे. तारण व देव यांसंबंधी तिने कामगारांना सांगितले. दुसऱ्याच दिवशी या कारखान्यातील बऱ्याच जणांना गोळ्या घातल्या गेल्या कारण ते कॉम्युनिस्टांच्याकडून

होणाऱ्या अन्यायाला विरोध करीत होते. त्यांनी ख्रिस्तसंदेश अगदी योग्य समयी ऐकला.

आमची मंडळी भूमिगत होती तरीदेखील बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणेच आम्ही मानवांशी व अधिकाऱ्यांशी उघडपणे ख्रिस्ताविषयी बोलत होतो.

एकदा आम्ही एका सरकारी इमारतीच्या पायऱ्यावर उभे होतो. आमच्यातले दोन ख्रिस्ती बंधू मोठ्या धैर्याने आमच्या पंतप्रधान घेओरघिउ देज यांच्यासमोर गेले. तेथे काही क्षणच ते होते पण तेवढ्यात त्यांनी ख्रिस्ताची साक्ष दिली आणि पापापासून मागे वळून होणारा छळ थांबवा असे त्यांना सांगितले. धैर्याने साक्ष दिल्याबद्दल त्याने त्यांना पकडून कैदेत टाकले. पुढे बऱ्याच वर्षांनी हे पंतप्रधान--घेओरघिउ देज--फार आजारी पडले. याच वेळी त्या ख्रिस्ती बंधूंनी पेरलेले ते सुवार्ता बीज अंकुरले. पंतप्रधानांना या संकटाच्या वेळी ते पूर्वी सांगितलेले शब्द पवित्रशास्त्रात लिहिल्याप्रमाणे "सजीव, सतेज, कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण .." असे होते. या शब्दांनी त्याच्या कठीण अंतःकरणाचा भेद केला. त्याने आपले जीवन ख्रिस्ताला समर्पित केले. त्याने आपली पापे कबूल केली, ख्रिस्ताचा स्वीकार केला व आजारी असतानाही तो त्याची सेवा करू लागला. यानंतर लौकरच तो मरण पावला, पण तो आपल्या नुकत्याच मिळालेल्या तारकापाशी गेला. दोन ख्रिस्ती व्यक्ती किंमत देण्यास तयार होत्या म्हणूनच हे शक्य झाले. कॉम्युनिस्ट देशातील धैर्यवान ख्रिस्ती लोकांचे हे दोघे जणू प्रतिकच होते.

याप्रमाणे भूमिगत मंडळीचे कार्य केवळ गुप्त सभा घेणे, लपून छपून कार्य करणे एवढेच नव्हते. आम्ही कॉम्युनिस्ट पुढाऱ्यांना, कॉम्युनिस्टांच्या रस्त्यांमध्ये उघडपणे देखील सुवार्तेची घोषणा करीत होतो. असे करण्यामध्ये धोका होता. याचे मोल द्यावे लागे. पण ते द्यायला आमची तयारी होती. आणि हे मोल द्यायला ही भूमिगत मंडळी आजही तयार आहे.

गुप्त पोलिसांनी या भूमिगत मंडळीचा फार छळ केला, कारण प्रस्थापित सत्तेला प्रभावी विरोध करणारी एवढीच शक्ती शिल्लक

आहे, हे त्यांना कळून आले. हा विरोध आत्मिक स्वरूपाचा आणि म्हणूनच परिणामकारी होता. त्याला बंधन घातले नाही तर त्यांचा नास्तिकवाद हतबल झाला असता. सैतानाप्रमाणेच त्यांनीही आपणाला धोका कोठून आहे, हे ओळखले. एखाद्याने ख्रिस्तावर विश्वास ठेवला की तो हृदयहीन, सज्ञाशून्य, सांगितलेले गुपचूप ऐकणारा असा राहणार नाही हे त्यांना ठाऊक होते. तसेच माणसांना तुरुंगात टाकता येईल, पण देवावरच्या विश्वासाला कैद करता येत नाही हेही त्यांना माहीत होते. म्हणूनच ते कठोरपण सामना देत होते.

पण कॉम्युनिस्ट सरकारमध्ये आणि गुप्त पोलिसांमध्ये देखील भूमिगत मंडळीचे मित्र वा सभासद होतेच.

गुप्त पोलिसांच्या हालचाली भूमिगत मंडळीला समजाव्यात म्हणून आम्ही काही ख्रिस्ती लोकांना पोलिसांमध्ये भरती होण्यास व आमच्या देशात सर्वांच्या दृष्टीने घृणास्पद असा तो गणवेश घालण्यास सांगितले. भूमिगत मंडळीतील कित्येकांनी असे केले; यावेळी त्यांनी आपला विश्वास मात्र गुप्त ठेवला होता. हा कॉम्‍ुनिस्टांचा गणवेश घालण्याबद्दल त्या लोकांचे कुटुंबीय व मित्र त्यांची हेटाळणी करीत, तिरस्कार करीत. अशा वेळी आपला खरा हेतू लपवून ही निंदा सहन करणे मोठे कठीण काम होते. तरीही या विश्वासू बंधूंनी ते पार पाडले. त्यांची ख्रिस्तावर अतिशय प्रीती होती.

मला रस्त्यावरून पळवून नेऊन कित्येक वर्षे गुप्तपणे कडक बंदोबस्तात ठेवण्यात आले होते, तेव्हा माझा ठावठिकाणा शोधून काढण्यासाठी एक ख्रिस्ती डॉक्टरदेखील खुषीने गुप्तपोलिसामध्ये दाखल झाला! गुप्तपोलिसाचा डॉक्टर या नात्याने त्याला सर्व कैद्यांच्या कोठड्यात जाता येई. मला शोधून काढता येईल असा त्याचा कयास होता. त्याच्या मित्रांनी त्याच्याशी सर्व संबंध तोडून टाकले. त्यांना वाटले हा आता कॉम्युनिस्ट बनला आहे. छळ करणाऱ्या लोकांप्रमाणे त्यांचाच पोषाख घालून फिरणे व लोकांची निंदा सहन करणे हा ख्रिस्तासाठी केलेला फार मोठा त्याग आहे. कैद्याचे कपडे घालण्यापेक्षा हे फार कठीण आहे.

एका अंधाऱ्या गुहेसारख्या कोठडीत या डॉक्टरला माझा तपास लागला. मी अजून जिवंत असल्याची वार्ता त्याने सर्वांना सांगितली. माझ्या पहिल्या तुरुंगवासाच्या साडेआठ वर्षाच्या काळात मला भेटणारा शोधून काढणारा हा पहिलाच मित्र होता! त्याच्याच प्रयत्नामुळे मी जिवंत आहे हे सर्वांना कळले. पुढे १९५६ मध्ये आयसेनहॉवर व क्रुश्चेव्ह यांच्यातील भेटीच्या वेळी काही कैद्यांना सोडून देण्यात आले, त्यावेळी माझ्याही सुटकेसाठी ख्रिस्ती लोकांनी आवाज उठवल्याने काही काळासाठी माझी मुक्तता झाली.

केवळ माझा शोध घेण्याच्या हेतूने गुप्त पोलिसांमध्ये दाखल झालेला हा ख्रिस्ती डॉक्टर नसता तर माझी कधीच सुटका झाली नसती हे निर्विवाद! कदाचित आजही मी तुरुंगातच ( अगर थडग्यामध्ये ) असतो.

गुप्त पोलिसांमधील आपल्या अधिकाराचा उपयोग करून, भूमिगत मंडळीच्या या सभासदांनी आम्हांला अनेकवार धोक्याची सूचना दिली, तसेच साहाय्यही केले. आजही भूमिगत मंडळीचे सभासद गुप्त पोलिसांमध्ये आहेत. ते ख्रिस्ती लोकांना संरक्षण देतात, तसेच येणाऱ्या संकटाची पूर्वसूचनाही देत असतात. काही तर कॉम्युनिस्ट वर्तुळात उच्च पदांवर आहेत. ते आपला विश्वास गुप्त ठेवतात आणि आम्हांला अनेकप्रकारे मदत करतात. आज ते ख्रिस्ताची सेवा गुप्तपणे करीत आहेत पण एक दिवस स्वर्गामध्ये त्यांना मोकळेपणे ख्रिस्ताची घोषणा करता येईल.

अशा स्थितीतही भूमिगत मंडळीच्या बऱ्याच सभासदांना शोधून काढून पकडण्यात आले. आमच्यातही काही "यहूदा" होतेच! त्यांनीच गुप्त पोलिसांना सांगितले आणि पकडून दिले. मारहाण करून, भूल देऊन, धमक्या देऊन, बेअब्रूची भीती दाखवून, कॉम्युनिस्टांनी पाळकांना व इतर ख्रिस्ती बंधूंना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न चालवला होता. अशाने त्यांना आमच्याविषयी निश्चित बातम्या मिळाल्या.

# प्रकरण दुसरे

२९ फेब्रुवारी १९४८ या दिवसापर्यंत मी भूमिगत व तसेच उघडपणेही कार्य करीत होतो. या रविवारच्या दिवशी–सुंदर रविवारी-मी देवळाला जातानाच गुप्त पोलिसांनी मला पळवून नेले.

पवित्र शास्त्रामध्ये "मनुष्यचोरीचे" अनेक उल्लेख आहेत. याचा अर्थ काय असावा ते मला बरेच दिवस समजत नव्हते. आता कॉम्युनिझमने या शब्दांचा अर्थ चांगलाच शिकवला आहे.

त्यावेळी माझ्याप्रमाणेच अनेकांना पळवून नेण्यात आले होते. गुप्त पोलिसांची गाडी माझ्यासमोर उभी राहिली, तीमधून चार माणसांनी उड्या मारल्या आणि मला एकदम त्या गाडीत कोंबले. कित्येक वर्षे मला कैदेत ठेवले होते. मी जिवंत आहे का मेलो याचा आठ-नऊ वर्षे कोणालाच पत्ता नव्हता. आपण तुरुंगातून सुटलेले कैदी आहोत असा बहाणा करून गुप्त पोलिस माझ्या पत्नीला भेटले. माझा तुरुंगात मृत्यू झाला व अंत्यविधीच्या वेळी आपण हजर होतो असे त्यांनी तिला सांगितले. माझ्या पत्नीवर आकाशच कोसळले.

वेगवेगळ्या मंडळीतील हजारो लोकांना यावेळी तुरुंगवास घडला. तुरुंगात टाकलेल्या लोकांत फक्त धर्मोपदेशकच नव्हते तर साधे शेतकरी, तरुण मुले-मुली, जे जे स्वतःच्या विश्वासाची साक्ष देत अशा सर्वांना कैद होई. तुरुंग अगदी तुडुंब भरले होते. इतर कॉम्युनिस्ट देशांप्रमाणेच रुमानियातसुद्धा तुरुंगात असणे म्हणजे यातना भोगणे असाच अर्थ होता.

यातनांचे काही प्रकार अति भयंकर होते. मला सोसाव्या लागल्या त्या यातनांविषयी मी अधिक काही लिहीत नाही. जर मी त्याबद्दल लिहिले, बोललो तर त्या दुःखद आठवणींनी मला मुळीच झोप येत नाही.

तुरुंगात असताना आम्हांला जे देवाचे अनुभव आले त्याविषयी " इन गॉड्स अंडरग्राऊंड " या माझ्या पुस्तकात मी संपूर्णपणे लिहिलेले आहे.

**जीवघेण्या यातना**

फ्लॉरेस्क्यु नावाचा एक पाळक कैदेत होता. त्याला तापलेल्या लोखंडी सळया व सुऱ्यांनी भाजण्यात आले व जखमा करण्यात आल्या. त्याला खूपच मारहाण केली होती. त्याच्या कोठडीत एका मोठ्या नळातून भुकेलेले उंदीर सोडले. त्याला झोपही घेता येईना. रात्रभर स्वतःचे रक्षण करावे लागे. क्षणभर जरी स्वस्थ बसले तरी ते उंदीर अंगावर तुटून पडत.

त्याला दोन आठवडे रात्रंदिवस सतत सक्तीने उभे ठेवण्यात आले. त्याने आपल्या मंडळीतल्या सभासदांची नावे सांगावी यासाठी कॉम्युनिस्ट त्याच्यावर हरप्रकारे जुलूम करीत होते. पण त्याने धैर्याने सर्व यातनांशी सामना केला. अखेरीस त्याच्या चौदा वर्षांच्या मुलाला त्याच्यासमोर आणून त्याला चाबूक मारण्यात आले. कॉम्युनिस्टांना हवी असलेली माहिती त्या पाळकाकडून समजेपर्यंत त्याच्या मुलाला फटके मारणे चालूच राहील असे सांगण्यात आले. गरीब बिचारा बाप ! पूर्वीच्या यातनांवर हा कळसच होता ! दुःखशोकाने तो अर्धा वेडाच झाला. तरीपण त्याने सहवेल तेवढे सहन केले; अखेरीस असहाय्यतेने तो ओरडला, " **अलेक्झांडर, माझ्या मुला, मला आता सहन होत नाही ! मी त्यांना हवे ते सांगतो. तुला बसणारे फटके मला बघवत नाहीत.** " मुलगा उत्तरला, " **बाबा–नको–असे करू नका ! माझ्या पित्याला विश्वासघातकी म्हटलेले मला चालणार नाही. सहन करा ! त्यांनी मला मारले तर मी मरेन तेव्हा माझ्या तोंडावर 'येशू, आणि माझी पितृभूमी' हेच शब्द असतील!** " हे शब्द ऐकून ते कॉम्युनिस्ट रागाने लालबुंद झाले. ते सर्व त्या मुलावर तुटून पडले, व त्यांनी त्याला ठार केले. त्या कोठडीच्या भिंती त्याच्या रक्ताने माखल्या होत्या. देवाची स्तुती करीतच त्याने प्राण सोडला. ही घटना पाहून आमचा प्रिय बंधू फ्लॉरेस्क्यु वेडाच झाला.

आमच्या मनगटांवर बेड्या होत्या, त्यांच्या आतील बाजूस टोकदार खिळे बसवले होते. हातांची काहीच हालचाल केली नाही तर ते टोचत नसत. पण कोठडीत फारच थंडी असे. आम्ही थंडीने कापू लागलो की आमची मनगटे त्या खिळ्यांमुळे रक्तबंबाळ होत.

ख्रिस्ती लोकांना खाली डोके वर पाय अशा स्थितीत दोरांना टांगून जोराने मारण्यात येई. हा मार इतका जबर असे की, त्यांची शरीरे माग पुढे झोके घेत. ख्रिस्ती लोकांना " **शीतगृहात** " ते ठेवीत. या खोल्या रेफ्रिजरेटरसारख्या होत्या. आतमध्ये इतके थंड असे की, भिंतीवर बर्फाचे थर जमलेले दिसत. मला एकदा अपुऱ्या कपड्यांनिशी अशा खोलीत टाकण्यात आले. या खोलीत कैद्यांना टाकले की तुरुंगाचे डॉक्टर एका लहानशा छिद्रातून आत नजर ठेवीत. आता कैदी गोठून मरणार अशी चिन्हे दिसू लागली की ते इशारा देत, लगेच रक्षक येऊन आम्हांला बाहेर काढून पुन्हा " गरम " करीत. आम्ही चांगले गरम झालो की, पुन्हा आम्हांला " शीतगृहात " टाकीत–पुन्हा गोठवायचे–पुन्हा गरम करायचे. असे हे सत्र कितीतरी वेळ चाले. ऊब आल्यावर पुन्हा कडक गारठा सहन करायचा–आता मरणार तो लगेच ऊब मिळायची, हा जीवघेणा प्रकार अखंड चालू असे. आज सुद्धा " शीत पेटी " उघडताना माझ्या अंगावर शहारे येतात.

आमच्या शरीराच्या आकाराहून किंचित मोठ्या लाकडी पेट्यात आम्हांला ठेवले होते. हलायला जागाच नव्हती. त्या पेटीला सर्व बाजूंनी धारदार खिळे मारलेले होते. त्यांची टोके आतपर्यंत आली होती. त्या पेटीत आम्ही स्तब्ध, शांत राहिलो तर सर्व काही ठीक असे. पण या पेट्यांत आम्हांला तासनतास सक्तीने उभे करून ठेवीत. कंटाळा येऊन अगर दमल्यामुळे आमची थोडी जरी हालचाल झाली तर बाजूचे खिळे अंगात घुसत. शरीराची किंचित जरी हालचाल झाली तरी हे खिळे सूड उगवीत.

कॉम्युनिस्टांनी ख्रिस्ती लोकांचा जो छळ केला तो समजणे मानवी बुद्धीपलीकडचे आहे. त्याचा अर्थच लावता येत नाही. ख्रिस्ती लोकांचा छळ करताना मी कॉम्युनिस्टांना पाहिले आहे, त्यावेळी या लोकांच्या चेहऱ्यावरून आसुरी आनंद ओसंडत असतो. " आम्हीच सैतान आहोत," अशा आरोळ्या ठोकीत त्यांची हाणामारी चालू असे.

आमचा लढा रक्तमांस असलेल्या सामान्य गोष्टीविरुद्ध नाही. दुष्टाईचे सामर्थ्य व दुष्ट यांच्याविरुद्ध आम्ही युद्ध करीत आहोत. कॉम्युनिझम काही मनुष्यनिर्मित नाही; तो सैतानाकडूनच आहे. ती

एक आत्मिक शक्ती आहे-ही दुरात्म्याची शक्ती आहे. दुसरी मोठी आत्मिक शक्तीच हिचा सामना करू शकेल. ही दुसरी महाशक्ती म्हणजेच देवाचा आत्मा.

आमचा छळ करणाऱ्यांना मी वरचेवर विचारी, " तुम्ही अगदीच असे उलटया काळजाचे कसे ? तुमच्या अंत:करणात दयेचा लवलेशही नाही का?" लेनिनचे एक वचन ते उत्तरादाखल सांगत. "अंडी फोडल्याशिवाय ऑम्लेट करता येत नाही आणि लाकडे तोडताना ढलप्या उडणारच !" मी पुन्हा म्हणे, "लेनिनचे हे वचन चांगलेच माहीत आहे. पण एक गोष्ट लक्षात घ्या. लाकूड तोडताना लाकडाला काही वाटत नाही. पण येथे तुमच्यासमोर मनुष्ये आहेत. तुमचा प्रत्येक फटका वेदनांना जन्म देतो. त्याबद्दल धाय मोकलून रडणाऱ्या कितीतरी आया आहेत. " माझ्या शब्दांचा त्यांच्यावर तिळमात्रही परिणाम झाला नाही. ते तर पक्के जडवादी होते.त्यांच्या लेखी अस्तित्व आहे ते फक्त पदार्थांना. माणूस तरी काय एक पदार्थच ! लाकडाचा ओंडका, अंडयाचे टरफल इतकीच त्याची किमत. ही कल्पना उराशी बाळगून ते विश्वास बसणार नाही अशा प्रकारचे अनन्वित अत्याचार करीत राहतात.

नास्तिकवाद अमर्याद क्रूरपणा शिकवितो–इतका की त्यावर विश्वासच बसत नाही. चांगली गोष्ट केली तर बक्षीस मिळेल, वाईट गोष्टींना शिक्षा मिळेल, असा विश्वास नसला म्हणजे मानवाला माणुसकी राखण्याची काहीच गरज भासत नाही. मग मानवाच्या अंत:करणात भरलेल्या दुष्ट प्रवृत्तींना इतके उधाण येते की त्याचा काही थांगच लागत नाही. हे कॉम्युनिस्ट अत्याचारी वारंवार म्हणत " देव नाही ! मृत्यूनंतर काहीच नाही ! दुष्टपणाला कसलीच शिक्षा नाही ! आम्हांला वाटेल ते आम्ही करू !" एक अत्याचारी म्हणाला, " माझा देवावर विश्वास नाही पण मी त्याचे उपकार स्मरतो; कारण माझ्या अंत:करणातील दुष्टपणाचा आसुरी आविष्कार करण्यासाठी मी आतापर्यंत जिवंत राहिलो ! " हे शब्द मी स्वत: ऐकले आहेत. कैद्यांवर आसुरी अत्याचार करून हा आविष्कार केला.

सुसरीने माणसाला खाल्ले तर मला वाईट वाटते, पण मी सुसरीला

आम्हांला जेव्हा रोज घाणेरडे सूप व आठवड्याला एक पावाचा तुकडा मिळे तेव्हा त्याचाही " दशांश " द्यायचा असे आम्ही ठरवले. प्रत्येक दहाव्या आठवड्यात आम्ही तो पावाचा तुकडा " आमचा प्रभूला दशांश " या नात्याने दुसऱ्या भुकेल्या बंधूला देत असू.

एक ख्रिस्ती व्यक्तीला मृत्युदंड दिला होता. मरण्यापूर्वी त्याला त्याच्या पत्नीची भेट घेऊ दिली. त्याच्या पत्नीशी तो शेवटचे बोलला ते शब्द म्हणजे :

" **माझा वध करणाऱ्यावर प्रीती करीत असतानाच मी मरत आहे. ही गोष्ट तू लक्षात ठेव. ते काय करीत आहेत हे त्यांना समजत नाही. माझी तुला शेवटची एकच विनंती आहे, तूही त्यांच्यावर प्रीती कर; तुझ्या प्रिय व्यक्तीला ते मारीत आहेत यामुळे त्यांच्याविषयी कसलेच किल्मिष तू मनात ठेवू नकोस. आता आपली भेट स्वर्गातच.** " त्यांच्या भेटीच्या वेळी हजर असलेल्या गुप्त पोलिस अधिकाऱ्यावर या शब्दांचा फार प्रभाव पडला. त्यानेच मला पुढे तुरुंगात ही गोष्ट सांगितली तेव्हा तो ख्रिस्ती झाल्यामुळे शिक्षा भोगत होता.

तिरगू–ओकना येथील तुरुंगामध्ये मॅटशेविकी नावाचा एक अगदी तरुण कैदी होता. अठरा वर्षाचा असतानाच त्याला तुरुंगात टाकले होते. झालेल्या छळामुळे तो आता क्षयाने फारच आजारी पडला होता. त्याची स्थिती चिंताजनक आहे ही गोष्ट कशीतरी त्याच्या कुटुंबियांना समजली. त्यांनी त्याच्यासाठी स्ट्रेप्टोमायसीन औषधाच्या शंभर बाटल्या पाठवल्या. हे औषध त्याच्यासाठी संजीवनीच ठरणार होते. तुरुंगामधल्या राजकीय अधिकाऱ्याने त्याला बोलावून हे पार्सल दाखविले व म्हटले, " हे पाहा तुला जीवदान देणारे औषध ! घराकडून आलेली पार्सले कैद्यांना द्यायची नाहीत असा दंडक आहे. मात्र तुला मदत करावी अशी माझी इच्छा आहे. तू तरुण आहेस. तुरुंगात खितपत तू मरावेस असे मला वाटत नाही. मात्र मी तुला मदत करताना तूही मला मदत कर. तुरुंगात तुझ्याबरोबर जे कैदी आहेत त्यांच्याविरुद्ध मला माहिती दे, मग माझ्या वरिष्ठांनी तुला पार्सल का दिले असे विचारले तर मला हे कारण सांगता येईल. "

माझी हृदयक्रियाच बंद पडेल, इतक्या त्या गोष्टी भयानक व ओंगळ आहेत. या सर्व गोष्टी तुमच्या ख्रिस्ती बांधवांना भोगाव्या लागल्या आणि **आता या क्षणी** देखील भोगाव्या लागत आहेत.

मिलान हैमोविकी हे खरोखर एक महान विश्वासी पाळक होते.

तुरुंगात फार गर्दी असे. तिथल्या रक्षकांना कोणा कैद्यांची नावे माहीत नव्हती. प्रत्येकाला नावे घेऊन बोलावण्याऐवजी, ज्यांना पंचवीस फटक्यांची शिक्षा देण्याचे ठरले त्यांनी बाहेर यावे असे ते पुकारीत. कोणतातरी तुरुंगाचा नियम मोडल्याबद्दल ही शिक्षा असे. पाळक मिलान हैमोविकी कित्येकवेळा बाहेर जाऊन दुसऱ्याला मिळणारे फटके त्याच्याएवजी स्वत: घेत असत. या त्यांच्या कृत्यामुळे ते स्वत: सर्व कैद्यांच्या आदरास पात्र झाले एवढेच नाही तर ते सर्व ख्रिस्ताचाही आदर करू लागले.

कॉम्युनिस्टांनी आमच्यावर केलेले सर्व अत्याचार व ख्रिस्ती लोकांनी दाखवलेले असीम धैर्य व केलेली त्यागाची कृत्ये सांगत बसलो तर ती कधीच संपणार नाहीत. प्रसिद्धी मिळाली ती फक्त छळ व यातना यांनाच नाही तर धैर्याच्या कृत्यांनासुद्धा प्रसिद्धी मिळाली. तुरुंगातील लोकांच्या या त्यागाच्या व धैर्याच्या कृत्यांमुळे अजून स्वतंत्र असलेल्या बांधवांना धीर व स्फूर्ती मिळे.

आमच्या भूमिगत मंडळीमध्ये कार्य करणारी एक तरुण मुलगी होती. ही लहान मुलांना ख्रिस्ताविषयी शिकवते, तसेच गुप्तपणे शुभवर्तमानांचा प्रसार करते हे कॉम्युनिस्ट पोलिसांना समजले होते तिला पकडण्याचे त्यांनी ठरवले. लौकरच तिचे लग्न होणार होते. तिला अटक करायची तर ती अधिक दु:खद व वेदनामय व्हावी यासाठी त्यांनी थोड दिवस थांबण्याचे ठरवले. लग्नाच्या दिवशी तिला पकडण्याचे निश्चित झाले होते. लग्नाचा दिवस आला. मुलीने वधूचा वेष घातला होता. तिच्या आयुष्यातील सर्वांत आनंदाचा व सौख्याचा हा दिवस होता. एकाएकी धाडकन दरवाजा उघडला गेला आणि गुप्त पोलिसांची धाड पडली !

गुप्त पोलिसांना पाहताच बेडया घालून घेण्यासाठी वधूने आपले हात पुढे केले त्यांनी धसमुसळेपणाने तिला बेडया घातल्या. तिने आपल्या भावी

पतीकडे नजर टाकली, आणि बेड्यांचे चुंबन घेऊन ती म्हणाली. " **माझ्या लग्नाच्या दिवशी माझ्या स्वर्गीय पतीने ही अमोल भेट मला दिली आहे म्हणून मी त्याला धन्यवाद देते. त्यासाठी यातना सहन करण्यासाठी मी पात्र ठरले म्हणून मी त्याला धन्यवाद देऊन त्याचे उपकार स्म ते.**" तिचा होणारा पती व जमलेले ख्रिस्ती बांधव यांना शोकसागरात टाकून तिला ओढून नेण्यात आले. कॉम्युनिस्ट रक्षकांच्या हातात सापडलेल्या तरुण मुलीचे काय होते ते त्यांना चांगले माहीत होते. पाच वर्षांनी तिची सुटका झाली; ती तीस वर्षांनी वृद्ध दिसत होती- भंगलेली, खचलेली अशी ती झाली होती. तिचा पती तिची वाट पहात होता. ख्रिस्तासाठी मी केले हे काहीच नाही असे ती म्हणाली. भूमिगत मंडळीत या प्रकारचे सुंदर, मनोहर ख्रिस्ती आहेत.

## ' ब्रेनवॉशिंग " म्हणजे काय ?

ब्रेनवॉशिंग म्हणजे मेंदू धुणे—मन धुणे—मनावरले पूर्वीचे विचार, परंपरा, कल्पना धुवून, पुसून टाकून त्याठिकाणी नवीन विचार घालणे. कोरीयातील युद्धामध्ये व आता व्हिएतनाममधील ब्रेनवॉशिंग-बद्दल बहुतेकांनी ऐकले आहे. माझ्यावरही हा प्रसंग आला होता. यासारखा दुसरा वेदनापूर्ण अनुभव कोणताच नाही. कित्येक वर्षे रोज सतरा तास आम्ही ऐकत होतो :

कॉम्युनिझम चांगला आहे !
कॉम्युनिझम चांगला आहे !
कॉम्युनिझम चांगला आहे !
कॉम्युनिझम चांगला आहे !
ख्रिस्ती धर्म मूर्खपणा आहे !
ख्रिस्ती धर्म मूर्खपणा आहे !
ख्रिस्ती धर्म मूर्खपणा आहे !
सोडून द्या ! सोडून द्या ! सोडून द्या !
सोडून द्या ! सोडून द्या !

हे शब्द रोज सतरा तास, कित्येक दिवस, आठवडे, महिने ऐकावे लागत.

ब्रेन वॉशिंगला विरोध कसा करायचा असे मला बऱ्याच ख्रिस्ती व्यक्तींनी विचारले. याला विरोध करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे, " हार्टवॉशिंग " (अंत:करण शुद्ध करणे). येशूच्या प्रीतीने आपले अंत:करण शुद्ध झाले असेल, आपण त्याच्यावर अंत:करणापासून प्रेम करीत असू तर कोणत्याही छळाला आपणांला तोंड देता येईल. प्रेमळ वधू आपल्या प्रेमळ वरासाठी काय करणार नाही ? आई आपल्या मुलासाठी कोणती गोष्ट करणार नाही ? ख्रिस्त बाळाला कडेखांद्यावर खेळवलेल्या मरीयेप्रमाणे तुमचे येशूवर प्रेम आहे का ? वधूच्या वरावरील प्रेमासारखे तुमचे ख्रिस्तावरील प्रेम आहे का ? असेल तर तुम्हांला या यातनांचा सामना करता येईल—हे सर्व सहन करता येईल.

आपण किती व काय सहन केले, हे देव न्याय करताना पाहणार नाही, तर किती प्रेम केले हे तो पाहणार आहे. कॉम्युनिस्ट तुरुंगात हाल-अपेष्टा सहन करणाऱ्या ख्रिस्ती लोकांनी अपार प्रीती केली याला मी साक्षी आहे. त्यांनी देवावर प्रीती केली एवढेच नाही तर माणसांवरही तशीच प्रीती केली.

निर्घृण अत्याचार आणि छळ अविरतपणे चालूच होते. मी बेशुद्ध पडलो अगर माझी वाणी बंद झाली की मला पुन्हा माझ्या कोठडीत टाकण्यात येई. तिथे माझी देखभाल करायला कोणीच नव्हते. मी एकटाच अर्धमेल्या अवस्थेत तेथे पडून राही. पुन्हा सावध झाल्यावर पूर्वीप्रमाणे अत्याचारांची सुरुवात होई. या अवस्थेत कित्येकजण मरण पावले पण मी मात्र पुन्हा पुन्हा सावध होई, पुन्हा मला थोडीशी शक्ती प्राप्त होई. पुढल्या काही वर्षांत, निरनिराळ्या तुरुंगांत त्यांनी माझ्या पाठीचे चार मणके तोडले, कित्येक हाडे मोडली, दहा बारा ठिकाणचे मांस कोरून काढले. शरीरावर अठरा ठिकाणी डाग देऊन भोके पाडली.

ऑस्लोमधील काही डॉक्टरांनी माझी तपासणी केली. माझ्या शरीराची अवस्था त्यांनी पाहिली, फुफुसावरील क्षयाचे डाग पाहिले व मी जिवंत कसा राहिलो याचे आश्चर्य व्यक्त केले. त्यांच्या मते मी अजून जिवंत राहिलो हा मोठा चमत्कार होता ! वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीने कित्येक वर्षांपूर्वीच माझा मृत्यू व्हावयास हवा होता. हा महान चमत्कार

आहे असा माझाही विश्वास आहे. देव खरोखर चमत्कार करणारा, अद्भुत देव आहे.

पोलादी पडद्यामागील भूमिगत मंडळीचा आवाज तुम्हाला ऐकता यावा, हे कार्य माझ्याकडून व्हावे यासाठी देवाने चमत्कार करून मला जिवंत ठेवले हा माझा विश्वास आहे. तुमच्या विश्वासू बांधवांची, यातनांत खितपत पडलेल्या बांधवांची हाक तुमच्यापर्यंत पोचवावी यासाठीच देवाने मला जिवंत बाहेर येऊ दिले.

## थोडेसे स्वातंत्र्य–पुन्हा अटक

१९५६ साल उजाडले. यावेळेंपर्यंत मी साडेआठ वर्षे तुरुंगात काढली होती. माझे वजन कमी झाले होते, शरीरावर वण पडले होते, मला भीषण मारहाण झाली होती, लाथा मारल्या होत्या, मला शिवीगाळ केली होती. उपासमार, दडपण मी अनुभवले होते, उबग येईपर्यंत मला प्रश्न विचारण्यात आले होते, धमकावले होते, माझी अवहेलना करण्यात आली होती. मात्र या सगळ्या गोष्टी होऊन देखील मला पकडणाऱ्यांची इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. निराश होऊन त्यांनी माझी सुटका केली. त्याखेरीज माझ्या अटकेविरुद्ध वारंवार तक्रारी येतच होत्या.

परत पूर्वीच्या जागी मी गेलो. फक्त एक आठवडाभरच मी स्वतंत्र होतो. मी दोन संदेश दिले. लगेच त्यांनी मला बोलावून संदेश देण्याची व धार्मिक कार्यात भाग घेण्याची मनाई केली. मी संदेश तरी काय दिले होते ? माझ्या कळपाला मी सांगितले, " धीर धरा, धीर धरा, खूप धीर धरा. " " म्हणजेच तू त्यांना धीर धरावयास सांगतोस, कारण मग अमेरिकन लोक येऊन त्यांची सुटका करतील, " पोलिस माझ्या अंगावर ओरडले. "चक्र फिरते, काळ बदलतो" असेही मी म्हटले होते. " कॉम्युनिस्टांची राजवट संपुष्टात येणार असे तू त्यांना सांगतोस ! ही क्रांतिविरोधी शिकवण आहे–ती खोटी आहे, " ते जवळ जवळ किंचाळलेच. अशा रीतीने माझ्या सार्वजनिक सेवेचा शेवट झाला.

मी हुकुम मोडण्याचे धाडस करणार नाही व भूमिगत सुवार्ता कार्यात पुन्हा भाग घेणार नाही असे बहुधा त्या अधिकाऱ्यांना वाटले

असावे. हीच त्यांची मोठी चूक होती. पुन्हा गुप्तपणे मी माझे पूर्वीचे कार्य सुरू केले. माझ्या कुटुंबाचे मला साहाय्य होतेच.

पुन्हा मी विश्वास ठेवणाऱ्या छोटचा छोटचा लपून राहणाऱ्या गटांना साक्ष देऊ लागलो. ज्यांच्यावर भरंवसा ठेवता येईल अशांच्या साहाय्याने एखाद्या भुतासारखा मी गटागटातून फिरत होतो. यावेळी माझ्या संदेशांना पुष्टी देण्यासाठी माझ्या अंगावरचे वण होते. त्यांच्याद्वारे मी नास्तिकतावादाचा दुष्टपणा, क्रूरपणा पटवून देत होतो व गडबडून गेलेल्या जिवांना देवावर विश्वास ठेवा, शूरपणे राहा असे सांगत होतो. मी गुप्तपणे सुवार्तिकांचे एक जाळेच विणले होते. हे सर्व परस्परांच्या साहाय्याने शुभवृत्तप्रसार करीत. यावेळी कॉम्युनिस्टांची दृष्टी अंध बनली होती. देवाचा कार्यकारी हात न दिसण्याइतका कोणी आंधळा बनला असेल तर त्याला सुवार्तिकही दिसणार नाहीत हे उघडच आहे.

पोलिस माझ्या हालचालीवर,मुक्कामाच्या जागांवर एकसारखे लक्ष ठेवून होते. या गोष्टींचा त्यांना अखेर फायदा मिळाला. पुन्हा माझा तपास काढून मला तुरुंगात टाकण्यात आले. काही कारणाने या खेपेस माझ्या कुटुंबियांना पकडण्यात आले नाही. कदाचित मला बरीच प्रसिद्धी मिळाली होती म्हणून असेल ! साडेआठ वर्षांच्या तुरुंगवासानंतर मला तीन वर्षे साधारण स्वातंत्र्य मिळाले होते. पुन्हा मला साडेपाच वर्षांची आणखी शिक्षा मिळणार होती.

पुष्कळ प्रकारे माझा हा दुसरा तुरुंगवास पहिल्याहून फारच खडतर होता. तिथे काय वाढून ठेवले आहे याची मला कल्पना होतीच. तेथे जाताच माझी प्रकृती एकदम ढासळली. पण भूमिगत मंडळीचे गुप्त कार्य कॉम्युनिस्ट तुरुंगामध्येही आम्ही गुप्तपणे चालू ठेविले.

## एक सौदा–आम्ही संदेश द्यायचा, त्यांनी मारहाण करायची

दुसऱ्या कैद्यांना सुवार्ता सांगण्याची सक्त मनाई होती. असे करताना कोणी सापडला तर त्याला बेदम मार मिळे, हेंही सर्वांना माहीत होते. पण संदेश देण्याचे भाग्य मिळावे म्हणून आमच्यापैकी काहींनी हे मोल द्यायचे मान्य केले व त्यांच्या अटी कबूल केल्या. हा एक सौदाच होता. आम्ही संदेश देत असू–ते आम्हांला मारहाण करीत. वार्ता संदेश

देताना आम्हांला आनंद होई. आम्हांला मारताना त्यांना आनंद होई. एकूण सगळेच आनंदात होते.

पुढे वर्णन केलेली घटना अनेक वेळा घडली होती. किती वेळा ते आता मलाही आठवत नाही. एक ख्रिस्ती बंधू इतर कैद्यांना सुवार्ता सांगत होता. इतक्यात कोठडीचा दरवाजा उघडून रक्षक आत घुसले. एक वाक्य अर्धवटच राहिले होते. त्यांनी त्याला ओढत ओढत "मारहाणीच्या खोलीत" नेले. अगदी बेदम मारहाण केल्यावर त्यांनी त्याला पुन्हा कोठडीत आणून जमिनीवर फेकले. त्याच्या अंगावर वळ उठले होते आणि तो रक्ताने माखला होता. मोठ्या कष्टाने तो उठून उभा राहिला. वेदना सहन करीतच त्याने आपले कपडे ठाकठीक केले आणि म्हणाला, "बरं तर मित्रांनो, मी जाण्यापूर्वी भाषण कुठे थांबवले होते ?" त्याने आपला सुवार्तासंदेश पुढे चालू ठेवला. मी अशा रमणीय, सुन्दर गोष्टी पाहिल्या आहेत !

कधी कधी अदीक्षित लोकही संदेश देत. साधी-सुधी सामान्य माणसेही पवित्र आत्म्याने प्रेरित होऊन उत्कृष्ट संदेश देत. प्रत्येक शब्द ते अंतःकरणात भिजवून बोलत. छळ होण्याची भीती असलेल्या अशा परिस्थितीत संदेश देणे हे सोपे काम नव्हते. लगेच रक्षक येत, संदेश देणाऱ्याला खेचून नेत, मारहाण करून अर्धमेला करीत आणि टाकून देत.

घेर्ला येथील तुरुंगात ग्रेकू नावाचा एक ख्रिस्ती कैदी होता. त्याला मरेपर्यंत मारहाण करण्याची शिक्षा देण्यात आली होती. हा प्रकार काही आठवडे चाले. त्याला अगदी संथपणे मारीत. एका रबरी दांडक्याने त्याच्या तळपायावर प्रहार करून त्याला टाकून देत. पुन्हा काही मिनिटांनी आणखी काही प्रहार, पुन्हा थोड्या वेळाने, अशी थांबून थांबून मारहाण करण्यात येई. त्याच्या वृषणावर मारले. मग एका डॉक्टरने त्याला इंजेक्शन दिले. तो सावध झाला. त्याला चांगले अन्न खावयास दिले. पुन्हा शक्ती आल्यावर पुन्हा मारहाण सुरू केली. हा प्रकार तो या संथ मारहाणीने मरेपर्यंत सारखा चालू होता. हा अनन्वित अत्याचार करणाऱ्यांचा जो पुढारी होता त्याचे नाव रेक. तो कॉम्युनिस्ट पार्टीच्या मध्यवर्ती समितीचा सदस्य होता.

कॉम्युनिस्ट वरचेवर ख्रिस्ती लोकांना बोलतात. तेच शब्द रेक ही मारहाण चालू असताना बोले; " हे पाहा, लक्षात ठेव, मीच देव आहे. तुला जीवदान द्यायचे की मृत्युदान द्यायचे ही गोष्ट माझ्या हाती आहे. स्वर्गात जो कोणी असेल त्याच्या हाती काहीच नाही. त्याच्या इच्छेने तू जिवंत राहू शकत नाहीस. सर्व काही माझ्या हाती आहे. माझी इच्छा असली तर मी तुला तारीन अगर मारीन. मीच देव आहे. " अशा प्रकारे तो ख्रिस्ती लोकांची टवाळी करी.

अशा प्रकारच्या भयानक स्थितीतही बंधू ग्रेकूने या रेकला मोठे समर्पक उत्तर दिले. हे मला नंतर रेककडूनच समजले. " तुम्ही बोलला त्यात केवढा गहन अर्थ आहे हे तुम्हालाच ठाऊक नाही. खरेच तुम्ही देव आहा. प्रत्येक सुरवंट खरे तर फुलपाखरूच असतो मात्र त्याची योग्य वाढ झाली पाहिजे. छळ करावा, वध करावा या हेतूने तुम्हाला घडवले नाही. देवासारखे व्हावे म्हणून तुम्हाला घडवले आहे. येशूही त्याच्या वेळच्या यहूद्यांना म्हणाला, ' तुम्ही देव आहात. ' ऱ्यैक देवाचे जीवन तुमच्या अंतःकरणात आहे. तुमच्यासारखे अत्याचारी अनेक होऊन गेले पण त्या सर्वांना, प्रेषित पौलाप्रमाणे एका क्षणी समजून आले की, अत्याचार करणे ही मानवतेला लाजिरवाणी गोष्ट आहे, आपणाला याहून उत्तम चांगल्या गोष्टी करता येतील. आणि म्हणून त्यांनी दैवी स्वभावाचा स्वीकार केला. रेकसाहेब, माझे ऐका, देवासमान बनणे हेच तुमचे कार्य आहे; छळ करणे हे नव्हे. "

त्या वेळी आपला बळी काय बोलतो आहे याकडे रेकने लक्ष दिले नाही. स्वतःसमोर स्तेफनाचा वध होत असताना त्याच्या सुन्दर साक्षीकडे तार्ससच्या शौलानेही लक्ष दिले नव्हतेच ! पण हे शब्द त्याच्या अंतःकरणात कार्य करीत होते. आपले खरे कार्य कोणते हे रेकला नंतर समजले.

कॉम्युनिस्टांच्या ह्या अत्याचारापासून, मारहाणीकडून, छळाकडून आम्ही एक मोठा धडा शिकलो. तो म्हणजे आत्मा हाच शरीराचा स्वामी आहे. यातना होत असताना आम्हांला त्यांची जाणीव होई. पण ख्रिस्ताच्या गौरवात गढलेल्या आमच्या आत्म्यापासून आणि आमच्यामधील त्याच्या समक्षतेपासून त्या यातना दूर कुठेतरी आहेत असे वाटे.

आम्हांला जेव्हा रोज घाणेरडे सूप व आठवड्याला एक पावाचा तुकडा मिळे तेव्हा त्याचाही "दशांश" द्यायचा असे आम्ही ठरवले. प्रत्येक दहाव्या आठवड्यात आम्ही तो पावाचा तुकडा "आमचा प्रभूला दशांश" या नात्याने दुसऱ्या भुकेल्या बंधूला देत असू.

एक ख्रिस्ती व्यक्तीला मृत्युदंड दिला होता. मरण्यापूर्वी त्याला त्याच्या पत्नीची भेट घेऊ दिली. त्याच्या पत्नीशी तो शेवटचे बोलला ते शब्द म्हणजे :

"**माझा वध करणाऱ्यावर प्रीती करीत असतानाच मी मरत आहे. ही गोष्ट तू लक्षात ठेव. ते काय करीत आहेत हे त्यांना समजत नाही. माझी तुला शेवटची एकच विनंती आहे, तूही त्यांच्यावर प्रीती कर; तुझ्या प्रिय व्यक्तीला ते मारीत आहेत यामुळे त्यांच्याविषयी कसलेच किल्मिष तू मनात ठेवू नकोस. आता आपली भेट स्वर्गातच.**" त्यांच्या भेटीच्या वेळी हजर असलेल्या गुप्त पोलिस अधिकाऱ्यावर या शब्दांचा फार प्रभाव पडला. त्यानेच मला पुढे तुरुंगात ही गोष्ट सांगितली तेव्हा तो ख्रिस्ती झाल्यामुळे शिक्षा भोगत होता.

तिरगू-ओकना येथील तुरुंगामध्ये मॅटशेविकी नावाचा एक अगदी तरुण कैदी होता. अठरा वर्षाचा असतानाच त्याला तुरुंगात टाकले होते. झालेल्या छळामुळे तो आता क्षयाने फारच आजारी पडला होता. त्याची स्थिती चिंताजनक आहे ही गोष्ट कशीतरी त्याच्या कुटुंबियांना समजली. त्यांनी त्याच्यासाठी स्ट्रेप्टोमायसीन औषधाच्या शंभर बाटल्या पाठवल्या. हे औषध त्याच्यासाठी संजीवनीच ठरणार होते. तुरुंगामधल्या राजकीय अधिकाऱ्याने त्याला बोलावून हे पार्सल दाखविले व म्हटले, "हे पाहा तुला जीवदान देणारे औषध ! घराकडून आलेली पार्सले कैद्यांना द्यायची नाहीत असा दंडक आहे. मात्र तुला मदत करावी अशी माझी इच्छा आहे. तू तरुण आहेस. तुरुंगात खितपत तू मरावेस असे मला वाटत नाही. मात्र मी तुला मदत करताना तूही मला मदत कर. तुरुंगात तुझ्याबरोबर जे कैदी आहेत त्यांच्याविरुद्ध मला माहिती दे, मग माझ्या वरिष्ठांनी तुला पार्सल का दिले असे विचारले तर मला हे कारण सांगता येईल."

मॅटशेविकीने लगेच उत्तर दिले, "अशाप्रकारे जिवंत राहण्याची माझी इच्छा नाही. मग मला आरशात माझे तोंड पाहायची पण लाज वाटेल; कारण जेव्हा जेव्हा मी आरशात पाहीन तेव्हा तेव्हा मला एका विश्वासघातक्याचेच तोंड दिसेल. तुमची अट स्वीकारण्यापेक्षा मी मरणच स्वीकारतो." या अधिकाऱ्याने त्याच्याशी हस्तांदोलन केले व म्हटले, "शाबास! अभिनंदन! तुझ्याकडून हेच अपेक्षित होते. पहा आता दुसरी एक गोष्ट तुला सांगतो. काही कैदी आमचे खबरे बनले आहेत. ते स्वतःला कॉम्युनिस्ट म्हणवतात आणि तुमचा घात करतात. ते दुटप्पी आहेत. त्यांच्यावर आमचा विश्वास नाही. ते खरोखर कितपत मनापासून कार्य करतात हे आम्हांला समजले पाहिजे. तुमच्या दृष्टीने ते द्रोहीच आहेत; तुमचे शब्द, कार्य, सर्वांची माहिती ते आम्हांला देतात आणि तुमचा घात करतात. तुझ्या मित्रांना पकडून द्यावे अशी तुझी इच्छा नाहीच. ते ठीक आहे, पण तुमच्या या विरोधकांची माहिती तू मला दे मग आमचे काम होईल, तुमचेही प्राण वाचतील!"

पहिल्याप्रमाणेच मॅटशेविकी ताडकन उत्तरला, "मी ख्रिस्ताचा शिष्य आहे. शत्रूंवरही प्रेम करा असे त्याने आम्हांला शिकविले आहे. आमचा घात करणारे हे लोक आमचे नुकसान करतात हे खरे, पण दुष्टपणाचा बदला दुष्टपणाने घेणे मला पसंत नाही. या लोकांविरुद्धसुद्धा मी माहिती देणार नाही. मला त्यांची दया येते, त्यांच्यासाठी मी प्रार्थना करतो, कॉम्युनिस्टांबरोबर मला कसलाच संबंध ठेवायचा नाही." अधिकाऱ्याबरोबर या प्रकारे बोलून मॅटशेविकी परत आला व मी ज्या कोठडीत होतो तेथेच मरण पावला. तो मरण पावला तेव्हा मी त्याच्याजवळ होतो-तो देवाची स्तुती करीत होता. जीवनाविषयीच्या नैसर्गिक ओढीवरसुद्धा प्रीतीने मात केली!

एखादा गरीब मनुष्य गाण्याचा शौकीन असतो. पदरचा शेवटचा रुपया खर्चूनसुद्धा तो गाणे ऐकतो. गाणे संपल्यावर पैसा जवळ नसतो पण तो निराश झालेला नसतो, कारण त्याने मधुर स्वर ऐकलेले असतात.

तुरुंगात अनेक वर्षे मी खितपत होतो म्हणून मलाही निराशा

वाटत नाही. मी कितीतरी सुन्दर, अद्‌भुत घटना पाहिल्या आहेत. तुरुंगात जे अशक्त, सामान्य कैदी होते त्यांतलाच मीही एक. पण पहिल्या काही शतकांतील थोर ख्रिस्ती व्यक्तींसारखेच शूर, धीराने विश्वास राखणाऱ्या अशा थोर पवित्र जनांबरोबर एकाच तुरुंगात राहाण्याचे महाभाग्य मला लाभले आहे. ख्रिस्तासाठी हे सर्व आनंदाने मरणाला सामोरे गेले. या विश्वासू वीरांच्या, या पवित्र जनांच्या आत्म्याचे सौंदर्य अवर्णनीय आहे.

येथे मी लिहीत असलेल्या या गोष्टी क्वचित आढळणाऱ्या अशा नाहीत. भूमिगत मंडळीतल्या ख्रिस्ती लोकांना या अतिमानवी वाटणाऱ्या गोष्टी अगदी स्वाभाविक अशा झाल्या आहेत. " पहिली प्रीती " पुन्हा मिळवलेली मंडळी म्हणजेच ही भूमिगत मंडळी.

तुरुंगात जाण्यापूर्वी मी ख्रिस्तावर फार प्रीती करीत असे. आता तुरुंगात मी " ख्रिस्ताची नवरी ", त्याचे आत्मिक शरीर, पाहिले. आणि आता मला म्हणता येते की, मी ख्रिस्तावर प्रीती करतो तेवढीच या भूमिगत मंडळीवरही करतो. या मंडळीचे सौंदर्य, त्यागाचा आवेश, सर्व काही मी आता पाहिले आहे.

## माझी पत्नी व मुलगा यांचे काय ?

माझ्या पत्नीपासून मला पकडून नेण्यात आले होते. नंतर तिचे काय झाले मला माहीत नव्हते. तिलाही तुरुंगात टाकले होते हे मला पुढे बऱ्याच वर्षांनी समजले. तुरुंगात ख्रिस्ती पुरुषांपेक्षा ख्रिस्ती स्त्रियांना जास्त यातना सहन कराव्या लागतात. तेथले रक्षक मुलींवर रानटीपणे बलात्कार करतात. चेष्टा करणे, अश्लील बोलणे यांना तर सीमाच नसते. एका कालव्याचे काम चालू होते, तेथे या स्त्रियांना सक्त श्रमाचे काम करावयास लावले आणि पुरुषांइतकेच काम करण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. हिवाळ्यात त्यांना माती उकरण्याचे काम असे. वेश्यांना त्यांच्यावर मुकादम म्हणून नेमण्यात आले होते. या विश्वासणाऱ्या स्त्रियांना त्रास देण्याची त्यांच्यात स्पर्धाच चालू असे. माझ्या पत्नीने गुरांप्रमाणे गवत खाऊन स्वतःचा जीव राखला. भुकेले कैदी या कालव्यावर काम करताना उंदीर आणि साप खात. रविवारच्या दिवशी

येथले रक्षक एक मजेचा खेळ खेळत. ते डॅन्यूब नदीत स्त्रियांना फेकून देत, त्यांना बाहेर काढत, त्यांना हसत, त्यांची ओलीचिंब शरीरे पाहून अश्लील बोलत, पुन्हा नदीत टाकत–बाहेर काढत. या प्रकारे माझ्या पत्नीला देखील ॅन्यूब नदीत फकले होते.

आम्ही दोघेही तुरुंगात होतो तेव्हा आमचा मुलगा रस्तोरस्ती भटकत होता. मिहाई लहानपणापासूनच धार्मिक होता; आमच्या विश्वासाबद्दल त्याला आस्था होती. वयाच्या नवव्या वर्षी आईबापांना पकडून तुरुंगात नेल्यामुळे त्याच्या ख्रिस्ती जीवनात ही कसोटीची वेळ आली. तो अगदी निराश झाला. या धर्मात काही अर्थ नाही असे तो म्हणू लागला. साधारणतः त्याच्या वयाच्या मुलांच्यापुढे कधी नसतात असले प्रश्न त्याला भेडसावत होते. मुख्य म्हणजे त्याला पोटाचा प्रश्न सोडवायचा होता.

ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबांना मदत करणे हा गुन्हा होता. मिहाईला मदत करणाऱ्या दोन स्त्रियांना पकडून बेदम मारहाण करण्यात आली. आता पंधरा वर्षांनंतरही या मारहाणीमुळे त्या अधू झाल्या आहेत. एका स्त्रीने मिहाईला आश्रय दिला. कैद्यांच्या कुटुंबियांना मदत केल्याच्या आरोपाखाली तिला पकडून आठ वर्षांची शिक्षा देण्यात आली. लाथांनी तिचे दात पाडण्यात आले, अनेक हाडे मोडण्यात आली. तिला आता कधीच कोणतेच काम करता येणार नाही. जन्मभर ती अधूच राहणार.

## " मिहाई, येशूवर विश्वास ठेव ! "

वयाच्या अकराव्या वर्षी मिहाई एक कामगार बनला व पोटापुरते मिळवू लागला. हालअपेष्टा सहन कराव्या लागल्यामुळे त्याचा विश्वास थोडा डळमळीत झाला होता. माझी पत्नी कैदेतच होती. दोन वर्षांनंतर मिहाईला तिला भेटण्याची परवानगी मिळाली. कॉम्युनिस्टांच्या तुरुंगात, लोखंडी गजांआड उभी असलेली आई त्याला दिसली. ती अगदी घाणेरडी व कृश दिसत होती. तिच्या हातांवर घट्टे पडले होते, अंगावर कैद्यांचा गबाळ वेष होता. प्रथम त्याने तिला ओळखलेच नाही. ती त्याच्याशी बोलली ते पहिले शब्द, " मिहाई, येशूवर विश्वास ठेव ! " हे होते. हे ऐकताच रक्षकांनी मोठ्या क्रोधाने तिला मिहाईजवळून ओढले व फरफटत

नेले. मिहाईला रडू कोसळले ; आईचे हाल पाहून त्याला अतिशय दु:ख झाले. याच क्षणी त्याचा पालट झाला. असल्या कठीण परिस्थितीतही जर ख्रिस्तावर प्रीती करता येते तर तो खरोखर खरा तारक आहे हे त्याच्या लक्षात आले. पुढे तो म्हणाला, " ख्रिस्ती धर्माच्या समर्थनासाठी दुसरा कुठलाच मुद्दा नसला तरी माझी आई त्या धर्मावर विश्वास ठेवते एवढी गोष्ट मला पुरेशी आहे." त्याच दिवशी त्याने पूर्णपणे ख्रिस्ताचा स्वीकार केला.

शाळेतही त्याला सतत झगडा करावा लागला. तो हुशार होता आणि बक्षीस म्हणून त्याला एक लाल रंगाचा नेक्टाय मिळाला होता. तरुण कॉम्युनिस्ट सभासदाचे चिन्ह म्हणजे हा टाय ! माझा मुलगा म्हणाला, " माझ्या आईवडिलांना तुरुंगात टाकणाऱ्यांचा हा टाय मी कधीच वापरणार नाही." यामुळे त्याला शाळेतून काढून टाकले. एक वर्ष फुकट गेले. पुन: तो शाळेत गेला. आपण ख्रिस्ती कैद्याचा मुलगा आहो ही गोष्ट त्याने गुप्त ठेवली होती.

पुढे त्याला पवित्रशास्त्रविरोधी असा निबंध लिहावयास सांगितले. त्याने लिहिले, " पवित्रशास्त्राच्या विरुद्ध असलेले मुद्दे तेवढे प्रभावी नाहीत व पवित्रशास्त्रविरुद्धची वचने सर्व खोटी आहेत. अध्यापकांनी पवित्रशास्त्र वाचलेले नसावे. पवित्रशास्त्र आणि विज्ञान यांमध्ये एक सुसंवाद आहे." पुन: त्याला काढून टाकले. या खेपेला त्याची शाळेची दोन वर्षे फुकट गेली.

अखेर त्याला सेमिनरीमध्ये अभ्यास करण्याची मुभा मिळाली. येथे त्याला " मार्क्सवादी देवज्ञान " शिकवण्यात येई. कार्ल मार्क्सच्या विचारांना अनुसरूनच प्रत्येक गोष्टीची फोड करण्यात येई. मिहाईने भर वर्गात निषेध व्यक्त केला. इतर विद्यार्थ्यांनी त्याला पाठिंबा दिला. परिणामी त्याला पुन्हा हाकलण्यात आले आणि त्याचा ईश्वरविज्ञानाचा अभ्यास अपुराच राहिला.

एकदा वर्गामध्ये एका प्राध्यापकाने नास्तिकमताचे व्याख्यान दिले. माझ्या मलाने उठून या प्राध्यापकाला विरोध केला. " इतक्या तरुणांना चकीचे मार्गदर्शन करून किती मोठी जबाबदारी स्वत:वर ओढवून तुम्ही

घेत आहात याची तुम्हाला जाणीव आहे का?" असे माझ्या मुलाने विचारले. सर्व वर्गातील सर्व मुलांनी हा मुद्दा उचलून धरला ; जो कोणी प्रथम बोलण्याचे धैर्य दाखवील त्याची सर्वजण बाजू घ्यावयास तयार होतेच. आपण ख्रिस्ती कैदी वर्मब्रँड याचे पुत्र आहोत, ही गोष्ट आपल्याला शिक्षण मिळावे म्हणून तो गुप्त ठेवी. पण ती अखेर उघडकीस येई, पुन्हा नेहमीप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापकांच्या कचेरीचे बोलावणे येई आणि त्याची हकालपट्टी होई.

मिहाईला भुकेचाही फार त्रास झाला. कॉम्युनिस्ट देशामधील ख्रिस्ती कैद्यांच्या कुटुंबांवर नेहमीच उपासमारीची वेळ येते. अशा कुटुंबांना मदत करणे म्हणजे मोठा गुन्हा करण्यासारखेच आहे.

अशाच एका कुटुंबाच्या हालाची कहाणी सांगतो. मला स्वत:ला ही गोष्ट माहीत आहे. भूमिगत मंडळीतील कार्यामुळे एक बंधू तुरुंगात गेला. मागे त्याची पत्नी व सहा मुले होती. सतरा आणि एकोणीस वर्षे वयाच्या त्याच्या मोठ्या मुलींना कोठेच नोकरी मिळेना, कारण कॉम्युनिस्ट देशामध्ये नोकऱ्या देणारी एकच संस्था आहे, ती म्हणजे सरकार आणि हे सरकार " गुन्हेगार " ख्रिस्त्यांच्या मुलांना नोकरी देणे शक्यच नव्हते. कृपा करून नीती-अनीतीचे निकष या गोष्टीला लावू नका. त्या ख्रिस्ती हुतात्म्याच्या–ख्रिस्ती असलेल्या–मुलींनी आपल्या लहान भावांचे व आजारी आईचे पोषण व्हावे म्हणून वेश्याव्यवसाय पत्करला. त्यांच्या चौदा वर्षाच्या भावाला हे समजले तेव्हा तो वेडाच बनला व त्याला वेड्यांच्या इस्पितळात पाठवावे लागले. कित्येक वर्षांनी त्यांच्या पित्याची तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. घरी आल्यानंतर त्याने एकच प्रार्थना केली, " देवा, मला पुन्हा तुरुंगात ने; ही स्थिती मला पाहावत नाही, हे मला सहन होत नाही. " त्याची इच्छा पूर्ण झाली. तो आता पुन्हा तुरुंगात आहे. अपराध काय, तर त्याने मुलांना ख्रिस्ताची साक्ष दिली. आता त्याच्या मुली वेश्या नाहीत. गुप्त पोलिसांचे सांगणे ऐकल्यावरून त्यांना आता नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्या आता खबऱ्याचे काम करतात. ख्रिस्ती कैद्याच्या मुली म्हणून त्यांचे सर्व ठिकाणी स्वागत होते. मग तिथे ऐकायला पाहायला मिळेल त्या सर्व गोष्टी त्या पोलिसांना

सांगतात. हे घृणास्पद आहे, अनैतिक आहे, एवढेच म्हणून स्वस्थ बसू नका–तसे ते आहेच–पण या पापात तुम्हीही भागीदार नाही का? कारण, जे तुम्ही स्वतंत्र आहा ते तुम्ही अशा ख्रिस्ती कुटुंबांना साहाय्य करीत नाही. ती कुटुंबे एकाकी पडतात व नाईलाजाने हा मार्ग चोखळतात.

# प्रकरण तिसरे

मला तुरुंगात येऊन एकूण चौदा वर्षे लोटली होती. या काळात मला पवित्र शास्त्र अगर इतर कोणतेच पुस्तक पाहावयास मिळाले नाही. लिहायचे कसे हेही मी विसरून गेलो होतो. भयंकर भूक, त्यामुळे होणारी उपासमार, यातना, पुन्हा शुद्धीवर येण्यास दिलेले अमली पदार्थ, या सर्व अत्याचारांमुळे मी शास्त्रवचने विसरलो होतो. ज्या दिवशी माझ्या कैदेची चौदा वर्षे पूर्ण झाली त्या दिवशी एकाएकी मला हे वचन आठवले, "याकोबाने राहेलीसाठी सात वर्षे चाकरी केली; तिच्यावर त्याची प्रीती असल्यामुळे ती वर्षे त्याला केवळ थोड्या दिवसांसारखी वाटली."

यानंतर लगेच काही दिवसांनी आमच्या देशात सार्वत्रिक माफी जाहीर केली त्यामध्ये माझीही सुटका झाली. अमेरिकेत आमच्या बाजूने लोकमत असल्याने ही माफी दिली गेली. माझ्या पत्नीची भेट झाली. चौदा वर्षे ती विश्वासाने माझी वाट पाहात होती.

अगदी दैन्यावस्थेत आम्ही नव्याने संसार सुरू केला. आमच्याकडे

काहीही नव्हते, कारण कोणाला पकडले तर लगेच त्याचे सर्वस्व हिरावून घेण्यात येई.

ज्या उपदेशक व पाळकांची सुटका झाली त्यांना लहान मंडळ्या मिळाल्या. ओर्सोव्हा गावातील मंडळी मला मिळाली. कॉम्युनिस्टांच्या पंथखात्याने मला सांगितले की, त्या मंडळीत फक्त पस्तीस सभासद आहेत; हे छत्तीस होऊ नयेत यासाठी मी काळजी घ्यायची होती. तसेच मी त्यांचा "खबऱ्या" बनावे, प्रत्येक सभासदाची माहिती पाठवावी, आणि सर्व तरुणांना मंडळीबाहेर ठेवावे. या सर्व गोष्टी मला करावयास सांगण्यात आले. अशा प्रकारे कॉम्युनिस्ट लोक मंडळीचा नियंत्रणाचे "साधन" म्हणून उपयोग करतात.

मी संदेश देऊ लागलो तर असंख्य लोक ते ऐकावयास येतील हे मला माहिती होते. म्हणूनच मंडळीमध्ये उघड कार्य करणे मी सुरू केले नाही. पुन्हा मी भूमिगत मंडळीचे काम सुरू केले. या कार्यातील आनंद व धोके पुन्हा मी अनुभवू लागलो.

मी कैदेत होतो त्या काळात देवाचे कार्य प्रभावीपणे चालू होतेच. भूमिगत मंडळी एकाकी विस्मृत अशी आता नव्हती. अमेरिकेतील व इतर देशांतील ख्रिस्ती लोक आम्हांला साहाय्य करीत होते, आमच्यासाठी प्रार्थना करीत होते.

एकदा दुपारच्या वेळी एका दूरच्या गावी मी एका बांधवाच्या घरी होतो. त्याने मला उठवले आणि "परदेशातून काही बंधू भेटावयास आले आहेत," असे तो म्हणाला. पश्चिमेकडचे ख्रिस्ती लोक आम्हांला विसरले नव्हते; त्यांनी आम्हांला टाकले नव्हते.

ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबांना मदत करण्यासाठी सामान्य ख्रिस्ती लोकांनी एक संघटना उभारली होती. ही संघटना बाहेरून ख्रिस्ती वाङ्मय व मदत आणून देत असे.

मी बाहेर आलो. हे मदतकार्य करण्यासाठी आलेले सहा बंधू तिथे होते. बराच वेळ आम्ही बोलत होतो. शेवटी ते म्हणाले, "आम्ही ऐकले आहे की, येथेच एक चौदा वर्षे तुरुंगात राहिलेली व्यक्ती आहे; कोठे आहे

ती ? " मी त्यांना सांगितले की ही व्यक्ती म्हणजे मीच. " काय म्हणता ? आम्हांला वाटले हे गृहस्थ दुःखी असतील. तुम्ही ते गृहस्थ खास नाही कारण तुम्ही अगदी आनंदी दिसता ! " ते म्हणाले. तुरुंगात चौदा वर्षे काढलेली व्यक्ती म्हणजे मीच असे त्यांना मी पटवून दिले आणि म्हटले की, तुम्ही मला भेटायला आला, आम्हांला कोणी विसरले नाही म्हणूनच मी आनंदित आहे. हळुहळू भूमिगत मंडळीसाठी सतत मदत येत राहिली. गुप्त मार्गांनी पवित्र शास्त्राच्या प्रती, ख्रिस्ती वाङ्मय, तसेच ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबासाठी मदत, या गोष्टी आम्हांला मिळाल्या.

हे साहाय्य मिळू लागल्याने आम्हांला भूमिगत मंडळीचे कार्य अधिक जोमाने करता येऊ लागले. आम्हांला त्यांनी देवाचे वचन दिले एवढेच नाही तर आमच्यावर प्रीती करणारे लोक आहेत हे त्यांनी आम्हांला दाखविले. त्यांनी आमचा समाचार घेऊन आमचे सांत्वन केले.

त्या पूर्वीच्या " ब्रेन वॉशिंग " च्या काळात आम्हांला सतत सांगण्यात येई, " तुमच्यावर कोणीच प्रीती करीत नाही, तुमच्यावर कोणीच प्रीती करीत नाही, तुमच्यावर कोणीच प्रीती करीत नाही. " आणि आता स्वतःचे जीवित धोक्यात घालून आमच्यावरील आपली प्रीती व्यक्त करणारे अमेरिकन व ब्रिटीश ख्रिस्ती लोक आम्ही पाहात होतो. आमच्याशी सल्लामसलत करून त्यांनी गुप्तपणे कार्य करण्याचे एक नवीन तंत्र स्वीकारले. गुप्त पोलिसांचा वेढा पडलेल्या घरांतून ते जात. पण ते घरात गेले आहेत, हे पोलिसांना समजत नसे.

परदेशात आमच्यासाठी प्रार्थना करणाऱ्या ख्रिस्ती लोकांनी आम्हांला मदत पाठविली नसती तर मी व माझे कुटुंब जगलोच नसतो. कॉम्युनिस्ट देशांतील अनेक भूमिगत पाळक व हुतात्म्यांच्या कुटुंबासंबंधी देखील असेच म्हणता येईल. ग्रेट ब्रिटनमधील युरोपियन ख्रिश्चन मिशनने आम्हांला बरीच मदत केली आणि मोठा नैतिक पाठिंबा दिला त्याविषयी मी स्वानुभवाने साक्ष देत आहे. आमच्या दृष्टीने त्यांचे हे लोक म्हणजे देवाने पाठवलेले देवदूतच होते !

भूमिगत मंडळीचे कार्य पुन्हा सुरू झाल्यामुळे मला पुन्हा अटक होण्याचे भय होतेच. यावेळी, दोन ख्रिस्ती संघटनांनी–नॉर्वेजियन मिशन

टू दि ज्यूझ् व हिब्रू ख्रिश्चन अलायन्स—या संघटनांनी माझ्यासाठी २५,००० पौंडांची खडणी भरली (सुमारे पाच लाख रुपये ). आता मी रुमानिया देश सोडून जाण्यास स्वतंत्र झालो.

## मी कॉम्युनिस्ट रुमानिया का सोडला

कितीही संकटे सोसावी लागली असती तरी मी हा देश सोडला नसता. पण भूमिगत मंडळीने मला देशत्यागाची आज्ञा केली. ह्या संधीचा फायदा घेऊन मी बाहेर जावे व मुक्त जगामध्ये भूमिगत मंडळीचा " आवाज " म्हणून कार्य करावे असे मला सांगण्यात आले. त्यांच्यासाठी जगातील लोकांशी मी बोलावे, त्यांचा छळ व त्यांना आवश्यक ती मदत करण्यासाठी तुम्हांस सांगावे यासाठी मला त्यांनी पाठविले. मी जरी या पश्चिमेकडील देशात आलो आहे तरी मी मनाने माझ्या त्या बांधवांबरोबरच आहे. भूमिगत मंडळीचा होणारा छळ, ती निर्भयपणे करीत असलेले कार्य, या गोष्टी तुम्हांला सांगण्याची निरट मला पटली म्हणूनच मी आलो नाहीतर मी रुमानिया कधीच सोडला नसता. हे माझे नेमून दिलेले सेवाकार्य आहे.

रुमानिया सोडण्यापूर्वी मला दोन वेळा गुप्त पोलिसांनी बोलावून आणले होते माझी किंमत त्यांना मिळाली आहे असे मला सांगण्यात आले. ( कॉम्युनिझमच्या आगमनामुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी रुमानियाचे नागरिक विकले जातात. ) त्यांनी मला सांगितले, " ठीक, पश्चिमेकडे जा, वाटेल तेवढे ख्रिस्ताचे संदेश दे, पण आमच्याविरुद्ध अवाक्षरही काढू नकोस. जर सांगितलेस तर काय होईल, हे नीट ऐक. पाचशे पौंड खर्च केले तर तुझा काटा काढण्यासाठी भाडोत्री गुंड मिळेल; ते जमले नाही तर तुला पळवून आणू ! " ( पूर्वी वासिलल्युल, या ऑर्थडॉक्स बिशपबरोबर मी तुरुंगात एकाच कोठडीत होतो. या बिशपला ऑस्ट्रियामधून रुमानियात पळवून आणले होते. त्याच्या बोटांची सर्व नखे ओढून काढली होती. तसेच, बर्लिनमधून पळवून आणलेल्या काही लोकांबरोबरही मी तुरुगात होतो. अलीकडेच पॅरिस व इटालीमधूनही रुमानियाच्या नागरिकांना पळवून नेण्यात आले आहे. ) त्यांनी पुढे सांगितले, " आम्ही तुझे चारित्र्यहनन

देखील करू. तरुणपणातील एका मुलीसंबंधाने एखादी चूक अगर तू चोरी केलीस, किंवा दुसरे एखादे पाप आम्ही उघड करू. पाश्चात्य लोकांना विशेषत: अमेरिकनांना–फसवणे फारच सोपे आहे ! ”

याप्रमाणे धमकावून त्यांनी मला देशाबाहेर सोडले. त्यांनी माझे ब्रेनवॉशिंग केले होते आणि त्यावर त्यांचा पक्का विश्वास होता. आजही पाश्चात्य देशामध्ये माझ्यासारख्याच प्रसंगातून गेलेले अनेक लोक आहेत; पण ते सर्वजण स्तब्ध आहेत. कॉम्युनिस्टांच्या हातून यातना सोसल्या तरी यातील काहीजण कॉम्युनिझमची प्रशंसाही करतात. मी देखील स्तब्ध राहीन अशी कॉम्युनिस्टांची पक्की खात्री होती.

डिसेंबर १९६५ मध्ये मी माझ्या कुटुंबासह रुमानिया देश सोडण्यास स्वतंत्र होतो.

देश सोडण्यापूर्वी मी एक शेवटचे काम केले. ज्या कर्नलने मला पकडण्याचा व माझा छळ करण्याचा हुकुम दिला होता त्याच्या थडग्याकडे जाऊन मी तेथे एक फूल ठेवले. ही गोष्ट करून मी माझ्या कार्याला वाहून घेतले–हे कार्य म्हणजे मला मिळालेला ख्रिस्ताचा आनंद आत्मिक दृष्टया दीनावस्थेत असलेल्या कॉम्युनिस्टांना द्यायचा.

कॉम्युनिस्ट पद्धतीचा मी द्वेष करतो पण त्या लोकांवर माझे प्रेम आहे. मला पापाचा तिटकारा आहे पण पापी माणसावर माझे प्रेम आहे. कॉम्युनिस्टांवरही माझे पूर्ण प्रेम आहे. कॉम्युनिस्ट लोक ख्रिस्ती लोकांचा वध करू शकतील, पण आपला वध करणाऱ्यांवरही ख्रिस्ती लोक जी प्रीती करतात ती प्रीती त्यांना कधीही मारून टाकता येणार नाही. ती अमर आहे. कॉम्युनिस्ट लोक अगर माझा छळ करणारे लोक यांच्याविषयी माझ्या अंत:करणात तिळमात्रदेखील द्वेषभावना नाही.

# प्रकरण चौथे

यहूदी लोकांत एक दंतकथा प्रचलित आहे. त्यांचे पूर्वज इजिप्तमधून येत असता इजिप्शिअन लोक त्यांचा पाठलाग करीत होते. पुढे तांबड्या समुद्रात हे सर्व इजिप्शिअन लोक बुडाले व यहूदी लोक बचावले. आपला बचाव झाला म्हणून ते आनंदाने नाचू-गाऊ लागले, तेव्हा या आनंदोत्सवात देवदूतही सहभागी झाले. मग देव त्या देवदूतांना म्हणाला, " हे यहूदी मानव आहेत; त्यांचा बचाव झाला यासाठी त्यांनी आनंद करणे स्वाभाविकच आहे. तुम्ही अधिक शहाणपणाने वागावयास हवे होते. हे इजिप्शिअन लोकसुद्धा माझेच नाहीत का ? त्यांच्यावरही मी प्रीती करीत नाही का ? त्यांच्या दुर्दैवाबद्दल मला स्वतःला वाटणाऱ्या दुःखात तुम्ही का सहभागी झाला नाही ? "

यहोशवा यरिहो नगराजवळ असताना त्याने वर पाहिले तो कोणी पुरुष आपल्या हाती उपसलेली तलवार घेऊन पुढे उभा आहे असे त्याच्या नजरेस पडले. यहोशवाने जवळ जाऊन विचारले, " तू आमच्या पक्ष्याचा की आमच्या वैऱ्यांच्या पक्ष्याचा ? " ( यहोशवा ५:१३. )

यहोशवाला भेटलेली ती व्यक्ती एक मानव असती तर " मी तुमच्या बाजूचा, " " मी तुमच्याविरुद्ध " अगर "मी तटस्थ आहे " अशा प्रकारचे एक उत्तर मिळाले असते. कोणीही मानव या प्रश्नाला यांपैकी एकच उत्तर देईल. पण यहोशवाला भेटलेली ती व्यक्ती या पृथ्वीवरील नव्हतीच, ती दुसऱ्याच ठिकाणाहून आली होती; म्हणून तू इस्राएलच्या बाजूचा का विरुद्ध असे विचारल्यावर त्याने समजण्यास कठीण व अनपेक्षित उत्तर दिले-" नाही. " " नाही " या शब्दाचा काय अर्थ ?

ती व्यक्ती जेथून आली तेथे कोणीच कोणाच्या बाजूचा अगर विरोधी असे नाही. तेथे प्रत्येकजण प्रत्येकाला समजून घेतो, सर्व गोष्टींविषयी जाणून घेतो. दया, करुणा यांचा परस्परांवर वर्षाव होत असतो. ते एकमेकांवर आस्थेने प्रीती करतात. जसे दैवी क्षेत्र आहे तसेच मानवी क्षेत्र आहे. याच क्षेत्रात कॉम्युनिझमशी झगडा केला पाहिजे. याच

पातळीवर आपण कॉम्युनिस्टांशी लढले पाहिजे, कारण ते क्रूर व जंगली अशा आदर्शाचा पुरस्कार करतात.

पण ख्रिस्ती लोक म्हणजे काही सामान्य मानव नाहीत. ख्रिस्ती लोक देवाची मुले—दैवी स्वभावाचे वाटेकरी आहेत.

यामुळे कॉम्युनिस्ट तुरुंगामध्ये मला असह्य छळ सोसावा लागला तरी मी कॉम्युनिस्टद्वेष्टा बनलो नाही ते देखील देवाची उत्पत्ती आहेत, मग मी त्यांचा द्वेष कसा करू ? तसेच मला त्यांचा मित्र बनणेही शक्य नाही. मैत्री म्हणज एक हृदय-दोन जीव ! कॉम्युनिस्टांबरोबर मी एक-दिल कसा होऊ ? ते देवाच्या कल्पनेचाही द्वेष करतात. मी तर देवावर प्रीती करतो. "तुम्ही कॉम्युनिस्टांच्या बाजूचे का त्यांचे विरोधक ?" असा जर मला कोणी प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर थोडे गुंतागुंतीचे आहे. मानव जातीवरील महान संकट म्हणजे कॉम्यूनिझम ! मी त्याचा कट्टर विरोधी आहे, तसेच त्याचा पाडाव होईपर्यंत मी त्याविरुद्ध लढा देत राहीन. पण आत्म्याने मी येशूबरोबर सुखलोकात आहे. मी येशूबरोबर जेथे आहे तो प्रांत "नाही" चा आहे. कॉम्युनिस्ट लोक अनंत अपराधी असतानाही या क्षेत्रात त्यांना समजून घेण्यात येते, त्यांच्यावर प्रेमवर्षाव होत असतो. या क्षेत्रात देवदूत आहेत, ते प्रत्येकाला मानवी जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी हरएक प्रकारचे साहाय्य करीत असतात. आणि मानवी जीवनाचे ध्येय म्हणजे ख्रिस्तासमान बनणे. यासाठी कॉम्युनिस्टांमध्ये सुवार्ताप्रसार करणे हा माझा उद्देश आहे. त्यांना सार्वकालिक जीवनाची सुवार्ता सांगणे हे माझे कर्तव्य आहे.

माझा प्रभू ख्रिस्त कॉम्युनिस्टांवर प्रीती करतो. प्रत्येक मानवा-वर तो प्रीती करतो, असे त्यानेच सांगितले आहे. नव्याणव मेंढरे सोडून एक मेंढरू हरवू नये, त्याचा नाश होऊ नये म्हणून तो प्रयत्नशील आहे. त्याचे शिष्य व ख्रिस्ती धर्माचे थोर शिक्षक, या सर्वांनी हाच विश्वप्रेमाचा संदेश ख्रिस्ताच्या नावाने दिला आहे संत मॅकरी म्हणतात, "कोणी मनुष्य सर्वांवर फार प्रेम करतो पण एकावर मला प्रेम करता येत नाही असे म्हणतो, तर तो ख्रिस्ती नाही, कारण त्याची प्रीती सर्व समावेशक नाही." संत ऑगस्टीन शिकवतो, "सर्व मानवजात धार्मिक असती व

एकच मानव पापी असता तरी त्या एकासाठी वधस्तंभावर आत्मबलिदान करावयास ख्रिस्त आला असता, इतकी त्याची प्रत्येक व्यक्तीवर प्रीती आहे. " ख्रिस्ती शिक्षण अगदी सरळ आहे. कॉम्युनिस्टही मानव आहेत आणि ख्रिस्त त्यांच्यावर प्रीती करतो. त्याचप्रमाणे ख्रिस्ताची मनोवृत्ती असलेली प्रत्येक व्यक्ती त्याच्यावर प्रीती करते. आम्ही पापाचा तिरस्कार करतो पण पाप्यांवर प्रीती करतो. आम्ही जसजसे कॉम्युनिस्टांवर प्रीती करतो तसतसे ख्रिस्त त्यांच्यावर कशी व किती प्रीती करतो ते आम्हांला समजते.

कॉम्युनिस्ट तुरुंगात ख्रिस्ती लोकांना कसे छळण्यात येई हे मला चांगले माहीत आहे. त्यांच्या पायात पन्नास पौंडांच्या बेडया असत, लालभडक तापवलेल्या लोखंडी सळयांनी त्यांना डाग देत, त्यांच्या तोंडात मुठी भरून मीठ भरभरून ओतीत व नंतर त्यांना पाण्याशिवाय तहानेने तडफडू देत, त्यांची उपासमार करीत, चाबकाचे फटके मारीत, त्यांना थंडीमध्ये काहीच संरक्षण देत नसत. पण इतका छळ सहन करूनही हे ख्रिस्ती मोठ्या आवेशाने या छळ करणाऱ्या कॉम्युनिस्टांसाठी प्रार्थना करीत, हे मी स्वत: पाहिले आहे. आता सामान्यपणे या गोष्टीचा अन्वयार्थ लावता येणे अशक्यच आहे ! ख्रिस्ताची प्रीती आमच्या अंत:करणात वास करते त्यामुळेच हे शक्य आहे.

पुढे काही दिवसांनी आम्हांला छळणारे हे कॉम्युनिस्ट अधिकारी-सुद्धा कैदी बनून तुरुंगात आले. कॉम्युनिझममध्ये कॉम्युनिस्ट व त्यांचे अधिकारी यांनाही त्यांच्या विरोधक शत्रूंप्रमाणेच तुरुंगाची शिक्षा मिळते. आता छळ करणारे व छळ सोसणारे, दोन्ही एकाच कोठडीत एकत्र होते. पूर्वी छळ झालेल्यांपैकी जे कैदी ख्रिस्ती नव्हते त्यांनी, आपला छळ करणारे पण आता कैदी बनलेल्या या लोकांना मारहाण केली. यावेळी तेथले ख्रिस्ती कैदीच त्यांच्या रक्षणार्थ पुढे आले. यामध्य त्यांनाही मारहाण होण्याची भीती होतीच, तसेच कॉम्युनिस्टांचे हस्तक अशी प्रसिद्धी होण्याचा संभवही होता. बरेचदा हे ख्रिस्ती कैदी आपला पावाचा शेवटचा तुकडाही ( त्यावेळी आम्हांला आठवड्याला एक तुकडा मिळे ) आणि त्यांना जीवदान देणारी औषधेही त्यांचा पूर्वी छळ

करणाऱ्या पण आता कैदी बनून आजारी पडलेल्या कॉम्युनिस्ट व्यक्तीला देऊन टाकीत. हे मी स्वतः पाहिले आहे.

युलियु मनियु हे रुमानियाचे ख्रिस्ती पंतप्रधान तुरुंगातच मृत्यू पावले. त्यांचे शेवटचे शब्द होते : "जर या देशामधील कॉम्युनिस्ट सत्ता उलथली गेली तर त्यावेळी प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने रस्त्यारस्त्यात जाऊन स्वतःचा जीव धोक्यात घालूनही कॉम्युनिस्टांचे संरक्षण करणे हे स्वतःचे पवित्र कर्तव्य असे समजून त्यानुसार केले पाहिजे. कारण ज्यांच्यावर आता अत्याचार केले जात आहेत ती सर्व जनता कॉम्युनिस्टांवर तुटून पडेल."

माझा पालट झाला त्यानंतरच्या दिवसांमध्ये असे वाटे की, मला जास्त काळ जगता येणार नाही, कारण रस्त्याने जाताना जे जे स्त्रीपुरुष माझ्या बाजूने जात त्या त्या प्रत्येकाबद्दल मला शारीरिक दुःखाचा अनुभव येई. हे दुःख म्हणजे जणू हृदयात फिरणारी सुरी अशीच होती. या दुःखाचे कारण म्हणजे या व्यक्तीचे तारण झाले आहे की नाही हा मला पडलेला प्रश्न ! मंडळीतील एखाद्या सभासदाने पाप केले तर मी तासन तास रडत बसे. सर्व आत्म्यांचे तारण व्हावे ही उत्कट इच्छा तेव्हापासून माझ्या अंतःकरणात घर करून राहिली आहे आणि यामध्ये कॉम्युनिस्टांचाही अंतर्भाव आहे.

तुरुंगात एकांतवासात ठेवलेले असताना आम्हांला पूर्वीप्रमाणे प्रार्थना करणे अशक्य होत असे. असह्य भुकेने आम्ही व्याकुळ होत असू; तसेच मादक द्रव्यांच्या माऱ्यामुळे आम्हांला वेड लागण्याची पाळी येई. आम्ही केवळ अस्थिपंजर असे उरलो होतो. प्रभूची प्रार्थना सुद्धा कितीतरी मोठी आहे असे वाटे. ती संपूर्ण म्हणण्याइतके एकचित होणे आम्हांला कठीण जाई. एकच प्रार्थना मी पुन्हापुन्हा म्हणत होतो; "येशू, मी तुझ्यावर प्रीती करतो."

आणि एका शुभदिनी येशूने मला उत्तर दिले : "काय, तू माझ्यावर प्रीती करतोस ? मग आता मी तुझ्यावर कशी प्रीती करतो हे दाखवतो." एकाएकी माझ्या अंतःकरणात सूर्यप्रकाशाप्रमाणे दिव्य प्रकाशज्योती चमकली. अम्माऊस गावाकडे निघालेल्या शिष्यांशी येशू

बोलला तेव्हा त्यांचीही अंतःकरणे आतल्या आत उकळत होती असे सांगितले आहे. माझी तशीच स्थिती झाली. ज्याने आम्हां सर्वांसाठी वधस्तंभावर आत्मबलिदान केले त्याची प्रीती मला मिळाली होती. कॉम्युनिस्टांची पापे कितीही घोर असली तरी ते या प्रीतीमध्ये सामावलेले आहेतच. ही प्रीती त्यांच्यासाठीही आहे.

कॉम्युनिस्टांनी असंख्य अत्याचार केले आहेत, करीत आहेत, पण प्रीती महाजलांच्यानेही विझवणार नाही; महापुरालाही तिला बुडवून टाकता येणार नाही. प्रेम मृत्यसारखे प्रबळ आहे. प्रेमसंशय अधोलोका-सारखा निष्ठुर आहे. मृत्यू सर्वांना कवटाळण्यास सिद्ध होत असतो. श्रीमंत, गरीब, तरुण, वृद्ध, सर्व राष्ट्रांतले, विविध जातींचे, विविध विचारांचे लोक, साधुसंत, पापी, सर्वांना मृत्यू कवटाळतो. त्याचप्रमाणे प्रीतीदेखील सर्व समावेशक आहे. ख्रिस्त–देहधारी झालेला हा प्रीतीचा आविष्कार–कॉम्युनिस्टांनाही जिंकून घेईपर्यंत स्वस्थ राहणार नाही.

माझ्या कोठडीतच एका पाळकाला टाकण्यात आले. तो अर्ध-मेला झाला होता, रक्तबंबाळ झाला होता. त्याला बेदम चोपले होते. आम्ही त्याच्या जखमा धुतल्या. त्यावेळी काही कैद्यांनी कॉम्युनिस्टांना शिव्या दिल्या. ते ऐकून तो मोठ्या कष्टाने म्हणाला, " कृपा करा, त्यांना शिव्या देऊ नका. शांत राहा. मला त्यांच्यासाठी प्रार्थना करायची आहे. "

## तुरुंगातसुद्धा आम्ही आनंदी कसे राहिलो ?

तुरुंगात घालवलेल्या चौदा वर्षांच्या कालावधीचा विचार मी करतो तेव्हा त्यातही बराचसा काळ सुखाचा होता असे मला दिसून येते. इतक्या यातनामय काळातही ख्रिस्ती लोक सुखी होऊ शकतात हे पाहून इतर कैद्यांना व रक्षकांनाही फार आश्चर्य वाटे. आम्ही गाणी म्हणत असू, मात्र त्याबद्दल मार खावा लागे. मला वाटते, पुढे शेवटी आपणाला मारणार हे माहीत असले तरी बुलबुल पक्षीसुद्धा मधुर स्वरांची तान छेडीत राहीलच ! तुरुंगातही ख्रिस्ती लोक आनंदाने नाचत. अत्याचार सहन करूनही ते आनंदी कसे होते ?

तुरुंगामध्ये मी येशूने त्याच्या शिष्यांना सांगितलेल्या काही शब्दांवर

पुष्कळ चिंतन केले. तो म्हणाला, "तुम्ही पाहिलेल्या गोष्टी जे पाहतात ते डोळे धन्य आहेत." हे शिष्य पॅलेस्टाइनचा दौरा करून आले होते. आपल्या प्रवासात त्यांनी भयानक स्थिती पाहिली होती. पॅलेस्टाइनमध्ये दडपशाहीचे राज्य होते. सगळीकडे दडपल्या गेलेल्या, जूलुम झालेल्या लोकांचे दैन्य, उदास देखावेच दिसत होते. आजार, रोगराई, उपासमार, भूक, दुःख यांचेच सर्वत्र थैमान त्यांना दिसले. ज्या घरात ते गेले तेथील कोणातरी देशभक्ताला पकडून नेलेले असायचेच आणि घरात फक्त वृद्ध शोकग्रस्त आई, वडील अगर पत्नी अशी माणसेच रडत असत. ही परिस्थिती चांगली नव्हतीच.

असे असूनही येशू म्हणाला, "तुम्ही पाहता त्या गोष्टी जे पाहतात ते डोळे धन्य." येशूने असे म्हटले कारण त्यांनी फक्त दुःखच पाहिले नव्हते तर प्रत्येक चांगली गोष्ट मिळवणाऱ्या सर्व मानवजातीला अपेक्षित असलेले ध्येय मिळवणाऱ्या अशा सर्वांच्या तारकाला त्यांनी पाहिले होते. झाडांपानांवरून फिरणाऱ्या सुरवंटांना प्रथमच समजले की या दुःखमय जीवनानंतर नवजीवन मिळाल्यावर आपण एक सुंदर रंगीबेरंगी फुल-पाखरू बनून फुलांवर फिरणार आहोत तेव्हा त्यांना आनंद वाटला. हेच सुख आपणांलाही मिळणार.

माझ्या आजूबाजूला पुष्कळ ईयोब होते. यातील काही तर ईयोबा-हून अधिक यातना भोगत होते. ईयोबाच्या गोष्टीचा शेवट मला ठाऊक होता. त्याला अखेरीस पहिल्याने होते त्यांच्या दुप्पट मिळाले. माझ्या-भोवती लाजरासारखे अनेक दीन बापुडवाणे होते. भुकेलेले, जखमांनी भरलेले–त्यांची कोणीच देखभाल करीत नव्हते. पण देवदूत त्या सर्वांना आब्राहामाजवळ नेणार हे मला ठाऊक होते. भविष्यात ते जसे होणार होते तसे मी त्यांना पाहात होतो. माझ्याजवळ असलेली व्यक्ती घाणेरडी व अशक्त असली तरी तिच्यामध्ये मला उद्याचा विजयी मुकुट पेहरणारा देवाचा पवित्र जन दिसत होता.

याप्रमाणे माणसांकडे ती आहेत तशी न पाहता, पुढे कशी होतील याचा मी विचार करू लागलो आणि छळ करणाऱ्या आजच्या तार्ससकर शौलामध्ये उद्याचे संत पौल मला दिसू लागले. आणि काहींच्या बाबतीत

घडले आहे. ज्या गुप्त पोलिस अधिकाऱ्यांना आम्ही ख्रिस्ताची साक्ष दिली ते पुढे ख्रिस्ती झाले आणि ख्रिस्तासाठी त्यांनी नंतर आनंदाने तुरुंगवास-ही सोसला. आम्हांला फटके मारणाऱ्या तुरुंगाधिकाऱ्यांना पाहून आम्हांला फिलिप्पैमधील तो तुरुंगाचा अधिकारी आठवे. अधिकाऱ्याने प्रथम पौलाला फटके मारले होते पण पुढे त्याचाच पालट झाला. हेही अधिकारी लौकरच " आमचे तारण व्हावे यासाठी आम्ही काय करावे ? " असा प्रश्न विचारतील असे आम्हांला वाटे. ख्रिस्ती लोकांच्या अंगाला विष्ठा फासून त्यांना वधस्तंभावर बांधीत त्यावेळी इतर कैदी जमून टवाळी करीत. या टवाळखोरांच्या जमावात आम्हांला तो गुलगुथा तेथील जमाव दिसे. तो लौकरच आपण पाप केले म्हणून ऊर बडवू लागणार होता.

कॉम्युनिस्टांचेही तारण होईल अशा प्रकारची आशाही आम्हांला तुरुंगात लाभली. तेथेच आमचीही त्यांच्याविषयी काही जबाबदारी आहे हे आम्हांला कळून आले. ते आमचा छळ करीत असतानाच आम्ही त्यांच्यावर प्रीती करावयास शिकलो.

माझ्या कुटुंबातील बऱ्याच नातेवाईकांचा खून करण्यात आला, आणि त्यांच्या **खुनाचा पालटही माझ्याच घरात झाला** : पालट होण्यास योग्य अशीच ती जागा होती. त्याचप्रमाणे कॉम्युनिस्ट तुरुंगातच कॉम्यु-निस्टांसाठी सुवार्ता कार्य करणे हे योग्यच होते.

एखादी मुंगी पाहते त्याहून आपले पहाणे वेगळ्या प्रकारचे असते. तसेच देवाचे पाहणे व मानवाचे पाहणे यांत फरक असतो. अंगाला विष्ठा फासलेली असताना वधस्तंभावर बांधलेल्या अवस्थेत राहणे हे मानवी दृष्टिकोनातून अतिशय भयंकर, अमानुष आहे. असे असले तरी पवित्र शास्त्रात लिहिले आहे की, हुतात्म्यांवर होणारे अत्याचार वगैरे क्षणिक व अल्प संकट आहे. चौदा वर्षांचा तुरुंगवास हा आमच्या दृष्टीने फार मोठा काल होता. पवित्र शास्त्रामध्ये सांगितले आहे की "हे क्षणिक दुःख आम्हासाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात अनंतकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते." यावरून आपणांला म्हणता येते की कॉम्युनिस्टांच्या पाशवी कृत्यांना मानवाच्या दृष्टीने क्षमा नसली व या अत्याचारांचा शेवटपर्यंत प्रतिकार करावा लागतो, तरीपण देवाच्या दृष्टीने हे अपराध

सामान्यच आहेत. गेली पन्नास वर्षे चाललेले त्यांचे अत्याचार देवाच्या दृष्टीने केवळ क्षणाची चूक असेच आहेत. कारण देवाला हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत. त्यांचे तारण होण्याची शक्यता आहे.

स्वर्गीय यरुशलेम मातेसमान आहे व मातेसमान प्रीती करते. कॉम्युनिस्टांसाठी स्वर्गाची दारे काही बंद झालेली नाहीत. तसेच त्यांच्यासाठी प्रकाशही नाहीसा झालेला नाही. इतरांप्रमाणेच त्यांनाही पश्चात्ताप करण्याची संधी आहे. त्यांना पश्चात्ताप करावयास सांगणे हे आमचे कर्तव्य आहे.

फक्त प्रीतीच कॉम्युनिस्टांचा पालट करू शकेल.(ही प्रीती म्हणजे कॉम्युनिस्टांशी समझोता करणे नव्हे. आज काही मंडळ्यांचे पुढाऱ्यांनी तसेच केले आहे). द्वेष आपणाला अंध बनवतो. हिटलरदेखील कॉम्युनिस्ट विरोधी होता पण तो प्रीतीचा द्वेष्टा होता, म्हणूनच त्यांच्यावर विजय मिळवण्याऐवजी त्याने त्यांना एक तृतीयांश जग जिंकून दिले.

तुरुंगामध्ये आम्ही प्रीतीने प्रेरित होऊन कॉम्युनिस्टांसाठी सुवार्ता प्रसाराचे कार्य योजिले आणि यावेळी प्रथम आम्ही कॉम्युनिस्ट अधिकाऱ्यांचा विचार केला

सुवार्तासेवासंस्थांच्या संचालकांनी बहुधा मंडळीच्या इतिहासाचा विशेष अभ्यास केलेला नसतो असे दिसते. नॉर्वे देशामध्ये ख्रिस्ती धर्म कसा पसरला ? प्रथम राजा ओलाफ यांना ख्रिस्ताकडे आणण्यात आले. रशियामध्ये तेथील राजा व्हलाडिमिर ख्रिस्ती झाल्यावर तेथे सुवार्ताप्रसार झाला. हंगेरीमध्येही सेंट स्टीफन हा तेथील राजा प्रथम ख्रिस्ती बनल्यानंतर सर्व देश ख्रिस्ती बनला. पोलंडमध्ये असेच झाले. आफ्रिकेमध्ये जमातीच्या प्रमुखाचा पालट झाला की सर्व जमात ख्रिस्ती होत असे. अगदी सामान्य माणसांसाठी आम्ही सेवासंस्था सुरू करतो. ही सामान्य माणसे उत्तम ख्रिस्ती बनतील, पण ही माणसे परिस्थिती बदलू शकत नाहीत.

आपण राज्यकर्त्यांना जिंकले पाहिजे; राजकीय, आर्थिक, शास्त्रीय, व कला अशा विविध क्षेत्रांतील प्रमुख व्यक्ती आपण ख्रिस्तासाठी जिंकल्या पाहिजेत, कारण तेच आत्म्याचे तज्ञ वास्तुशास्त्रज्ञ आहेत. हे मानवांचे

पुढारीपण करतात. त्यांना जिकले म्हणजे त्यांचे अनुयायीदेखील जिकले जातात. ख्रिस्ती सुवार्ताप्रसाराच्या दृष्टीने इतर सामाजिक व्यवस्थांपेक्षा कॉम्युनिस्ट समाज-व्यवस्थादेखील अधिक फायदेशीर आहे, कारण ती अधिक केंद्रित आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षांनी मॉर्मन तत्त्वाचा स्वीकार केला तर सर्व अमेरिकन लोक ती तत्त्वे स्वीकारणार नाहीत. पण माओत्सेतुंग, ब्रेझ्नेव्ह अगर चेअस्कू, हे ख्रिस्ती झाले तर त्यांचे देश सुवार्ताप्रसाराला खुले होतील इतका या पुढाऱ्यांचा त्या त्या लोकांवर प्रभाव आहे.

कॉम्युनिस्ट पुढाऱ्याचा पालट करता येईल का ? निश्चितच ! कारण त्याच्या तावडीत सापडलेल्या लोकांप्रमाणेच तोही असुरक्षित व दुःखी आहे. रशियातील जवळ जवळ सर्व कॉम्युनिस्ट राज्यकर्त्यांचा अंत दोन प्रकारेच झाला आहे. एकतर त्यांना कैद करण्यात आली अगर त्यांच्याच सहकाऱ्यांनी त्यांना गोळ्या घातल्या. चीनमध्ये हेच घडले. आयगोडा, इथजोव, बेरिया यांसारखे बलवान, सर्वसमर्थ वाटणारे मंत्रीदेखील क्रांतिविरोधकांप्रमाणे विनाश पावले. मानेत एक बंदुकीची गोळी त्यांचा खेळ खलास करण्यास पुरेशी होती. अलिकडेच रशियन गृहमंत्री शेपेलिन, युगोस्लावियाचे गृहमंत्री रँकोविक यांचीही कचऱ्याप्रमाणे हकालपट्टी करण्यात आली.

## कॉम्युनिझमशी आत्मिक उपायांनी कसा सामना करावा ?

कॉम्युनिस्ट राजवटीमध्ये कोणीही सुखी नसतो; ही राजवट त्या राज्यकर्त्यांनादेखील सुखदायक ठरत नाही. कोणत्याही रात्री गुप्त पोलिसांची गाडी येईल आणि आपणाला पकडून नेईल या चिंतेने ते राज्यकर्ते सदैव ग्रासलेले असतात. पक्षाचे धोरण केव्हा बदलले जाईल याचा नेम नसतो. अनेक कॉम्युनिस्ट पुढाऱ्यांशी माझी चांगली ओळख आहे. हे सर्व अतिशय चिंताक्रांत, काळजीने ग्रस्त असतात. फक्त येशूच त्यांना शांती देऊ शकेल.

कॉम्युनिस्ट राज्यकर्त्यांना ख्रिस्तासाठी जिंकता आले तर अणशक्तीमुळे या जगाचा होणारा भावी विनाश टाळता येईल. मानवजातीला उपासमारीपासून वाचवता येईल; आज जो पैसा वास्तविक अन्नासाठी

खर्च व्हावयाचा तो शस्त्रबल वाढविण्यासाठी खर्च होत आहे. कॉम्युनिस्ट राज्यकर्ते ख्रिस्ताकडे आले तर आंतरराष्ट्रीय तणाव समूळ नाहीसा होईल; त्यामुळे ख्रिस्त व देवदूत आनंदी होतील व मंडळीचा विजय होईल. आज न्यू गिनी, मादागास्कर, यांसारख्या देशांत मिशनरी खडतर परिस्थितीत सुवार्ताकार्य करीत आहेत. कॉम्युनिस्ट ख्रिस्ती बनले तर देशही ख्रिस्ताकडे येईल; ख्रिस्ती धर्माला एक नवे सामर्थ्य प्राप्त होईल.

पालट झालेल्या कॉम्युनिस्टांशी माझी ओळख आहे. मी स्वतः तरुण असताना बंडखोर नास्तिक होतो. पालट झालेले नास्तिक व कॉम्युनिस्ट, दोघेही ख्रिस्तावर फार प्रीती करतात, कारण त्यांची पातके फार मोठी होती.

सुवृत्तप्रसाराच्या मिशनरी कार्याच्या पद्धतीमध्ये युक्ती अवलंबण्याची जरुरी आहे. सर्वांना तारण प्राप्त करून घेता येईल, या दृष्टीने पाहिले तर सर्व आत्मे सारखेच आहेत; पण मिशनरी कार्यात जी युक्ती अवलंबावयाची आहे त्या दृष्टीने सर्वजण समान नाहीत असे मानले पाहिजे. इतरांवर वजन असलेल्या माणसाला ख्रिस्ताकडे आणणे महत्त्वाचे आहे, मग त्याच्यामुळे इतर हजारो लोकांना तो जिंकू शकेल. याउलट जंगलातील एखाद्या रानटी माणसाला सुवार्ता सांगितली तर फक्त त्याचेच तारण होईल, त्याच्यामुळे इतर ख्रिस्ताकडे येण्याची शक्यता कमीच असते. यासाठीच येशूनेही एखाद्या लहानशा खेड्यात न थांबता आपल्या सेवाकार्याचा त्याचा शेवट यरुशलेममध्ये केला. यरुशलेम हे त्यावेळी जगातील प्रमुख असे आत्मिक गोष्टीचे केंद्र होते. यासाठीच पौलही हरप्रयत्न करून रोम येथे गेला.

पवित्र शास्त्र म्हणते की, स्त्रीचे संतान सर्पाचे डोके ठेचील पण आपण या सर्पाच्या पोटाला गुदगुल्या करून त्याला हसवतो. या सर्पाचे डोके त्यूनिसमध्ये नाही अगर मादागास्करमध्येही नाही; ते आहे मॉस्को आणि पेकिंग यांच्यामध्ये कोठेतरी; मिशन संचालक व मंडळीचे पुढारी यांच्या सेवेचे मुख्य लक्ष्य कॉम्युनिस्ट जग हेच असले पाहिजे–आणि प्रत्येक विचारी ख्रिस्ती व्यक्तीनेही याच दिशेने विचार केला पाहिजे.

आपली ठराविक प्रकारची कार्यपद्धत बदलली पाहिजे. "जो

कपटाने यहोवाचे काम करतो तो शापित असतो " असे लिहिलेले आहे. मंडळीने कॉम्यूनिझमविरुद्ध आत्मिक आघाडी उघडून समोरासमोर सामना करावयास हवा.

आक्रमक चढाई करूनच लढाई जिंकता येते; संरक्षक पवित्रा घेऊन नव्हे. कॉम्युनिझमच्या संबंधात मंडळीने अजूनपर्यंत तरी संरक्षक पवित्राच घेतला आहे, म्हणूनच देशामागून देश कॉम्युनिझमला बळी पडत आहेत. संपूर्ण मंडळीतच ही परिस्थिती आमूलाग्र बदलली पाहिजे. देव पोलादी खांब दुभंगतो असे एका स्तोत्रात सांगितले आहे. मग देवाच्या दृष्टीने पोलादी पडदा क:पदार्थच आहे! पहिली मंडळी कार्य करी ते गुप्तपणे व बेकायदेशीरपणे आणि ती विजयी झाली. आपणही पुन्हा त्याच पद्धतीने कार्य करण्यास शिकले पाहिजे.

नव्या करारात अनेक व्यक्तींना टोपण नावांनी संबोधिले आहे; शिमोनाला पेत्र म्हणत, योहानाला मार्क म्हणत वगैरे. याचा खरा अर्थ मला कॉम्युनिस्ट राजवटीतच समजला. आता या कॉम्युनिस्ट देशामध्ये आमच्या कार्यातही आम्ही टोपण नावाचाच उपयोग करतो.

शेवटच्या भोजनाची व्यवस्था करावयास सांगताना येशूने "अमक्या पत्त्यावर अमक्या घरी जा " असे सांगितले नाही. तर " तुम्ही नगरात प्रवेश केल्यावर पाण्याची घागर घेऊन जाणारा एक मनुष्य तुम्हांस आढळेल " असे सांगितले. पूर्वी मला याचा अर्थ समजला नव्हता पण आता समजला आहे. आजही भूमिगत मंडळीच्या कार्यात आम्ही अशाच प्रकारच्या खाणाखुणांचा उपयोग करतो. अशाप्रकारे प्राचीन मंडळीची कार्यपद्धती स्वीकारण्याचे ठरवले तर आपणांला ख्रिस्तासाठी प्रभावी कार्य करता येईल.

पश्चिम युरोपमधील काही मंडळीच्या पुढाऱ्यांना मी भेटलो, पण त्यांच्यामध्ये कॉम्युनिस्टांविषयी काही प्रीती आढळली नाही. ती असती तर बऱ्याच काळापूर्वी कॉम्युनिस्ट देशांमध्ये मिशनरी कार्याची सुरुवात झाली असती. मला तर त्यांचे विचार कॉम्युनिझमला पाठिंबा देणारे आहेत असेच आढळले. कार्ल मार्क्सच्या घराण्यातील हरवलेल्या आत्म्यासंबंधी तेथे मला चांगल्या शोमरोन्यासारखी करुणा कोणामध्ये आढळली नाही.

एखादी व्यक्ती मतांगिकार म्हणताना ती आपला खरा विश्वास प्रकट करते असे नाही; मात्र एखाद्या गोष्टीसाठी ती व्यक्ती मरावयास तयार झाली तेव्हाच तिचा विश्वास प्रकट होतो.

भूमिगत मंडळीतील ख्रिस्ती लोकांनी आपल्या विश्वासासाठी मरावयाची तयारी दर्शविली आहे. आता मी ज्या प्रकारचे कार्य करीत आहे त्यामुळे कदाचित मला पुन्हा कॉम्युनिस्ट कैदेत पडण्याचा प्रसंग येईल, पुन्हा नव्याने यातना सोसाव्या लागतील, कदाचित मृत्यूही होईल. मी करीत असलेले हे कार्य म्हणजे पोलादी पडद्यामागे गुप्तपणे शुभवार्ता सांगणे. यासाठी मी अनेक धोके पत्करलेले आहेत. याचे कारण मी लिहितो त्या प्रत्येक गोष्टीवर माझा पूर्ण विश्वास आहे.

कॉम्युनिझमशी मैत्रीचा हात मिळविणारे अमेरिकेतील मंडळ्यांचे पुढारी या आपल्या विश्वासाखातर मरण पत्करण्यास तयार होतील काय ? असा प्रश्न विचारण्याचा मला नैतिक अधिकार आहे. पश्चिमेकडील मुक्त देशांमधील मोठ्या अधिकाराच्या जागा सोडून पूर्वेकडच्या कॉम्युनिस्ट देशांमध्ये येऊन सरकारी पाळक बनून कॉम्युनिस्टांशी प्रत्यक्ष सहकार्य करण्यास यांना कोणी मनाई केली आहे काय ? या प्रकारच्या विश्वासाचा पुरावा अजून पश्चिमेकडील मंडळीच्या पुढाऱ्यांपैकी कोणीही दिलेला नाही.

पारध करताना, मासे मारताना व पुढे जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करताना परस्परांचे भाव व्यक्त करण्यासाठी हळूहळू मानवी शब्द–भाषा–प्रगत होत गेली. देवाविषयी अद्‌भूत गोष्टी व आत्म्याविषयीच्या उच्च गोष्टी योग्य प्रकारे समजून घेण्यादेण्यासाठी मानवाकडे शब्दच नाहीत.

तसेच सैतानी क्रूरता याचेही पूर्णतः वर्णन करण्यासाठी मानवी शब्द नाहीतच.नाझींनी एखाद्या माणसाला उचलून आगीच्या रणरणत्या भट्टीत फेकावयाचे होते किंवा आपल्या मुलाला उचलून ह्या अग्निभट्टीत फेकले असे पाहिले तेव्हा त्या त्या व्यक्तीला जे वाटले ते शब्दांनी सांगता येईल का?

म्हणूनच ख्रिस्ती लोकांनी कॉम्युनिस्ट सत्तेखाली जे सोसले आहे, आजही जे सोसत आहेत त्या यातनांचे पूर्णपणे वर्णन करण्याचा प्रयत्न करणे अशक्य आहे.

ल्युक्रेशियू पॅट्रास्कानू या माणसाने रुमानियात काम्युनिस्ट सत्ता आणली. तो माझ्याबरोबर तुरुंगात होता. ( त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला हे सेवेचे बक्षीस दिले होते.) तो चांगला शुद्धीवर होता, वेडा नव्हता. तरीही त्यांनी त्याला इतर वेडयांबरोबर वेडयांच्या हॉस्पिटलात ठेवले; त्यामुळे तो खरेच वेडा बनला. अॅना पॉकर ही तेथील माजी राज्य सचीव. तिलाही अशीच वागणूक मिळाली. ख्रिस्ती लोकांनाही केव्हा केव्हा अशा तऱ्हेची वागणूक मिळते. त्यांना विजेचे धक्के देतात, तसेच हातपाय हालवणे, हालचाल करता येऊ नये अशा प्रकारचे कपड त्यांना घालतात.

चीनमधील रस्त्यारस्त्यातून चाललेल्या आसुरी अत्याचारांच्या नुसत्या वार्तेने अखिल जगाला हादरा बसला आहे. रेडगार्डस सर्वांसमक्ष आपले अत्याचारी कार्य पार पाडीत असतात. उघडउघड असे घडते तर लोकांच्या दृष्टीआड चिनी तुरुंगाच्या चार भिंतींआड काय घडत असेल याची कल्पनाच करवत नाही. एक प्रसिद्ध चिनी ख्रिस्ती लेखक व इतर ख्रिस्ती लोकांनी आपला विश्वास सोडून देण्याचे मान्य केले नाही म्हणून त्यांचे दोन्ही कान, जीभ व पाय कापून टाकण्यात आले.

माणसांना शारीरिक यातना देणे, मारणे या गोष्टींहून एक अतिशय वाईट गोष्ट कॉम्युनिस्ट करीत आहेत. स्वतंत्र विचारशक्तीची प्रेरणाच ते नष्ट करतात व तरुण मुले यांच्या हृदयात, मनात विषबीजे पेरतात. मंडळयांतील अधिकारांच्या जागांवर त्यांनी स्वतःची माणसे नेमिली आहेत, म्हणजे यांनी ख्रिस्ती लोकांचे पुढारीपण करावे व अखेरीस मंडळयांचा विनाश करावा. देवावर, ख्रिस्तावर विश्वास ठेवू नका एवढेच सांगून ते थांबत नाहीत तर या नावाचाही द्वेष करण्यास ते तरुणांना शिकवतात.

ख्रिस्तासाठी यातना सोसण्यास सिद्ध असणाऱ्या या ख्रिस्ती बंधूंची शोकांतिका कशी वर्णावी ? वर्षानुवर्षे तुरुंगात यातना भोगून घरी परत आल्यानंतर पहावे तो त्यांची मुले बंडखोर नास्तिक बनलेली असतात व वडिलांबद्दलचा द्वेष त्यांच्या रोमारोमात भरलेला असतो.

**हे पुस्तक आहे ते शाईने नाही तर रक्तबंबाळ हृदयातून वाह-णाऱ्या रक्तधारांनी लिहिले आहे.**

दानीएलाच्या काळात तीन तरुणांना धगधगत्या अग्निभट्टीत टाकण्यात आले होते, त्यातून त्यांची सुटका झाली. पण नंतर त्यांच्या शरीरातून जळाल्याची दुर्गंधी येत नव्हती. त्याप्रमाणेच कॉम्युनिस्टांच्या तुरुंगात हालअपेष्टा सोसलेल्या ख्रिस्ती लोकांच्या अंतःकरणांनाही द्वेषाची दुर्गंधी येत नाही.

पायदळी तुडवलेले फूल आपल्यावर सुगंधाचीच बरसात करते. तसेच कॉम्युनिस्टांनी ज्यांच्यावर अत्याचार केले ते ख्रिस्ती लोकही प्रीतीचा सुगंधच उधळतात. आमचे जे तुरुंगाधिकारी होते त्यांतील कित्येकांना आम्ही ख्रिस्ताकडे आणले. आजसुद्धा आमच्या अंतःकरणात एकच प्रबळ इच्छा आहे. ज्या कॉम्युनिस्टांनी आमचा छळ केला त्यांना आमच्याकडे असलेली सर्वोत्तम वस्तू–आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताकडून प्राप्त होणारे तारण–द्यावयाची, हीच ती इच्छा आहे.

तुरुंगामध्ये कैदेतच ख्रिस्तासाठी हुतात्म्याचे मरण मिळण्याचे सद्भाग्य मला लाभले नाही. मात्र हे भाग्य माझ्या काही सहकाऱ्यांना लाभले. माझी सुटका झाली व पश्चिमेकडील देशांमध्ये मला सुखरूप येता आले.

या पश्चिमेकडच्या देशांमधील ख्रिस्ती मंडळीच्या पुढाऱ्यांमध्ये मला जी भावना दिसली ती पोलादी व बांबूच्या पडद्यांमागील भूमिगत मंडळीमध्ये दिसणाऱ्या भावनेहून काही वेगळीच आहे. या पश्चिमेकडील देशांतील बऱ्याच ख्रिस्ती जनांना कॉम्युनिस्टांबद्दल काहीच प्रेम वाटत नाही. कॉम्युनिस्ट देशांतील लोकांच्या तारणासाठी ते काहीच प्रयत्न करीत नाहीत हाच या गोष्टीचा पुरावा आहे. यहूदी लोकांसाठी, मुसल-मानांसाठी, बौद्ध धर्मीयांसाठी अशा त्यांच्या विविध सुवार्ताप्रसार करणाऱ्या संस्था आहेत. तसेच भिन्न विचाराच्या मंडळ्यांनीही वेगळ्या मंडळीत यावे यासाठीही प्रचार करणाऱ्या संस्था आहेत. पण **कॉम्युनि-स्टांमध्ये सुवार्ताकार्य करण्यासाठी मात्र एकही संस्था नाही!** खरेच हे लोक त्यांच्यावर प्रेम करीत नाहीत. नाहीतर त्यांच्यासाठी अशी संस्था कधीच

स्थापन झाली असती. केरीचे भारतीयांवर प्रेम होते, हडसनचे चिनी लोकांवर प्रेम होते म्हणूनच त्यांनी आपापल्या सुवार्ताप्रसार संस्था स्थापन केल्या.

हे लोक कॉम्युनिस्टांवर प्रेम करीत नाहीत, त्यांच्यामध्ये कार्य करण्यासाठी संस्था काढीत नाहीत एवढेच म्हणून भागणार नाही. हे पाश्चिमात्य मंडळ्यांचे पुढारी स्वतःच्या आत्मसंतुष्ट वृत्तीमुळे, दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीमुळे व केव्हा केव्हा हस्तक बनून कॉम्युनिस्टांमधील अविश्वासाच्या रोपांना खतपाणी घालून ती वाढवीत आहेत. त्यांच्या साहाय्यामुळे कॉम्युनिस्टांना इकडच्या मंडळ्यांत प्रवेश सुलभ होतो; तेथे त्यांना पुढारी बनावयास मिळते व मग हळूहळू ते जगाचे पुढारी बनतात ! ह्या मंडळ्यांचे पुढारी, ख्रिस्ती लोकांना कॉम्युनिझमचे धोके कळू देत नाहीत !

हे कॉम्युनिस्टांवर प्रेम करीत नाहीत आणि कॉम्युनिस्टांमध्ये सुवार्ताप्रसार करण्याची परवानगी नाही असा बहाणा करून त्यांच्यासाठी सुवार्ता कार्य सुरू करीत नाहीत. ( जणू काही पहिल्या ख्रिस्ती मंडळीने प्रचार कार्यासाठी नीरो बादशहाकडून परवानगी घेतली होती! ) एवढेच नाही तर ते त्यांच्या मंडळीतील सभासदांवरही प्रेम करीत नाहीत. कारण कॉम्युनिस्टांना आपण ख्रिस्तासाठी जिंकले नाही तर ते सर्व पश्चिमभाग पादाक्रांत करून येथेही ख्रिस्ती धर्माची पाळेमुळे उखडल्या-शिवाय स्वस्थ राहणार नाहीत.

## इतिहासाच्या शिकवणीकडे दुर्लक्ष

इसवी सनाच्या पहिल्या काही शतकांमध्ये उत्तर आफिरकेत ख्रिस्ती धर्म चांगला प्रबळ होता. संत ऑगस्टिन, संत सिप्रिअन, संत अँथानेसिअस व टर्टलिअन हे देवाचे थोर सेवक याच भागातून आले. पण उत्तर आफ्रिकेतील या ख्रिस्ती लोकांनी एका गोष्टीकडे दुर्लक्ष केले. त्यांनी मुसलमानांना ख्रिस्तासाठी जिंकले नाही. त्यामुळे हे मुसलमान तेथे गेले, त्यांनी तो प्रदेश जिंकला व पुढे कित्येक शतकांपर्यंत तेथील ख्रिस्ती धर्म समूळ उखडून टाकला. आजही हा प्रदेश मुस्लीम वर्चस्वाखाली आहे. ख्रिस्ती मिशनरी संस्था या भागाला "पालट न होणारा गट" असे म्हणतात!

आपण इतिहासापासून धडा शिकू या.

रेंफॉर्मेशन ( धर्मसुधारणा ) चळवळ झाली त्यावेळी सर्वच युरोपिअन लोकांना पोपच्या सत्तेचे जोखड फेकून देण्याची जबर इच्छा होती. या इच्छेला हस, लूथर व काल्विन यांचे विचार पूरक ठरले. त्यावेळी राजकीय व आर्थिक क्षेत्रामध्ये पोपचे जुलमी वर्चस्व होते. आज-ही कॉम्युनिस्ट लोक व त्यांच्या वर्चस्वाखालील लोकांमध्ये सुवार्ताप्रसार करण्याची भूमिगत मंडळीची इच्छा व अखिल जगातील स्वतंत्र लोकांची स्वातंत्र्यामध्ये जगण्याची इच्छा सारख्याच आहेत—त्या परस्परांना पूरक आहेत.

आज कॉम्युनिझम उलथून टाकील अशी कोणतीही राजकीय शक्ती नाही. कॉम्युनिस्टांकडे संहारक अणुशस्त्रे आहेत. त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारणे म्हणजे लक्षावधी लोकांचा संहार आणि तिसऱ्या जागतिक युद्धाची सुरुवात असे आहे. त्याशिवाय अनेक पाश्चिमात्य राज्यकर्त्यांचे आमूलाग्र मतपरिवर्तन करण्यात आले आहे; त्यामुळे कॉम्युनिस्टांचा पाडाव करण्याची त्यांना मुळीच इच्छा नाही. ही गोष्ट त्यांनी अनेकवार प्रकटपणे सांगितली आहे. मादक पदार्थांची सवय, गुंडगिरी, कॅन्सर, क्षय यांसारख्या गोष्टी नाहीशा व्हाव्यात पण कॉम्युनिझम नाहीसा होऊ नये हीच त्यांची इच्छा दिसते. मात्र या सर्व गोष्टींना जेवढे लोक बळी पडले आहेत त्याहून जास्त लोक कॉम्युनिझमला बळी पडले आहेत ही गोष्ट ते सोईस्करपणे विसरतात !

सोव्हिएट लेखक इल्या एहरेनबर्ग म्हणतो की, स्टॅलिनने इतर काही न करता आयुष्यभर त्याच्या हातून ज्या निरपराध्यांचे बळी घेतले गेले त्यांची फक्त नावे लिहिली असती तरी हे काम संपले नसते ! कॉम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या मेळाव्यापुढील आपल्या भाषणात क्रुश्चेव्हने सांगितले, " स्टॅलिनने हजारो निरपराधी व निर्दोष कॉम्युनिस्टांची कत्तल केली.... पक्षाच्या सतराव्या मेळाव्याच्या वेळी मध्यवर्ती समितीचे एकशे एकूण-चाळीस सभासद व उमेदवार निवडण्यात आले होते. त्यांपैकी अठ्याण्णव लोकांना पकडून गोळ्या घालण्यात आल्या. म्हणजे एकूण संख्येपैकी सत्तर टक्के लोक मारण्यात आले. "

मग आता यावरून त्याने ख्रिस्ती लोकांचे काय केले असेल याची कल्पना करा !

क्रुश्चेव्हने स्टॅलिनवर दोषारोप करून त्याचे नाव पुसून टाकले खरे, पण क्रुश्चेव्हच्या काळात पूर्वीच्या सर्व गोष्टी तशाच चालू होत्या. १९५९ मध्ये सोव्हिएट रशियामध्ये जी देवळे उघडी होती त्यांतील निम्मी आता बंद करण्यात आली.

चीनमध्ये रानटी अत्याचारांची एक नवी लाट उसळली आहे. तेथील परिस्थिती तर स्टॅलिनच्या वेळेपेक्षाही भयंकर आहे. उपासना-मंदिरे व उघडपणे उपासना करणे या गोष्टी कधीच बंद करण्यात आल्या आहेत. रशिया व रुमानियामध्ये पुन्हा धरपकडीचे सत्र सुरू झाले आहे. ( रशियामध्ये ख्रिस्ती लोकांची मोठ्या प्रमाणावर धरपकड झाल्याचे वृत्त नुकतेच समजले आहे. )

शंभर कोटीहून जास्त लोकसंख्या असलेल्या या देशात आज धाक व फसवणूक ही साधने वापरून सर्व तरुणांना पाश्चिमात्य विचार, वस्तू, ख्रिस्ती धर्म यांचा द्वेष करण्याचे पद्धतशीरपणे शिक्षण देण्यात येत आहे.

रशियामधील उपासना-मंदिरासमोर स्थानिक अधिकारी पहारा करताना वारंवार आढळतात. विशेषतः ते लहान मुलांवर लक्ष ठेवतात; जर कोणी मुले मंदिरात जाऊ लागली तर त्यांना थोबाडीत मारून हाकलून देतात. पाश्चिमात्य ख्रिस्ती धर्माच्या ह्या भावी विध्वंसकांची कशी काळजीपूर्वक, पद्धतशीरपणे वाढ करण्यात येत आहे ते लक्षात घ्या !

कॉम्युनिझमचा पाडाव करू शकेल अशी फक्त एकच शक्ती आहे. या शक्तीमुळेच ख्रिस्ती राज्यांना मूर्तिपूजक रोमी साम्राज्याएवढा दर्जा प्राप्त झाला या शक्तीमुळेच रानटी ट्युटोन व व्हायकिंग या लोकांतून उत्कृष्ट ख्रिस्ती बनले, या शक्तीनेच पंधराव्या शतकात पोपने स्थापिलेल्या धर्माच्या नावाखाली अत्याचार करणाऱ्या 'इन्क्विझिशन' ह्या न्यायसभेचा समूळ पाडाव केला. ही शक्ती म्हणजच शुभवर्तमानाचे सामर्थ्य. सर्व कॉम्युनिस्ट देशांमध्ये असलेल्या भूमिगत मंडळ्यांमध्ये हे सामर्थ्य आहे.

हालअपेष्टा सोसणाऱ्या बंधुजनांना मदत करणे, त्यांच्याशी आपले ऐक्य आहे हे दाखवण्यासाठी ह्या मंडळीला साहाय्य करणे एवढ्यापुरताच

हा प्रश्न मर्यादित नाही. हा तर तुमच्या स्वतःच्या देशाचा व तेथील मंडळयांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. ह्या मंडळीला साहाय्य करणे हे केवळ स्वतंत्र ख्रिस्ती लोकांचे कर्तव्य न राहता स्वतंत्र देशांच्या राज्यकर्त्यांचेही असेच धोरण असले पाहिजे.

भूमिगत मंडळीने यापूर्वीच काही कॉम्युनिस्ट अधिकारी पुढाऱ्यांना ख्रिस्ताकडे जिंकून आणले आहे. रुमानियाचे पंतप्रधान घेओरघिऊ देज हे मरण पावले तेव्हा त्यांचा पालट झाला होता; त्यांनी आपली पापे कबूल करून पापी जीवनाचा त्याग केला होता. कॉम्युनिस्ट देशांमधील सरकारामध्ये गुप्तपणे ख्रिस्ती झालेले काही कॉम्युनिस्ट आहेत.त्यांची संख्या आणखी वाढेल. मगच काही कॉम्युनिस्ट सरकारांच्या धोरणात बदल झालेला दिसून येईल. हे बदल टिटो व ग्रोमुल्क यांनी केलेल्या बदलांप्रमाणे नसतील, कारण त्या बदलानंतरही हुकुमशाही व क्रूर नास्तिकतेचे थैमान चालूच राहिले. हा बदल असेल ख्रिस्ती धर्माकडे व स्वातंत्र्याकडे नेणारा ! हा बदल घडवून आणण्यासाठी पूर्वी कधी नव्हती अशी संधी आज मिळत आहे.

ख्रिस्ती लोकांप्रमाणेच कॉम्युनिस्टांचाही त्यांच्या मतप्रणालीवर दृढ विश्वास असतो, पण आज हे लोक एका खडतर परिस्थितीतून जात आहेत. कॉम्युनिझममुळे राष्ट्रा-राष्ट्रांत परस्पर बंधुभाव वाढेल असा त्यांचा खरेच विश्वास होता पण त्याऐवजी त्यांना दिसते की कॉम्युनिस्ट देश परस्परांशी कुत्र्याप्रमाणे भांडत आहेत ! कॉम्युनिझम पृथ्वीवर स्वर्ग उत्पन्न करील, मग स्वर्गाच्या खोटया कल्पनांवर विश्वास ठेवायलाच नको या त्यांच्या विश्वासालाही तडा गेला. पाहावे तिकडे उपासमार होताना दिसते. भांडवलशाही राष्ट्रांकडूनच गहू आयात करावा लागतो.

कॉम्युनिस्टांचा त्यांच्या पुढाऱ्यांवर विश्वास होता, पण आता त्यांच्याच वर्तमानपत्रात लिहिले जाते की, स्टॅलिन मोठा खुनी होता, त्याने खूप माणसे मारली आणि क्रुश्चेव्ह मूर्ख होता. राकोसी, गेरो, अँना पॉकर, रँकोविकी, या त्यांच्या राष्ट्रीय प्रमुखांबद्दलही अशीच गोष्ट आढळते. आपले पुढारी कधीच चूक करीत नाहीत यावर आता कॉम्युनिस्टांचा मुळीच विश्वास नाही. हे लोक म्हणजे पोप नसलेले कॅथॉलिक !

कॉम्युनिस्टांच्या अंत:करणात एक पोकळी आहे. ही पोकळी भरण्याचे कार्य ख्रिस्तच करू शकेल. मानवी अंत:करण निसर्गत: देवाचा शोध घेत असते. प्रत्येक मानवामध्ये ही आत्मिक पोकळी असते. ख्रिस्त तेथे येतो व ती पोकळी भरून काढतो. नाहीतर ती कधी भरली जात नाही. कॉम्युनिस्टांच्या संदर्भातही असेच आहे. शुभवर्तमानात दैवी प्रेमाचे सामर्थ्य आहे, ते कॉम्युनिस्टांनाही वश करते. असे घडलेले मी पाहिले आहे; असे होते, हेही मला माहीत आहे.

कॉम्युनिस्टांनी ख्रिस्ती लोकांवर व त्यांच्या कुटुंबियांवर अत्याचार केले. पण ख्रिस्ती लोक ते अत्याचार विसरून गेले आहेत, त्यांनी कॉम्यु-निस्टांना क्षमा केली आहे. आत्मिक आणीबाणीच्या प्रसंगातून पार पडून कॉम्युनिस्टांनी ख्रिस्ताकडे यावे म्हणून हे सर्वजण प्रयत्न करीत आहेत. यासाठी त्यांना आपले साहाय्य हवे.

एवढ्यासाठी आपण त्यांना मदत करावी असे नाही. ख्रिस्ती प्रीती विश्वव्यापी आहे ख्रिस्ती लोकांना पक्षपात माहीतच नाही. देवाने निर्माण केलेला सूर्य चांगल्यांवर, वाईटांवर सारखाच प्रकाशतो असे येशूने म्हटले आहे. ख्रिस्ती प्रीती अशीच आहे.

पश्चिमेकडचे जे ख्रिस्ती पुढारी कॉम्युनिस्टांशी मित्रभावनेने वागतात ते आपल्या या वागणुकीचे समर्थन " आपण आपल्या वैऱ्यांवरही प्रीती केली पाहिजे " या येशूच्या शब्दांनी करतात. पण आपल्या भावांना सोडून **फक्त** वैऱ्यावर प्रीती करा, असे काही यशूने सांगितलेले नाही.

ख्रिस्ती लोकांच्या रक्ताने ज्यांचे हात माखले आहेत अशा लोकां-बरोबर मेजवान्या करून हे लोक आपले प्रेम दाखवतात, ख्रिस्ताची सुवार्ता सांगून नव्हे. आणि कॉम्युनिस्ट ज्यांच्यावर जुलूम करीत आहेत त्यांना हे विसरतात. त्यांच्यावर ते प्रेम करीत नाहीत.

पश्चिम जर्मनीमधील इव्हँजेलिकल व कॅथोलिक मंडळ्यांनी आजवर भुकेल्या लोकांसाठी १२५ दशलक्ष डॉलर्सची मदत दिली आहे. अमेरिकन ख्रिस्ती लोकांनी याहून जास्त दिले आहे.

जगामध्ये भुकेले लोक पुष्कळ आहेत. पण छळ सोसणारे ख्रिस्ती लोक व त्यांची कुटुंबे यांच्याहून जास्त भुकेलेले कोणी असतील असे मला

वाटत नाही; तसेच स्वतंत्रतेत जगणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या मदतीची अधिक गरज यांच्याखेरीज कोणालाच नाही. जर्मनी, ब्रिटन, अमेरिका, स्कँडिनेव्हिया, या देशांतील ख्रिस्ती मंडळ्या मदतकार्यासाठी जमा करीत असलेला पैसा प्रत्येक गरजवंताला मिळाला पाहिजे, पण **प्रथम हा पैसा ख्रिस्तासाठी छळ सोसणाऱ्या लोकांना व त्यांच्या कुटुंबियांना मिळाला पाहिजे.**

आज असे घडते आहे का ?

माझ्या सुटकेसाठी ख्रिस्ती संस्थांनीच पैसा उभारला व दिला. यावरून पैसे भरून ख्रिस्ती लोकांची सुटका होऊ शकते हे सिद्ध होते. असे असूनही खंडणी भरून सोडवलेली अशी माझ्या देशातील एकच व्यक्ती आहे ती म्हणजे मीच ! माझ्यासाठी खंडणी भरली पण इतरांच्या बाबतीत आपले कर्तव्य बजावले नाही असा आरोप पश्चिमेकडील या ख्रिस्ती संघटनांवर करता येईल.

आपली नवी मंडळी फक्त यहूद्यांसाठीच आहे का इतर लोकांसाठीही आहे असा प्रश्न पहिल्या ख्रिस्ती लोकांसमोर होता. त्यांना या प्रश्नाचे योग्य उत्तरही मिळाले. आजही हाच प्रश्न वेगळ्या स्वरूपात या विसाव्या शतकात आपणापुढे आहे. ख्रिस्ती धर्म ही काही फक्त पश्चिमेकडच्या देशांची मिरास नाही. ख्रिस्त काही अमेरिका, इंग्लंड यांसारख्या लोकशाही देशांची मालमत्ता नाही. त्याला वधस्तंभावर खिळले त्यावेळी त्याचा एक हात पूर्वेकडे पसरला होता तर दुसरा पश्चिमेकडे. तो केवळ यहूद्यांचाच राजा होणार नाही तर विदेशी लोकांचाही राजा होणार–कॉम्युनिस्टांचा देखील ! तो काही फक्त पश्चिमेकडच्या देशांवरच राज्य करणार नाही. "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा," अशी येशूची आज्ञा आहे.

त्याने सर्वांसाठी आपले रक्त सांडले व सर्वांनी सुवार्ता ऐकली पाहिजे, विश्वास ठेवला पाहिजे.

कॉम्युनिस्ट देशांमध्ये सुवार्ताप्रसार करण्यासाठी आम्ही उत्साही आहोत, कारण तेथले जे लोक ख्रिस्ती होतात ते आवेशी व प्रेमळ असतात. मला भेटलेल्या रशियन ख्रिस्ती लोकांत एकही "कोमट"

नव्हता. पूर्वी कॉम्युनिस्ट असणारे तरुण ख्रिस्ताचे शिष्य बनले म्हणजे इतके कार्यतत्पर होतात की तसे दुसरे शिष्य विरळेच !

ख्रिस्त जसा सर्व पाप्यांवर प्रेम करतो, पापांपासून त्यांची सुटका करण्याची त्याची इच्छा असते, तसेच तो सर्व कॉम्युनिस्टांवर प्रेम करतो व त्यांची कॉम्युनिझमपासून सुटका करावी अशी त्याची इच्छा आहे. या प्रश्नाकडे पाहण्याचा योग्य असा हा दृष्टिकोन सोडून पश्चिमेकडील मंडळ्यांचे काही पुढारी दुसराच दृष्टिकोन स्वीकारतात. म्हणजेच ते कॉम्युनिझमकडे तुष्टतेच्या भावनेने कानाडोळा करतात. ते पापावर पाखर घालतात, कॉम्युनिझमचा विजय होण्यास साहाय्य करतात. असे करून ते कॉम्युनिस्टांचे व त्यांच्या बळीचे तारण होण्याच्या मार्गामध्ये अडथळे मात्र निर्माण करतात.

## सुटका झाल्यावर मला काय आढळून आले ?

तुरुंगातून सुटका झाल्यावर माझ्या पत्नीची भेट झाली. "आता पुढे काय?" असे तिने विचारले तेव्हा मी म्हटले, "एकांतवासात आत्मिक जीवन जगावे असा माझा विचार आहे." आपलाही असाच विचार असल्याचे तिने मला सांगितले.

तरुणपणी मी फार उत्साही व चळवळ्या होतो; पण कैद आणि तुरुंगातील एकांतवासाची शिक्षा यामुळे मी आता चिंतनशील, विचारप्रवण बनलो होतो. हृदयातील खळबळ–वादळे आता शमली होती. कॉम्युनिझमचा आता काही बाऊ वाटत नव्हता. तो आहे की नाही इकडे माझे लक्षच नव्हते, मी तर स्वर्गीय पतीच्या बाहुपाशात होतो. माझा छळ करणाऱ्यांसाठी मी प्रार्थना करीत होतो, त्यांच्यावर मनापासून प्रेम करीत होतो.

माझी सुटका होईल असे मला वाटले नाही. जेव्हा जेव्हा हा विचार येई व आपण नंतर काय करायचे असा प्रश्न पडे तेव्हा मी त्या प्रश्नाचे उत्तर देऊन टाकले होते. आपण निवृत्त होऊन जावे व स्वर्गीय पतिसमवेत एकांतवासात मधुर काल कंठावा असे मी ठरवले होते.

देव हेच "सत्य" आहे. पवित्रशास्त्र म्हणजे या "सत्याविषयीचे सत्य"! ईश्वरविज्ञान म्हणजे "या सत्याविषयीच्या सत्याविषयीचे

सत्य." फंडमेंटॅलिझम म्हणजे " सत्याविषयीच्या सत्याविषयीच्या सत्याविषयीचे सत्य." या सत्याविषयीच्या अनेक सत्यांचा अभ्यास करण्यात ख्रिस्ती लोक दंग असतात. म्हणूनच त्यांना ते " एकच सत्य " मिळत नाही, समजत नाही. उपासमारीने, माराने व मादक पदार्थांनी आम्ही हैराण झालो होतो, तेव्हा आम्ही पवित्रशास्त्र व ईश्वरविज्ञान सर्व विसरलो होतो. आम्ही सत्याविषयीची सत्ये विसरलो होतो आणि त्यामुळेच " त्या सत्यात " जगत होतो. " तुम्हांस कल्पना नाही त्यासमयी व तुम्हांस माहीत नाही अशा दिवशी मनुष्याचा पुत्र येईल, " असा शास्त्रलेख आहे. आमची विचारशक्ती बोथट झाली होती. असह्य यातनांच्या त्या काळचा वेळी मनुष्याचा पुत्र आमच्याजवळ आला तेव्हा तुरुंगाच्या भिंती हिऱ्यांसारख्या चकाकू लागल्या, कोठड्या प्रकाशाने भरून गेल्या, आमच्यावर अत्याचार करणारे ते लोक दूर कोठेतरी शरीराच्या प्रांतात होते आणि आमचा आत्मा प्रभूमध्ये जयोत्सव करीत होता. कोणी राजवैभव देतो म्हटले असते तरी हा आनंद आम्ही सोडला नसता. झगडा कशासाठी ? कोणाविरूद्ध ? झगडा करण्याची लवमात्र इच्छा नव्हती. युद्ध करण्याची, धर्मयुद्ध करण्याचीदेखील माझी इच्छा नव्हती. त्याऐवजी ख्रिस्तासाठी जिवंत मंदिरे उभारण्याचे मी ठरविले होते. सर्वकाळ चिंतन, प्रार्थना या गोष्टींत घालवण्याची आशा उराशी बाळगून मी तुरुंगाच्या बाहेर आलो.

तुरूंगातून बाहेर आल्यावर मला कॉम्युनिझमचे जे घृणास्पद स्वरूप दिसले ते मी तुरुंगात सोसलेला छळ व यातना अगदी त्यासारखेच होते. मोठमोठे पाळक व उपदेशक एकामागून एक असे मला भेटले, हे सर्व वेगवेगळ्या मंडळ्यांमध्ये होते. यांच्यात काही बिशप देखील होते. यांतील प्रत्येकाने मोठ्या दु:खाने कबूल केले की ते सर्व जण गुप्त पोलिसांचे " खबरे " होते व स्वत:च्या मंडळीतील सभासदांविरूद्ध माहिती पुरवणे हे त्यांचे काम होते. " तुम्हाला अटक झाली तरी हे काम सोडायचे याला तुमची तयारी आहे का ?" असे मी त्यांना विचारले. सर्वांनी उत्तर दिले, " नाही." आम्हांला स्वत:ची कातडी बचावयाची आहे म्हणून आम्ही असे म्हणत नाही ते म्हणाले. मंडळीमध्ये

घडत असलेल्या बऱ्याच नव्या गोष्टी त्यांनी मला सांगितल्या. मला अटक झाली त्यावेळी मंडळीमध्ये असे काही नव्हते. आता खबर द्यायचे कोणी पाळकाने नाकारिले तर त्याची मंडळीच बंद केली जात असे.

धर्मपंथावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक गावात एक कॉम्युनिस्ट अधिकारी असतो. हा गुप्त पोलिस अधिकारीच असतो. केव्हाही कोणत्याही पाळकाला अगर उपदेशकाला बोलावून प्रश्न विचारण्याचा त्याला अधिकार असतो. मंदिरात उपासना करण्यास कोण कोण येते, वरचेवर प्रभुभोजन कोण घेते, कोण विशेष धार्मिक आहे, सुवार्ता कार्य कोण करीत आहे, कोणते लोक आपली पापे कबूल करतात, अशा प्रकारचे हे प्रश्न असत. उत्तरे द्यायचे नाकारले तर तुमची उचलबांगडी होते व तुमच्या जागी दुसरा "पाळक" नेमला जातो. हा नवा पाळक या प्रश्नांची उत्तरे देईल असाच नेमण्यात येतो. ज्या ठिकाणी सरकारला असा अधिकारी नेमता येत नाही ( असे क्वचितच घडते ) त्या ठिकाणी असलेली मंडळी बरखास्त करण्यात येते.

बऱ्याच पाळकांनी गुप्त पोलिसांना माहिती दिली. काहींनी महत्त्वाची माहिती लपवून केवळ नाईलाज म्हणून जुजबी स्वरूपाची माहिती पुरवली तर इतर काहींना माहिती देण्याचे व्यसनच लागले. त्यांची विवेकबुद्धी बोथटली होती. इतर काहींना माहिती देणे महत्त्वाचे वाटून त्यांनी आवेशाने विचारल्यापेक्षा अधिक माहिती पुरविली.

ख्रिस्ती हुतात्म्यांची काही मुले मला भेटली. ज्या कुटुंबांनी त्यांना आसरा दिला होता त्यांच्याविरुद्ध बातमी देण्याची या मुलांवर सक्ती करण्यात आली होती. त्यांनी ही बातमी दिली नाही तर त्यांना शाळेत अभ्यास करता येणार नाही अशा धमक्या त्यांना दिल्या होत्या.

मी एका बॅप्टिस्ट मेळाव्यांसाठी गेलो. हा मेळावा कॉम्युनिस्ट ध्वजाखाली भरला होता. या मंडळीचे "निवडलेले पुढारी" कोण असावे ते हे कॉम्युनिस्टांनीच तेथे ठरवले.

सरकारच्या परवानगीने चालू असलेल्या सर्व मंडळ्यामध्ये कॉम्यु-निस्ट पक्षाने निवडलेलेच लोक अधिकारावर होते ही गोष्ट मला समजून

चुकली. "पवित्र स्थानात ओसाडीचा अमंगळ पदार्थ" याबद्दल येशू बोलला होता ते मी आता प्रत्यक्षच पाहात होतो.

चांगले वाईट उपदेशक व पाळक सर्वत्रच असतात. पण आता ख्रिस्ती मंडळीच्या इतिहासात प्रथमच नास्तिकतेचा हिरिरीने पुरस्कार करणाऱ्या पक्षाची मध्यवर्ती समितीच मंडळीचे प्रमुख कोणी व्हायचे हे ठरवीत आहे, आणि धर्माचे समूळ उच्चाटन करणे हा या पक्षाचा हेतू जगजाहीर आहे, पुढारीपण कशासाठी ? उघडच आहे, धर्म उखडून टाकण्यासाठी.

लेनिनने लिहिले आहे, "धर्मविषयक प्रत्येक कल्पना, देवविषयक प्रत्येक कल्पना अगर त्या कल्पनेचा नुसता विचारदेखील उच्चारता येणार नाही इतका अमंगळ, भयंकर स्वरूपाचा आहे, तसेच घृणास्पद संसर्गजन्य रोग आहे. लक्षावधी पातके, अमंगळ बीभत्स कृत्ये, अत्याचार, हिंसा घृणास्पद संसर्ग, या सर्व गोष्टींहून देवाविषयीची ही धूर्त आत्मिक कल्पना अतिशय भयंकर आहे."

सोव्हिएट विभागातील सर्व कॉम्युनिस्ट पक्ष लेनिनच्या विचारांप्रमाणे वागतात. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कॅन्सर, क्षयरोग अगर उपदंश यांहून अधिक भंयकर! आणि हेच लोक धार्मिक पुढाऱ्यांची निवड करतात. या अधिकृत मंडळ्यातील इतर कार्यकर्ते मग या नेमलेल्या अधिकाऱ्यांना—इच्छा असो नसो—सहकार्य देतात व कमीअधिक प्रमाणात मिळते जुळते घेतात.

मुलांच्या व तरुणांच्या मनात नास्तिक वादाचे विषारी बीजारोपण होत असलेले मी स्वतः पाहिले आहे. अधिकृत मंडळ्यांना या गोष्टींचा प्रतिकार करता येत नाही. बुखारेस्ट या आमच्या देशाच्या राजधानीमध्ये तुम्हांला एकही तरुणसंघ अगर मुलांची शब्बाथ शाळा आढळणार नाही. ख्रिस्ती मुलांना द्वेषाच्या शाळेत शिक्षण मिळते. त्यांच्यामध्ये द्वेषभावना रुजवली जाते.

या सर्व गोष्टी पाहून मी कॉम्युनिझमचा द्वेष करू लागलो. माझा छळ होत असताना, यातना होत असतानाही मला इतका तिरस्कार कधी वाटला नव्हता.

कॉम्युनिझममुळे माझा छळ झाला यासाठी मी त्याचा द्वेष करीत

नाही, तर त्यामुळे देवाच्या गौरवाला काळिमा येतो, ख्रिस्ताच्या नावाला कलंक लागतो व या सत्तेखालच्या कोट्यावधी लोकांचे आत्मे विनाशाच्या गर्तेकडे जात आहेत म्हणून मी त्याचा द्वेष करतो.

सार्‍या देशातून शेतकरी आले व मला भेटले. सामुदायिक शेती कशी चालली आहे हे त्यांनी मला सांगितले. हे सर्व शेतकरी आता त्यांच्याच शेतांत, द्राक्षमळयांत गुलाम म्हणून अर्धपोटी काम करीत होते. त्यांना खावयास भाकर मिळत नव्हती, त्यांच्या मुलांना दूध मिळत नव्हते, फळे मिळत नव्हती–आणि हे सर्व जुन्या काळच्या कनान देशाप्रमाणे नैसर्गिक संपत्तीने भरलेल्या देशात ! कॉम्युनिस्ट राजवटीने आम्हां सर्वांना चोर, खोटे बोलणारे बनवले आहे असे या बंधूंनी मला सांगितले. भुकेपोटी त्यांना एकेकाळी त्यांचे स्वतःचे असलेल्या शेतातून चोरी करावी लागे, कारण आता ही शेते सामुदायिक मालकीची होती. आणि मग ही चोरी छपविण्यासाठी खोटे बोलणे भाग पडे.

कारखान्यामध्ये चालणार्‍या जुलमी दडपशाहीबद्दल कामगारांनी मला सांगितले. तेथे कामगारांची जशी पिळवणूक होते तशी अजून कोणत्याही भांडवलशाही राष्ट्रांत झालेली नाही. येथल्या कामगारांना संप करण्याची मनाई आहे.

बुद्धिमान लोकांनादेखील स्वतःच्या विश्वासाविरुद्ध " देव नाही " अशी शिकवण द्यावी लागे.

जगातील एक तृतीयांश लोकांचे जीवन व विचार उध्वस्त व विकृत करण्यात आले आहेत.

काही तरुण मुली मला भेटल्या. एका ख्रिस्ती तरुणाचे चुंबन घेतल्याबद्दल त्यांना कॉम्युनिस्ट तरुण संघटनेच्या कचेरीत बोलावून त्यांची कानउघाडणी करण्यात आली. तसेच चुंबन घेण्यास योग्य अशा एका तरुणाचे नावही त्यांना सांगण्यात आले !

प्रत्येक गोष्ट निखालस खोटी आणि भयंकर बनली होती.

नंतर मी भूमिगत मंडळीच्या शूर कार्यकर्त्यांना भेटलो. हे सर्व माझे पूर्वीचे सहकारी बांधव. यांपैकी काही जणांना अटक झाली नाही; इतर काहींनी तुरुंगातून सुटल्यावर पुन्हा या कार्याला वाहून घेतले होते.

मी पुन्हा त्यांच्यासह या कार्यात भाग घ्यावा म्हणून ते माझ्याकडे आले. मी त्यांच्या सभेला गेलो. तेथे ज्या पुस्तकांतून गाणी म्हणत ती सर्व पुस्तके हाताने लिहिली होती.

थोर संत अँथनीची मला आठवण होते. तो तीस वर्षे वाळवंटात, निर्जनवासात होता. जगाशी सर्व संबंध तोडून तो उपास व प्रार्थना करीत आपले जीवन कंठीत होता. पण संत अँथनासियस व अरिअस यांच्यात ख्रिस्ताच्या दैवीपणाबद्दल वाद चालला आहे हे त्याने ऐकले तेव्हा आपले संन्याश्याचे जीवन सोडून सत्याचा जय करण्यासाठी तो अलेक्झाँड्रिया येथे गेला. संत बर्नार्ड द क्लेरव्हो याचे उदाहरण मला आठवले. उंच पर्वतामध्ये तो मठ बांधून राहात असे. त्याने क्रूसेडस्च्या ( धर्मयुद्ध ) नावाखाली चालणाऱ्या मूर्खपणाविषयी ऐकले. एक मोठे थडगे जिंकून घेण्यासाठी ख्रिस्ती लोक अरब, यहूदी व त्यांचे बांधव यांची कत्तल करीत आहेत हे त्याने ऐकले. लगेच तो मठ सोडून खाली आला व धर्मयुद्धाविरुद्ध प्रचार करू लागला.

सर्व ख्रिस्ती लोकांनी जे केले पाहिजे तीच गोष्ट मी करण्याचे ठरवले. ही गोष्ट म्हणजे, ख्रिस्त, प्रेषित पौल, थोर संत यांचे उदाहरण घेणे व त्याप्रमाणे करणे–निवृत्त होण्याचा विचार सोडून पुन्हा जोमाने कार्य सुरू करणे.

हे कार्य, हे सुयुद्ध कोणते असणार ? ख्रिस्ती लोकांनी कैदेत असताना त्यांच्या शत्रूंसाठी नेहमी प्रार्थना केली आहे व त्यांना उत्तम साक्ष दिली आहे त्या शत्रूंचे तारण व्हावे ही आमची उत्कृष्ट इच्छा असे व जेव्हा तसे घडे तेव्हा आमची अंत:करणे आनंदाने भरून येत.

असे असले तरी मी कॉम्युनिस्ट प्रणालीचा द्वेष करी व भूमिगत मंडळी समर्थ बनावी ही माझी इच्छा होती. **कारण ही भयानक जुलमी सत्ता उलथून टाकण्याचे सामर्थ्य फक्त भूमिगत मंडळीलाच प्रभावी शुभवर्तमानाद्वारे आहे.**

**यावेळी माझ्या मनात फक्त रुमानियाचाच विचार नव्हता, पण सर्व कॉम्युनिस्ट देशांबद्दल मी विचार करीत होतो.**

**पश्चिमेकडें आल्यावर मला बरीचशी बेपर्वा वृत्ती दिसली.**

सैनावस्की व दानीएल या दोन कॉम्युनिस्ट लेखकांना त्यांच्याच सहकाऱ्यांनी तुरुंगाची शिक्षा दिली तेव्हा जगभरच्या लेखकांनी या कृत्याचा निषेध केला. पण त्यांच्या विश्वासामुळे ख्रिस्ती लोकांना शिक्षा होते तेव्हा मंडळ्या त्याविरुद्ध ब्रही काढत नाहीत.

टोरीने लिहिलेली भक्तिपुस्तके व पवित्रशास्त्राचे भाग अशा प्रकारचे "विषारी" वाङ्मय लोकांना दिले या आरोपाखाली शिक्षा झालेल्या ब्रदर कुझिकबद्दल कोणाला काही वाटते का ? उपदेशांच्या प्रती वाटल्या म्हणून ब्रदर प्रोकोमिटोव्हला शिक्षा झाली, हे कोणाला माहीत तरी आहे का ? ग्रुनव्हाल्ड या हिब्रू ख्रिस्ती व्यक्तीची कोणाला माहिती तरी आहे का ? त्यालाही अशाच आरोपावरून रशियामध्ये शिक्षा झाली व त्याचा छोटा मुलगा कॉम्युनिस्टांनी त्याच्यापासून कायमचा हिरावून नेला. माझा मुलगा मिहाई माझ्याकडून ओढून नेला तेव्हा मला काय वाटले ते मला चांगले ठाऊक आहे. ब्रदर ग्रुनव्हाल्ड, आयव्हॅनेन्को, ग्रॅनी शेव्हचुक, तायशा टॅंकचेन्को, एक्टेरिना वेकाझिना, जॉर्जी वेकाझिन, लॅटेवियामधील पिलात जोडपे, आणि अनेक—या सर्वा-सह मी यातना भोगत आहे. हे सर्व या विसाव्या शतकातील पवित्र जन व विश्वासाचे शूर पाईक आहेत. पूर्वीच्या काळी पहिल्या ख्रिस्ती लोकांना हिंस्र पशूंच्यापुढे टाकण्यासाठी शिपाई नेत होते तेव्हा त्यांचे ख्रिस्ती बंधू त्यांच्या पायातील बेड्यांचे चुंबन घेत, तसेच मीही या सर्व शूर ख्रिस्त सैनिकांच्या शृंखलांचे नम्रपणे चुंबन घेतो.

पश्चिमेकडच्या मंडळ्यातील काही पुढारी यांपैकी कोणाचीच काळजी करीत नाहीत. या छळ सोसणाऱ्यांची नावेदेखील त्यांच्या प्रार्थ-नायादीत नाहीत ! हे सर्व यातना भोगत होते, तुरुंगात खितपत पडले होते त्यावेळी ज्यांनी त्यांना पकडून दिले ते रशियन बॅप्टिस्ट व आर्थ-डॉक्स मंडळ्यांचे अधिकृत पुढारी मात्र मोठ्या आनंदात होते, मान सन्मान उपभोगत होते, नवी दिल्ली, जिनीव्हा अशा ठिकाणच्या संमे-लनांना हजर राहात होते, त्यांचा आदरसत्कार होत होता. रशियामध्ये संपूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य आहे असे त्यांनी या संमेलनातून सर्वांना सांगितले.

सोव्हिएट आर्चबिशप निकोदिम यांनी ही गोष्ट सांगितली तेव्हा जागतिक ख्रिस्ती मंडळ्यांच्या संघटनेच्या एका अधिकाऱ्याने त्यांना कडकडून मिठी मारली. मग याच जागतिक ख्रिस्ती संघटनेच्या नावाने त्यांनी एकत्र मेजवान्या झोडल्या. मात्र याच वेळी तुरुंगातले पवित्र जन काय खात होते ? तेही माझ्याप्रमाणेच येशू ख्रिस्ताच्या नावाने कोबी व न धुतलेली आतडी खात होते.

ही परिस्थिती बदललीच पाहिजे. म्हणूनच संधी मिळाली की मी देश सोडून बाहेर जावे व तुम्हा ख्रिस्ती बंधूंना व भगिनींना खरी परिस्थिती कळवावी असे भूमिगत मंडळीने ठरवले.

मी " कॉम्युनिस्टांवर " प्रेम करतो पण " कॉम्युनिझमचा " पाडाव करायचाच असा मी निश्चय केला आहे. कॉम्युनिझमवर हल्ला केल्याशिवाय सुवार्ता सांगणे योग्य नाही असे मला वाटते.

काही लोक मला म्हणतात, " फक्त सुवार्ताच सांगा ! " यावेळी मला त्या गुप्त पोलिसांची आठवण येते. ते मला म्हणाले, " ख्रिस्ताविषयी सांग पण कॉम्युनिझमबद्दल अवाक्षरही बोलू नकोस ! " आता " निर्भेळ सुवार्ता सांगा, " असे म्हणणारे लोक व कॉम्युनिस्ट लोक यांना असे बोलण्यास स्फूर्ती देणारी खरोखर शक्ती एकच आहे का ?

निर्भेळ सुवार्ता म्हणजे काय हे मला मुळीच समजत नाही. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे संदेश निर्भेळ होते का ? " पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे, " एवढेच म्हणून तो थांबला नाही. " हेरोदा, तू दुराचारी आहेस, " असेही तो म्हणाला त्याचा शिरच्छेद झाला कारण तो फक्त तात्त्विक शिक्षण देत बसला नाही. येशूने काही फक्त डोंगरावरचा "निर्भेळ " संदेशच दिला नाही, तर मंडळीचे पुढारी ज्याला "निषेधात्मक" म्हणतील असाही संदेश दिला.

" शास्त्र्यांनो, परूश्यांनो, तुम्हांस धिक्कार असो, दांभिकांनो, सापांच्या पिलांनो, " आपल्या संदेशामध्ये अशी " भेसळ " केल्यामुळे त्याला वधस्तंभावर मरण सहन करावे लागले. डोंगरावरील प्रवचनांविषयी परूश्यांना काही वाटले नाही.

पापाला पापच म्हटले पाहिजे. आजच्या जगातले सर्वात भयंकर

पाप म्हणजे कॉम्युनिझम. जे शुभवर्तमान या पापाचा निषेध करीत नाही ते शुभवर्तमान नव्हेच. स्वातंत्र्य व जीवित धोक्यात घालून भूमिगत मंडळी या पापाचा निषेध करीत आहे. पश्चिमेकडे स्वातंत्र्य आहे येथे स्वस्थ बसण्याची काय जरूर ?

कॉम्युनिझमचा निषेध करायचा असा मी निश्चय केला आहे. मात्र कॉम्युनिस्टविरोधी लोकांप्रमाणे मी निषेध करणार नाही. हिटलर देखील कॉम्युनिस्ट विरोधी होता पण तो जुलमी होता. आम्ही पापाचा द्वेष करतो पण पाप्यावर प्रेम करतो.

## पश्चिमेमध्ये देखील मी का दुःख सोसत आहे ?

कॉम्युनिस्ट देशामध्ये मी जेवढा अस्वस्थ होतो त्याहून जास्त अस्वस्थ येथे आहे. मी अस्वस्थ आहे, कारण मी भूमिगत मंडळीच्या अवर्णनीय गुणसौंदर्याला मुकलो आहे. " न्युडिस न्यूडम ख्रिस्टी सेक्वी " या जुन्या लॅटिन म्हणीप्रमाणे वागणारी ही मंडळी आहे (नग्न ख्रिस्ताला नग्नपणे अनुसरा).

कॉम्युनिस्टांच्या प्रदेशात मनुष्याच्या पुत्राला व जे त्याचे आहेत त्यांना कोठे डोके टेकायलासुद्धा जागा नाही. तेथील ख्रिस्ती लोक स्वतःसाठी घरे बांधत नाहीत. बांधून उपयोग काय ? त्यांना कैद केले की प्रथम घरदार जप्त होणार. नवीन घर बांधले तर ते एक अटक होण्याचे कारणच ठरेल, कारण कॉम्युनिस्टांना नवी घरे फुकटात हवीच असतात. तिथे ख्रिस्ताच्या मागे जाण्याअगोदर कोणी वृद्ध वडिलांच्या मरणाची वाट पाहात नाही, अगर कुटुंबाचा निरोपही घेत नाहीत. कोण तुमची आई, कोण बहीण, कोठले भाऊ ? या दृष्टीने येथे तुम्ही येशूसारखेच आहा. देवाचे वचन पाळून त्याची इच्छा पूर्ण करणारे हेच तुमचे भाऊ, आई. जेथे वधू वराला धरून देते, मुले आईबापांचा उघड निषेध करतात, स्त्रिया आपल्या पतीविरुद्ध माहिती देतात, तेथे स्वाभाविक नातीसंबंधांना कसला अर्थ उरला आहे ? येथे अर्थ आहे तो आत्मिक संबंधाला—कारण हेच नाते टिकणारे आहे.

भूमिगत मंडळी गरीब आहे, यातना, हालअपेष्टा सहन करणारी आहे, पण यामध्ये एकही " कोमट " सभासद नाही.

भूमिगत मंडळीमधील उपासना एकोणीसशे वर्षांपूर्वीच्या प्राचीन मंडळीतील उपासनेप्रमाणेच असते. येथल्या उपदेशकाला गुंतागुंतीचे ईश्वरविज्ञान माहीत नसते. पेत्राप्रमाणेच त्यालाही धर्मोपदेशविद्या माहीत नसते. ईश्वरविज्ञानाच्या प्रत्येक प्राध्यापकाने पेत्राने पन्नासाव्या दिवशी केलेल्या प्रवचनाला अगदी कमी गुण दिले असते. कॉम्युनिस्ट देशामधल्या लोकांना पवित्रशास्त्रातील फार थोडी वचने माहीत असतात, कारण तेथे पवित्रशास्त्र ही दुर्मिळ वस्तू आहे. तसेच बहुधा हा उपदेशकही तुरुंगात बरीच वर्षे काढलेला असतो व त्याने कित्येक वर्षे पवित्रशास्त्र पाहिलेलेही नसते.

देवपित्यावर विश्वास आहे असे ते म्हणतात तेव्हा त्या विधानामागे मोठा अर्थ असतो. तुरुंगामध्येही ते रोज याच समर्थ पित्याकडे भाकरी मागत पण त्यांना काय मिळे? कोबी आणि कसली तरी अमंगळ वस्तू! तरीदेखील देव प्रेमळ पिता आहे असा त्यांचा दृढ विश्वास आहे. देवाने मला ठार केले तरी मी त्याच्यावर विश्वास ठेवणार असे म्हणणाऱ्या ईयोबाप्रमाणे ते आहेत. वधस्तंभावर देवाने आपला त्याग केला असे वाटत असताना येशूने देवाला "पिता" अशी हाक मारली तसेच हे आहेत.

या भूमिगत मंडळीतील आत्मिक सौंदर्य ज्यांनी अनुभवले आहे त्यांना पश्चिमेकडच्या काही मंडळयांतला आत्मिक पोकळपणा पाहून कधी समाधान लाभेल का? कॉम्युनिस्ट देशातील तुरुंगात असताना होतो त्याहून जास्त अस्वस्थ मी येथे आहे; कारण पाश्चात्य संस्कृतीचा ऱ्हास होत आहे असे मला दिसत आहे.

"डिक्लाईन ऑफ द वेस्ट" या आपल्या पुस्तकात ओस्वाल्ड स्पेंग्लरने लिहिले आहे, "तुमचा नाश होत आहे. ऱ्हासाची निदर्शक अशी सर्व दुश्चिन्हे दिसत आहेत. तुमची मोठी संपत्ती, मोठे दारिद्र्य, तुमची भांडवलशाही, तुमचा समाजवाद, तुमच्या लढाया आणि क्रांती, नास्तिकता, निराशावाद, उदासीनता, तुमच्यामधील अनीती, उध्वस्त संसार, मोडलेली लग्ने, संततिनियोजन–या सर्व गोष्टी एका बाजूने तुमचे रक्तशोषण करीत आहेत व दुसऱ्या बाजूने बुद्धिहनन करीत आहेत, हे मी

सिद्ध करून दाखवतो. तसेच प्राचीन राज्यांमध्ये–अलेक्झांड्रिया, ग्रीस व विकारी रोममध्ये–विनाशाच्या वेळी अशी चिन्हे दिसत होतीं हेही मी सिद्ध करून दाखवीन. ''

हे पुस्तक १९२६ मध्ये लिहिलेले आहे. तेव्हापासून आजपावेतो युरोपच्या अर्ध्याहून अधिक भागामध्ये थेट क्यूबापर्यंत लोकशाही व संस्कृतीचा विनाश झालाच आहे; आणि पश्चिमेकडचे इतर देश झोपलेलेच आहे.

एक सामर्थ्य मात्र झोप न घेता जागरूक आहे–ही आहे कॉम्युनिस्टांची शक्ती ! पूर्वेकडे कॉम्युनिस्टांचा भ्रमनिरास झाला आहे, तेथे ते निराश झाले आहेत, तरी पश्चिमेकडे मात्र कॉम्युनिझम प्रबळ आहे. कॉम्युनिस्ट देशांमध्ये चाललेल्या अत्याचार, जुलुम, दैन्यावस्था, यांवर हे येथले कॉम्युनिस्ट विश्वासच ठेवीत नाहीत. उलट आपले प्रचारकार्य दुप्पट उत्साहाने सुरूच ठेवतात. श्रीमंतांच्या आरामगृहापासून ते थेट उपासना–मंदिरापर्यंत, क्लबातून, कॉलेजातून, बद्धिवादी लोकांमध्ये, झोपडपट्टीत–सर्वत्र हे प्रचारसत्र चालूच असते. त्यांना विश्रांती कशी ती माहीतच नाही. आपण ख्रिस्ती लोक बहुधा खऱ्या सत्याच्या बाजूला अर्धवटपणे असतो तर हे कॉम्युनिस्ट लोक खोटयाच्या बाजूला जिवेभावे असे असतात.

आणि धर्मतत्त्वज्ञ या वेळात क्षुल्लक गोष्टींवरून वाधंग माजवीत असतात.

येथे मला परत इतिहासातील एक घटना आठवते. इ. स. १४९३ मध्ये दुसऱ्या महमदाच्या सैन्याने कॉस्टॅंटिनोपलला वेढा दिला होता. येणाऱ्या शतकांत बाल्कन राष्ट्रे ख्रिस्ती वर्चस्वाखाली राहणार का मुसलमानी वर्चस्वच तेथे राहाणार; हे ठरण्याचा तो आणीबाणीचा निर्णायक प्रसंग आला तर त्यावेळी या वेढा पडलेल्या शहरात एका स्थानिक ख्रिस्ती मंडळीची समिती कशाचा विचार करीत होती ? त्यांच्यापुढचे " गहन '' प्रश्न वेगळेच होते : पवित्र कुमारीच्या नेत्रांचा रंग कोणता असावा ? देवदूतांचे लिंग कोणते ? पवित्र केलेल्या जलात माशी पडली तर काय होते–माशीचे पवित्रीकरण होते का जल अशुद्ध होते ? असे होते ते प्रश्न.

त्या काळाला अनुलक्षून अशी ही केवळ दंतकथाही असेल, पण आपण आजची मंडळयांची मासिके वगैरे पाहिली तर तेथेही अशाच प्रकारच्या प्रश्नांची चर्चा चाललेली आढळेल. कॉम्युनिझमपासून असलेला भयानक धोका व भूमिगत मंडळी सोसत असलेल्या हालअपेष्टा, या गोष्टी तेथे क्वचितच आढळतात.

ईश्वरविज्ञान, संस्कार, विधी, अनावश्यक गोष्टी यांसंबंधी सर्वत्र वाद चाललेले असतात, त्यांना अंतच नाही !

एका दिवाणखान्यात एका मेजवानीच्या प्रसंगी कोणी प्रश्न विचारला, " समजा तुम्ही एका बुडणाऱ्या बोटीवर आहात आणि तेथून एका एकाकी निर्जन बेटावर तुम्हाला जीव बचावून जाता येईल. जाताना बोटीवरच्या वाचनालयातून एकच पुस्तक नेता येईल तर यावेळी तुम्ही कोणते पुस्तक निवडाल ?" एक म्हणाला, " मी पवित्रशास्त्र घेईन, " दुसरा म्हणाला, " शेक्सपिअरची नाटके ". एका लेखकाने मात्र अगदी बरोबर उत्तर दिले. तो म्हणाला, " बोट कशी तयार करावी व किनाऱ्याकडे परत कसे जावे ही माहिती असलेले पुस्तक मी निवडीन; एकदा किनारा गाठला की वाटेल तेवढे वाचायला मिळेल. "

विविध ख्रिस्ती मतप्रणाली व ईश्वरविज्ञान हे सर्व स्वतंत्र राहावे; कॉम्युनिस्टांच्या छळामुळे जेथे असे स्वातंत्र्य नष्ट झाले त्याबद्दल विषाद व्यक्त करणे आवश्यक आहे. याइतके एकच योग्य असे ईश्वरविज्ञानाविषयीचे मत स्वीकारणे महत्त्वाचे नाही.

" सत्य तुम्हाला मुक्त करील, " येशूने सांगितले आहे; पण " स्वातंत्र्य–केवळ स्वतंत्रताच–सत्य प्रकाशित करते." म्हणूनच क्षुल्लक, बिनमहत्त्वाच्या गोष्टींवर वाधंग माजवीत न बसता कॉम्युनिझमच्या जुलुमाविरुद्ध सामना करण्यासाठी आपण संघटित होऊन या स्वातंत्र्ययुद्धात सामील झाले पाहिजे.

पोलादी पडद्यामागील मंडळीच्या वाढत्या योजनांविषयी ऐकून मलाही त्या यातना होत आहेत. अशाच यातना मी भोगल्या आहेत. त्यामुळे त्यांना होणारे क्लेश मला चांगले समजतात.

गेल्या जूनमध्ये रशियन वृत्तपत्रांनी रशियन बॅप्टिस्ट ख्रिस्ती

लोकांवर आरोप केला की, ते आपल्या मंडळीतील सभासदांना मुलांचा बळी देऊन पापाचे प्रायश्चित्त करावे असे शिक्षण देत आहेत. पूर्वी यहूदी लोकांविरुद्ध धार्मिक कार्यासाठी नरबळी देण्याचा आरोप केला जाई.

या सर्व आरोपांचा परिणाम काय होतो हे मला चांगले माहीत आहे. १९५९ मध्ये रुमानियामधील क्लूजच्या तुरुंगात मी होतो. माझ्या-बरोबरच लाझारोविकि हा कैदी होता. एका मुलीला ठार केले या आरोपाखाली त्याला शिक्षा झाली होती. तो केवळ तीस वर्षांचा होता-पण त्या पाशवी छळांमुळे त्याचे केस एका रात्रीत पांढरे झाले होते. तो अगदी म्हातारा दिसू लागला. त्याच्या बोटाला नखेच नव्हती. न केलेल्या गुन्ह्याची कबूली मिळावी यासाठी ती नखे ओढून काढली होती. या-प्रमाणे एक वर्षभर त्याचा छळ केल्यावर पुढे तो निर्दोष आहे म्हणून त्याची सुटका करण्यात आली. पण या स्वातंत्र्याचा त्याला काय उपयोग? तो आता कायमचा खचला होता.

सोव्हिएट वृत्तपत्रे बॅप्टिस्ट लोकांवर करीत असलेले खोटे आरोप वाचून बऱ्याच जणांना हसू येईल, पण ज्यांच्यावर हा आरोप केला जात आहे त्यांची कशी कुचंबणा होत आहे हे मला माहीत आहे. पाश्चिमात्य देशात राहणे व अशा प्रकारचे प्रसंग सतत डोळ्यांपुढे येणे अतिशय भयंकर आहे.

कालुगा ( रशियामधील शहर ) येथील येरमोगेन हे आर्चबिशप व इतर सात बिशप आज कोठे असतील ? आर्चबिशप निकोडिम व पुढारी अलेक्झी ह्या कॉम्युनिस्ट हस्तकांनी सरकारशी संपूर्ण सहकार्याचे आवाहन केले होते त्याविरुद्ध येरमोगेन वगैरे सात बिशपांनी विरोध केला. त्यांचे आज काय झाले आहे ? रुमानियामधल्या असाच विरोध करणाऱ्या बिशपांचा मृत्यू कसा झाला हे मी तुरुंगात स्वतः पाहिले आहे म्हणूनच मला या धार्मिक बिशपांबद्दल अतिशय काळजी वाटते आहे.

निकोलाय एशलिमन व ग्लेब याकुमीन या पाळकांना प्रमुख बिशपने शिस्त लावली, कारण मंडळीला धार्मिक स्वातंत्र्य असावे म्हणून त्यांनी मागणी केली होती. पाश्चिमात्य लोकांना एवढेच माहीत आहे, पण व्लाडिमिरेस्टी, रुमानिया येथल्या फादर ऑयोनबरोबरच मी

तुरुंगात होतो. त्यांच्याबाबतीतही असेच घडले होते. वरवर पाहिले तर या " शिस्त लावण्याचे " स्वरूप धर्मासंबंधी आहे असे दाखवण्यात येते पण आमच्या अधिकृत मंडळचांचे अधिकारीही (कॉम्युनिस्ट देशांतील सर्व अधिकृत मंडळचांच्या अधिकाऱ्यांप्रमाणे) गुप्त पोलीसांच्या हातात हात घालून सहकार्य करीत असतात. मंडळीचे अधिकारी ज्यांना शिक्षा करतात त्यांना हे पोलीस दुसरी परिणामकारी " शिस्त " लावतात. कैद, मारहाण, छळ व मादक द्रव्ये पाजणे असे तिचे स्वरूप असते.

कॉम्युनिस्ट प्रदेशांतील लोकांच्या होणाऱ्या छळाविषयी ऐकून मला कापरे भरते. तसेच, हे यातना देणारे लोक पुढे कोणत्या सार्वकालिक शिक्षेला तोंड देणार हे आठवून माझा जीव घाबरा होतो. ज्यांचा छळ होत आहे अशा आपल्या बांधवांना काहीच साहाय्य न करणाऱ्या पाश्चिमात्य ख्रिस्ती लोकांसाठीही माझा जीव तळमळतो आहे.

खरे तर माझी अंत:करणापासूनची इच्छा आहे की, आपण आपले पहावे, स्वत:च्याच द्राक्षमळचाची ( मनाची ) निगा राखावी, आणि या मोठ्या संघर्षात उडी घालू नये; कोठेतरी दूर शांतीने, समाधानाने कालक्रमणा करावी. पण हे शक्यच नाही. कॉम्युनिझम उंबरठ्यापर्यंत आला आहे. कॉम्युनिस्टांनी तिबेट पादाक्रांत केला तेव्हा तेथे जे लोक फक्त आत्मिक विचार करणारे होते त्या सर्वांची कत्तल करण्यात आली. आमच्या देशातही वस्तुस्थितीपासून तोंड फिरवलेल्या सर्वांचा नायनाट करण्यात आला. मंदिरे, मठ, सर्व बरखास्त करून फक्त परदेशीयांच्या डोळचात धूळ फेकण्यास आवश्यक तेवढीच मंदिरे ठेवण्यात आली. शांती, समाधान हवे असे मी म्हणतो पण ही माझी इच्छा माझ्या आत्म्याला धोकादायकच ठरेल; कारण मग मीही वस्तुस्थितीकडे पाठ फिरवीत आहे असे होईल.

व्यक्तिश: कितीही धोकादायक असले तरी हा लढा मला चालूच ठेवला पाहिजे.

उद्या मी बेपत्ता झालो तर कॉम्युनिस्टांनी मला पळवून नेले असे खुशाल समजा. १९४८ मध्ये त्यांनी मला असेच पळवून नेले आणि खोटया नावाने तुरुंगात डांबले. त्या वेळी ॲना पॉकर या आमच्या देशाच्या

राजसचिवाने स्वीडनचे राजदूत सर पॅट्रिक व्हॉन रूटरस्वाड यांना सांगितले की "वर्मब्रॅन्ड आता कोपनहेगेन येथे आनंदात फिरत आहेत." या राजदूताकडे मी तुरुंगातून चोरून पाठवलेले एक पत्र होते; त्यामुळे आपणाला खोटी गोष्ट सांगण्यात येत आहे हे त्यांना समजले. अशीच गोष्ट पुन्हा घडणे अशक्य नाही. माझा खून झाला तर खुनी इसम नक्कीच कॉम्युनिस्टांनी पाठवलेला असणार! मी मरावे,मला मारावे अशी इच्छा इतर कोणाचीच नाही. चोरी, व्यभिचार, अनाचार, खोटे बोलणे, राजकीय दृष्टचा नालायक अशा नैतिक अधःपाताच्या गोष्टी तुम्ही माझ्याविषयी ऐकल्यात तर समजा की गुप्त पोलीसांनी मला दिलेली धमकी खरी झाली आहे–"आम्ही तुझा नैतिक अधःपात करू!"

अमेरिकन सेनॅटसमोर मी साक्ष दिली म्हणून कॉम्युनिस्टांनी माझा वध करण्याचे ठरविले आहे असे मला एका खात्रीलायक ठिकाणाहून समजले आहे. कदाचित ते माझा वध करतील अगर बेअब्रू करतील. रुमानियामधील माझ्या मित्रांवर अत्याचार, दडपण आणून ते मला आपल्या इच्छेप्रमाणे करायला लावतील. त्यांची शक्ति–साधने समर्थ आहेत.

**तरीही मी गप्प बसणार नाही.** मी काय म्हणत आहे याचा शांतपणे विचार करणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही म्हणाल, अनेक वर्षे छळ, यातना भोगल्यामुळे तुमचे मन छळाच्या कल्पनांनी ग्रासलेले आहे. असे खुशाल म्हणा! पण माझी व इतरांची अशी अवस्था होण्यास कारणीभूत झालेली ही कॉम्युनिझमची भयंकर शक्ती काय आहे असा जरी विचार तुम्ही करू लागला तरी मला पुरेसे आहे. पूर्व जर्मनीतून लोक बंदुकीच्या गोळचापासून धोका असताना आपल्याबरोबर लहान मुले घेऊन बुलडोझरमधून काटेरी तार तोडून पश्चिमेकडे येण्याचा प्रयत्न का करतात, एवढा जरी विचार केलात तरी बरेचसे काम होईल.

सर्व "पश्चिम" झोपली आहे; तिला उठवलेच पाहिजे!

* * *

ज्यांना यातना भोगाव्या लागतात ते सर्वच एखाद्या "बळीच्या"

शोधात असतात. मग त्याच्यावर सर्व दोष ते लादतात. असा एखादा "बळी" शोधला, त्यावर सर्व दोष टाकला की मन थोडे हलके होते.

मी असे करणार नाही. कॉम्युनिझमशी हातमिळवणी करणाऱ्या काही पाश्चिमात्य ख्रिस्ती पुढाऱ्यांना मी तरी दोष देणार नाही. ह्या दुष्टपणाचे कारण हे पुढारी नाहीत. हा दुष्टपणा फार जुना आहे. याहून जुन्या दुष्टपणाचे बळी असे हे पुढारी आहेत. मंडळ्यांतील गोंधळ काही यांनी निर्माण केला नाही, यांना फक्त तो तेथे सापडला !

पश्चिमेकडे आल्यानंतर मी अनेक ईश्वरविज्ञान विद्यालयांना भेट दिली आहे. येथे मी अनेक व्याख्यानेही ऐकली. व्याख्यानांचे विषय होते : घंटांचा व भक्तिगायनांचा इतिहास, आता अस्तित्वातच नसलेले मंडळीसंबंधी नियम, शिस्त वगैरे. ईश्वरविज्ञान शिकणारे विद्यार्थी मी पाहिले आहेत. हे काय शिकतात ? पवित्र शास्त्रातील उत्पत्तीचा इतिहास, आदाम, जलप्रलय, मोशाचे चमत्कार-यांपैकी एकही गोष्ट खरी नाही, भविष्यवचने पूर्ण झाल्यावर नंतर लिहिलेली आहेत, कुमारीच्या पोटी जन्म ही भाकडकथा आहे; येशूचे पुनरुत्थान झालेच नाही-कोणत्या तरी थडग्यात त्याची हाडे अजून पडली आहेत. मंडळ्यांना लिहिलेली पत्रे खोटी आहेत; प्रकटीकरणाचे पुस्तक एखाद्या माथेफिरूने लिहिले आहे-पण असे असूनही हे "पवित्र" पुस्तक आहे ! (म्हणजे या पवित्र पुस्तकात एखाद्या कॉम्युनिस्ट वर्तमानपत्रात असतात त्याहून जास्त खोट्या गोष्टी आहेत म्हणायच्या !)

ईश्वरविद्या शिकताना मंडळीच्या आजच्या पुढाऱ्यांनी ह्याच प्रकारचे ज्ञान मिळवले आहे. असल्याच वातावरणात ते राहतात. ज्याच्याविषयी भ्रामक गोष्टी बोलल्या जातात त्या प्रभूवर त्यांनी का विश्वास ठेवावा? ज्या मंडळीत "देव मरण पावला आहे" असे उघड शिकवले जाते त्या मंडळीशी पुढाऱ्यांनी तरी का विश्वासू राहावे ?

हे पुढारी आहेत अधिकृत मंडळीचे-**ख्रिस्ताच्या वधूचे** नव्हेत ! ज्या मंडळीने आपल्या प्रभूचा केव्हाच विश्वासघात केला आहे अशा मंडळीचे ते पुढारी आहेत. भूमिगत मंडळीतील हालअपेष्टा सोसणारी, यातना सहन केलेली एखादी व्यक्ती या लोकांना भेटली म्हणजे हे

तिच्याकडे "हा कोण प्राणी ?" अशा भावनेने बघतात.

दुसरें असे आहे की, आपण केवळ एकाच गोष्टीमुळे कोणाचा न्याय करू नये. सर्व विचार केला पाहिजे. असे केले नाही तर आपण परूश्यांसारखेच होऊ. येशू शब्बाथाचे नियम पाळत नाही म्हणून ते त्याचा द्वेष करीत. यामुळे त्यांच्या दृष्टीनेसुद्धा येशूमध्ये ज्या चांगल्या गोष्टी होत्या त्यांकडे त्यांची डोळेझाक झाली.

कॉम्युनिझमविषयी वेगळा दृष्टिकोन असणारे हेच पुढारी इतर बाबतीत योग्य विचार करणारे व व्यक्तिशः प्रामाणिक असतील, आणि ज्या गोष्टींचा ते चुकीने विचार करतात त्या गोष्टींबद्दल ते योग्य विचार करू लागतील.

रुमानियामधील एका ऑर्थडॉक्स बिशपला मी भेटलो. हा कॉम्युनिस्टांचा हस्तक होता व स्वतःच्या लोकांनाच पकडून देई. मी त्याचा हात माझ्या हातात घेतला आणि त्याला उधळ्या पुत्राची गोष्ट सांगितली. ती संध्याकाळची वेळ होती. आम्ही त्याच्या बागेत बसलो होतो. मी म्हटले, "परत येणाऱ्या पापी माणसाचा देव कसा प्रेमाने स्वीकार करतो पहा. पश्चात्ताप करणाऱ्या बिशपचाही तो असाच स्वीकार करील." मी त्याला काही ख्रिस्ती गाणी म्हणून दाखवली आणि या माणसाचा पालट झाला.

तुरुंगामध्ये माझ्या कोठडीत एक ऑर्थडॉक्स पाळक होता. आपली सुटका होईल या आशेने तो नास्तिक विचारांची व्याख्याने लिहीत होता. मी त्याच्याशी बोलल्यावर त्याने ते कागद फाडून टाकले व आपल्या सुटकेच्या आशेवर पाणी सोडले.

माझ्या अंत:करणावरील हे यातनांचे दडपण मी कोणाच्या माथी मारू इच्छीत नाही. या सर्वांचे खापर कोणावर तरी फोडावे व थोडे मानसिक समाधान मिळवावे हे मला मान्य नाही.

* * *

माझे आणखी एक दुःख आहे. माझे निकटचे मित्रसुद्धा मला योग्य प्रकारे समजून घेत नाहीत. कॉम्युनिस्टांविषयी माझ्या मनात द्वेष, तिरस्कार भरला आहे असे ते म्हणतात. पण हे खरे नाही हे मलाच माहीत आहे

एक लेखक क्लॉड मॉंटिफिओर म्हणतो की, येशूने शास्त्री व परूशी लोकांबद्दल जो पवित्रा घेतला, जो निषेध उघडपणे केला तो चुकीचा होता. शत्रूंवर प्रेम करा व शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, या येशूच्या शिकवणीविरुद्ध ही गोष्ट आहे, असे तो म्हणाला. लंडन येथील संत पॉल चर्चचे नुकतेच निवृत्त झालेले प्रमुख डॉ. डब्ल्यू. आर. मॅथ्यूज हे देखील येशूमध्ये वैचारिक गोंधळ व एकवाक्यता नाही असे म्हणून पुढे सांगतात की याचे कारण तो बुद्धिवादी नव्हता !

मॉंटिफिओरेची येशूविषयीची कल्पना चूक होती. येशूने परूश्यांचा जाहीरपणे निषेध केला तरी तो त्यांच्यावर प्रेम करी. मीदेखील कॉम्युनिस्ट व मंडळयातील त्यांचे हस्तक या सर्वांचा निषेध करतो पण त्यांच्यावर माझे प्रेम आहे.

"कॉम्युनिस्टांना विसरून जा! फक्त आध्यात्मिक गोष्टींचा विचार करा-तेवढेच कार्य करा !" असे मला पुन्हा पुन्हा सांगण्यात येते. नाझींच्या हातून छळ झालेला एक ख्रिस्ती मला भेटला. तो म्हणाला, "जोपर्यंत तुम्ही ख्रिस्ताची साक्ष देत राहाल तोवर माझा तुम्हाला संपूर्ण पाठिंबा आहे; पण कॉम्युनिझमविरुद्ध तुम्ही एक शब्दही बोलू नये." मी त्याला विचारले की, "नाझींच्या विरुद्ध जर्मनीमध्ये ख्रिस्ती लोक लढत होते ती त्यांची चूकच होती नाही का? खरे तर त्यांनी फक्त पवित्र आविषयीच बोलावयास हवे होते आणि जूलमी हिटलरविरुद्ध ब्रही काढावयास नको होता ! यावर त्याने उसळून उत्तर दिले, "असे कसे म्हणता ! हिटलरने साठ लाख यहूद्यांना मारले, त्याविरुद्ध लढा देणे भागच होते." "मग कॉम्युनिझमनेदेखील तीन कोटी रशियनांची कत्तल केली, असंख्य चिनी व इतर लोकांना ठार केले. त्यांनी यहूद्यांचा देखील वध केला. मग फक्त यहूद्यांना मारले तरच निषेध करायचा आणि रशियनांना मारले तर गप्प बसायचे असेच करायचे ना ?" मी विचारले. "ही गोष्ट वेगळी आहे" उत्तर आले. पण वेगळी म्हणजे काय काही समजले नाही.

कॉम्युनिस्टांच्या पोलिसांनी व हिटलरच्या पोलिसांनी-दोघांनीही-मला मारहाण केली आहे, आणि या दोन्हीत काही "वेगळेपण" आहे

असे मला कधी वाटले नाही. दोन्हीमुळे मला सारख्याच यातना झाल्या.

ख्रिस्ती धर्माला काही फक्त कॉम्युनिझिमविरुद्धच लढा द्यावयाचा नाही, तर पापाच्या विविध अंगांशी सामना करावयाचा आहे. आम्हांला अस्वस्थ करणारा हा एकच प्रश्न नाही.

मात्र कॉम्युनिझम आज ख्रिस्ती धर्माचा सर्वांत मोठा व सर्वांत भयंकर शत्रू आहे व त्याविरुद्ध आपण संघटित व्हावयास हवे.

एक गोष्ट पुन्हा सांगू का ? ख्रिस्तासमान होणे हे मानवाचे ध्येय आहे. आणि ही गोष्ट होऊ न देणे हेच कॉम्युनिझमचे ध्येय आहे ! कारण ते प्रामुख्याने धर्मविरोधी आहेत. मेल्यावर माणसाचे काय होते ? केवळ माती, दुसरे काही नाही, हा त्यांचा विश्वास आहे. भौतिक सुखाच्या पातळीवर सर्व जीवन जगले पाहिजे ही त्यांची इच्छा !

त्यांना फक्त "समुदाय" माहीत आहेत. नव्या करारातील त्या भूताच्या शब्दाप्रमाणेच हा त्यांचा शब्द आहे. "तुझे नाव काय ?" असे विचारले तर ते म्हणाले, "सैन्य"! देवाने मानवजातीला दिलेली मोठी देणगी म्हणजे व्यक्तिमत्त्व. ही देणगीच येथे पायदळी तुडवली जाते. आल्फरेड अॅडलरने लिहिलेले "इंडिव्हिज्युअल सायकॉलॉजी" हे पुस्तक जवळ बाळगल्याबद्दल त्यांनी एकाला कैदेत टाकले आहे. त्यावेळी गुप्त पोलिस अधिकारी ओरडत होते, "व्यक्ती, व्यक्ती, दुसरे यांना काही दिसत नाही ! कधी हे समूदाय, समूह, असे का म्हणत नाहीत ?"

आम्ही स्वतंत्र व्यक्ती व्हावे अशी येशूची इच्छा आहे. म्हणूनच आम्ही व कॉम्युनिझम यांचा मेळ होण्याची मुळीच शक्यता नाही. ही गोष्ट कॉम्युनिस्टांनाही माहीत आहे. विज्ञान व धर्म या त्यांच्या मासिकात ते लिहितात, "धर्म कॉम्युझिमच्या विरोधी आहे. तो शत्रू आहे... कॉम्युनिस्ट पक्षाचा कार्यक्रम म्हणजे धर्माचे मरणच आहे... हा कार्यक्रम म्हणजे लोकांना धार्मिक गूलामगिरीतून कायमचे मुक्त करण्यासाठी नास्तिकतावादी समाजरचना करावयाची."

कॉम्युनिझम व ख्रिस्ती धर्म एकत्र राहू शकतील का ? या प्रश्नाचे उत्तर कॉम्युनिस्टांनी येथेच दिले आहे : "कॉम्युनिझम म्हणजे धर्माचे मरण."

# प्रकरण पाचवे

आता पुन्हा मी भूमिगत मंडळीची माहिती सांगतो.

ही मंडळी विविध परिस्थितीमध्ये कार्य करते. सर्व कॉम्युनिस्ट देशांमध्ये नास्तिकता हाच अधिकृत सरकारी धर्म आहे. वृद्ध लोकांना कमी अधिक प्रमाणात धर्मविषयक सवलती मिळतात–त्यांना विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य आहे–पण मुले व तरुणांवर विश्वास न ठेवण्याची सक्ती आहे. त्यांनी विश्वास ठेवता कामा नये. या देशांतील रेडिओ, टेलिव्हिजन, सिनेमा, नाटक, वृत्तपत्रे, साहित्यालयें, या सर्वांपुढे एकच उद्देश असतो–तो म्हणजे देवावरचाच विश्वास नष्ट करणे.

या पक्षहीन देशांच्या सामर्थ्याशी सामना करण्याएवढी भूमिगत मंडळी समर्थ नाही. रशियातील भूमिगत पाळकांना ईश्वरविद्येचे कसलेच शिक्षण मिळालेले नसते.यांतील काहींनी संपूर्ण पवित्र शास्त्रसुद्धा वाचलेले नाही. बऱ्याच पाळकांची दीक्षा कशी होते हें आता सांगतो. गुप्तपणे पाळकाचे काम करणारा एक तरुण रशियन आम्हांला भेटला. "तुझी दीक्षा कोणी केली?" असे मी त्याला विचारले. तो म्हणाला, "दीक्षा करण्यासाठी कोणी विश्वासू बिशप नव्हता. अधिकृत बिशप आहेत पण ते फक्त कॉम्युनिस्ट पक्षाने मान्यता दिलेल्या व्यक्तीलाच दीक्षा देतात. मग आम्ही दहा ख्रिस्ती तरुण हुतात्म्याचे मरण आलेल्या एका बिशपच्या थडग्यापाशी गेलो. आमच्यातील दोघांनी त्या थडग्यावर हात ठेवले; बाकीचे आमच्याभोवती वर्तुळाकार उभे राहिले. आमची दीक्षा करण्यासाठी आम्ही पवित्र आत्म्याची प्रार्थना केली. येशूने आपल्या भोसकल्या, जखमा असलेल्या हातांनीच आमची दीक्षा केली असा आमचा विश्वास आहे."

माझ्या दृष्टीने या तरुणाची दीक्षा देवासमोर योग्य अशीच आहे! अशाप्रकारे दीक्षा झालेले लोक, ज्यांनी कधी ईश्वरविद्येचे शिक्षण घेतले नाही, ज्यांना पवित्र शास्त्राची विशेष माहिती नाही असे लोक ख्रिस्ताचे कार्य चालवीत आहेत.

पहिल्या मंडळीत असेच होते. ख्रिस्तासाठी जगाची उलथा-पालथ

करणारे ते कोणत्या पाठशाळांत गेले होते ? त्या सर्वांना वाचता तरी येत होते का? त्यांच्याकडे कुठे पवित्रशास्त्र होते? देवच त्यांच्याशी बोलत होता.

आमच्या भूमिगत मंडळीत मोठमोठी भव्य उपासना–मंदिरें नाहीत; पण गुप्तपणे अरण्यात जमतो तेव्हा आम्ही पाहतो त्या स्वर्गीय आकाशाहून कोणते मंदिर सुंदर आहे ? पक्ष्यांची किलबिल हेच आमचे मधूर वाद्य असते. फुलांचा सुवास हाच आमचा धूप. आणि नुकत्याच तुरुंगातून आलेल्या ख्रिस्ती बांधवांचे फाटके कपडे हें एखाद्या बिशपच्या कपड्यांहून अधिक तेजस्वी असतात. चंद्र, तारे–या आमच्या मेणबत्त्या, देवदूत त्या पेटवत होते.

**या मंडळीच्या पवित्र सौंदर्याचे वर्णन करणे माझ्या सामर्थ्यापलीकडचे आहे !**

बरेचदा ही गुप्त उपासना संपली की ख्रिस्ती लोकांना पकडून तुरुंगात टाकण्यात येते. तिथे एखादी वधू जशी तिच्या प्रियकराकडून आलेले दागिने आनंदाने आपल्या अंगावर घालते तसे हे लोक हातापायावर शृंखला वागवतात. तुरुंग खरोखर शांत जलशयासारखा आहे. तेथे तुम्हांला येशूची प्रीती व समक्षता मिळते आणि या जागेऐवजी कोणी राजपद देऊ केले तर तेही तुम्ही नाकाराल. खरे विजयी व आनंदी ख्रिस्ती लोक मला फक्त तीन जागी दिसले : पवित्रशास्त्रात, भूमिगत मंडळीत व तुरुंगात. भूमिगत मंडळी जुलुमाखाली त्रस्त अशी आहे तरीही तिचे अनेक मित्र आहेत–सर्वत्र, गुप्त पोलिसांमध्ये व सरकारी अधिकाऱ्यांमध्येसुद्धा मित्र आहेत. हे गुप्त विश्वासी अनेकदा भूमिगत मंडळीचे संरक्षण करतात.

अलिकडेच रशियन वृत्तपत्रांमध्ये या " बाह्यतः अविश्वासी " लोकांची संख्या वाढते आहे अशा तक्रारी करण्यात आल्या. हें लोक-असंख्य स्त्री पुरुष–कॉम्युनिस्ट सत्तेची सर्व क्षेत्रे व्यापून उरले आहेत ! सरकारी कचेऱ्यांमध्ये, प्रचार कचेऱ्यांमध्ये आणि सर्वत्र–बाह्यात्कारी हे आपण कॉम्युनिस्ट आहो असे भासवतात. पण खरोखर हे सर्व गुप्तपणे विश्वास ठेवणारे व भूमिगत मंडळीचे सभासद आहेत असे या वृत्तपत्रांनी म्हटले आहे.

कॉम्युनिस्ट वृत्तपत्रांमध्ये एका तरुण स्त्रीची हकीगत प्रसिद्ध केली होती. ही स्त्री कॉम्युनिस्ट प्रचारखात्यात काम करीत होती. रोजचे काम संपल्यावर ती घरी जाई. तोवर तिचा पतीही कामावरून आलेला असे. मग जेवण झाल्यावर ही पतिपत्नी त्यांच्या बिल्डिंगच्या इतर ब्लॉकमधल्या तरुण मंडळींना एकत्र करीत आणि पवित्रशास्त्राभ्यास व प्रार्थनासभा घेत. **अशीच गोष्ट संपूर्ण कॉम्युनिस्ट जगतात घडत आहे.** " बाह्यात्कारी अविश्वासी " असे हजारो लोक कॉम्युनिस्ट देशांत आहेत. देखाव्यासाठीच असलेल्या उपासना-मंदिरात हे लोक जात नाहीत, कारण तेथे कोणीतरी त्यांच्यावर लक्ष ठेवून असणार व तेथल्या सुवार्तेतही भेसळ असणार. त्याऐवजी अधिकाराच्या जागांवर राहावयाचे, जबाबदारी सांभाळायची आणि तेथूनच शांतपणे ख्रिस्ताची परिणामकारक साक्ष द्यावयाची असे हे करतात.

या भूमिगत विश्वासू मंडळीमध्ये अशा प्रकारचे हजारो सभासद आहेत. तळघरे, पोटमाळा, घरे, ब्लॉक इत्यादी ठिकाणी ह्यांच्या सभा असतात.

लहान मुलांचा बाप्तिस्मा, प्रौढांचा बाप्तिस्मा अगर पोपचे म्हणणे वादातीत आहे. अशा गोष्टींविषयी वाद खेळणे रशियातील लोक कधीच विसरून गेले आहेत. ख्रिस्ती लोकांना अगोदर स्वर्गात नेण्यात येईल व मग हजारो वर्षांचे ख्रिस्तराज्य येणार, का अगोदर ख्रिस्तराज्य व मग विश्वासणारे स्वर्गात घेतले जातील अशा स्वरूपाची मते हे उराशी बाळगत नाहीत. भविष्यवादींचा अर्थ लावणे त्यांना जमत नाही व ते त्यांविषयी भांडतदेखील नाहीत. तरीपण नास्तिक लोकांना हे लोक देवाच्या अस्तित्वाचे प्रमाण प्रभावी रीतीने कसे पटवून देतात याचे मला राहून राहून आश्चर्य वाटे.

नास्तिकांना हे अगदी साधी उत्तरे देतात; " समजा, तुम्हाला एका मेजवानीला बोलावले. तेथे नानाप्रकारची पक्वान्ने आहेत. आता ही पक्वान्ने आपोआप तयार झाली, तेथे आचारी वगैरे कोणी नाही, असे म्हटले तर त्यावर तुम्ही विश्वास ठेवाल का ? हा संपूर्ण निसर्ग म्हणजे आपणांसाठी तयार केलेली मेजवानी ! तेथे टोमाटो, पीचफळे, सफरचंद,

दूध, मध, असे पदार्थ आहेत. मानवासाठी हे एवढ कोणी बरे केले असेल? निसर्गाला डोळे नाहीत. आता तुम्ही म्हणता देव नाही; तर मग आपणाला ह्व्यात त्याच गोष्टी आंधळ्या निसर्गाने भरपूर प्रमाणात कशा तयार केल्या याचा खुलासा तुम्हाला करता येईल का ?"

सार्वकालिक जीवन आहे हेही ते सिद्ध करून पटवून देतात. एक ख्रिस्ती व्यक्ती व एक नास्तिक यांच्यामधला संवाद मी ऐकला. "मातेच्या उदरात गर्भावस्थेतल्या जीवाशी बोलता येईल अशी कल्पना करू. मग समजा आपण त्या जीवाला सांगितले की, हे गर्भवासातले जीवन अगदी थोड्या काळचे आहे व यानंतरच खरे, दीर्घ जीवन सुरू होणार ! या प्रश्नाला तो जीव काय उत्तर देईल ? जेव्हा आम्ही तुम्हां नास्तिकांशी स्वर्ग व नरक यांविषयी बोलतो तेव्हा तुम्ही आम्हांला देता तेच उत्तर तो जीव आपणाला देईल. तो म्हणेल, 'हे आईच्या गर्भातले जीवनच खरे सत्य आहे आणि बाकी सर्व धर्मभोळेपणा आहे.' पण या जीवाला विचार करता आला तर तो स्वतःशी म्हणेल, 'आता माझ्या शरीरावर बाहू–हात वाढत आहेत. मला यांची जरूरी नाही, ते पसरता पण येत नाहीत. पण हे का वाढत आहेत ? कदाचित माझ्या जीवनात पुढे केव्हातरी ते उपयोगी पडतील. माझे पायही वाढताहेत, ते मला छातीशी जुळवून ठेवावे लागताहेत. पण ते का वाढताहेत ? कदाचित पुढे मला मोठ्या जगात जायचे असेल आणि तेथे चालावे लागेल. भोवती अंधार आहे. तरी डोळे वाढतच आहेत. मला त्यांचा काय उपयोग ? कदाचित प्रकाश व रंगांनी भरलेल्या जगात मला जायचे असणार.' गर्भावस्थेतील हा जीव स्वतःच्या विकासाविषयी असा विचार करू लागला तर त्याला न पाहताही कळून येईल की, मातेच्या उदराबाहेरही एक जग आहे. हीच गोष्ट आपल्या बाबतीतही खरी आहे. आपण लहान असताना सशक्त असतो पण त्या शक्तीचा योग्य तो उपयोग करण्यासाठी तयार असे मन नसते. पुढे आपण प्रौढ होतो. आपले ज्ञान, शहाणपण वाढते. त्यावेळी आपली स्मशानास जाण्याची वेळ येते. असे असेल तर हे ज्ञान, शहाणपण मिळवायचे तरी कशाला ? स्मशानात मृत्यूनंतर या ज्ञानाचा काय उपयोग ? गर्भावस्थेत त्या जीवाचे हात, पाय, डोळे हे अवयव का

विकसित होतात ? **हे सर्व घडते ते पुढे होणार त्यासाठी.** आपलेही तसेच आहे. येथे ज्ञानात,शहाणपणात,अनुभवात आपली वाढ होते ती पुढे येणाऱ्या गोष्टींसाठी. मृत्यूनंतर ज्या उच्च पातळीवर आपणांला सेवा करावयास जायचे त्याची तयारी म्हणूनच ही वाढ होत असते."

येशूबद्दलचे कॉम्युनिझमचे अधिकृत म्हणणे आहे की, तो कधी नव्हताच. भूमिगत मंडळीचे कार्यकर्ते या आक्षेपाला सहजपणे उत्तर देतात–" तुमच्या हातात कोणते वर्तमानपत्र आहे ? 'प्रवदा'च ना ? कालचा का आजचा ? ठीक–जरा पाहू दे मला–वा ! १४ जानेवारी १९६४. आता हे १९६४ वर्ष केव्हापासून मोजता, सांगा बरे. जो कधी नव्हता, ज्याने काही केले नाही त्याच्यापासूनच ना ? तुम्ही म्हणता तो कधी झाला नाही, नव्हता, पण वर्षे मात्र त्याच्या जन्मापासून मोजता. काळ तर त्याच्याही अगोदर होताच. पण तो आल्यावर अगोदरच्या असणाऱ्या सर्व गोष्टी व्यर्थ व आता सर्व गोष्टींना अर्थ प्राप्त झाला असे सर्व मानवजातीला वाटले; जणू काळ आता नव्याने सुरू झाला. येशू ही काही काल्पनिक कथा नाही हे तुमच्या कॉम्युनिस्ट वर्तमानपत्रावरूनच तुम्हाला समजेल."

पश्चिमेकडील मंडळींच्या पाळकांना वाटते की, त्यांच्या मंडळीतल्या सर्वांना ख्रिस्ती धर्माची तत्त्वे संपूर्ण समजली आहेत, त्यांची खात्री पटली आहे. पण वास्तविक पाहता असे काहीच नसते. आपल्याला विश्वव्यापी खात्री पटवून देणारा संदेश क्वचितच ऐकावयास मिळतो. पोलादी पडद्यामागे काही विशेष शिक्षण न मिळालेले पाळक पालट झालेल्या सर्वांना विश्वासात बळकट करतात.

ख्रिस्ती धर्माचा बालेकिल्ला असणाऱ्या भूमिगत मंडळीचे कार्य कोठे संपते व अधिकृत मंडळीचे कार्य कोठे सुरू होते हे दर्शवणारी एखादी सीमारेषा दाखवणे शक्य नाही. या दोन्हींचे कार्य एकमेकात गुंफलेले आहे. देखाव्यासाठी ठेवलेल्या या मंडळ्यांचे अनेक पाळक अधिकृत कार्य करीत असतानाच कॉम्युनिस्टांनी घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघून आणखी गुप्त सेवाकार्य करीत असतात.

कॉम्युनिस्टांशी सहकार्य करणाऱ्यांची मंडळी "अधिकृत" मंडळी

आहे. हिचा फार मोठा इतिहास आहे.

रशियन समाजवादी क्रांतीनंतर थोड्याच कालाने या मंडळीची सुरुवात झाली. सर्जियस नावाचा एक पाळक तिचा संस्थापक होता; " जिवंत मंडळी " या नावाने ही मंडळी ओळखली जाते.

त्यावेळी या " जिवंत मंडळी " ने मॉस्कोमध्ये जाहीर केले, " मंडळीची पुन्हा वाढ करणे हा आमचा हेतू नाही; आम्ही मंडळीचाच काय पण सर्व धर्माचा नायनाट करण्यासाठी सिद्ध आहो. "

असे सर्जियस प्रत्येक देशात आहेतच. हंगेरीमध्ये कॅथोलिक ख्रिस्ती लोकांमधला फादर बालोध हा असाच होता. त्याने व इतर काही प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांनी साहाय्य केल्यामुळेच तेथें कॉम्युनिस्ट लोक सर्वसत्ताधारी बनले.

रुमानियामध्ये सुद्धा ऑर्थडॉक्स पाळक बुर्डकियाच्या साहाय्यानेच कॉम्युनिस्टानी सत्ता काबीज केली. हा पाळक पूर्वीचा नाझी होता आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून त्याला " लाल " कॉम्युनिस्टापेक्षा "अधिक लाल" बनणे आवश्यक होते. सोव्हिएट राज्यसचिव विशिन्स्की जेव्हा रुमानियामध्ये कॉम्युनिस्ट सरकार स्थापन झाल्याची घोषणा करीत होते त्यावेळी हे पाळक त्यांच्याजवळच उभे राहून संतोषाने हसत होते. " हे सरकार पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करणार आहे; त्यामुळे तुम्हाला आता त्या दुसऱ्या स्वर्गाची जरूर नाही," विशिन्स्की म्हणाले.

रशियाचे आर्चबिशप निकोडिम हे सरकारचे " खबरे " आहेत हे सर्वश्रुतच आहे. रशियन गुप्त पोलिसांमधून पळून आलेले मेजर डेरॅबिन यांनी निकोडिम यांच्या हस्तक आहे अशी साक्ष दिली.

सर्व विविध मंडळ्यांमध्ये याच प्रकारची परिस्थिती आहे. रुमानियामधील बॅप्टिस्ट मंडळीमधील पुढारी तर सक्तीने त्या मंडळीवर लादलेले आहेत. हे पुढारी खऱ्या ख्रिस्ती लोकांचा निषेध करतात. रशियामधील बॅप्टिस्ट मंडळ्या असेच करीत आहेत, रुमानियन ॲडव्हेंटिस्ट मंडळ्यांचे अध्यक्ष ताचिकी हे तर कॉम्युनिस्ट सरकारने सत्ता काबीज केल्या दिवसापासून त्यांचे हस्तक बनले व गुप्त पोलिसांना माहिती देऊ लागले. त्यांनी स्वत:च मला हे सांगितले.

कॉम्युनिस्टांनी हजारो उपासना–मंदिरे बंद केली पण काही "अधिकृत मंदिरे" या नावाखाली त्यांनी राहू दिली. या मंडळ्या म्हणजे ख्रिस्ती लोकांवर नजर ठेवून, त्यांचे नियंत्रण करून अखेर त्यांचा व ख्रिस्ती धर्माचा नाश करण्याची साधने ! ख्रिस्ती लोकांवर नियंत्रण ठेवण्यास योग्य साधन, व परदेशी लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठीं ह्या मंडळ्या राहू देणे त्यांना योग्य वाटले. या मंडळ्यांचा कॉम्युनिझमच्या ध्येयसिद्धीसाठी ते उपयोग करून घेत आहेत. या प्रकारची एक मंडळी मलाही देऊ केली होती. मात्र पाळक या नात्याने मी मंडळीतील प्रत्येक सभासदाची माहिती सरकारला द्यावी अशी अट होती. भूमिगत मंडळी अर्थपूर्ण, परिणामकारक रीतीने प्राणिमात्राला–तरुणांना देखील–सुवार्ताप्रसाराच्या कार्याऐवजी अशा प्रकारच्या प्रतीकात्मक देखाव्यासाठीच असणाऱ्या मंडळ्यांचा स्वीकार करणार नाही.

तरीपण अधिकृत मंडळ्यांतही काही ठिकाणी घातकी पुढाऱ्यांना न जुमानता खरे आत्मिक जीवन वाढताना दिसते. ( पश्चिमेकडच्या काहीं मंडळ्यांतही मला असेच दिसले. सभासद दृढ विश्वासी असतात याचे कारण त्यांचे पुढारी विश्वासी असतात म्हणून नव्हे. )

येथल्या ऑर्थडॉक्स मंडळीतील उपासनापद्धती जुनीच आहे, यात काही बदल झालेला नाही; त्यामुळेच या सभासदांना आत्मिक अन्न मिळते. येथे दिले जाणारे संदेश मात्र कॉम्युनिस्टांना आवडणारे असेच असतात. लूथरन्स, प्रेस्बिटेरिअन व इतर प्रॉटेस्टंट ख्रिस्ती जुनीच भक्तीगीते म्हणतात. आणि संदेश देणारा पोलिसांचा हस्तक असला तरी त्याचाही संदेश पवित्र शास्त्रावर आधारलेला हवाच ! पाळक घातकी आहेत, पोलिसांचे 'खबरे' आहेत, मंडळीत कोणाचा पालट झाला तर हेच पोलिसांना माहिती देतील, हे ठाऊक असून सुद्धा काही लोकांचा पालट होतो. ज्याने आपल्या भेसळीच्या संदेशाने हा विश्वास उत्पन्न केला त्या पाळकापासून त्यांना आपला विश्वास लपवून ठेवावा लागतो. हा देवाचा फार मोठा चमत्कार आहे. याविषयी लेवीय ११ व्या अध्यायात ३७ व्या वचनात सांकेतिक भाषेत लिहिलेले आहे. "त्यांच्या शवांचा काही भाग पेरण्याच्या बियाण्यावर पडला तरी ते बियाणे शुद्ध समजावे."

पक्षपात न करता बोलायचे तर या मंडळयांमधील सर्वच अधिकृत पाळक अगर सर्वच मोठे उच्च अधिकारी कॉम्युनिस्टांचे हस्तक नाहीत.

भूमिगत मंडळयांचे सभासद या अधिकृत मंडळयांमध्ये प्रामुख्याने कार्य करीत असतात. मात्र यातील काहींना लपून छपून राहावे लागते, हेच सभासद ख्रिस्ती धर्म हा आक्रमक व जिवंत राहावा, केवळ देखाव्याचा, शोभेचा होऊ नये, म्हणून प्रयत्नशील असतात. रुमानियामधील ब्लॅडि-मिरेश्टी येथील व रशियामधील काही मठ बंद करण्यासाठी तेथे गुप्त पोलिस गेले तेव्हा त्यांना चांगलाच सामना द्यावा लागला. धर्माला प्रतिबंध करणाऱ्या काही कॉम्युनिस्टांना गुन्हा केल्यामुळे आपल्या प्राणास मुकावे लागले आहे.

हळुहळू या अधिकृत मंडळयांची संख्या कमी कमी होऊ लागली आहे. संपूर्ण सोव्हिएट रशियामध्ये आज पाच-सहा हजार तरी उपासना-मंदिरे असतील की नाही हे सांगणे अवघड आहे. ( अमेरिकेतील एवढयाच लोकसंख्येसाठी तीन लाख मंदिरे आहेत. ) आणि ही मंदिरे म्हणजे आपल्या कल्पनेनुसार नाहीत तर लहान लहान खोल्या आहेत. मॉस्को-मधले प्रॉटेस्टंट उपासनामंदिर परदेशी प्रवासी पाहतात, तेथली गर्दी पाहतात आणि म्हणतात, " वा ! किती धार्मिक स्वातंत्र्य आहे इथे ! " " प्रार्थनामंदिरात देखील ही गर्दी ! " असे आनंदाचे उद्‌गार ते काढतात. पण सत्तर लाख लोकांच्या आत्मिक उन्नतीसाठी फक्त एकच प्रॉटेस्टंट चर्च आहे, ही किती खेदाची गोष्ट आहे हे त्यांना समजत नाही. आणि ही जी एका खोलीची उपासनामंदिरे आहेत तीसुद्धा इतकी दूर आहेत की, एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोक तेथे प्रवास करून जाऊच शकत नाहीत. या इतक्या मोठ्या जनसमुदायासाठी फक्त दोनच गोष्टी करणे शक्य आहेत : त्यांना संपूर्णपणे विसरून जाणे अगर भूमिगत मार्गांनी गुप्तपणे त्यांच्यामध्ये सुवार्ताप्रसार करणे. याहून तिसरी गोष्ट करताच येणार नाही.

एखाद्या देशात कॉम्युनिझमचा प्रसार जितका जास्त तितकी मंडळी जास्त जास्त भूमिगत होते. जी अधिकृत प्रार्थनामंदिरे बंद केलेली आहेत तेथे धर्मविरोधी संघटनांचे कार्य चालू असते.

## भूमिगत मंडळी नास्तिकवादी वाङ्मयाचा कसा फायदा घेते

या नास्तिकवादाचाही कसा उपयोग करून घ्यावा हे भूमिगत मंडळीला चांगलेच माहीत आहे.एलीयाला कावळ्यांनी खाऊ घातले तसेच ही मंडळीही प्रथम नास्तिक वाङ्मयावर पोसली जाते. पवित्रशास्त्रातील वचनांची थट्टा करण्यासाठी व त्यावर टीका करण्यामध्ये या नास्तिक लोकांनी बरेच कौशल्य खर्च केले आहे.

नास्तिकवादाच्या कॉम्युनिस्ट पुरस्कर्त्यांनी दोन पुस्तके छापून प्रकाशीत केली–एक " विनोदी पवित्रशास्त्र " व दुसरे " विश्वासी व अविश्वासी लोकांसाठी पवित्रशास्त्र." या दोन्ही पुस्तकांत पवित्रशास्त्रातील वचने कशी मूर्खपणाने भरलेली आहेत हे दाखविले आहे. आणि हे दाखविताना पवित्रशास्त्रातील अनेक वचने उद्धृत केली आहेत. यामुळे आम्हांला फार आनंद झाला. वचनांवरील टीका इतक्या मूर्खपणाने भरलेली होती की त्याकडे कोणीच लक्ष दिले नाही. या पुस्तकांच्या लक्षावधी प्रती छापल्या होत्या व त्यांमध्ये पवित्रशास्त्रातील सुन्दर सुन्दर वचने होती. कॉम्युनिस्टांच्या निंदेमुळे त्या वचनांचे सौन्दर्य मुळीच कमी झाले नव्हते. पूर्वी इन्क्विझिशन (धर्मन्यायालय) "पाखंड्यांना " जाळून मारण्याची शिक्षा देई. त्यावेळी त्यांना मिरवणुकीने अंगावर विचित्र, भूतप्रेतांची व नरक–अग्नीची चित्रे असलेले कपडे घालून वधस्थानी नेण्यात येई. पण त्यामुळे या तथाकथित " पाखंड्यांच्या " खऱ्या संतपणाला काहीच बाध आला नाही. तसेच सैतानाच्या मुखातून जरी पवित्रशास्त्रातील वचने आली तरी त्यांमधील सत्य अबाधितच राहते.

ही पुस्तके छापणाऱ्या कॉम्युनिस्ट प्रकाशन संस्थेकडे अक्षरश: हजारो पत्रे आली. या सर्व पत्रांत एकच मागणी होती–पवित्रशास्त्राचा उपहास करणारी व त्यातील वचने असणारी अशी नास्तिकवादाची पुस्तके पुन्हा प्रसिद्ध करावी. आता पवित्रशास्त्र अगर त्याचे भाग न मिळू शकणाऱ्या भूमिगत मंडळीकडूनच ही पत्रे आली होती, हे त्यांना माहीत नव्हते. त्यांना ही पत्रे पाहून अत्यानंदच झाला !

नास्तिकवादाच्या सभांचा उपयोग आमच्या कार्यासाठी कसा

करून घ्यावा हेही आम्हांला चांगलेच ठाऊक होते.

कॉम्युनिझम शिकवणाऱ्या एका प्राध्यापकांनी एका सभेत सांगितले की येशू केवळ एक जादूगार होता. या प्राध्यापकासमोर पाण्याने भरलेले एक भांडे होते. त्या पाण्यात त्याने कसलीतरी पूड टाकली, लगेच तें पाणी लाल रंगाचे झाले. "पहा हाच तो चमत्कार," ते सांगू लागले. "येशूने आपल्या अस्तनीत अशीच एक पूड लपवून ठेवली होती. ह्या पुडीच्या साहाय्यानेच आपण मोठा चमत्कार करून पाण्याचा द्राक्षारस बनवला असा त्याने बहाणा केला. पण येशूपेक्षा मी मोठा चमत्कार करून दाखवतो; आता ह्या द्राक्षरसाचे मी पुन्हा पाणी करतो." त्याने दुसरी एक पूड त्या रसात टाकली व त्या रसाचा रंग पाण्यासारखा झाला. पुन्हा दुसरी पावडर टाकल्यावर पुन्हा ते लाल झाले.

यावेळी एक ख्रिस्ती माणूस उभा राहून म्हणाला, "प्राध्यापक बंधू, तुम्ही ही गोष्ट करून आम्हांला अगदी चकित करून टाकले आहे. आता आपण आणखी एकच गोष्ट करावी अशी आमची इच्छा आहे. तुम्ही जो द्राक्षरस केला आहे त्यातला थोडासा पिऊन दाखवा !"

प्राध्यापक म्हणाले, "छे! छे! भलतेच काय! ही मी यात टाकली ती पूड विषाची आहे." "मग तुम्ही व येशू ख्रिस्त यांच्यात हाच फरक आहे. त्याने आपल्या द्राक्षरसाने आम्हांला गेली २००० वर्षे आनंद दिला आहे, आणि तुम्ही या तुमच्या रसाने आमच्यावर विषप्रयोग करीत आहा." या ख्रिस्ती माणसाला तुरुंगात जावे लागले पण या घटनेची वार्ता सर्वत्र पसरली आणि त्यामुळे इतरांचा विश्वास दृढ बनला.

दाविदाप्रमाणे आम्ही लहान, अशक्त असे आहोत तरीही नास्तिकवादाच्या गल्याथापेक्षा आम्ही समर्थ आहोत; कारण देव आमच्या पक्षाचा आहे. आमचा पक्ष सत्याचा पक्ष आहे.

एका प्रसंगी एक कॉम्युनिस्ट व्याख्याता नास्तिकवादावर व्याख्यान देत होता. कारखान्यातील सर्व कामगारांनी ह्या व्याख्यानाला हजर राहण्याची सक्ती होती. यांमध्ये बरेचसे ख्रिस्ती होते. देवविरोधी मते व ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांचा मूर्खपणा आहे, यांविषयी ते शांतपणे ऐकत होते. मग तो व्याख्याता सिद्ध करून देऊ लागला की

आध्यात्मिक जग नाही, देव नाही, ख्रिस्त नाही, मृत्यूनंतर काही नाही, मानवाला आत्मा नाही –तो एक वस्तू आहे. पुन्हा पुन्हा फक्त वस्तूच आहेत, पदार्थ आहेत, दुसरे काहीच नाही, हे तो सांगत होता.

एक ख्रिस्ती माणूस उठून उभा राहिला व त्याने बोलण्याची परवानगी मागितली. त्याला परवानगी दिली. त्याने आपली घडीची खुर्ची उचलली व जोराने जमिनीवर आदळली. थोडा वेळ त्याने खुर्चीकडे पाहिले. नंतर तो व्यासपीठाकडे गेला व त्याने त्या कॉम्युनिस्ट वक्त्याचे थोबाडीत मारली. वक्ता रागाने लाल झाला. शिव्यांची लाखोली वाहत त्याने आपल्या सोबत्यांना बोलावून या ख्रिस्ती माणसाला पकडण्यास सांगितले. " माझ्या थोबाडीत मारण्यास तू कसा धजलास? का मारलेस?" तो विचारू लागला.

तो ख्रिस्ती माणूस म्हणाला, " तुम्ही स्वतःला आताच खोटे ठरवले आहे. आताच तुम्ही सांगितले की सर्व काही वस्तूच–पदार्थच– आहेत, इतर काही नाही. मी खुर्ची उचलली व फेकली. ती खरेच वस्तू आहे, त्या खुर्चीला काही राग आला नाही. मग मी तुमच्या थोबाडीत मारली पण तुम्ही काही या खुर्चीसारखे वागला नाही. तुमचे वर्तन अगदी वेगळेच होते वस्तू, पदार्थ काही कोणावर रागावत नाहीत, पण तुम्ही रागावला. म्हणून बंधो, तुमचे चुकते आहे. माणूस पदार्थांहून वेगळा आहे. आपणांला आत्मा आहे! "

भूमिगत मंडळीतील सामान्य ख्रिस्ती अशाच इतर अनेक मार्गांनी नास्तिकवादाची गुंतागुंतीची विधाने खोडून काढतात.

तुरुंगामध्ये मला तेथल्या राजकीय अधिकाऱ्याने करडेपणाने विचारले, " हा मूर्खपणाचा धर्म तुम्ही आणखी किती दिवस पाळणार?" मी शांतपणे उत्तर दिले, " मी अनेक नास्तिक पाहिले आहेत. शेवटी मृत्युशय्येवर त्यांना आपण देवविरहित आहो याचा पश्चात्ताप झाला व व ते ख्रिस्ताला शरण गेले. याउलट एखादा ख्रिस्ती माणूस मृत्युशय्येवर असताना त्याला आपल्या ख्रिस्तीपणाचा पश्चात्ताप होऊन आपले तारण करण्यासाठी मार्क्स अगर लेनिनला शरण गेल्याचे कधी तुम्ही ऐकले आहे का?" " वा ! छान उत्तर आहे !" तो हसू लागला. मी पुढे बोलू

लागलो, " इंजिनिअर एखादा पूल बांधतो. त्यावरून एखादे मांजर पलीकडे जाते. पण मांजर पलीकडे गेले याचा अर्थ तो पूल मजबूत आहे असा होत नाही. त्यावरून एखादे मोठे अवजड वाहन गेले पाहिजे, मगच त्या पुलाची कार्यक्षमता सिद्ध होते. सर्व काही सुरळीत चालले असताना तुम्ही नास्तिक असला तर त्यामुळे नास्तिकवाद खरा म्हणता येणार नाही. आणीबाणीच्या, संकटाच्या प्रसंगी नास्तिकवादाची किंमत शून्यच आहे." सोव्हिएट संघाचा पंतप्रधान बनल्यावरदेखील काहीतरी चुकले तर स्वत: लेनिन प्रार्थना करीत असे, हेही मी लेनिनच्या पुस्तकांचा उल्लेख करून समजावून सांगितले.

आम्ही स्वस्थ आहोत आणि घडणाऱ्या घटनांची शांतपणे वाट पाहात आहोत. याउलट कॉम्युनिस्ट अस्वस्थ आहेत म्हणून ते रोज रोज धर्मविरोधी नव्या योजना अमलात आणतात. असे करून ते संत ऑग-स्टिनच्या " तुझ्यामध्ये विश्रांती मिळेपर्यंत प्रत्येक हृदय अस्वस्थ असते, " या विधानाची सत्यताच पटवतात.

## कॉम्युनिस्टांनाही जिंकता येईल – का व कसे ?

तुम्ही स्वतंत्र ख्रिस्ती लोकांनी या भूमिगत मंडळीला साहाय्य केले तर ही मंडळी कॉम्युनिस्टांची अंत:करणे जिंकील व जगाचा चेहरा बदलून जाईल. त्यांना जिंकणे शक्य आहे, कारण स्वभावत: कोणीच कॉम्युनिस्ट नसतो. एखाद्या कुत्र्यालादेखील आपले स्वत:चे असे एखादे हाडूक हवे असते. कॉम्युनिस्टांना जी कामे करावी लागतात व ज्या गोष्टींवर विश्वास ठेवावा लागतो त्या सर्व गोष्टी ते नाइलाजाने करतात. आतून त्यांची अंत:करणे सदैव विरोध करीत असतात.

वादविवाद करताना कॉम्युनिस्ट म्हणतात की, भौतिकवादच काय तो खरा आहे. पदार्थ—वस्तू— हेच खरे सत्य. मनुष्य म्हणजे काही रसायने व खनिजपदार्थ एका विशिष्ट पद्धतीने एकत्र करून बनलेली वस्तू आहे. मृत्यूनंतर पुन्हा आपले रूपांतर क्षार, खनिजपदार्थ, रसायन यामध्येच होते. या म्हणण्याला समर्पक असा एक प्रश्न त्यांना विचारला— " तुम्ही म्हणता ते खरे आहे तर बऱ्याच देशांमधील कॉम्युनिस्टांनी आपल्या तत्त्वांसाठी मरण पत्करले याचा अर्थ कसा लावायचा ? मूठभर

रसायने व खनिजपदार्थ यांना कोठे तत्त्वे असतात का ? खनिजपदार्थ दुसऱ्यांसाठी त्याग करतात का ? हे शक्य आहे का ? " या प्रश्नाला त्यांना काहीच उत्तर देता येत नाही.

आणि त्यांचा तो अत्याचारी रानटीपणा ! मानवाची उत्पत्ती काही अत्याचारी, रानटी अशी झाली नाही, आणि कोणताही मानव फार काळ रानटी राहणार नाही. याची सत्यता आपण नाझी सत्तेच्या शेवटामध्ये पाहिलीच आहे. त्यांपैकी काहींनी आत्महत्या केली तर इतरांनी पश्चात्ताप करून आपले गुन्हे कबूल केले.

कॉम्युनिस्ट देशांमध्ये मद्यपानाची प्रवृत्ती अत्यंत वाढत्या प्रमाणावर आहे. तेथल्या जीवनाशी या प्रवृत्तीचा काहीतरी संबंध आहे.अधिक सखोल, अर्थपूर्ण जीवन जगता येत नाही म्हणूनच ही प्रवृत्ती वाढीस लागली आहे. साधारणपणे प्रत्येक रशियन माणूस खोल विचारांचा, उदारहृदयी, मोकळ्या मनाचा असा आहे. कॉम्युनिझम खोल जीवनाला स्पर्श करूच शकत नाही. हा माणूस अर्थपूर्ण, खोल जीवन धुंडीत असतो आणि ते कोठे मिळत नाही म्हणून तो निराश होतो; मग ही निराशा मद्याच्या पेल्यात बुडवून टाकण्याचा तो प्रयत्न करतो. जे फसवे, अत्याचारी जीवन त्याला जगावे लागते त्याबद्दलची घृणा तो दारूच्या एकाच प्याल्यात बुडवण्याचा प्रयत्न करतो. क्षणभर दारू त्याला स्वतंत्र करते–पण क्षणभरच–खरे तर ' सत्य'च त्याला कायमचे स्वतंत्र करील. मात्र ते त्याला समजलें पाहिजे.

रशियन लोकांनी बुखारेस्ट व्यापले होते तेव्हा एकदा दारूच्या गुत्त्यामध्ये जावे अशी मला तीव्र इच्छा झाली. माझ्याबरोबर येण्यासाठी मी माझ्या पत्नीला बोलावले व आम्ही दोघे तेथे गेलो. तेथे एक रशियन कॅप्टन हातात पिस्तुल घेऊन उभा होता. तो सगळ्यांना धमकावत होता व सारखा दारू प्यावयास मागत होता. तो फार झिंगला होता त्यामुळे त्याला दारू देत नव्हते. सगळे लोक घाबरले होते. गुत्त्याचा मालक मला ओळखत होता. मी त्याच्याकडे गेलो आणि त्या कॅप्टनला दारू देण्यास सांगितले. मी त्याच्याबरोबर बसेन व त्याला शांत ठेवीन असेही मी सांगितले. एकामागून एक दारूच्या बॉटल्या आमच्या टेबलावर येऊ

लागल्या. तेथे तीन पेले होते. तो कॅप्टन प्रत्यक वेळी सभ्यपणाचे निदर्शक म्हणून तीनही पेले भरी... आणि तीनही पेले स्वतःच रिते करी. आम्हां दोघांपैकी कोणीही एका थेंबालाही स्पर्श केला नाही. तो कॅप्टन झिंगला होता पण त्याचे मन शुद्धीवर होते. दारूची त्याला सवय होती. मी त्याच्याशी ख्रिस्ताविषयी बोलू लागलो आणि आमची आशा नसतानादेखील तो अगदी शांतपणे माझे बोलणे ऐकत होता.

अखेरीस तो म्हणाला, " तुम्ही कोण आहा ते मला तुम्ही सांगितले, आता मी कोण आहे ते एका. मी एक ऑर्थडॉक्स धर्मोपदेशक आहे. आपला विश्वास ज्यांनी प्रथम नाकारला त्यांच्यापैकी मी एक आहे. ही गोष्ट स्टॅलिनच्या काळी प्रथम छळ सुरू झाला तेव्हाची आहे. खेड्याखेड्यातून मी व्याख्याने देत फिरलो. व्याख्यानात मी सांगे, ' देव मुळीच नाही आणि धर्मोपदेशक या नात्याने मी तुम्हां सर्वांना फसवत होतो. मी तर फसवणारा आहेच पण इतर सर्वच धर्मोपदेशक, पाळक फसवे आहेत. ' माझा हा उत्साह पाहून माझी फार स्तुती होई, म्हणून त्यांनी मला गुप्त पोलिसांमध्ये अधिकारी नेमले. या माझ्या हाताने ख्रिस्ती लोकांचा छळ करायचा, आणि त्यांना ठार मारायचे ही देवाने मला शिक्षाच दिली. आणि मी केलेली ती अनन्वित कृत्ये विसरण्यासाठी मी दारू पितो. पण काय उपयोग ? त्या गोष्टींचा विसर पडत नाही. "

बरेच कॉम्युनिस्ट आत्महत्या करतात. एसेनिन व मायकोवस्की या तेथल्या महाकवींनीही आत्महत्या केली. तेथला थोर लेखक फाडीव हा त्याच मार्गाने गेला. " सौख्य " या नावाची कादंबरी त्याने पूर्ण केली. कॉम्युनिझमच्या उत्कर्षासाठी एकसारखे कार्य केले तरच खरे सौख्य मिळते असे त्याने या कादंबरीत सांगितले आहे. ही कादंबरी पूर्ण केल्यावर तो एवढा सुखी झाला की लगेच त्याने स्वतःवर गोळी झाडून त्या सुखाचा कळस गाठला. खरे तर, एवढ्या असत्याचे प्रकटीकरण त्याच्या आत्म्याला सहन झाले नाही. झारच्या काळामधले जॉफे, टॉमकिन यांसारख्या मोठ्या कॉम्युनिस्ट पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना कॉम्युनिझमचे खरे उग्र स्वरूप सहन झाले नाही, त्यांचाही शेवट आत्महत्येमध्येच झाला.

कॉम्युनिस्ट सुखी नाहीत. त्यांचे मोठेमोठे हुकुमशाहादेखील

तसेच आहेत. स्टॅलिनचेच उदाहरण घ्या. आपले सर्व जुने सहकारी मारल्यावर तो फार घाबरून गेला होता. कोणी विषप्रयोग करील की गोळी घालून जीव घेईल अशी त्याला सतत भीती वाटे. बँकेतल्या मोठ्या तिजोरीप्रमाणे मजबूत कुलुपबंद अशी त्याची आठ शयनगृहे होती. आणि कोणत्या रात्री तो कोणत्या शयनगृहात झोपणार आहे हे कोणालाही माहीत नसे. तो जेवी तेव्हा प्रथम त्याच्या स्वैपाक्याला त्याच्यासमोर सर्व पदार्थ प्रथम खावे लागत व मगच तो स्वतः जेवी. कॉम्युनिझम कोणालाच, तेथल्या हुकुमशाहांनादेखील सुखी करीत नाही. त्यासाठी त्यांना ख्रिस्तच हवा.

कॉम्युनिझमचा पाडाव केला तर आपण केवळ कॉम्युनिझमला बळी पडलेल्यांना वाचवू एवढच नाही तर कॉम्युनिस्टांनाही वाचवू.

दास्यात खितपत पडलेल्या आमच्या बांधवांच्या गरजा भूमिगत मंडळी व्यक्त करते. तिला साहाय्य करा !

* * *

भूमिगत मंडळीचे वैशिष्टय म्हणजे ती विश्वासाविषयी आवेशी आहे.

"जॉर्ज" या नावाने स्वतःची ओळख देणाऱ्या एका उपदेशकाने देवाच्या भूमिगत मंडळीविषयी लिहिलेल्या पुस्तकात पुढील गोष्ट लिहिली आहे.

हंगेरीमधील एका पाळकाकडे रशियन सैन्यातील एक कॅप्टन आला व आपणाला एकांतात भेटावयाचे आहे असे म्हणाला. हा कॅप्टन अगदी तरुण व उद्धट होता व आपण जेते आहोत ही भावना त्याच्या प्रत्येक हालचालीतून व्यक्त होत होती. त्याला एका छोटचा खोलीत नेण्यात आले. दार बंद केल्यावर त्याने भिंतीवर टांगलेल्या क्रूसाकडे मान वळवली. "हे पहा, ती गोष्ट खोटी आहे," तो पाळकाला म्हणाला. "तुम्ही सर्व उपदेशक व पाळक लोक लोकांची फसवणूक करता; लोकांचे अज्ञान तसेच रहावे, आणि त्यामुळे श्रीमंतांचा फायदा व्हावा यासाठी एक साधन म्हणून तुम्ही ही वस्तू वापरता. आता मला खरे सांगा, इथे आपण दोघेच आहोत. येशू ख्रिस्त खरेतर देवाचा मुलगा आहे असा तुमचा पण विश्वास नाही. होय ना? कबूल करा! होय म्हणा !" पाळक हसले, "हे पहा,

तरुण मित्रा, तो खरेच देवाचा पुत्र आहे. माझा विश्वास तसाच आहे." "मला फसवू नका. उगीच थाप मारू नका," तो कॅप्टन ओरडला. "मी अगदी गंभीरपणे विचारतोय, माझी चेष्टा करू नका." त्याने आपले पिस्तूल बाहेर काढले आणि पाळकाच्या अंगावर टेकले. "ताबडतोब कबूल करा. म्हणा, सर्व खोटे आहे. नाहीतर गोळी उडालीच म्हणून समजा." "नाही, शक्य नाही, कारण ते खरे नाही. आमचा प्रभू खरोखरच देवाचा पुत्र आहे," पाळक म्हणाले. त्या कॅप्टनने पिस्तुल जमिनीवर भिरकावून दिले आणि या देवाच्या माणसाला मिठी मारली. त्याच्या नेत्रांत अश्रू आले.

"खरे आहे ! ते खरे आहे," तो ओरडला. "सत्य आहे ! माझा-सुद्धा तसाच विश्वास आहे. पण या विश्वासासाठी माणसे पंचप्राणाची आहुती द्यायला तयार होतील की नाही हे मला स्वतःला प्रत्यक्ष पाहायचे होते. मी तुमचा अत्यंत आभारी आहे. तुम्ही माझा विश्वास दृढ केलात. आता मीपण ख्रिस्तासाठी मरेन. कसे ते तुम्हीच मला दाखवलेत."

अशीच इतर अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. रशियनांनी रुमानिया पादाक्रांत केला त्यावेळी दोन रशियन सैनिक हातात बंदुका घेऊन एका उपासना मंदिरात गेले. ते म्हणाले, "आमचा तुमच्या या विश्वासावर मुळीच भरंवसा नाही. जे हा विश्वास आताच सोडणार नाहीत त्यांना लगेच गोळ्या घालण्यात येतील. विश्वास सोडून देणाऱ्यांनी उजवे बाजूला यावे !" काही लोक उजव्या बाजूला गेले. मंदिरातून बाहेर पडून लगेच घरी जा, असे त्यांना सांगण्यात आले. जीवाच्या आशेने ते पळून गेले. मग हे रशियन बाकी ख्रिस्ती लोकांसह एकटेच राहिल्यावर त्यांनी सर्वांना मिठ्या मारल्या आणि म्हणाले, "आम्हीपण ख्रिस्तीच आहोत, पण विश्वासासाठी मरण्याची ज्यांची तयारी आहे अशांबरोबरच आम्हांला सहभागिता हवी, त्यांच्याबरोबरच आम्ही एकत्र उपासना करू."

आमच्या देशात अशा प्रकारची माणसे सुवार्तेसाठी लढा देतात, आणि केवळ सुवार्तेसाठीच नव्हे तर स्वातंत्र्यासाठीसुद्धा हा लढा चालू आहे.

काही पाश्चिमात्य ख्रिस्ती लोकांच्या घरामध्ये तासन् तास संगीत

चालू असते. हे संगीत सामान्य प्रकारचे हलके-फुलके असते. आमच्या घरामध्ये केव्हा केव्हा मोठ्या आवाजात संगीत ऐकू येते. पण मात्र आमचे शुभवर्तमानाविषयीचे अगर भूमिगत मंडळीच्या कार्याबद्दलचे बोलणे शेजाऱ्यांनी ऐकू नये व पोलिसांना खबर देऊ नये म्हणून हे मोठ्या आवाजातील संगीत चालू असते.

पश्चिमेकडचा एखादा आस्थेवाईक ख्रिस्ती भेटला म्हणजे त्यांना फार आनंद होतो ! हे शब्द लिहिणारी व्यक्ती अगदी सामान्य, यःकश्चित आहे. पण ज्यांना वाणी नाही अशांची मी वाणी आहे; ज्यांची मुस्कटदाबी झाली आहे व पश्चिमेकडे ज्यांना कोणीही प्रतिनिधी नाही अशांचा आवाज मी आहे. त्यांच्या नावाने मी तुम्हांला विनवीत आहे की, आपला विश्वास व ख्रिस्ती लोकांचे प्रश्न सोडविणे या दोन्ही गोष्टींकडे गांभीर्याने पाहा; त्यांच्या नावाने मी विश्वास, हालअपेष्टा सोसणाऱ्या कॉम्युनिस्ट प्रदेशातील भूमिगत मंडळीसाठी प्रार्थना व साहाय्य मागत आहे.

* * *

आम्ही कॉम्युनिस्टांवर विजय मिळवू, कारण देव आमच्या बाजूचा आहे. त्यावर आमचा संदेश अंतःकरणाची मोठी गरज भागवतो, तेथील पोकळी भरून काढतो.

नाझींच्या तुरुंगात कैद भोगणाऱ्या कॉम्युनिस्टांनी आपण कठीण प्रसंगी प्रार्थना करीत असू असे मला सांगितले. " येशू, येशू, " असा जप करीत मरणारे कॉम्युनिस्ट अधिकारी मी स्वतः पाहिले आहेत.

आमचा विजय होणारच ! कारण आमच्या लोकांचा सांस्कृतिक वारसा आमच्या बाजूचा आहे. आधुनिक ख्रिस्ती वाङ्मयावर कॉम्युनिस्ट लोकांना पूर्ण बंदी घालता येईल. पण टॉलस्टॉय, डोस्टोएव्हस्की यांची पुस्तके आहेतच आणि या पुस्तकांतूनही ख्रिस्तप्रकाशाची प्रभा चहूकडे फाकत आहे. पूर्व जर्मनीमध्ये गथे, पोलंडमध्ये झिकेविझ यांची व इतरांची पुस्तके ख्रिस्तसंदेश देतच आहेत. सॅडोविन्यू हा रुमानियामधला थोर लेखक आहे. " संतचरित्रे " हे त्याचे पुस्तक कॉम्युनिस्टांनी " संतांच्या दंतकथा " या नावाने प्रकाशित केले आहे. नाव बदलले तरी पुस्तकातील मजकूर अजूनही स्फूर्ती देतच आहे.

चित्रकलेच्या इतिहासाच्या पुस्तकांत असणाऱ्या राफेल, मायकेल अँजेलो, लिओनार्दो द व्हिंची यांच्या चित्रांच्या प्रतिकृती काढून टाकता येत नाहीत. ही चित्रेही सुवार्ताप्रसार करीतच असतात.

एखाद्या कॉम्युनिस्टाशी मी ख्रिस्ताविषयी बोलू लागलो की त्याच्या आत्म्याची तळमळ माझ्या मदतीला येते. माझ्या विधानांना समर्पक उत्तर देता येत नाही अशी त्याला खरी अडचण नसतेच; त्याची खरी अडचण म्हणजे माझ्या बाजूला असलेल्या त्याच्या विवेकबुद्धीचा आवाज कसा बंद करावा हीच !

मार्क्सवादावर व्याख्यान देणारे काही प्राध्यापक माझ्या ओळखीचे आहेत. नास्तिकवादावरील व्याख्यानाला सुरुवात करताना यश मिळावे म्हणून ते प्रार्थना करतात ! दूरवरच्या गुप्त सभेला जाणारे कॉम्युनिस्टही मला माहीत आहेत. ही गोष्ट उघडकीस आल्यावर आपण भूमिगत मंडळीच्या सभेला गेलो हे त्यांनी नाकबूल केले. मग त्यांना रडू कोसळले; कारण ज्या विश्वासाने त्यांना उपासनेला जाण्यास प्रवृत्त केले त्या विश्वासासाठी धैर्याने खरे बोलणे त्यांना शक्य झाले नाही. पण तेही मानवच आहेत. एकदा व्यक्तीमध्ये विश्वास उत्पन्न झाला–मग तो विश्वास अगदी सामान्य का असेना–तो वाढतो, विकसतो. हा विश्वास विजयी होईल अशी आमची खात्री आहे कारण आम्ही भूमिगत मंडळीच्या कार्यकर्त्यांनी हा विजय वारंवार पाहिला आहे.

कॉम्युनिस्ट लोकांवर ख्रिस्त प्रीती करतो. त्यांना ख्रिस्ताकडे आणले पाहिजे, त्यांना आणता येईल. आणि पोलादी पडद्यामागील भूमिगत मंडळीच त्यांना जिंकू शकेल. सर्व मानवांच्या आत्म्यांचे तारण व्हावे अशी कळकळ येशूला आहे. त्याच्या हृदयाची इच्छा पूर्ण करण्याची ज्याची मनीषा असेल त्या प्रत्येकाने भूमिगत मंडळीला साहाय्य करून तिला कार्यप्रवण ठेवणे जरूर आहे. "सर्व राष्ट्रांस शिक्षण द्या," असे येशूने म्हटले. पोलादी पडद्याजवळ थांबा, पुढे जाऊ नका असे तो म्हणाला नाही. देवाशी निष्ठा व त्याची महान आज्ञा यामुळे पोलादी पडद्यापलीकडेही कॉम्युनिझमचे गुलामगिरीत खितपत पडलेल्या एकूण जगातील लोकसंख्येच्या एकतृतीयांशांना शुभवर्तमान सांगणे ही आमची जबाबदारी

आहे. आणि यांच्यापर्यंत कसे पोचायचे ? तेथे पूर्वीच कार्य करीत असलेल्या भूमिगत मंडळीला साहाय्य करून !

## भूमिगत मंडळीत कोण कोण आहेत ?

### १ ) कॉम्युनिस्टांनी काढून टाकलेले पाळक व उपदेशक

कॉम्युनिस्ट देशांमधील भूमिगत मंडळीत तीन वेगवेगळे समूह आहेत. पहिला समूह आहे पाळकांचा आणि उपदेशकांचा. यांची संख्या हजारात मोजता येईल. शुभवर्तमानात भेसळ करण्याचे नाकारल्यामुळे या सर्वांना त्यांच्या उपासनामंदिरातून व मंडळ्यातून हाकून दिले आहे.असे पूर्वी पाळक, उपदेशक असलेले अनेक लोकांना वर्षानुवर्षे तुरुंगात डांबून ठवले होते व त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. सुटका झाल्याबरोबर लगेच त्यांनी सेवाकार्य सुरू केले–गुप्तपणे, परिणापकारक रीतीने ते भूमिगत मंडळीमध्ये वचनाची सेवा करीत आहेत. कॉम्युनिस्टांनी यांची पूर्वीची उपासनामंदिरे बंद केली आहेत अगर तेथे अधिक " जबाबदार " पाळकांची नेमणूक केली आहे तरीही त्यांच्या सेवाकार्यात खंड पडला नाही; उलट ते अधिक आवेशाने भूमिगत मंडळीच्या गुप्त सभांमधुन सेवा करीत आहेत. या गुप्त सभा कोठारात, माळ्यावर, तळघरात, रात्रीच्या वेळी शेतात–अगर जेथे विश्वासी लोक जमतील तेथे भरतात. हे सर्व लोक " जिवंत हुतात्मे " आहेत. पुन्हा कैद, यातना, छळ होण्याची भीती असूनदेखील हे सतत सुवार्ताप्रसार करीत आहेत.

### २ ) मंडळीचे सभासद

भूमिगत मंडळीचा दुसरा भाग म्हणजे तिचे असंख्य सभासद. या सभासदांमधील सर्वच स्त्री-पुरुषांनी आपले जीवन ख्रिस्ताला समर्पित केले आहे. रशियामध्ये अगर चीनमध्ये नामधारी, अर्धवट, " कोमट " असे ख्रिस्ती लोक मुळीच नाहीत हे नीट लक्षात ठेवले पाहिजे. तेथल्या ख्रिस्ती लोकांना आपल्या विश्वासाची अत्यंत जबर अशी किंमत द्यावी लागते. याबरोबरच छळ व यातना भोगाव्या लागल्या म्हणजेच चांगले साक्ष देणारे–आत्मे जिंकणारे–असे ख्रिस्ती तयार होतात हा मुद्दाही ध्यानात घतला पाहिजे. कॉम्युनिस्टांचा अत्याचार करण्याचा हेतू मुळीच सिद्ध झाला नाही. उलट त्यामुळे आवेशी, समर्पित ख्रिस्ती लोक

तयार झाले. अशा प्रकारचे ख्रिस्ती मुक्त प्रदेशांत क्वचितच आढळतात. भेटलेल्या प्रत्येक व्यक्तींचा आत्मा ख्रिस्तासाठी जिकण्याची तळमळ नसणारा माणूस स्वतःला ख्रिस्ती तरी कसा म्हणवतो, हे या लोकांना समजत नाही.

रशियन सैन्याच्या " रेड स्टार " ( लाल तारा ) या वृत्तपत्राने रशियन ख्रिस्ती लोकांवर कडाडून हल्ला चढवला. " या ख्रिस्तपूजकांना प्रत्येक व्यक्तीभोवती आपले 'लोभी पंजे' आवळण्याची तीव्र इच्छा आहे. " पण त्यांच्यामधून प्रकाशणारे ख्रिस्ताचे विपुल व विशुद्ध प्रेम पाहून त्यांचे शेजारी व गावातील लोक त्यांचा सन्मानच करतात. कोणत्याही गावातील अगर शहरातील सर्वांत आवडते आणि सर्वांना प्रिय लोक म्हणजे ख्रिस्तीच ! एखाद्या मातेला स्वतःच्या आजारामुळे आपल्या मुलांकडे लक्ष देणे अशक्य झाले तर एखादी ख्रिस्ती माउलीच तिच्या मदतीला धावून जाते. एखादा माणूस आजारी पडला व लाकूड-फाटा तोडायला कोणी नसले तर त्याच्या मदतीला ख्रिस्ती माणूसच जातो. ते आपला विश्वास " जगतात. " मग ते इतरांना ख्रिस्ताविषयी साक्ष देऊ लागले की लोक त्यांचे ऐकतात व विश्वास ठवतात; कारण या सर्वांनी ख्रिस्ती लोकांच्या जीवनात प्रत्यक्ष ख्रिस्त पाहिलेला असतो. परवाना असलेला उपदेशकच फक्त मंदिरात उपदेश करू शकतो त्यामुळे कॉम्युनिस्ट जगाच्या कानाकोपऱ्यात लाखो आवेशी, उत्साही ख्रिस्ती लोक बाजारात,पाण्याच्या पंपाजवळ,ते जेथे जातील तेथे आत्मे जिंकतात, साक्ष देतात व सेवा करतात. ख्रिस्ती लोक मांसाभोवती सुवार्तापत्रिका गुंडाळून मांस विकतात अशी रशियन वृत्तपत्रांनी कबुली दिली आहे. तसेच कॉम्युनिस्टांच्या छापखान्यात काम करणारे ख्रिस्ती अधिकारी रात्रीच्या वेळी छापखाना बंद झाल्यावर तेथे जातात, यंत्रे चालू करतात व ख्रिस्ती वाङ्मयाच्या हजार–दोनहजार प्रती छापतात, व सकाळ होण्यापूर्वीच सर्व बंद करतात. मॉस्कोमधील ख्रिस्ती मुलांना कोठूनतरी शुभवर्तमानाच्या प्रती मिळाल्या व त्यांनी त्यावरून हस्तलिखित प्रती तयार केल्या. मग ह्या प्रती त्यांनी आपल्या शिक्षकांच्या ओव्हरकोटाच्या खिशात ठेवल्या. ( शाळा चालू असताना सर्वांचेच कोट शाळेतील एका

खोलीत टांगून ठेवलेले असतात.) ह्या सर्व गोष्टींची कबुली रशियन वृत्तपत्रांनी दिली आहे. हे सर्व असंख्य ख्रिस्ती स्त्री-पुरुष व मुले कॉम्युनिस्ट प्रदेशांत समर्थपणे, प्रभावीपणे सुवार्ताकार्य चालवीत आहेत व आत्मे जिंकीत आहेत.

कॉम्युनिस्ट क्यूबामधील पूर्वीच्या मिशनरींनी सांगितले की तेथेही गुप्त मंडळीचा उदय झाला आहे, कारण सर्व खरे उपदेशक कैदेत छळ भोगत आहेत व त्यांच्या जागी नवे कॉम्युनिस्ट "पाळक" नेमण्यात आले आहेत.

विश्वासणाऱ्यांचा नाश करण्यासाठी कॉम्युनिस्टांनी छळाचा वणवा पेटवला; पण त्यामध्ये नाश तर झालाच नाही तर या अग्निपरीक्षेने असंख्य विश्वासणारे जीवन पूर्णपणे समर्पित करून अधिक आवेशी व सच्चे बनले.

**३) अधिकृतपणे कार्य करणारे पाळक व उपदेशक**

भूमिगत मंडळीतील तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे अधिकृत मंडळीतील विश्वासू पाळक. यांची संख्या मोठी आहे. ज्या मंडळ्यांमध्ये ते काम करतात. त्या मंडळ्यांवर अनेक बंधने घातली आहेत. भूमिगत मंडळी काही अधिकृत मंडळीपासून विभक्त झालेली नाही. युगोस्लाविया, पोलंड, हंगेरी, या कॉम्युनिस्ट देशांतील अधिकृत मंडळ्यांचे बरेच पाळक गुप्तपणे भूमिगत मंडळीत कार्य करतात. काही देशांमध्ये तर या दोन्ही मंडळ्यांचे कार्य एकमेकात गुंफलेले आहे. तेथल्या पाळकांनी ख्रिस्ताबद्दल जे काही सांगायचे ते त्यांच्या एका खोलीच्या मंदिरातच सांगितले पाहिजे. ख्रिस्तीतर लोकांना सभेला येण्याची भीती वाटते. लहान मुलांसाठी उपासना घ्यावयाची नाही, तरुणांच्या सभा भरवायच्या नाहीत, कोणी सभासद आजारी असेल तर त्याच्या घरी जाऊन प्रार्थना करायची नाही, अशा प्रकारचे कडक निर्बंध त्यांच्यावर लादलेले आहेत. कॉम्युनिस्टांनी जणू त्यांच्याभोवती नियमांची भिंतच बांधली आहे. त्यामुळे त्यांच्या मंडळ्यांना काहीच अर्थ उरलेला नाही. हे सर्व निर्बंध म्हणज "धार्मिक स्वातंत्र्याची" चेष्टाच! याला कंटाळून बरेच वेळा हे पाळक स्वतःच्या जीवाला धोका पत्करूनही कॉम्युनिस्ट नियमांच्या बाहेर असे

नवे सेवाकार्य गुप्तपणे सुरू करतात. तरुणांसाठी व मुलांसाठी ते गुप्त सभा घेतात. ख्रिस्ती घरांमध्ये, तळघरांत गुप्तपणे ते सुवार्ताप्रसार करतात. ते ख्रिस्ती वाङ्मय मिळवतात व आध्यात्मिक भूक असलेल्या लोकांना देतात. सरकारी नियम व सूचना धाब्यावर बसवून, स्वतःचे स्वातंत्र्य धोक्यात घालून हे पाळक भोवतालच्या भुकेल्या आत्म्यांना देववचनाची मेजवानी देतात. वरवर पाहता अतिशय नम्र व आज्ञा-धारक असे हे पाळक अंतरात गुप्तपणे सर्वत्र वचनाचा प्रकाश पाडत असतात. रशियामध्ये अलीकडे यातल्या कांहींना शोधून कैद करण्यात आले. त्यांना कित्येक वर्षांची शिक्षा झाली.

हे सर्व पाळक भूमिगत मंडळीचा महत्त्वाचा तिसरा भाग आहे.

कॉम्युनिस्टांनी हाकून दिलेले व छळ सोसलेले पूर्वीचे पाळक, मंडळीचे सभासद, गुप्तपणे सेवा करणारे, सीमारेषा ओलांडून सुवार्ता-कार्य करणारे अधिकृत पाळक–हे सर्वजण भूमिगत मंडळीमध्ये काम करीत आहेत. कॉम्युनिझमचा संपूर्ण पाडाव होईपर्यंत ही भूमिगत मंडळी सात-त्याने काम करीत राहणारच ! काही देशांमध्ये या तीन भागांतला एक भाग इतरांहून जास्त कार्यप्रवण असतो–पण कमी अगर जास्त हे सर्वच एकत्रितपणे, मोठा धोका पत्करून ख्रिस्तासाठी कार्य करीत असतात.

कॉम्युनिस्ट देशांमध्ये वारंवार प्रवास करणारा व धर्माविषयी आस्था बाळगणारा एक माणूस तेथे जाऊन आला. आपणाला तेथे भूमिगत मंडळीचे दर्शनही झाले नाही असे त्याने लिहिले.

मध्य आफिरकेत प्रवास करून तेथील अशिक्षित लोकांमध्ये फिरायचे, व परत येऊन, असे सांगायचे, " मी तेथे संपूर्ण चौकशी केली. ते गद्यात बोलतात का, असे मी विचारलें. सर्वांनी ' नाही ' असे उत्तर दिलें." या गोष्टीत जेवढे सत्य आहे तेवढेच कॉम्युनिस्ट देशांचा प्रवास करणाऱ्या त्या माणसाच्या गोष्टीत आहे. खरे म्हणजे ते सर्वच रहिवासी गद्यच बोलतात; पण हेच गद्य एवढेच त्यांना समजत नाही.

पहिल्या शतकातील ख्रिस्ती लोकांना आपण ख्रिस्ती आहोत हे माहीत नव्हते. त्यांना कोणी त्यांच्या धर्माविषयी विचारले असते तर त्यांनी आपण यहूदी, इस्राएली, मशीहा म्हणून येशूवर विश्वास ठेवणारे,

बंधुजन, पवित्रजन, देवाची मुले आहोत, असे सांगितले असते. त्यांना " ख्रिस्ती " हे नाव पुढे कित्येक वर्षांनी प्रथम अंत्युखिया या शहरात मिळाले. लूथरच्या अनुयायांना आपण "लूथरन" आहो हे माहीत नव्हते. स्वतः लूथर या नावाला कडकपणे विरोध करीत असे.

पूर्वेकडील धर्मस्थितीचा अभ्यास करणाऱ्या पाश्चिमात्य लोकांनी कॉम्युनिस्ट देशांमध्ये आपोआप निर्माण झालेल्या एका गुप्त संघटनेला " भूमिगत मंडळी " हे नाव दिले आहे. भूमिगत मंडळीचे सभासद स्वतः-च्या संघटनेला ह्या नावाने ओळखत नाहीत. ते स्वतःला ख्रिस्ती, विश्वासी, देवाची मुले म्हणतात. ते कार्य करतात ते मात्र गुप्तपणे एकत्र येतात, गुप्त स्थळी भरलेल्या बेकायदेशीर सभांतून सुवार्ताप्रचार करतात. आपण भूमिगत मंडळी पाहिलीच नाही असे सांगणारे परदेशी लोकही अशा सभांना हजर असतात. वास्तविक हे सार्थ नाव दिले आहे या गुप्त संघटनेच्या शत्रूंनी, व बाहेर राहून या अद्भुत संघटनेला मदतीचा हात देणाऱ्या मित्रांनी !

पश्चिमेकडच्या देशांत तुम्ही कित्येक वर्षे फिरला तरी तुम्हाला तेथे रशियन हेरसंघटना आढळणार नाही. पण याचा अर्थ मात्र तशी संघटना अस्तित्वातच नाही असा नव्हे. येईल त्या प्रवाश्याला आपले अस्तित्व जाहीर करण्याएवढी ही हेरसंघटना काही भोळीभाबडी नाही.

अशा या धैर्यशाली भूमिगत मंडळीच्या अस्तित्वाची खात्री व कार्याचे महत्त्व विशद करणारे रशियन वृत्तपत्रांमधील उतारे मी पुढच्या प्रकरणात देणार आहे.

# प्रकरण सहावे

रशियन सैन्यामध्ये व रुमानियामध्ये ख्रिस्तसंदेशाचा प्रसार कर-ण्याच्या कार्यातील आमच्या अनुभवांविषयी मी पूर्वीच सांगितले आहे.

कॉम्युनिस्टांना व त्यांच्याकडून छळल्या जाणाऱ्या लोकांना ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्याच्या कामामध्ये तुमच्या मदतीची मी याचना करीत आहे.

माझे हे आव्हान स्वप्न आहे का? ते प्रत्यक्षात कधी येणारच नाही असे कोणाला वाटते का?

सत्य हाच त्याचा पाया नाही का? **आता या क्षणी** रशियामध्ये व इतर कॉम्युनिस्ट देशांमध्ये भूमिगत मंडळी खरोखरच अस्तित्वात आहे का? तेथे आता गुप्तपणे कार्य करणे शक्य आहे का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे आनंददायी आहेत.

कॉम्युनिस्ट लोक आपल्या सत्तेचे अर्धशतक उलटले म्हणून महोत्सव साजरा करीत आहेत. पण त्यांचा हा जय खरोखर पराजयच आह. विजय झाला आहे तो ख्रिस्ती धर्माचा–कॉम्युनिझमचा नाही. आमच्या संघटनेने रशियन वृत्तपत्रांचा सखोल अभ्यास केला आहे. या वृत्तपत्रांत भूमिगत मंडळीबद्दल खूपच माहिती येत असते. आजवरच्या काळात प्रथमच भूमिगत मंडळी इतकी प्रबळ झाली आहे की, तो आता साधारणतः उघडपणे कार्य करीत आहे–त्यामुळे कॉम्युनिस्ट भयभीत होत आहेत. कॉम्युनिस्ट वर्तमानपत्रांतील या अहवालांना दुजोरा देणारी माहितीही आम्हांला इतर ठिकाणांहून मिळालेली आहे.

लक्षात घ्या, भूमिगत मंडळी एखाद्या हिमनगासारखी आहे. बहुधा ती पृष्ठभागाखालीच कार्य करते आणि तिचा थोडासाच भाग उघडयावर असतो.

या पुढल्या पानांवर या महत्त्वाच्या वृत्तांताचा सारांश दिलेला आहे.

## हिमनगाचे टोक

७ नोव्हेंबर १९६६ मध्ये कॉकसस प्रांतातील सुहुमी या गावी भूमिगत मंडळीची एक मोठी सभा उघडयावर आभाळाखाली भरली होती. इतर शहरांतील अनेक विश्वासी लोक या सभेला हजर होते. ख्रिस्ताला स्वीकारण्यासाठी पुढे येण्याचे आमंत्रण दिले तेव्हा सत्तेचाळीस तरुणांनी पुढे येऊन ख्रिस्ताचा स्वीकार केला. पवित्र शास्त्राच्या काळी

होई त्याप्रमाणे लगेच तेथेच या सर्वांना काळ्या समुद्रामध्ये बाप्तिस्मा देण्यात आला.

बाप्तिस्म्यापूर्वी शिक्षण वगैरे काही दिले नव्हते. पन्नास वर्षे चालू असलेली कॉम्युनिस्ट हुकुमशाहीमुळे पवित्रशास्त्र, ख्रिस्ती वाङ्मय, ईश्वर-विज्ञान पाठशाला यांचा अभाव यामुळे भूमिगत मंडळीतले उपदेशक काही ईश्वरविज्ञानशास्त्री असे नसतात. पण प्राचीन काळी फिलिप्प तरी असा कोठे होता ? हबशी अधिकाऱ्याशी तासभरच तो बोलला असेल, लगेच त्या अधिकाऱ्याने त्याला विचारले, " पाहा हे पाणी, मला बाप्तिस्मा घेण्यास काय अडचण ? " फिलिप्प म्हणाला, " जर आपण आपल्या सर्व अंत:करणाने विश्वास धरता तर योग्य आहे. " मग ते उभयता पाण्यात उतरले आणि फिलिप्पाने त्याला बाप्तिस्मा दिला (प्रेषित ८:३६–३८).

काळा समुद्र पाण्याने काठोकाठ भरलेला आहे. भूमिगत मंडळीही पवित्रशास्त्राच्या काळातील रीतीप्रमाणे पाण्यात लोकांचा बाप्तिस्मा करीत आहे.

शिक्षकांच्या एका मासिकाच्या २३ ऑगस्ट १९६६ च्या अंकात पुढील बातमी दिली आहे–" रॉस्टॉव्ह-ऑन-डॉन येथल्या बॅप्टिस्ट ख्रिस्ती मंडळीने कॉम्युनिस्ट सरकारने नेमलेल्या 'पुढाऱ्यांचे' हुकूम पाळण्याचे नाकारले, तसेच कायद्यानुसार आपल्या मंडळीची नोंदणी करण्याचे नाकारले. या गोष्टींना आपला विरोध दर्शविण्यासाठी त्यांनी रस्त्यातून एक मोर्चा काढला व निदर्शने केली. "

ही गोष्ट घडली एक मे च्या दिवशी. परूश्यांचा विरोध मोडण्यासाठी येशूही आपले अद्भुत सेवाकार्य शब्बाथवारी करीत असे. तसेच ही भूमिगत मंडळी कॉम्युनिस्टांचे कायद्यांना विरोध करण्यासाठी त्यांचे " समारंभ दिवस " निवडते.

एक मे हा दिवस "मे दिन" व "जागतिक कामगार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी कॉम्युनिस्ट देशांमध्ये सर्वत्र मोठमोठ्या मिरवणुका काढतात, व्याख्याने व इतर मनोरंजनाचे कार्यक्रम असतात आणि ह्या प्रसंगी सर्व लोकांनी हजर झाले पाहिजे असा

हुकूम आहे. पण यावर्षी रशियातील दुसरी मोठी शक्ती–भूमिगत मंडळी–स्वतःची मिरवणूक घेऊन समारंभाने रस्त्यातून मिरवली.

या मिरवणुकीत १५०० विश्वासणारे लोक होते. त्यांच्यावर सक्ती होती फक्त देवप्रीतीची–कायद्याची नव्हे. आपले स्वातंत्र्य धोक्यात येईल, कैद होणार असेल, कदाचित तुरुंगात यातना भोगत खितपत पडावे लागेल, या गोष्टींची त्यांना पूर्ण जाणीव होती.

रशियातील प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला "गुप्त घोषणा पत्रिकेची" माहिती आहे. बर्नोल येथल्या सुवार्तामंडळाने ती प्रकाशित केली आहे. या पत्रिकेत कुलुंद गावच्या माराताईची कथा आहे. तिचा नवरा तुरुंगात मृत्यू पावला. आता ती आपल्या चार मुलांसह विधवेचे जिणे जगत आहे. तिच्या मृत पतीचे शव तिच्याकडे पाठवण्यात आले तेव्हा त्या शरीरावर अत्याचारांच्या असंख्य खुणा दिसल्या. हातावर बेड्यांचे वण होते. हाताचे तळवे, बोटे, तळपाय गंभीरपणे जळालेले होते. पोटाच्या खाली सुरामारीच्या खुणा दिसल्या. उजवा पाय सुजलेला होता व दोन्ही पायांवर माराच्या खुणा होत्या. संपूर्ण शरीर मारहाणी-मुळे झालेल्या जखमांनी भरले होते.

रोस्टॉव्ह–ऑन–डॉन येथल्या तर मिरवणुकीत सामील झालेल्या प्रत्येक विश्वासणाऱ्या व्यक्तीला आपली अखेर अशीच होऊ शकेल याची पूर्ण जाणीव होती, तरीदेखील ते आले.

ख्रिस्ती झाल्यापासून या हुतात्म्याने फक्त तीनच महिन्यांत देवासाठी स्वप्राण अर्पण केले आणि विश्वासणाऱ्यांच्या मोठ्या जमावा-समोर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले हेही ह्या या लोकांना ठाऊक होते. तेथे जमलेल्या सर्वांनी आपल्या छातीवर पत्रके लावली होती, हातात फलक घेतले होते. त्यांच्यावर लिहिले होते–

"मला जगणे हे ख्रिस्त व मरणे हे लाभ असे आहे."

"जे शरीराला वधितात पण आत्म्याला वधावयास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका."

"मी वेदीखाली देवाच्या वचनासाठी जिवे मारलेल्यांचे आत्मे पाहिले."

रोस्टॉव्ह–ऑन–डॉनमधल्या लोकांचे स्फूर्तिस्थान म्हणजे हा हुतात्मा. रस्त्यावर एका लहान घराभोवती ते जमले होते. घरांवर, झाडांवर (जक्कयासारखे) जागा मिळेल तिथे लोक जमले होते. या वेळी ऐंशी लोकांचे तारण झाले. त्यांतले बहुतेक तरुण होते. यांतले तेवीस कॉमसॉमाल्स या कॉम्युनिस्ट तरुणसंघटनेचे कार्यकर्ते होते !

हे विश्वासणारे लोक संपूर्ण गावातून मिरवत बाहेर असलेल्या नदीकडे गेले. तेथे त्यांना बाप्तिस्मा दिला.

नदीकाठावर हे सर्व लोक असतानाच पोलिसांच्या मोटारी आल्या व त्यांनी सर्वांना वेढा घातला. त्यांना पकडायचे होते मिरवणुकीच्या पुढाऱ्यांना ! (सर्वच म्हणजे पंधराशे लोकांना पकडणे सोपे नव्हते.) सर्व विश्वासणाऱ्या लोकांनी लगेच गुडघे टेकून देवाने आपल्या लोकांचे रक्षण करावे व त्या दिवशीची उपासना करण्यास आपणाला मिळावी म्हणून कळकळीने देवाची प्रार्थना केली. मग सर्व बंधुभगिनींनी खांद्याला खांदे भिडवून उपासना चालवणाऱ्या बंधूंभोवती कडे केले. त्यामुळे पोलिसांना ख्रिस्ती लोकांना अटक करणे शक्य झाले नसते. परिस्थिती बिकट बनली.

हेच वृत्तपत्र पुढे लिहिते, "रोस्टॉव्हमधील बॅप्टिस्ट ख्रिस्ती मंडळी या बेकायदेशीर संघटनेचा एक भूमिगत छापखाना आहे." (रशियामधील बॅप्टिस्ट यामध्ये इव्हँजेलिकल व पेंटिकॉस्टल या ख्रिस्ती मंडळ्याही येतात.)

तरुणांना विश्वासात 'स्थिर राहा' असे आवाहन करणाऱ्या पत्रिका येथे छापतात. एका पत्रिकेत ख्रिस्ती आईबापांना सूचना केली आहे (मला ती फार चांगली वाटते). "क्षणभंगुर गोष्टींची काळजी करू नये हे शिकविण्यासाठी आपल्या मुलांना अंत्यविधीच्यावेळी बरोबर घेऊन जा", अशी सूचना आहे. कॉम्युनिस्ट शाळांमधून नास्तिकवादाचे विषारी शिक्षण दिले जाते. या विषावर उतारा म्हणून मातापित्यांनी आपल्या मुलांना ख्रिस्ती शिक्षण द्यावे अशी सूचना केली आहे.

या लेखाच्या शेवटी हे वृत्तपत्र लिहिते, "ज्या कुटुंबातील मुलांना मूर्ख बनवण्यात येते आहे, (धर्मशिक्षण देऊन !) त्या कुटुंबात

शिक्षक भीतभीत मिसळतात–जातात–असे का ?"

भूमिगत कार्यकर्त्यांनी गुप्तपणे बाप्तिस्मे दिले. त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. या चौकशीचे वेळी काय घडले तेही या " शिक्षक पत्रिकेत " सांगितले आहे.

" साक्षीदार म्हणून बोलावलेले तरुण विश्वासणारे कॉम्युनिस्ट न्यायालयाचा उपमर्द व हेटाळणी करीत होते. त्यांची वागणूक रागाची व वेडेपणाची होती. पण तेथल्या तरुण स्त्रिया या आरोपींकडे **आदराने** पाहात होत्या व इतर नास्तिक लोकांकडे नाखुषीच्या भावाने पाहात होत्या."

रशियातील कॉम्युनिस्ट पक्षाच्या मुख्य ठाण्यापुढे भूमिगत मंडळीच्या सभासदांनी मारहाणीला अगर कैदेच्या भीतीला न जुमानता अधिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून निदर्शने केली.

रशियामधील इव्हँजेलिकल बॅप्टिस्ट मंडळ्यांच्या " बेकायदेशीर " संघटनेने प्रकाशित केलेली एक गुप्त पत्रिका आम्हांला मिळाली आहे. या संघटनेला विरोध करणारी अशी कॉम्युनिस्ट नियंत्रित " बॅप्टिस्ट युनियन " ही "कायदेशीर" संघटना तेथे आहे. कारेव्ह नावाचा विश्वासघातकी या संघटनेचे नेतृत्व करतो. " सोव्हिएट लाईफ टुडे " ( आजचे सोव्हिएट जीवन ) अंक ६,१९६३ या मासिकात त्याने असंख्य ख्रिस्ती लोकांचे हत्याकांड करणाऱ्या कॉम्युनिस्टांमधल्या मानवतेची स्तुती करून 'स्वातंत्र्याचा' उदोउदो केला आहे. आम्हांला मिळालेली ती गुप्त पत्रिका गुप्तमार्गांनीच पश्चिमेकडे प्रसारित करण्यात आली आहे.

त्यामध्ये खुद्द मॉस्कोमध्ये जी वीरोचित सार्वजनिक निदर्शने झाली त्यांची माहिती दिली आहे. पुढील उतारा या पत्रिकेतूनच घेतला आहे.

" **अत्यंत तातडीचा संदेश** "

" प्रिय बंधुभगिनींनो, आमचा देव पिता व आमचा प्रभू येशू ख्रिस्त तुम्हांस आशीर्वाद व शांती देवो. हा तातडीचा संदेश आहे. इव्हँजेलिकल बॅप्टिस्ट ख्रिस्ती संघटनेचे पाचशे सभासद १६ मे १९६६ रोजी मॉस्कोला गेले. सत्तेच्या मध्यवर्ती केंद्रामध्ये जाऊन आपले म्हणणे मांडण्यासाठी ते गेले होते. यु. एस. एस. आर.च्या कॉम्युनिस्ट पक्षाच्या

मध्यवर्ती समितीची कचेरी आहे त्या इमारतीमध्ये ते गेले व आपले म्हणणे ऐका, अशी त्यांनी तेथल्या अधिकाऱ्यांना विनंती केली. पक्षाचे चिटणीस ब्रेझ्नेव्ह यांना आम्ही एक निवेदन दिले."

हे पाचशे लोक दिवसभर त्या इमारतीसमोर ठाण मांडून उभे होते असे या पत्रिकेत पुढे म्हटले आहे. कॉम्युनिझमच्या विरोधी असे हे मॉस्कोमधले पहिलेच निदर्शन ! आणि हे केले होते भूमिगत मंडळीच्या सभासदांनी. दिवसअखेरीस त्यांनी ब्रेझनेव्ह यांच्या नावाने आणखी एक निवेदन दिले. कोणी एका "बंधू" स्ट्रोगॅनोव्हने त्यांची विनंती ब्रेझनेव्हना सांगायचे नाकारले व त्यांना धमक्या दिल्या असे या निवेदनात म्हटले होते.

रात्रभर हे पाचशे लोकांचे शिष्टमंडळ रस्त्यावरच होते. बाजूने जाणाऱ्या येणाऱ्या मोटारी त्यांच्यावर चिखल उडवीत होत्या. लोक त्यांचा अपमान करीत होते. पाऊस कोसळत होता, अपमानास्पद वागणूक मिळत होती तरी हे सर्व सकाळपर्यंत कॉम्युनिस्ट पक्षाच्या इमारती-समोरच उभे होते.

दुसऱ्या दिवशी काही दुय्यम दर्जाच्या कॉम्युनिस्ट अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी जवळच्याच इमारतीत चला असे त्यांना सांगण्यात आले. पण "अधिकाऱ्यांना इमारतीमध्ये भेटण्यास गेले की बहुधा कोणी साक्षीदार नसताना मारहाण होते, हे माहीत असल्याने सर्व प्रतिनिधींनी ही सूचना एकमुखाने नाकारली व आपणांला ब्रेझ्नेव्हचीच भेट हवी हा आग्रह सोडला नाही."

मग अपरिहार्य तेच घडले.

दुपारी पावणेदोन वाजता तेथे पोलिसांनी भरलेल्या अठ्ठावीस बसगाड्या आल्या आणि त्यांनी या विश्वासणाऱ्यांवर पाशवी सूड उगवण्यास सुरवात केली. "एकमेकांचे हात धरून आम्ही कडे केले आणि '**वधस्तंभ वाहू जेव्हा तोच दिन सौख्याचा...**' हे गीत गाऊ लागलो. गुप्त पोलिसांची माणसे आम्हांला मारहाण करू लागली. तरुण, म्हातारे, कोणालाच त्यांनी सोडले नाही. ते लोक रांगांतून माणसांना बाहेर ओढून काढीत, तोंडावर, डोक्यावर मारीत आणि डांबरी सडकेवर आपटीत. काही

बंधूंना त्यांनी केस धरून ओढीत गाड्यांकडे नेले. पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ते बेशुद्ध पडेपर्यंत मारण्यात आले. विश्वासणाऱ्या लोकांना त्या बसमध्ये कोंबून कोठेंतरी अज्ञात स्थळी नेण्यात आले. या बस गाड्यांतून आमच्या भावाबहिणींची गाणी ऐकू येत होती. लोकांच्या मोठ्या जमावासमोरच या सर्व गोष्टी घडल्या. "

यानंतर एक उत्तम गोष्ट घडली. या पाचशे लोकांवर छळ करण्यासाठी पकडून नेल्यावर बंधू जी. बिन्स आणि दुसरे एक पुढारी बंधू होरेव्ह ( ख्रिस्ताच्या कळपाचे खरे पाळक ) मोठ्या धैर्याने कॉम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या त्याच कचेरीत गेले. ( तसेच बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला पकडल्यावर येशूने तेथेच त्याच ठिकाणी उघडपणे संदेश देणे सुरू केले. आणि बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला जे शब्द उच्चारल्याबद्दल पकडण्यात आले तेच शब्द येशूनेही उच्चारले– "पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. " )

" पकडलेले प्रतिनिधी कोठे आहेत ? त्यांची ताबडतोब सुटका करा, " अशी मागणी बिन्स व होरेव्ह यांनी केली. हे दोन्ही धैर्यशाली बंधू लगेच बेपत्ता झाले. पुढे कळले की, त्यांना लफोर्टोव्हस्किया तुरुंगात टाकले आहे.

भूमिगत मंडळीचे हे ख्रिस्ती सभासद घाबरले होते का ? मुळीच नाही ! इतरांनी आपलेही स्वातंत्र्य धोक्यात घालून हे कार्य पुढे चालू ठेवले. याचे प्रत्यंतर म्हणजे आमच्यापुढील ही पत्रिका. त्यामध्ये ही सर्व हकीगत लिहिली आहे. ते म्हणतात, " **कारण त्याच्यावर विश्वास ठेवावा इतकेच केवळ नव्हे, तर ख्रिस्ताच्या वतीने त्याच्याकरता दुःखही सोसावे असा अनुग्रह** " त्यांच्यावर झाला आहे ( फिलिप्पै १:२९ ). ते बंधूजनांना धीर देतात. " या संकटात कोणी घाबरू नये, कारण आपण यासाठीच नेमलेले आहो, हे तुम्ही स्वतः जाणून आहा " ( १ थेस्स ३:३ ). इब्री १२:२ हे वचन उद्धृत करून ते विश्वासणाऱ्यांस सांगतात, " आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू याच्याकडे पाहात असावे; त्याच्यापुढे जो आनंद ठेविलेला होता त्याकरिता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला. "

रोस्टॉव्ह, मॉस्को येथे आणि सर्व रशियामध्ये सर्वत्र तरुणांची मने नास्तिकवादाच्या विषाने भरून टाकली जात आहेत, या गोष्टीला भूमिगत मंडळीने उघड विरोध केला आहे. कॉम्युनिझमचे विष व अधिकृत मंडळीचे तथाकथित घातकी पुढारी यांच्याविरुद्ध ते लढा देत आहेत अशा पुढाऱ्यांविषयी ते लिहितात, "आमच्या काळामध्ये सैतान आज्ञा करतो आणि 'मंडळी' देवाच्या आज्ञाविरोधी असणारे सर्व निर्णय स्वीकारते." ("प्रवदा यूक्रेनी "च्या ऑक्टोबर ४, १९६६ या अंकावरून.)

ॲलेक्सी नेव्हेंरॉव्ह, बोरिस गार्माशोव्ह व अक्झन झूबोव्ह या बंधूंवरील खटल्याची हकीगत "प्रावदा व्होस्टोका" या वृत्तपत्रात दिली आहे. अमेरिकेतून रेडिओवरून प्रसारित होणारे सुवार्तासंदेश ऐकण्यासाठी त्यांनी एक संघटना स्थापन केली होती. हे संदेश ते टेपवर ध्वनिमूद्रित करीत व मग त्यांचा प्रसार करीत. "कलामंडळ" व "सहली" या नावाखाली गूप्तपणे सुवार्तासभा घेतल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवला होता. रोममधल्या थडग्यांच्या गुहांतून प्राचीन मंडळीचे कार्य चालू असे तसेच आजही रशियातील भूमिगत मंडळी करीत आहे.

दुसऱ्या वृत्तपत्राच्या एका अंकामध्ये भूमिगत मंडळी टंकलिखित पुस्तिका प्रसारित करीत आहे अशी तक्रार केली आहे. कायद्याने बंदी असली तरी हे लोक सार्वजनिक जागी जमतात, आणि जागोजागी ख्रिस्ताची साक्ष देतात असे पुढे म्हटले आहे.

याच वृत्तपत्रातील आणखी एक बातमी: आगगाडीत प्रवास करणारी तीन तरुण मुले व चार मुली ख्रिस्ती गायन गात होत्या—"अर्पू या तारुण्य आपुले ख्रिस्ताला..." हा बातमीदार म्हणतो, "हे ऐकून मला अत्यंत शिसारी आली." हे माथेफिरू विश्वासणारे, रस्त्यांत, रेल्वे स्टेशनांत, आगगाड्यांत, बसमध्ये, सरकारी संस्थांत—पहावे तिकडे—आपल्या ख्रिस्ताचा प्रचार करीत असतात!" भूमिगत मंडळी या प्रकारे आज रशियात काम करीत आहे.

सार्वजनिक जागी ख्रिस्ती गाणी म्हटल्याबद्दल या ख्रिस्ती लोकांना शिक्षा सुनावल्यावर हे आरोपी गुडघे टेकून बसले व त्यांनी प्रार्थना केली

" आम्ही स्वतःला देवाच्या हाती सोपवून देतो. हे प्रभू, या विश्वासासाठी दुःखसहन करण्याची संधी तू आम्हांला दिलीस याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो." मग न्यायालयातील सर्व प्रेक्षकवर्ग तेथेच " माथेफिरू " मादनच्या नेतृत्वाखाली गाणे म्हणू लागले. जे गाणे म्हटल्याबद्दल त्यांच्या बांधवांना नुकतीच कैदेची व छळाची शिक्षा झाली होती तेच हे गाणे होते.

एक मे,या दिवशी कोपच्याग व झाहारोव्हका या गावांत मंदिरे नसल्याने तेथल्या लोकांनी गुप्तपणे जंगलात उपासना केली !

वाढदिवस सभारंभ आहे असे सांगून ते गुप्तपणे सभा भरवतात. ( चार-पाचच व्यक्ती असलेली ख्रिस्ती कुटुंबे या गुप्त सभांसाठी सुमारे पस्तीस वाढदिवस समारंभ साजरे करतात ! )

कैद, तुरुंगवास, छळ व यातना या गोष्टींची भूमिगत मंडळीला मुळीच पर्वा नाही. प्राचीन मंडळीप्रमाणेच ही मंडळीदेखील हालअपेष्टापासूनच सामर्थ्य व आवेश प्राप्त करून घेते.

वर्तमानपत्राच्या दुसऱ्या एका अंकामध्ये ब्रदर प्रोकोफिव्हची माहिती दिली आहे. रशियातील भूमिगत मंडळीचा हा एक पुढारी. त्याला तीन वेळा तुरुंगवास घडला. सुटका झाली की तो लगेच शब्बाथ शाळा चालवू लागे. आता त्याला पुन्हा पकडले आहे.

एका गुप्त पत्रकात त्याने लिहिले आहे : " मानवी नियमांचे ( कॉम्युनिझमचे हुकुम ) पालन करून अधिकृत मंडळीने देवाचा आशीर्वाद गमावला आहे. "

आपल्या रशियन बंधूंला तुरुंगात टाकले असे ऐकाल तेव्हा हा तुरुंग तुमच्या तुरुंगांसारखा नाही, हे लक्षात घ्या. रशियात तुरुंग म्हणजे **उपासमार, यातना, व ब्रेनवॉशिंग.**

एका मासिकाच्या अंकात लिहिले आहे की, ख्रिस्ती लोक नियतकालिकांमध्ये पत्रके छपवून सुवार्तासाहित्याचा प्रसार करतात. टॉलस्टॉयची कादंबरी ते तुम्हांला देतात. वर नाव असते–" ॲना कॅरेनिना " आणि आत असतो पवित्र शास्त्राचा एक भाग ! अशीच इतरही पुस्तके ते वाटतात.

ते गाणी म्हणतात. गाण्याची चाल असते कॉम्युनिस्ट गीतांची पण

शब्द असतात ख्रिस्तस्तुतीचे ! सायबेरिया येथील ख्रिस्ती लोकांनी एक गुप्त पत्र प्रकाशित केले आहे. त्यात लिहिले आहे: "बाप्टिस्टांच्या अधिकृत पुढाऱ्यांनी जगातील मंडळी व तिचे खरे सेवक यांचा नाश केला आहे. तसेच पूर्वी मुख्य याजकांनी, शास्त्र्यांनी व परूश्यांनी येशू ख्रिस्ताला पिलाताच्या हाती विश्वासघाताने सोपवले होते. पण भूमिगत मंडळीचे कार्य विश्वासूपणे चालूच आहे."

ख्रिस्तवधू ख्रिस्ताची सेवा करीत आहे. भूमिगत मंडळी कॉम्युनिस्टांनाही ख्रिस्ताकडे आणीत आहे असे मी म्हणतो. आणि कॉम्युनिस्टही हे खरे आहे अशी कबुली देतात. त्यांना जिंकता येते !

कॉम्युनिस्ट तरुणसंघाच्या तानिया सिगुनोव्हा या तरुणीचे पत्र एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहे. ही तरुणी ख्रिस्ती झाली. कॉम्युनिस्ट अधिकाऱ्यांनी हे पत्र जप्त केले होते :

प्रिय नादिया मावशी, आपला प्रिय प्रभू तुला आशीर्वाद देवो. मावशी, तो माझ्यावर किती प्रेम करतो ! आपण त्याच्यासमोर काहीच नाही–केवळ कस्पटासमान. 'तुमच्या शत्रूंवर प्रेम करा, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा, जे तुम्हांस शाप देतात त्यांस आशीर्वाद द्या, जे तुमची निर्भर्त्सना करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा, या शब्दांचा अर्थ, मावशी, तुला समजतच असेल."

हे पत्र जप्त झाले आणि तिला ज्याने ख्रिस्ताकडे आणले त्या ख्रिस्ती बंधूला तुरुंगात जावे लागले. त्याने अनेक तरुण कॉम्युनिस्टांना ख्रिस्ताकडे आणले. त्याच्या संदेशातील काही भाग एका कॉम्युनिस्ट वृत्तपत्रात आला आहे : "पहिल्या ख्रिस्ती लोकांप्रमाणेच आपलाही आपल्या तारकावर विश्वास असावयास हवा. आपला सर्वश्रेष्ठ मुख्य नियम म्हणजे पवित्र शास्त्र. दुसरा कोठलाच नियम आम्ही जाणत नाही. लोकांना, विशेषतः तरुणांना, पापापासून वाचवण्यासाठी आम्ही सत्वर कार्य केले पाहिजे." तरुणांमध्ये ख्रिस्तसंदेशाचा प्रसार करणे हे सोव्हिएट कायद्याच्या विरुद्ध आहे असे त्याला अधिकाऱ्यांनी सांगितल्यावर तो म्हणाला, "आम्हांला एकच कायदा माहीत आहे–पवित्रशास्त्राचा.' क्रूर नास्तिक हुकुमशाही अत्याचारी थैमान घालीत असलेल्या देशात हे

उत्तर अगदी योग्यच होते.

पुढे हे कॉम्युनिस्ट वृत्तपत्र एका "जंगली" प्रसंगाचे चित्रण करते. "तरुण मुलें-मुली उपासनागीत म्हणतात, बाप्तिस्म्याचा विधी करतात आणि वैऱ्यावर प्रेम करा ही खोटी, घातकी शिकवण उराशी बाळगतात."

हेच वृत्तपत्र दुसरीकडे म्हणते की कॉम्युनिस्ट तरुणसंघटनेत काम करणाऱ्या अनेक युवकयुवती खरे तर ख्रिस्तीच आहेत. या लेखात शेवटी लिहिले आहे: "हे पाळक ज्या कॉम्युनिस्ट शाळांतून ही मुले त्यांच्या शिक्षकांसमोर जिंकून नेतात...त्या शाळा किती कमकुवत व भ्रष्ट असल्या पाहिजेत, तिथले शिक्षण किती कंटाळवाणे असेल, तिथले शिक्षक किती बेपर्वा असतील ! "

उत्कृष्ट गुण मिळवणारा उत्कृष्ट विद्यार्थी ख्रिस्ती आहे हे पाहून एका पत्राने खेद प्रकट केला आहे.

दुसऱ्या वृत्तपत्रामध्ये भूमिगत मंडळीने ख्रिस्ती मातांना उद्देशून काढलेल्या एका पत्रकातील काही भाग दिला आहे: "आपली मुले अगदी लहान–पाळण्यात असतानाच–त्याचे जीवन देवाला अर्पण करण्याच्या प्रार्थनांत व प्रयत्नांत आपण सर्व सहभागी होऊ या ... या जगाच्या प्रभावापासून आपल्या मुलांचे रक्षण करू या. "

या प्रयत्नांना यश आले आहे ! कॉम्युनिस्ट वृत्तपत्रेच याला साक्ष आहेत ! तरुणांमध्ये ख्रिस्ती धर्माचा झपाट्याने प्रसार होतो आहे !

एका वर्तमानपत्रात कॉम्युनिस्ट तरुणसंघटनेमधील निना नावाची एक तरुणी कशी ख्रिस्ती झाली ते सांगितले आहे. एका गुप्त ख्रिस्ती सभेत तिचा पालट झाला आणि अशा सभेचे वर्णन केले आहे. "या सभा मध्यरात्री भरतात. माणसे वेगवेगळ्या ठिकाणांहून लपत-छपत येतात. स्वतःच्या पावलांच्या आवाजाला, सावलीलासुद्धा ते जपूनच असतात. अंधाऱ्या खोलीत हे सर्व बंधू जमतात. या खोलीच्या भिंती फार उंच नसतात. तेथे एवढी गर्दी होती की कोठे गुडघे टेकून बसण्यास-ही अगर उभे राहण्यास जागा नव्हती. तेथे एक जुनी गॅसबत्ती होती पण खोलीत हवा खेळत नसल्याने ती केव्हाच विझून गेली. दमलेल्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. बाहेर रस्त्यावर प्रभूचा एक सेवक

पोलिस येतात का, हे पाहात टेहळणी करीत होता." मात्र अशाच एका सभेमध्ये तिला मिठी मारून निनाचे अगत्याने स्वागत करण्यात आले. "त्यांच्यामध्ये–आता माझ्यात आहे तसा–मोठा प्रभावी विश्वास, देवावरचा विश्वास,मला आढळला. तोच आमचे संरक्षण स्वत:च करतो, तो आम्हांला स्वत:च्या आश्रयाखाली घेतो. आता माझे पूर्वीचे सहकारी–कोम्सोमॉलस–खुशाल माझ्याकडे दुर्लक्ष करोत ! ते माझ्याकडे द्वेषाने खुशाल पाहोत ! "बॅप्टिस्ट" असे हेटाळणीने मला म्हणोत ! त्यांना वाटेल ते करू दे. मला त्यांची मुळीच जरूरी नाही."

तिच्यासारखे अनेक तरुण कॉम्युनिस्ट आहेत. त्यांनीही अखेरपर्यंत ख्रिस्ताची सेवा करण्याचे व्रत घेतले आहे.

भूमिगत मंडळीमधल्या ख्रिस्ती लोकांना कॉम्युनिस्टांच्या न्यायालयात आणले म्हणजे ते जी उत्तरे देतात ती त्यांना आत्म्याने सुचवलेली अशीच असतात. एका न्यायाधीशाने विचारले : "या तुमच्या बेकायदेशीर पंथामध्ये तुम्ही लोकांना का ओढता ?" एका ख्रिस्ती भगिनीने उत्तर दिले, "**संपुर्ण जगच** ख्रिस्तासाठी जिंकावे हा आमचा उद्देश आहे."

दुसऱ्या एका खटल्यामध्ये न्यायाधीशांनी टोमणा मारला, "तुमचा हा धर्म अशास्त्रीय आहे." याला आरोपीने–एक तरुण विद्यार्थिनीने–उत्तर दिले : "न्यूटनपेक्षा, आईनस्टाईनपेक्षा तुम्हाला विज्ञान अधिक समजते का ?ते विश्वासणारे होते. आमच्या या विश्वाला आईनस्टाईनचे नाव दिले आहे. हायस्कूलमध्येच मी शिकले.या विश्वाला 'आईनस्टाईनचे विश्व' असे नाव आहे. आईनस्टाईनने लिहिले आहे संदेष्टयांनी शिकवलेला यहूदीधर्म व येशूने शिकवलेला ख्रिस्तीधर्म यांतून नंतर आलेल्या गोष्टी (विशेषत: धर्मोपाध्यायांनी घुसडलेल्या गोष्टी) काढून टाकल्या तर अखिल मानवजातीवरील सामाजिक अन्याय दूर करणारा असा धर्म आपणांस मिळेल. हा असा धर्म विजयी व्हावा म्हणून आटोकाट प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे पवित्र कर्तव्य आहे.' आपल्या देशातील थोर शरीरशास्त्रज्ञ पाव्हलोव्ह तुम्हाला माहीत असेलच. तो ख्रिस्ती होता असे आपल्या पुस्तकातून सांगितलेले नाही का ? 'दास कापिटाल' या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत खुद्द कार्ल मार्क्स म्हणतो : 'ख्रिस्ती धर्म, विशेषत: प्रॉटेस्टंट

ख्रिस्ती धर्म, हा आदर्श धर्म होय; कारण त्यामध्ये पापाने भ्रष्ट झालेल्या आत्म्याचे पुनरुज्जीवन होते. ही शक्ती या धर्मातच आहे.' माझा स्वभाव पापामुळे भ्रष्ट झाला होता, तो पुन्हा नव्यासारख्या करण्यासाठी ख्रिस्ती व्हावे हे मला मार्क्सनेच शिकविले. आता मार्क्सच्या तत्त्वानुसार चालणारे तुम्ही माझा न्याय कसा करणार ?"

न्यायाधीशाने मौन का पाळले ते सहज समजण्यासारखे आहे.

ख्रिस्ती धर्म विज्ञानाच्या विरोधी आहे, या आरोपाला एका ख्रिस्ती माणसाने न्यायालयातच उत्तर दिले, "न्यायाधीश महाराज क्लोरोफॉर्म व इतर अनेक औषधे शोधून काढणाऱ्या सिंप्सन, एवढे मोठे शास्त्रज्ञ तुम्ही नाही हे निश्चित. या सिंप्सनला एकदा 'तुमचा सर्वांत मोठा शोध कोणता ?' असा प्रश्न विचारण्यात आला. त्याने उत्तर दिले, 'क्लोरोफॉर्म हा काही माझा मोठा शोध नाही. मी पापी आहे आणि देवाच्या कृपेमुळे माझे तारण होते हाच मला लागलेला सर्वांत मोठा शोध."

आपले जीवन, आत्मत्याग, प्राणाचे मोल, विश्वासासाठी वाटेल ती किंमत द्यावयाची तयारी भूमिगत मंडळीच्या सर्व सभासदांमध्ये दिसून येते आणि याच गोष्टी ख्रिस्ती धर्माची महानता पटवून देतात. आफ्रिकेमधील प्रसिद्ध मिशनरी आल्बर्ट श्वाईटझर यांच्या शब्दांत ही भूमिगत मंडळी म्हणजे "दुःखाची चिन्हे वागविणारी, पवित्र जनांची सहभागिता आहे." या मंडळीतील सभासद येशूच्या–क्लेशांनी व्यापिलेल्या पुरुषाच्या–सहवासात आहेत. ही मंडळी आपल्या तारकाशी प्रेमबंधनांनी बांधलेली आहे आणि हेच बंधन त्यांना परस्परांशी संयुक्त करते. जगातील कोणीच त्यांचा पराभव करू शकत नाही.

भूमिगत मंडळीने गुप्तपणे एक पत्र बाहेर पाठविले आहे. त्यात म्हटले आहे : "उत्तम ख्रिस्ती बनावे अशी आमची प्रार्थना नाही. आम्ही जसे ख्रिस्ती बनावे अशी देवाची इच्छा आहे तसेच आम्हांस बनावयाचे आहे; ख्रिस्तासारखे ख्रिस्ती, जे देवाच्या गौरवासाठी खुषीने वधस्तंभ वाहतील असे आम्हांस व्हावयाचे आहे."

येशूच्या शिक्षणास अनुसरून हे ख्रिस्ती लोक सापांसारखे शहाणपण दाखवून आपले पुढारी कोण हे न्यायालयात अगर त्यांना प्रश्न विचारणा-

त्यांसमोर मुळीच सांगत नाहीत.

" प्रावदा " ह्या वर्तमानपत्राच्या एका अंकात मरिया सेव्हियुक या आरोपी स्त्रीवरील खटल्याची हकीगत दिली आहे. " तुला ख्रिस्ताकडे कोणी आणले ?" असे विचारले तेव्हा तिने उत्तर दिले, " या समुदायामध्ये येण्यास देवानेच मला प्रवृत्त केले. " दुसऱ्याने प्रश्न विचारला, " तुमचा पुढारी कोण?" ती म्हणाली, " आम्हांला कोणी मानवी पुढारी नाही. "

" कॉम्युनिस्ट बालसंघटना ( पायोनिअरस ) सोडण्यासाठी तांबडे नेक्टाय काढून टाकण्यास तुम्हांला कोणी शिकवले ?" असा ख्रिस्ती मुलांना प्रश्न विचारला. ती मुले म्हणाली, " कोणी शिकवले नाही. हे आम्ही स्वखुषीने केले आहे. "

काही काही विभागांमध्ये या " हिमनगाचे " टोक दिसून येते, तरी इतर काही विभागांतील ख्रिस्ती लोक पुढाऱ्यांची अटक होऊ नये म्हणून स्वतःच स्वतःचा बाप्तिस्मा करतात. काही ठिकाणी हा विधी नदीमध्ये करण्यात येतो व त्यावेळी बाप्तिस्मा करणारा व देणारा दोघांच्याही तोंडावर कोणी फोटो काढू नये म्हणून मुखवटे घातलेले असतात.

एका वृत्तपत्राच्या अंकात एका नास्तिकवादाच्या व्याख्यानाबद्दल अहवाल दिला आहे. व्याख्यान संपल्यावर तेथल्या विश्वासी लोकांनी व्याख्यात्याला प्रश्न विचारून नास्तिकतेच्या शिक्षणाची उघडपणे हेटाळणी करण्यास सुरुवात केली. त्या व्याख्यात्याला या प्रश्नांची उत्तरे देता येईनात. त्यांनी विचारले, " तुम्ही कॉम्युनिस्ट लोक 'चोरी करू नका, खून करू नका',अशासारखे नीतिनियम शिकवता पण ते पाळत नाही– हे नीतिनियम तुम्ही कोठून शिकता?" हे सर्व नीतिनियम पवित्रशास्त्रातूनच घेतले आहेत व त्याविरुद्ध कॉम्युनिस्ट लढतात, हे या ख्रिस्ती लोकांनी त्या व्याख्यात्याला सप्रमाण पटवून दिले. त्याचा गोंधळ उडाला आणि विश्वासणाऱ्यांच्या विजयाने व्याख्यानाचा शेवट झाला !

## भूमिगत मंडळीच्या वाढत्या हालअपेष्टा

भूमिगत मंडळीतील ख्रिस्ती लोकांचा आज पूर्वीहून अधिकच छळ होतो आहे. तसे पाहिले तर रशियात सर्व धर्मांच्या अनुयायांना

छळ भोगावा लागतो कॉम्युनिस्ट देशांमध्ये चाललेल्या यहूद्यांवरील अत्याचारांच्या बातम्या ऐकून ख्रिस्ती लोकांचे काळीज गलबलते. पण अत्याचाराचे मुख्य लक्ष आहे भूमिगत मंडळी. मोठ्या प्रमाणावर केलेल्या धरपकडीच्या व खटल्यांच्या बातम्या रशियन वृत्तपत्रांमध्ये येत असतात. एका ठिकाणी ब्याऐंशी ख्रिस्ती लोकांना वेड्यांच्या इस्पितळात ठेवण्यात आले. काही दिवसांनी त्यांतले तेवीस जण मृत्यू पावले. मृत्यूचे कारण "दीर्घकाळची प्रार्थना." दीर्घकाल प्रार्थना केल्याने केव्हापासून मृत्यू येऊ लागला ? त्यांच्यावर कसले प्रसंग ओढवले याची तुम्हाला कल्पना करता येईल का ?

हे लोक आपल्या मुलांना ख्रिस्ती शिक्षण देतात असे आढळले तर त्यांना देण्यात येणारी मोठ्यात मोठी शिक्षा म्हणजे त्यांची मुले घेऊन जातात–कायमची–पुन्हा कधी त्यांचे दर्शनही त्यांना होत नाही.

"शिक्षणाच्या क्षेत्रात कोणताही पक्षपात करावयाचा नाही," संयुक्त राष्ट्रसंघाच्या या सनदेवर सोव्हिएट रशियाने स्वाक्षरी केली आहे. या सनदेमध्ये म्हटले आहे की, "आईबापांनी स्वत:च्या विश्वासाप्रमाणे आपल्या मुलांना धार्मिक व नैतिक शिक्षण देणे हा त्यांचा अधिकार आहे." घातकी कारेव्ह, रशियातील अधिकृत बॅप्टिस्ट संघटनेचा पुढारी, एका लेखात लिहितो, "ही गोष्ट रशियामध्ये प्रत्यक्षात आली आहे." आणि मूर्ख लोक त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवतात ! सोव्हिएट वृत्तपत्रे काय म्हणतात पाहा.

मॅक्रिनकोव्हा या बॅप्टिस्ट मातेची सहा मुले तिच्याकडून बळजबरीने नेण्यात आली, कारण तिने त्यांना ख्रिस्ती शिक्षण दिले व लाल नेकटाय वापरण्याची मना केली. ही बातमी एका वर्तमानपत्रामध्ये दिली आहे. आपल्याला दिलेली शिक्षा ऐकून ती म्हणाली, "मी विश्वासासाठी दु:ख सोसत आहे." तिच्याकडून नेलेल्या मुलांचा खर्चही तिलाच भरावा लागतो, आणि त्यांना शिक्षण मिळते आहे ते विषारी नास्तिकतेचे ! ख्रिस्ती मातांनो, या मातेला होणाऱ्या असह्य मानसिक यातनांची जरा कल्पना करा.

इग्नाटी मुल्लिन व त्याची पत्नी यांच्यावरही असाच प्रसंग ओढ-

वल्याचे वर्तमानपत्रामध्ये नमूद केले आहे. विश्वास सोडून द्या असा न्यायाधीशाने त्यांना हुकूम केला. तो म्हणाला, "देव अगर तुझी मुलगी यांतून एकाची निवड कर. देवाची निवड करणार ?" तो पिता उत्तरला, "मी माझा विश्वास सोडणार नाही."

"सर्व काही कल्याणकारी असे होते," असे पौल म्हणतो. ख्रिस्ती म्हणून वाढवलेली मुले त्यांच्या आईबापांकडून हिसकावून कॉम्युनिस्ट शाळांत ठेवलेली मी स्वतः पाहिलेली आहेत. पण नास्तिकवादाची विषारी वेल यांच्या मनोभूमीत रुजली नाहीच तर री शिकलेली ख्रिस्ती धर्माची तत्त्वे व विश्वास त्यांनी तेथे इतर मुलांमध्ये पसरविला ! येशूवरील प्रीतीपेक्षा कोणाचे स्वतःच्या मुलांवर जास्त प्रेम असेल तर तो येशूला योग्य नाही असे पवित्रशास्त्रात म्हटले आहे. पोलादी पडद्यामागे या शब्दांची सार्थता पटते. तुमच्या मुलांपासून एक आठवडादेखील दूर राहण्याबद्दल तुम्हांला किती दुःख होते ते पाहा. मग रशियामधील आमच्या बंधूंना होणाऱ्या दुःखाची कल्पना तुम्हाला येईल.

येथपर्यंत भूमिगत प्रॉटेस्टंट मंडळीचाच विचार केला, एवढाच विचार सांगणे अन्यायाचे होईल. रशियामधील आर्थडॉक्स मन कॅथॉलिक ख्रिस्तीही संपूर्णपणे बदलून गेले आहेत. लक्षावधी तुरुंगात जाऊन आले आहेत. तिथे त्यांना जपमाळा, पवित्र मूर्ती, वधस्तंभचिन्हे, उदबत्त्या, धूपदीप या गोष्टी कशा मिळणार ? या मंडळीचे सभासद तुरुंगात आणि त्यांना कोणी धर्मगुरु नव्हता. धर्मगुरु कोठे असलेच तर त्यांना झगे नव्हते, प्रभुभोजनासाठी गव्हाची भाकर अगर द्राक्षारस नव्हते, पवित्र तेले नव्हती अगर प्रार्थनापुस्तके नव्हती. पण या सर्वांशिवाय देखील आपण प्रार्थनेद्वारे देवाकडे जाऊ शकतो ही गोष्ट त्यांना येथे समजली. ते प्रार्थना करू लागले व देवाच्या आत्म्याची कृपावृष्टी होऊ लागली. आज या लोकांमध्ये नवीन खरी आत्मिक जागृती होत आहे. ख्रिस्ती धर्माच्या पायाशुद्ध तत्त्वांचा उदय त्यांच्या मनात होत आहे.

रशिया व त्याच्या कक्षेतील इतर देश यांच्यामध्ये आज ऑर्थडॉक्स भूमिगत मंडळीही कार्य करीत आहे. ही मंडळीदेखील देवाच्या निकट

आहे, ती सुवार्ताप्रसार करीत आहे व ख्रिस्ती धर्माची खरी तत्त्वे शिकविते आहे. पूर्वीच्या तिच्या विधी–संस्कारांमधील जो काही भाग अवशिष्ट दिसतो तो केवळ सवयीमुळे उरला आहे. याही मंडळीने अनेक हुतात्मे पैदा केले आहेत. येरमोजेन हा काळुगा येथील वृद्ध आर्च-बिशप आज कोठे आहे कोणालाच माहीत नाही. मंडळयांची धर्मसत्ता व देवशून्य कॉम्युनिस्ट सरकार यांच्यामधील घातकी सहकाराविरुद्ध त्याने आवाज उठवला होता.

कॉम्युनिस्ट सत्तेची पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. तरीही कॉम्यु-निस्ट वृत्तपत्रे भूमिगत मंडळीच्या विजयवार्तांनी भरलेली आहेतच ! अवर्णनीय अशा कठीण परिस्थितीतून हालअपेष्टा भोगत असताना देखील ती संख्येने वाढते आहे.

रुमानियामधील रशियन सेनेमध्य गुप्त कार्य करून आम्हीही सुवार्ताबीज पेरले आहे. त्याचप्रमाणे रशियात व रशियाने काबीज केलेल्या इतर देशांत दुसऱ्यांनी केले आहे. हे पेरलेले बी आता फळ देत आहे.

कॉम्युनिस्ट जग ख्रिस्तासाठी जिंकता येईल. कॉम्युनिस्टही ख्रिस्ती बनू शकतील. तसेच त्यांनी ज्यांच्यावर अत्याचार केले आहेत ते लोकही ख्रिस्ताकडे येतील. फक्त आपण अशांना साहाय्य केले पाहिजे.

हे माझे म्हणणे सत्य आहे. याचा पुरावा हाच की आज सोव्हि-एट रशिया, चीन व सर्व कॉम्युनिस्ट देशांमध्ये भूमिगत मंडळी सफल कार्य करीत आहे. आपल्या ख्रिस्ती बांधवांची जीवने यातनामय परि-स्थितीत देवाच्या सौन्दर्याने भरलेली आहेत. याचे प्रमाण म्हणून पुढे काही पत्रे दिली आहेत. ही सर्व रशियातील तुरुंगातून लिहिलेली शेव-टची पत्रे आहेत.

## व्हारिया–एक कॉम्युनिस्ट मुलगी. तिला ख्रिस्त कसा मिळाला, तिने साक्ष कशी दिली व ती गुलाम कशी बनली याची हकीगत–

पहिली तीन पत्रे ख्रिस्ती तरुणी मरियाने लिहिली आहेत. तिनेच व्हारियाला ख्रिस्ताकडे आणले.

पहिले पत्र–

. . मी येथेच राहात आहे. सर्वजण माझ्यावर माया करतात. कोम्समोलच्या ( कॉम्युनिस्ट तरुणांची संघटना ) शाखेची एक सदस्य देखील माझ्यावर खूप प्रेम करते. ती मला म्हणाली, "तू कोणत्या प्रकारची आहेस हे मला समजतच नाही. तुझा किती तऱ्हांनी अपमान होतो, तुला किती त्रास होतो तरी तू सर्वांवर प्रेमच करतेस. मी तिला म्हटले, " हे तर देवानेच आम्हांला शिकविले आहे. मित्रांवरच नाही तर शत्रूवरही प्रेम केले पाहिजे, सर्वांवर प्रेम केले पाहिजे." पूर्वी हीच मुलगी खूप त्रास देई पण मी तिच्यासाठी कळकळीने विशेष प्रार्थना केली. तू माझ्यावरही प्रीती करशील का, असे तिने मला विचारले तेव्हा मी तिला मिठी मारली व दोघीही रडू लागलो. आता आम्ही एकत्र प्रार्थना करतो.

तिच्यासाठी तूही प्रार्थना कर. तिचे नाव आहे व्हारिया. देव नाही असे जे मोठमोठ्याने ओरडून सांगतात ते खरोखर मनापासून बोलतात असे आपणांला वाटते. पण या लोकांचे जीवन जवळून पाहिले तर काय दिसते ? हे लोक तोंडाने देवाचा निषेध करतात पण त्यांच्या हृदयात एक भकास पोकळी आहे. त्यांच्या हृदयाची दीनवाणी हाक ऐकू येते... असे स्पष्टपणे वाटते की हे लोक कशाचा तरी आतुरतेने शोध करीत आहेत आणि ही उणीव झाकण्यासाठीच नास्तिकतेचे पांघरूण घेत आहेत.

खिरस्तामधील तुझी भगिनी–मरिया.

दुसरे पत्र–

माझ्या पूर्वीच्या पत्रात मी तुला व्हारिया नावाच्या नास्तिक मुलीबद्दल लिहिलेच होते. आता प्रियांनो, ही सुवार्ता लौकर ऐका. व्हारियाने खिरस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारले आहे आणि तिने ही गोष्ट सर्वांसमोर उघडपणे कबूल केली.

तिने खिरस्तावर विश्वास ठेवला, तारणाचा आनंद अनुभवला पण त्याच वेळी ती दुःखी झाली. तिच्या दुःखाचे कारण होते ती पूर्वी नास्तिकतेचा प्रचार करी हेच ! या अपराधाचे प्रायश्चित्त घेण्याचा तिने

आता निश्चय केला आहे.

नास्तिक लोकांच्या सभेला आम्ही बरोबरच–दोघीजणी–गेलो. सावधगिरीने वाग, असे मी तिला सांगितले होते पण त्याचा काहीच उपयोग नव्हता. व्हारिया गेली आणि काय होते हे पाहण्यास मीही तिच्याबरोबर गेले. सुरुवातीला सर्वांनी एक कॉम्युनिस्ट गीत म्हटले (व्हारियाने यात भाग घेतला नाही). नंतर तिने बोलण्याची परवानगी मागितली. तिची वेळ आल्यावर ती सर्व सभेसमोर उभी राहिली आणि मोठ्या धैर्याने व भावनापूर्ण स्वरात तिने ख्रिस्ताची साक्ष दिली. ख्रिस्त माझा तारणारा आहे असे सांगून सर्वांनी आपणांस क्षमा करावी अशी तिने विनवणी केली, कारण आपले आत्मिक नेत्र आतापर्यंत बंद होते व अजाणता ती स्वत:सह इतरांना विनाशगर्तेकडे नेत होती. पापाचा मार्ग सोडून सर्वांनी ख्रिस्ताकडे यावे असे तिने आवाहन केले.

सर्वजण स्तब्ध झाले. कोणीही तिला अडथळा केला नाही. आपले बोलणे संपल्यावर तिने आपल्या मधुर आवाजात एक ख्रिस्ती गीत संपूर्ण-पणे म्हटले–"लाजणार मी नाही ख्रिस्तवार्ता सांगायला ! पाळीन आज्ञा त्याच्या मी दृढ धरूनी वधस्तंभाला ! "

आणि मग ... मग ते आले आणि आपली व्हारिया घेऊन गेले.

आज मेची नऊ तारीख. तिचे काय झाले, ती कोठे आहे, अजून काहीच समजले नाही. पण देव तिचे रक्षण करण्यास समर्थ आहे. प्रार्थना कर.

तुझी मरिया.

तिसरे पत्र–

कालच, दोन ऑगस्टला मी तु गात जाऊन आपल्या प्रिय व्हारियाला भेटले. तिच्याविषयी विचार करताना माझ्या अंत:करणाला घरे पडतात. ती अगदी लहान कोवळी पोर आहे ! उण्या-पुऱ्या एकोणीस वर्षांची आहे ती ! देवावरील विश्वासाच्या बाबतीतही अजून अजाण आहे पण सव सामर्थ्यानिशी ती प्रभूवर प्रीती करते आणि लगेच तिने वधस्तंभाची बिकट वाट चालण्याची सुरुवात केली आहे. बिचारीची किती उपासमार होत आहे ! ती तुरुंगात आहे हे आम्हांला समजले तेव्हा

लगेच आम्ही तिला खाद्य पदार्थांची पुडकी पाठविली. पण पाठवले त्यातले अगदी थोडकेच तिला मिळाले.

काल मी तिला पाहिले. अगदी अशक्त, फिकटलेली, मारहाण झालेली अशी ती दिसली. चमकत होते फक्त तिचे डोळे. त्यांत देवाची शक्ती व स्वर्गीय आनंद यांची निरांजने पेटली होती.

होय प्रियांनो, ख्रिस्ताच्या अद्‌भुत शांतीचा ज्यांना अनुभव नाही त्यांना हे कधीच समजणार नाही...पण ज्यांना ही शांती मिळते ते किती सुखी...जे ख्रिस्तात आहेत त्यांना कसलाही छळ, कोणतीच निराशा अडवू शकणार नाही.

लोखंडी गजाआडून मी विचारले, " व्हारिया, तू जे केलेस त्याचा तुला पश्चात्ताप होतो का ? "

" मुळीच नाही," ती म्हणाली, " येथून त्यांनी मला सोडले तर मी पुन्हा जाऊन सर्वांना ख्रिस्ताच्या महान प्रीतीची साक्ष देईन. मला सोसावे लागते, असे वाटून घाऊ नको. प्रभू माझ्यावर एवढे प्रेम करतो आणि त्याच्या नामासाठी सहन करण्याचा आनंद देतो यामुळेच मी अतिशय सुखी आहे. "

तिच्यासाठी अंतःकरणपूर्वक तळमळीने प्रार्थना कर अशी माझी तुला नम्र विनंती आहे. बहुधा तिला ते सायबेरियाला पाठवतील. त्यांनी तिचे कपडे व सर्व वस्तू काढून घेतल्या आहेत. तिच्या अंगावर आहे त्याशिवाय दुसरे तिच्याकडे काहीच नाही. तिला कोणी नातेवाईकदेखील नाहीत. तिला आवश्यक त्या वस्तू आपणच जमवून दिल्या पाहिजेत. तू मला मागे पाठविलेले पैसे मी बाजूला ठेवले आहेत. व्हारियाला तिकडे नेले तर मी ते पैसे तिला देईन व देव तिला सामर्थ्य देईल व पुढेही सर्व सहन करण्यास समर्थ करील असा माझा विश्वास आहे. देव तिचे रक्षण करो.

तुझी मरिया.

चौथे पत्र–

" प्रिय मरिया, अखेर तुला पत्र लिहिण्याची मला संधी मिळाली. आम्ही येथे सुखरूप येऊन पोचलो. शहरापासून आमचा तळ दहा मैल

दूर आहे. येथल्या जीवनाचे वर्णन मला करता येणार नाही. ते कसे असते हे तुला माहीतच आहे. मी माझ्याबद्दल थोडेसेच लिहिणार आहे. देवाने मला निरोगी ठेवले आहे आणि मला काम करता यते याबद्दल मी त्याचे आभार मानते.मी आणि भगिनी 'क्ष', आम्हां दोघींना कारखान्यात कामाला पाठवले. आम्ही येथे यंत्रांवर काम करतो. काम फार अवघड आहे आणि 'क्ष'ची प्रकृती खराब आहे. मला दोघींचेही काम करावे लागते. अगोदर माझे काम मी संपवते व नंतर माझ्या भगिनीला मदत करते. आम्ही दरदिवशी बारा–तेरा तास काम करतो. येथेही अन्नाची परिस्थिती तिथल्याप्रमाणेच आहे–अन्न दुर्मिळच आहे. पण मी काय यासाठी तुला पत्र लिहीत नाही.

तुझ्याद्वारे देवाने मला तारणाचा मार्ग दाखविला म्हणून मी देवाची स्तुती करते व आभार मानते. आता या मार्गावरून चालत असताना मला माझ्या जीवनाचे ध्येय सापडले आहे; मी कोठे जावयाचे, काय करावयाचे व यातना कोणासाठी सहन करावयाच्या हे मला आता समजले आहे. माझ्या अंत:करणात ओसंडून जाणारा तारणाचा आनंद आहे आणि सर्वांना तो सांगावा अशी उत्कट इच्छा मला होत आहे. ख्रिस्तामधील देवाच्या प्रीतीपासून आम्हांला कोण विभक्त करणार? कोणीही, काहीही, तुरुंग अगर यातना हे करू शकणारच नाहीत. आमच्यावर देवाने आणलेल्या प्रसंगांमुळे आमचा विश्वास दृढ होत जातो. माझ्या अंत:करणात देवाची कृपा काठोकाठ भरून ओसंडत आहे. कामाच्या वेळी इतर लोक मला शिव्या देतात, जास्त काम देतात आणि शिक्षा करतात, कारण मी गप्प न राहता प्रत्येकाला ख्रिस्ताने माझ्यासाठी काय केले ते सांगत असते. विनाशगर्तेकडे निघालेल्या मला त्याने नवीन जीवन दिले, नवीन निर्मिती असे केले आहे. इतके झाल्यावरही मी शांत राहीन का? गप्प राहावे का? कधीच नाही! माझे ओठ बोलू शकतात तोपर्यंत मी त्याच्या महान प्रीतीची साक्ष सर्वांना देत राहीन.

आमच्या तळाकडे जाताना मला ख्रिस्तामधले पुष्कळ भाऊ-बहिणी भेटल्या. या बंधूभगिनींना पाहताक्षणीच जाणीव होते की हीदेखील देवाची मुले आहेत आणि आपण आत्मिक बंधनांनी परस्परांशी बांधलेले

आहो. ही गोष्ट किती अद्‌भुत आहे ! बोलण्याची गरजच नाही. केवळ एकदाच पाहिल्याबरोबर हे कोण आहेत हे समजते.

वाटेवर एका स्टेशनमध्ये गाडी थांबली तेव्हा एका स्त्रीने आम्हांला काही खावयास दिले व तीनच शब्द–" देव जिवंत आहे "–बोलून ती निघून गेली.

आम्ही येथे आलो त्या संध्याकाळी (फार उशीरा आम्ही पोचलो ) आम्हांला तळघरातल्या कोठडयांत नेण्यात आले. तिथे होते त्यांना आम्ही " तुम्हांस शांती असो " या शब्दांनी अभिवादन केले. आनंदाची गोष्ट की, चारी कोपऱ्यांतून शब्द आले, " आम्ही तुमचा शांतीने स्वीकार करतो. " आणि त्या पहिल्याच संध्याकाळी आम्ही एका मोठ्या कुटुंबातच आलो असे आम्हांला वाटले.

खरेच, हे कुटुंबच आहे. येथे ख्रिस्तावर स्वतःचा तारक म्हणून विश्वास ठेवणारे अनेकजण आहेत. एकूण कैद्यांपैकी निम्मे विश्वासी आहेत. उत्कृष्ट गायक व सुवार्ता सांगणारे उत्तम वक्ते आहेत. दिवसाचे खडतर काम संपवल्यावर थोडा वेळ आमच्या तारकाच्या चरणापाशी बसून प्रार्थनेत वेळ घालवणे किती आनंदाचे असते ! ख्रिस्तामध्ये सर्वत्र सर्वकाली स्वातंत्र्य मिळते. येथे मी पुष्कळ नवीन सुंदर अशी आत्मिक गीते शिकले. रोज देव मला आपल्या वचनांतून नव्या नव्या गोष्टी शिकवीत आहे. वयाच्या एकोणीसाव्या वर्षी मी प्रथमच ख्रिस्ताचा वाढदिवस साजरा केला. त्या दिवसाची आठवण कधी पुसली जाणार नाही. त्या दिवशी दिवसभर आम्ही काम करीत होतो, तरीही आमच्यातले काही बंधू जवळच्याच नदीवर गेले. तिथे त्यांनी बर्फ फोडून जागा तयार केली. तिथेच रात्री देवाच्या वचनानुसार माझा आणि आणखी इतर सात बंधूंचा बाप्तिस्मा झाला.

आता मी फार सुखी आहे आणि मरिया तूही इथे असतीस तर किती छान झाले असते ! मग मी तुझे जे अपराध मागे केले त्यांची थोडीशी तरी भरपाई केली असती व तुझ्यावर प्रीती केली असती.

पण आपणाला देवाने ठेवले तेथेच राहिले पाहिजे आणि नेमून दिलेले काम करून स्थिर राहिले पाहिजे.

देवाच्या मुलांच्या सर्व कुटुंबाला माझे अभिवादन. तुमच्या सर्वांचे काम माझ्याप्रमाणेच देव आशीर्वादित करील. इब्री १२:१–३ वाच.

येथले बंधुजन तुला शुभेच्छा पाठवीत आहेत. छळामध्येदेखील तू सतत देवाची स्तुती करीत आहेस म्हणून सर्वांना धन्यता वाटते. तू कोणाला पत्र पाठवलेस तर आमच्या शुभेच्छा त्यांना कळव.

तुझी व्हारिया.

**पाचवे पत्र–**

प्रिय मरिया,

अखेर तुला चार ओळी लिहिण्याची ही संधी मिळाली. प्रिय भगिनी, देवाच्या कृपेने मी व भगिनी 'क्ष' निरोगी व चांगल्या आहोत. आता आम्ही......येथे आहोत मग आम्हाला......येथे पाठवणार आणि आम्ही तेथे राहू.

मातेसारखी तू माझी काळजी घेतलीस म्हणून मला तुझे आभार मानू दे. तू आमच्यासाठी तयार करून पाठवलेल्या सर्व वस्तू मिळाल्या. सर्वांत मोलवान वस्तू–पवित्रशास्त्र–तू मला दिलेस त्याबद्दल मी तुझी फार आभारी आहे. सर्वांचे आभार आणि तू इतरांना पत्रे लिहिशील तेव्हा माझ्या शुभेच्छा त्यांना पाठीव. त्यांनी माझ्यासाठी जे केले त्याबद्दल मी फार आभारी आहे.

प्रभूने त्याच्या पवित्र प्रीतीचे रहस्य मला उलगडून दाखवले तेव्हापासून मी फार सुखी झाले आहे. जगात माझ्यासारखे सुखी कोणी नसेलच ! मला सोसावा लागणारा छळ म्हणजे माझ्यावरची विशेष कृपा असे मी समजते. माझ्या विश्वासाच्या पहिल्या दिवसापासूनच प्रभूने त्याच्यासाठी छळ सोसण्याची संधी मला दिली म्हणून मला फार आनंद वाटतो. शेवटपर्यंत प्रभूच्या विश्वासात मी टिकून राहावे म्हणून सर्वांनी माझ्यासाठी प्रार्थना करावी.

प्रभू तुमचे रक्षण करो व पवित्र लढाई तुम्हाला सामर्थ्य देवो.

आम्हांला......येथे पाठवल्यावर पुन्हा पत्र लिहिण्याचा प्रसंग मिळेल. आमची काही काळजी करू नका. आम्ही आनंदी व सुखी आहोत, कारण स्वर्गात आमचे प्रतिफळ मोठे आहे. मत्तय ५:११–१२.

तुझी व्हारिया.

हे व्हारियेचे शेवटचे पत्र. ह्या कॉम्युनिस्ट मुलीला ख्रिस्तलाभ झाला, तिने त्याची साक्ष दिली व तिला गुलाम–कामगार म्हणून राबण्याची शिक्षा झाली. पुढे तिचे काय झाले हे समजले नाही. पण ख्रिस्तावरील तिची अपार प्रीती व तिने दिलेली ही आवेशी साक्ष यावरून यातना सहन करीत विश्वासाने काम करीत राहणाऱ्या भूमिगत मंडळीची अद्‌भुत रमणीयता दिसून येते. कॉम्युनिझमच्या पगड्याखाली एकतृतीयांश जग आज आहे. या सर्व ठिकाणी अशा मंडळ्या कार्य करीत आहेत.

# प्रकरण सातवे

## भूमिगत मंडळीच्या नावाने माझा तुम्हाला संदेश

"भूमिगत मंडळीचा आवाज" असे मला म्हणण्यात येते. ख्रिस्ताच्या शरीराच्या एवढ्या आदरणीय भागाचा आवाज होण्यास मी पात्र नाही.

कॉम्युनिस्ट देशांमध्ये काही काळ मी भूमिगत मंडळीच्या एका भागाचा पुढारी होतो. चौदा वर्षांच्या घोर यातनामय तुरुंगवासातून मी वाचलो हा एक चमत्कारच आहे. यातली दोन वर्षे तर मी "मृत्यू कोठडीत" काढली. याहीपेक्षा मोठा चमत्कार म्हणजे देवाने तुरुंगातून माझी मुक्तता केली आणि पश्चिमेकडच्या देशातील स्वतंत्र मंडळीशी बोलण्याची संधी दिली.

माझे असंख्य बांधव थडग्यात चिरनिद्रा घेत आहेत. त्यांची थडगी कोठे आहेत ते कोणाला माहीत नाही. त्या थडग्यांवर नावे

नाहीत की काही नाही, अशा सर्व बांधवांच्या नावाने मी बोलत आहे. जे माझे बांधव गुप्तपणे उपासना करण्यासाठी जंगलांत, तळघरांत, माळयांवर आणि अशाच जागी गोळा होतात त्यांच्या वतीने मी तुमच्याशी बोलत आहे.

मी माझा देश रुमानिया सोडून बाहेर जाण्याचा प्रयत्न करावा, जगातील स्वतंत्र ख्रिस्ती लोकांना एक संदेश द्यावा असे येथल्या भूमिगत मंडळीने ठरविले. केवळ चमत्कार घडल्यानेच मी बाहेर येऊ शकलो आणि आता माझ्यावर सोपवलेले कार्य मी पूर्ण करीत आहे. हे कार्य ज्यांनी मला सोपवले ते लोक आजही कॉम्युनिस्ट प्रदेशात काबाडकष्ट करीत आहेत, यातना सहन करीत धोका पत्करून जगत आहेत, मरत आहेत.

मी आणलेला भूमिगत मंडळीचा संदेश आहे:

"आमचा त्याग करू नका!"

"आम्हांला विसरू नका!"

"आम्ही संपलो असे म्हणू नका!"

"आम्हांला आवश्यक ती साधने द्या! आम्ही त्यांचा उपयोग करू आणि त्यांची किंमत भरू!"

हाच निरोप तुम्हाला द्यावा म्हणून मला नेमलेले आहे.

मुस्कटदाबी केलेल्या मंडळीच्या वतीने, ज्या मंडळीला बोलता येत नाही अशा 'मुक्या' मंडळीच्या वतीने मी बोलत आहे. कॉम्युनिस्ट प्रदेशातील तुमच्या बंधुभगिनींचा हा करुण आवाज ऐका! त्यांना तेथून पळून यायचे नाही, आपले रक्षण करा अगर आरामात जीवन जगू द्या असे ते मागत नाहीत. त्यांच्या मुलांमुलींवर विषारी संस्कार होत आहेत, नास्तिकवादाचे विष पुढच्या पिढीत भिनविले जात आहे. ह्या विषाचा नायनाट करण्यासाठी त्यांना हवी आहेत साधने! ही साधने म्हणजे पवित्रशास्त्राच्या प्रती. त्यांच्या साहाय्याने ते देवाचे वचन सर्वत्र प्रसारित करू शकतील. देवाचे वचनच जवळ नसेल तर त्याचा प्रसार तरी कसा व्हावा?

भूमिगत मंडळी एका शस्त्रवैद्याप्रमाणे आहे. हा शस्त्रवैद्य आग-

गाडीने प्रवास करीत होता. ही आगगाडी दुसऱ्या एका आगगाडीवर आदळली. शेकडो लोक या अपघातात जखमी झाले, काही मरणाच्या पंथास लागलेले होते, काहींचे हातपाय गेले होते. हा शस्त्रवैद्य त्या मरणोन्मुख माणसांमधून ओरडत फिरत होता, "आता माझी शस्त्रक्रियेची हत्यारे असती तर . . . माझी शस्त्रक्रियेची साधने आता असती तर ! " त्याची हत्यारे असती तर त्याने अनेकांचे प्राण वाचविले असते. लोकांचे प्राण वाचवण्याची त्याची तयारी होती पण त्याच्याजवळ हत्यारेच नव्हती. आज भूमिगत मंडळीची स्थिती अशीच आहे. जवळचे सर्व काही खुषीने देण्यास ती तयार आहे. तिचे सभासद हुतात्मे होण्यास तयार आहेत, कॉम्युनिस्ट तुरुंगात वर्षानुवर्षे खितपत पडण्यास तयार आहेत. पण ही सर्व तयारी व्यर्थ आहे, कारण तिच्याकडे साधने नाहीत. म्हणून या धैर्यशाली भूमिगत मंडळीची तुम्हांला स्वतंत्र ख्रिस्ती लोकांना एकच कळकळीची विनवणी आहे, " आम्हांला साधने द्या--शुभवर्तमाने, पवित्र शास्त्र, ख्रिस्ती वाङ्मय--एवढ्यांची मदत आम्हांला द्या, बाकी कार्य आम्ही करू ! "

## स्वतंत्र ख्रिस्ती लोकांनी कसे साहाय्य करावे

प्रत्येक स्वतंत्र ख्रिस्ती व्यक्तीला पुढील गोष्टी ताबडतोब करता येतील.

आपल्या जीवनाचे काही अदृश्य, अनाकलनीय असे अधिष्ठान आहे, हे न मानणारे लोक म्हणजेच नास्तिक. विश्व व जीवन यांमधील गूढ रहस्याविषयी त्यांच्या मनात काहीच जाणीव नसते. ख्रिस्ती लोक अशांना या रहस्याची जाणीव करून देऊ शकतील. यासाठी त्यांनी बाह्यरूपावर दृष्टी न ठेवता अंतर्मुख होऊन विश्वासाने वागावयास हवे. आणि अदृश्य देवाबरोबर सहभागीपणात जगावयास हवे.

त्यागमय ख्रिस्ती जीवन सतत जगून ते आम्हांला साहाय्य करू शकतील. ख्रिस्ती लोकांचा कोठेही छळ झाला तरी त्यांनी त्याविरुद्ध सार्वजनिक निषेध केला पाहिजे.

पाश्चिमात्य ख्रिस्ती लोकांनी कॉम्युनिस्टांचे तारण व्हावे म्हणून प्रार्थना केली पाहिजे. अशी प्रार्थना करणे कोणाला बालिशपणाचे वाटेल,

आम्ही कॉम्युनिस्टांसाठी प्रार्थना केल्यावर दुसऱ्या दिवशी ते आमचा अधिकच छळ करीत. पण यरुशलेमाच्या प्रभूची प्रार्थनाही अशीच होती. प्रार्थना संपल्यावर त्यांनी त्याला वधस्तंभावर चढविले. पुढे थोड्याच दिवसांनी त्यांनी ऊर बडवून घेतले आणि एका दिवसात पाच हजारांचे तारण झाले, आणि इतरांसाठीही ती प्रार्थना निष्फळ ठरली नाही. ज्याच्यासाठी मध्यस्थीची प्रार्थना केली असेल त्या व्यक्तीने तिचा मान केला नाही तर ती प्रार्थना अधिक आशीर्वादासह तुमच्याकडे परत येते व प्रार्थना ज्याच्यासाठी केलेली असेल त्याला ती शापासमान होते. ख्रिस्ताच्या वचनाप्रमाणे इतर अनेक ख्रिस्ती बांधवांसह मी हिटलरसाठी प्रार्थना करीत होतो. आणि माझी खात्री आहे की दोस्त सनिकांच्या गोळ्यांनी त्याचा पराभव झाला त्याचप्रमाणे आमच्या प्रार्थनाही त्याला कारणीभूत झाल्या.

आमच्या शेजाऱ्यांवरही स्वतःप्रमाणेच प्रीती केली पाहिजे. इतर शेजाऱ्यांप्रमाणेच कॉम्युनिस्टही आपले शेजारीच आहेत.

ख्रिस्ताची वचने पाळली नाहीत म्हणूनच कॉम्युनिस्टांची पैदास झाली. ख्रिस्ताचे वचन आहे : "त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून मी आलो आहे." ख्रिस्ती लोकांनी अजूनपर्यंत प्रत्येकासाठी विपुल जीवनाची संधी दिलेली नाही. जीवनातील मोलवान गोष्टींच्या निकटच पण बाहेर असे त्यांनी अनेकांना ठेवले आहे. याच लोकांनी बंड करून कॉम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. यातले लोक साधारणपणे सामाजिक विषमतेचे बळी असतात, म्हणून त्यांच्यात क्रौर्य व द्वेष दिसतो. त्यांच्याविरुद्ध आपणांस लढायचे आहे. पण ख्रिस्ती लोक लढतात तेव्हा ते लढतानाही शत्रूला समजून घेऊन त्याच्यावर प्रीती करतात.

काही लोक कॉम्युनिस्ट बनले याचा दोष आपणांवर येतोच. कमीत कमी कर्तव्यामध्ये दुर्लक्ष केल्याचा दोष तरी आपल्या पदरी येतोच. याचे प्रायश्चित्त म्हणून आपण त्यांच्यावर प्रीती केली पाहिजे आणि त्यांच्यासाठी प्रार्थना केली पाहिजे (प्रीती करणे व आवड असणे या दोन्ही गोष्टी भिन्न अशाच आहेत).

कॉम्युनिस्ट प्रश्न सोडवण्यासाठी प्रीती पुरेशी आहे असा माझा पोरकट समज नाही. गुंडगिरीचा प्रश्न सोडविण्यास प्रेमाचा प्रयोग करा, असे मी कोठल्याच सरकारला सांगणार नाही. पोलिस दल, न्यायाधीश, तुरुंग, या गोष्टी गुंडांशी सामना करण्यास आवश्यक आहेत. गुंडांना पश्चात्ताप होत नसेल तर त्यांना तुरुंगातच टाकले पाहिजे. कॉम्युनिस्ट लोकही या गुंडांसारखेच आहेत त्यामुळे कॉम्युनिस्टांविरुद्ध चाललेल्या राजकीय, आर्थिक अगर सांस्कृतिक लढाया थांबवाव्या म्हणून मी ख्रिस्ती प्रेमाचे शब्द वापरणार नाही. कॉम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय गुंड आहेत ! गुंड फार तर पैशाचे पाकीट चोरील पण हे देशच्या देश चोरतात !

असे असले तरीही प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने व पाळकाने कॉम्युनिस्टांना व त्यांच्या निरपराधी बळींना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. मग त्यांनी कसलेही गुन्हे केलेले असोत. या सर्वांसाठी ख्रिस्ती मनुष्याने समजूतदारपणे प्रार्थना केली पाहिजे.

## पवित्रशास्त्र व शुभवर्तमाने यांची अत्यंत गरज आहे

पवित्रशास्त्र व त्याचे भाग पाठवून स्वतंत्र ख्रिस्ती लोक आम्हांला दुसऱ्या प्रकारे साहाय्य करू शकतील. कॉम्युनिस्ट देशांमध्येही ख्रिस्ती वाङ्मय पाठवण्याचे सुरक्षित मार्ग आहेत. मी इकडे आल्यापासून पवित्रशास्त्राच्या अनेक प्रती पाठवल्या आणि त्या तेथे सुखरूप पोचल्या. मार्ग आहेत, मात्र तुम्ही आपल्या भूमिगत मंडळीतील बंधुभगिनींच्या हाती देवाचे वचन पडावे यासाठी वाङ्मय पाठवले पाहिजे. रुमानियात असतानाच विविध मार्गांनी मिळवलेल्या पवित्रशास्त्राच्या अनेक प्रती मी वाटल्या होत्या. पवित्रशास्त्र पाठवायचे कसे हा प्रश्न नसून त्याच्या प्रती मिळवणे हे महत्त्वाचे आहे. येथे त्यांची अत्यंत गरज आहे. रशियामध्ये व इतर कॉम्युनिस्ट देशांमध्ये हजारो ख्रिस्ती लोक आहेत की त्यांनी गेल्या पंचवीस ते पन्नास वर्षांत पवित्रशास्त्र पाहिलेसुद्धा नाही !

एक दिवस माझ्या घरी घाणेरडा पोषाख घातलेले दोन खेडूत आले. ते आले होते कामासाठी. काम होते हिवाळाभर बर्फ उकरून रस्ते वाहतुकीस योग्य ठेवायचे, आणि त्यांची इच्छा होती या कामाच्या मजुरीतून एक जुने पुराणे पवित्रशास्त्र विकत घेण्याची ! त्यांच्या गावात

कोणाकडेच पवित्रशास्त्र नव्हते. मला अमेरिकेहून काही प्रती मिळाल्या होत्या. त्यांतील एक नवी प्रत मी त्यांना दिली. त्यांचा विश्वासच बसेना! बर्फ उकरून मिळवलेले पैसे ते मला देऊ लागले. मी पैसे घेतले नाहीत. ते आपल्या गावाला गेले आणि काही दिवसांनी माझे आभार मानणारे एक पत्र मला मिळाले. त्यांनी आपला आनंद मुक्तपणे व्यक्त केला होता. या पत्रावर तीस खेडुतांच्या सह्या होत्या ! त्यांनी त्या पवित्रशास्त्राचे काळजीपूर्वक तीस भाग केले होते आणि ते आपसात वाटून घेऊन आळीपाळीने वाचत होते !

एखादा रशियन माणूस पवित्रशास्त्राच्या एका पानाची भीक मागताना पाहून हृदय करुणेने भरून येते. हे पानच त्याच्या आत्म्याचे अन्न आहे. पवित्रशास्त्रासाठी ते एखादी गाय अगर मेंढी देण्यासही तयार असतात. एक जुना, जीर्ण नवा करार मिळविण्यासाठी माझ्या ओळखीच्या एका माणसाने आपली लग्नातली अंगठी दिली. आमच्या मुलांनी कधी एकही नाताळ भेटकार्ड पाहिलेले नाही. केव्हा एखादे चुकून मिळालेच तर गावातली सर्व मुले एकत्र जमून ते पाहतात आणि एखादा वृद्ध त्यांना त्या कार्डावरील चित्रांची गोष्ट सांगतो. येशू बाळ, त्याची आई–कुमारी मरिया–आणि मग पुढची तारणाची गोष्टही सांगितली जाते. हे सर्व एका नाताळभेटकार्डाने साध्य होते ! पवित्रशास्त्राच्या प्रती, शुभवर्तमाने, ख्रिस्ती वाङ्मय,भेटकार्डही पाठवून तुम्ही मदत करू शकाल.

बालवर्ग ते विश्वविद्यालयापर्यंत सर्वत्र मुलांना–मुलींना नास्तिकवादाचे कटु शिक्षण दिले जाते. त्याला प्रतिरोध करण्यासाठी आपण विशेष प्रकारचे वाङ्मय छापून पाठवावयास हवे. "नास्तिकाचा वाटाड्या" नावाचे एक पुस्तक कॉम्युनिस्टांनी प्रसिद्ध केले आहे. हे म्हणजे "नास्तिकांचे पवित्रशास्त्र". या "वाटाड्याच्या" अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या आवृत्त्या आहेत. त्यामध्ये प्राथमिक व प्रगत असे प्रकार असून विद्यार्थी वरच्या वर्गात जातील त्याप्रमाणे अधिक प्रगत आवृत्ती शिकवण्यात येते. हे "सैतानी शास्त्र" लहापणापासून मोठे होईपर्यंत प्रत्येकाचा पाठपुरावा करते आणि त्याचे मन नास्तिकतेच्या विषाने पूर्ण भरून टाकते. ख्रिस्ती वाङ्मयात या प्रकारच्या पुस्तकाला प्रत्युत्तर असे अजून काहीही प्रसिद्ध

करण्यात आलेले नाही. या पुस्तकाला प्रत्युत्तर देणारे पुस्तक लिहिता येईल. नास्तिकवादाच्या विषारी वक्त्यास ख्रिस्ती उत्तर देणे हे आपले कर्तव्य आहे आणि ते आपण पार पाडलेच पाहिजे. ही गोष्ट ताबडतोब केली पाहिजे, कारण विषारी शिक्षण मिळत असलेल्या या मुलांच्या हाती द्यावयास भूमिगत मंडळीजवळ कसलेच साहित्य नाही. भूमिगत मंडळीच्या हाती विविध भाषांतील असले साहित्य जोवर पडत नाही तोपर्यंत तिचे हात बांधलेलेच राहणार.

या तरुणांची भ्रष्ट मने शुद्ध करण्यासाठी, त्यांना पाहिजे आहे ते उत्तर–ख्रिस्ताचे उत्तर–देवाचे उत्तर–आमचे उत्तर द्यावयास हवे. येथेही तुम्ही साहाय्य करू शकाल. नास्तिकवादाला उत्तर अशी मासिके, पुस्तके, सचित्र पुस्तके, मुलांसाठी प्रसिद्ध केलेले पवित्रशास्त्र वगैरे साहित्य तुम्ही पाठवू शकाल.

आवश्यक अशी चौथी गोष्ट म्हणजे भूमिगत मंडळीचे हात बळकट करणे, त्यांच्याशी "हात मिळवणे", प्रवास करून वैयक्तिक प्रत्यक्ष सुवार्ताप्रसार करण्यासाठी त्यांना आर्थिक साहाय्य हवे आहे. या क्षणी वचनाचे अनेक सेवक आपल्या जागी "बांधलेले" आहेत. रेल्वे व बस भाडेखर्च व प्रवासातील अन्नखर्च यासाठी पैशांची जरुरी आहे. आज तीस चाळीस मैलांवरच्या गावातून त्यांना गुप्त सभेसाठी निमंत्रणे येत आहेत, पण जावयास भाडेखर्चाएवढेही पैसे मिळू शकत नाहीत, हे केवढे दुर्दैव ! महिन्याला काही रुपये ( १००–२०० ) दिले तर आम्ही त्यांना "बंधमुक्त" करू शकू–म्हणजे त्यांना ही निमंत्रणे स्वीकारून देवाचे वचन अधिक उत्साहाने गरजू लोकांना सांगता येईल.

आपल्या विश्वासासाठी पूर्वीच्या पाळकांना तुरुंगवास सोसावा लागला आहे; त्यांच्याकडे ज्वलंत सुवार्ता संदेश आहे, हरवलेल्या आत्म्यांसंबंधी त्यांना अतिशय कळकळ आहे. पण हा संदेश गावोगावी जाऊन सांगायचा कसा ? त्यांच्याकडे काहीच साधन नाही. दरमहा काही पैसे त्यांना मिळाले तर ही गोष्ट साध्य होईल.

इतर ख्रिस्ती बांधवांनाही मदत हवी आहे. ते ख्रिस्ती आहेत म्हणून त्यांना जेमतेम जगण्यापुरतेच उत्पन्न मिळते. त्यांनाही सुवार्ता

प्रचारासाठी खेडोखेडी व गावोगावी फिरता येत नाही.थोडेसे पैसे त्यांच्याद्वारे " मोठा चमत्कार " घडवून आणतील.

अधिकृत मंडळीचे जे पाळकही मोठा धोका पत्करून गुप्तपणे सुवार्ताकार्य करीत असतात, त्यांनाही या कार्यासाठी वेगळ्या पैशांची गरज आहे. सरकारने त्यांना मंजूर केलेला पगार अतिशय तुटपुंजा आहे. कॉम्युनिस्ट फर्मानांना न जुमानता गुप्त सभा भरवून तरुणांना,मुलांना, प्रौढ लोकांना, सर्वांना सुवार्ता सांगण्यास ते नेहमीच तयार असतात. पण एवढेच पुरेसे नाही. ही गुप्त सेवा उत्तम प्रकारे करावयाची तर त्यांना योग्य ते साधन दिले पाहिजे.

दरमहा शंभर-दोनशे रुपयांत भूमिगत मंडळीच्या अशा सभासदाला परिणामकारकपणे सुवार्ताकार्य करता येईल. भूमिगत मंडळीला साहाय्य करण्याचा हा आणखी एक मार्ग आहे.

या पुढचा पायरी म्हणजे नभोवाणीवरून कॉम्युनिस्ट देशांत सुवार्तासंदेश प्रसारित करणे. स्वतंत्र जगातील नभोवाणीकेंद्रांचा वापर करून भुकेलेल्या भूमिगत मंडळीला आपण ही " जीवनाची भाकरी " देऊ शकू. कॉम्युनिस्ट लोक लघुलहरींचा वापर करून कॉम्युनिझमचे प्रचारकार्य करीत असतात त्यामुळे लक्षावधी रशियनांकडे आणि त्यांच्या सत्तेखालच्या लोकांकडे रेडिओ आहेत. त्यावरून हे सुवार्तासंदेश ऐकता येतील. कॉम्युनिस्ट प्रदेशांत असे संदेश प्रसारित करण्यास आता संधी आहे. मात्र ह्या कार्याला योग्य चालना दिली पाहिजे. हे नभोवाणी संदेश म्हणजे आत्मिक अन्न-आणि आपण ते भूमिगत मंडळीला पुरवले पाहिजे. कॉम्युनिस्ट प्रदेशातील भूमिगत मंडळीला साहाय्य करण्याचा हा आणखी एक मार्ग.

## ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबाची शोकान्तिका

जे ख्रिस्ती हुतात्मे बनले आहेत त्यांच्या कुटुंबियांना आपण साहाय्य केले पाहिजे. आज अशी हजारो कुटुंबे हालअपेष्टा भोगीत दीनवाणे जीवन कंठीत आहेत. त्यांचे दैन्य व हाल वर्णन करणेदेखील शक्य नाही. कोणत्याही ख्रिस्ती कुटुंबातील प्रमुख व्यक्तीला पकडले की त्या घरावर दु:खाची काळी सावली पडलीच असे समजावे. कोणी त्यांना मदत करू

शकत नाही कारण ते बेकायदेशीर आहे. मागे राहिलेल्या पत्नीची व मुलांची उपासमार व्हावी यांसाठीच कॉम्युनिस्टांनी ही योजना केलेली आहे. एखादा ख्रिस्ती माणूस तुरुंगात–मृत्यूकडे–किंवा यातनांकडे गेला की कुटुंबाच्या छळाला केवळ सुरुवात होते आणि या यातनांना अंत नाही हे मी माझ्या अनुभवाने सांगत आहे. जगातल्या सामान्य ख्रिस्ती लोकांनी मला व माझ्या कुटुंबाला मदत पाठविली नसती तर आम्ही जगलो नसतो आणि हे शब्दही मला लिहिता आले नसते !

रशियामध्ये व इतरत्र आताच मोठ्या प्रमाणावर ख्रिस्ती लोकांच्या धरपकडीला व छळाला पुन्हा सुरुवात झाली आहे. अनेक लोक हुतात्मे बनत आहेत. त्यांना मृत्यू येतो व स्वर्गात त्यांना योग्य ते प्रतिफळ मिळते, हे खरे असले तरी मागे राहिलेले त्यांचे कुटुंब मात्र हीनदीन असे होते. आपण त्यांना साहाय्य केलेच पाहीजे. उपासमारीने मरणारे आफ्रिकन व जगातील इतर लोक यांनाही आपण साहाय्य करावयास हवे पण कॉम्युनिस्टांच्या तुरुंगात विश्वासासाठी प्राणत्याग केलेल्यांच्या कुटुंबियां-हून ख्रिस्ती लोकांची मदत मिळवण्यास अधिक पात्र कोणी आहे का ?

माझी सुटका झाल्या दिवसापासून युरोपिअन ख्रिश्चन मिशन या संस्थेने ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबियांसाठी बरीच मदत पाठविली आहे. पण जे झाले आहे ते अगदी अल्प आहे. तुमच्या साहाय्याने किती तरी जास्त करता येईल.

भूमिगत मंडळीचा एक जगून वाचून निसटून आलेला सभासद या नात्याने मी तुम्हांपुढे उभा आहे. मी ज्या बांधवांना मागे सोडून आलो आहे त्यांच्या वतीने मी तुम्हांला विनंती करीत आहे. त्यांचा निरोप तुम्हापर्यंत पोचवीत आहे.

हा संदेश तुम्हांला द्यावा म्हणून त्यांनी मला पाठवले आहे. हा संदेश देण्यासाठी मी अजून जिवंत राहिलो हादेखील मोठाच चमत्कार आहे.

कॉम्युनिस्ट जगामध्ये ख्रिस्तसंदेशाचा प्रसार करण्याची किती निकड आहे हे मी तुम्हांला स्पष्टपणे सांगितलेच आहे. ख्रिस्ती हुता-त्म्यांच्या कुटुंबांना मदत करण्याची आवश्यकताही मी प्रतिपादन केली

आहे. भूमिगत मंडळीने आपले सुवार्ताप्रसाराचे कार्य जोमाने पुढे चालू ठेवावे यासाठी तुम्हांला काय करता येईल हेही मी तुम्हांला सांगितलेच आहे.

माझ्या तळपायावर मार बसला तेव्हा माझी जीभ ओरडली असे का? माझ्या जिभेला काही मार बसला नव्हता. ती ओरडली, कारण जीभ व पाय हे एकाच शरीराचे भाग आहेत. तुम्हीही जे स्वतंत्र ख्रिस्ती आहात ते व जे आज कॉम्युनिस्ठ तुरुंगांत व देशात यातना भोगत आहेत ते सर्व एकाच ख्रिस्तशरीराचे भाग–अवयव–आहेत. आमच्या दुःखाची तुम्हांला जाणीव होत नाही का ?

आज कॉम्युनिस्ट जगामध्ये प्राचीन मंडळीचा उदय झाला आहे. तिचा विश्वास, तिचा त्याग व तिचे सौंदर्य यांना आजच्या जगात जोड नाही.

गेथशेमाने बागेत येशू यातनामय प्रार्थना करीत होता. पलिकडेच पेत्र, याकोब व योहान झोपले होते. त्यांच्यानजीकच मोठा ऐतिहासिक संघर्ष घडत होता. पण हे गाढ झोपी गेले होते. त्यांना कसली जाणीवच नव्हती. तुमची ख्रिस्ती कळकळ व ख्रिस्ती दान यातून हुतात्मे बनणाऱ्या मंडळीच्या वाट्याला कितीसे येते ? पोलादी पडद्यामागे खितपत पडलेल्या ख्रिस्ती बंधुभगिनींसाठी तुमची मंडळी काय करीत आहे हे तुमच्या पाळकांना, मंडळीतील कार्यकर्त्यांना विचारा.

पोलादी पडद्यामाग आज प्राचीन मंडळीला सोसावी लागलेली सर्व दुःखे, सर्व जय, सर्व पराजय आजही तेथे प्रत्ययास येत आहेत. इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे–आणि स्वतंत्रतेत जगणाऱ्या मंडळचा झोपा काढीत आहेत.

आपले तेथले बांधव एकाकी,कोणाच्या साहाय्याशिवाय या विसाव्या शतकातील सर्वांत मोठा लढा धैर्याने लढत आहेत. त्यांच्या या धैर्याची, या विश्वासाची, या जिद्दीची तुलना फक्त प्राचीन मंडळीशीच करता येईल. आणि मुक्त मंडळी मोकळेपणे–निर्धास्तपणे–झोप घेत आहे; तिला या यातनांची, या झगड्याची जाणीवच नाही. आपला तारक तो यातनामय संघर्ष अनुभवत असताना पेत्र, याकोब व योहान हे झोपलेच होते

तसेच ही आजची मंडळी करीत आहे.

ही भूमिगत मंडळी, हे तुमचे ख्रिस्ती बांधव सुवार्तेसाठी एकाकीपणे यातना भोगीत असताना तुम्हीही झोपून राहणार का ?

" आमची आठवण ठेवा, आम्हांला साहाय्य द्या, " ही आमची हाक तुम्हा ऐकणार नाही का ?

" आमचा त्याग करू नका ! ' आता हा माझा संदेश पूर्ण होत आहे. हा संदेश विश्वासू भूमिगत मंडळीकडून आलेला आहे. कॉम्युनिस्ट देशांत नास्तिकवादी कॉम्युनिझमच्या दास्यात खितपत पडलेल्या तुमच्या बांधवांचा हा संदेश आहे.

******

पत्रव्यवहारासाठी लेखकाचा पत्ता :

**THE LOVE IN ACTION SOCIETY**

P.O. Box 4532, New Delhi 110016

कॉम्युनिस्ट देशांतील मिशनरी सेवेसाठी व ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कुटुंबासाठी देणग्या अगर साहाय्य पाठवावयाचे तेही वरील पत्त्यावर पाठवावे. मात्र " कॉम्युनिस्ट देशातील सेवेसाठी " ( Funds for the Communist World ) असा उल्लेख करावा.

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने म्हटले आहे, "कॉम्युनिस्टांच्या तुरुंगातील ख्रिस्ती कैद्यांना २५ किलोपेक्षा जास्त वजनाच्या बेड्यांनी जखडलेले मी पाहिले आहे. लाल भडक तापवलेल्या लोखंडाने डाग देणे, तोंडाला मिठाचा तोबरा देऊन तहानेने व्याकूळ करणे, चाबूक मारणे, उपासमार करणे, अशा प्रकारचे अत्याचार ख्रिस्ती कैद्यांवर होत. तरीही थंडीने काकडणारे हे ख्रिस्ती कैदी कॉम्युनिस्टांसाठी प्रार्थना करीत. केवढे आश्चर्य ! मानवी बुद्धीला हे केवळ अगम्य आहे. त्यांच्या हृदयांत ओतप्रोत भरलेल्या ख्रिस्तप्रभूच्या प्रेमामुळेच हे शक्य झाले."